(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.योगेश सागर)

पृ.शी./मु.शी.: तोंडी प्रश्नोत्तरे.

(१) ***५२०५६** ***श्री.त्र्यंबकराव* भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित देशमुख (लातूर शहर)*:*** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) **लातूर** जिल्ह्यातील दुष्काळाची दाहकता वाढत असून लातूर एमआयडीसीतील सुमारे ६०० तर इतर तालुक्यातीललसुमारे ६०० असे एकूण १२०० उद्योग असून त्यापैकी सुमारे ५० टक्के उद्योग पाण्याअभावी बंद पडल्याचे माहे **फेब्रुवारी,** २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले **आहे,** हे खरे आहे **काय,**

(२) **असल्यास,** जिल्ह्यातील या उद्योगांमध्ये सुमारे २० हजार कामगार कार्यरत असून यातील निम्मे उद्योग बंद केल्यामुळे दहा हजार मजुरांवर बेकारीची वेळ आली असून सदर प्रश्नाची तीव्रता लक्षात घेता राज्य शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करणार **आहे,**

(३) **नसल्यास,** विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) हे अंशतः खरे आहे.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे **लातूर,** अतिरिक्त लातूर व औसा औद्योगिक क्षेत्राला पाणीपुरवठा करण्यात येत होता. **तथा प,** मांजरा धरणातील पाणीसाठा संपला असल्यामुळे सदर औद्योगिक क्षेत्राचा पाणीपुरवठा बंद झालेला आहे. **तथा प,** महामंडळाने सदर औद्योगिक क्षेत्रात पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत.

१) पाणी टंचाईच्या काळात किमान पिण्यासाठी पाणी उपलब्ध होणेसाठी महामंडळातर्फे औद्योगिक क्षेत्रात विविध ठिकाणी विंधन विहिरी घेण्यात येत आहेत.

२) लातूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना त्यांचे मागणीप्रमाणे व भूजल सर्वेक्षण विभागाच्या शिफारशीनुसार विंधन विहिरी खोदण्याची परवानगी देण्यात येते.

३) महामंडळाने लातूर महानगरपालिका व जिल्हा **प्रशासन,** लातूर यांना इतर स्त्रोतातून पिण्यासाठी पाणी पुरवठा करण्याची मागणी केली आहे.

४) महामंडळाने वरिष्ठ **भूवैज्ञानिक,** भूजल सर्वेक्षण आणि विकास **यंत्रणा,** लातूर यांनी सुचविलेल्या ठिकाणी विंधन विहिरी खोदण्याची परवानगी दिलेली आहे.`

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

04-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-2

SVK/ ST/ AKN/ 11:00

ता.प्र.क्र.52056.....

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आज डिमांड आहेत याची कल्पना आम्हाला आहे. आम्ही स्थगन प्रस्ताव दिलेला आहे. प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर आम्हाला स्थगन प्रस्ताव मांडण्याची संधी मिळावी. प्रश्नोत्तराच्या तासाला संबंधित मंत्री महोदय उपस्थित नाहीत. सभागृह तहकूब करावे. याबाबत मंत्री महोदयांनी दिलगिरी व्यक्त केली पाहिजे.

श्री.सुभाष देसाई (उद्योग) : अध्यक्ष महोदय, मी सभागृहात उशीरा आल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझी उत्तराला हरकत अशी आहे की, मंत्री महोदयांबद्दल पूर्ण आदर आहे. मला असे वाटते आज काल आपण कदाचित सहया करताना वाचत नसावेत. मेक इन महाराष्ट्रामुळे कदाचित झाले असेल मला माहित नाही. लातूर जिल्हयातील दुष्काळाची दाहकता वाढत असून एमआयडीसीतील सुमारे 600 व इतर तालुक्यातील 600 असे एकूण 1200 उद्योग असून त्यापैकी 50 टक्के उद्योग पाण्याअभावी बंद पडल्याचे माहे फेब्रुवारी 2016 मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे का ? याचे उत्तर देताना मंत्री महोदयांनी अंशतः खरे आहे असे लिहिले आहे आणि खाली उत्तर देताना म्हणतात, किमान पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी विंधन विहीरी घेण्यात येत आहेत. भूजल सर्वेक्षणला आदेश देण्यात आलेले आहेत. नगरपालिका महानगरपालिकेला विनंती करण्यात आलेली आहे. प्रश्न इंडस्ट्रीज बंद पडण्याच्या संदर्भातील आहे. हा प्रश्न पिण्याच्या पाण्याच्या संदर्भातील नाही. त्यामुळे मला असे वाटते की, मिसलिडिंग उत्तर आहे. सर्वांनी लातूर शहराची, जिल्हयाची परिस्थिती काय आहे हे माहित आहे. तुम्ही जर असे उत्तर दिले असते की, होय पाण्याची टंचाई आहे. पाण्याची टंचाई असल्यामुळे उद्योग बंद आहेत किंवा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. आम्हाला असे उत्तर चालले असते. विसंगत असे उत्तर दिलेले आहे. मी याच्यामध्ये मंत्री महोदयांची चूक मानीत नाही. माझी हरकत याच्यावर आहे की, हे उत्तर पिण्याच्या पाण्याच्या संदर्भातील नाही. हे उत्तर इंडस्ट्री बंद पडते आहे का ? याच्या संदर्भातील आहे. म्हणून हा प्रश्न माननीय उद्योग मंत्र्यांना गेला नाही तर हा प्रश्न माननीय पाणीपुरवठा मंत्र्यांना गेला असता. हे उत्तर मंत्री महोदयांनी दुरुस्त करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.52056.....

तालिका सभाध्यक्ष : मंत्री महोदय आपल्याला उत्तर दुरुस्त करायचे आहे का ?

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, मी सर्व पुरक प्रश्नांना उत्तरे दिल्यानंतर जर आवश्यकता असेल तरी शिल्लक राहिले तर नक्की दुरुस्त करु

तालिका सभाध्यक्ष : आपण उत्तर दुरुस्त करायचे आहे किंवा नाही एवढेच विचारु शकता. मंत्री महोदयांना विचारा की उत्तर दुरुस्त करायचे आहे का ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, आपल्या सभागृहाची परंपरा आहे की, एखादे दिलेले उत्तर जर चुकीचे आहे असे दाखविण्याचा प्रयत्न सन्माननीय सदस्याने केला तर मंत्री महोदयांना अजूनही ते उत्तर दुरुस्त करायला संधी आहे. माझा मंत्री महोदयांना असा प्रश्न आहे की, हे उत्तर आपल्याला दुरुस्त करावयाचे आहे किंवा नाही ?

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, प्रश्नाचे उत्तर अपूर्ण असेल तर ते मी उप प्रश्नातून पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. त्यातूनही आपले समाधान झाले नाही ....

श्री.दिलीप वळसे-पाटील : आपण दिलेले उत्तर आपल्याला दुरुस्त करावयाचे आहे किंवा नाही ? जे विभागाने लेखी उत्तर दिलेले आहे हे उत्तर आपल्याला योग्य आहे असे वाटत असेल सांगावे मला काही दुरुस्त नाही करावयाचे. अयोग्य वाटत असेल त्यामध्ये दुरुस्ती करावयाची असेल तर करावी.

श्री.सुभाष देसाई : हे उत्तर योग्य आहे.

श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय उद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय, लातूर जिल्हयातील दुष्काळाची दहकता वाढत असून लातूर एमआयडीसीतील सुमारे 600 इतर तालुक्यातील सुमारे 600 असे एकूण 1200 उद्योग असून त्यापैकी सुमारे 50 टक्के उद्योग पाण्याअभावी बंद पडल्याचे माहे फेब्रुवारी, 2016 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ? असल्यास, जिल्हयातील या उद्योगांमध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.त्र्यंबकराव भिसे.....
सुमारे 20 हजार कामगार कार्यरत असून यातील निम्मे उद्योग बंद केल्यामुळे दहा हजार मजुरांवर बेकारीची वेळ आली असून सदर प्रश्नाची तीव्रता लक्षात घेता राज्य शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करणार आहे ?

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी प्रश्नाचे वाचन करु नये. कृपया प्रश्न विचारावा.

श्री.त्र्यंबकराव भिसे : अध्यक्ष महोदय, लातूर एमआयडीसीने उद्योगांना पाणीपुरवठा करणे गेल्या 6 महिन्यांपासून बंद केले आहे, हे खरे आहे काय ?

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, लातूर औद्योगिक क्षेत्रात 747 उद्योग आहेत. त्यातील 53 उद्योग बंद आहेत. हे पाणी प्रश्न गंभीर झाला त्याच्या आगोदर पासूनच बंद आहेत. त्यांची वेगवेगळी कारणे आहेत. पाण्यामुळे आम्ही उद्योग बंद केला, किंवा करत आहोत असे कुठल्याही उद्योगाने सांगितलेले नाही. उद्योग त्यांची औद्योगिक पाण्याची गरज टँकर वैगरे मिळवून भागवतात. पिण्याच्या पाण्याकरिता 6 विंधन विहीरी घेतल्या त्यातील 3 विंधन विहीरींना पाणी लागले आणि त्याच्यामुळे 150 घन मीटर एवढा दर दिवशी पाण्याचा पुरवठा होतो आहे.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, लातूर जिल्हयातील दुष्काळाची दाहता वाढत असून लातूर एमआयडीसी तील इतके उद्योग, त्यापैकी 50 उद्योग पाण्याअभावी बंद पडल्याचे माहे फेब्रुवारी, 2016 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे काय ? याचे उत्तर आहे अंशत: खरे आहे. आता मंत्री महोदय म्हणतात आम्हाला यातील कुठलीच माहिती नाही की, पाण्याअभावी उद्योग बंद पडले आहेत. 52 च्या ऐवजी बरेच उद्योग बंद पडलेले आहेत. माननीय अध्यक्ष महोदय आपण या उत्तराला कन्व्हीन्स आहात काय ? मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये विसंगती आहे. यासंदर्भात आपण रूलींग द्यावे अशी आमची मागणी आहे.

श्री.दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, माझी विनंती आहे, प्रश्न क्रमांक दोनमध्ये असे म्हटले आहे की, जिल्हयातील उद्योगामध्ये 20 हजार कामगार कार्यरत असून यातील निम्मे उद्योग बंद केल्यामुळे 10 हजार मजूरांवर बेरोजगारांची वेळ आली असून प्रश्नाची तीव्रता लक्षात घेता शासनाने कुठली उपाययोजना केली वा करणार आहे ? याचे कोणतेही उत्तर तुमच्या छापील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.52056.....

श्री.दिलीप वळसे पाटील .....

उत्तरात नाही. एका बाजूला सांगता पाण्यामुळे उद्योग बंद पडलेले नाहीत. दुस-या बाजूला, तीसरा प्रश्न आहे की, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत, तर विलंबाची कारणे, प्रश्न उद्भवत नाही. म्हणजे पाण्यामुळे उद्योग बंद पडलेले नाहीत असे सांगता. प्रत्यक्षामध्ये उद्योग बंद आहेत. लातूर जिल्हयामध्ये रेल्वेने पाणी आणण्याची चर्चा सुरु आहे. एका हंडाभर पाण्यासाठी मृत्यू व्हायला लागलेले आहेत. हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा. तेथे 144 कलम पुकारलेले आहे अशी परिस्थिती आहे. मंत्री महोदयांना हे माहिती आहे का ? लातूर एमआयडीसीमध्ये आज किती उद्योग सुरु आहेत, किती कामगार काम करता आहेत, त्यांना दर दिवसाला किती पाणी लागते आहे, ते पाणी कोठून येते आहे, याचे कशाचेच उत्तर नाही. इंडस्ट्रीच्या संदर्भातील प्रश्न आहे. पिण्याच्यापाण्याच्या संदर्भातला किंवा विधन विहीरी, भूजल सर्वेक्षणचा विषय नाही. हे उत्तर सभागृहाचे दिशाभूल करणारे आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, हा प्रश्न कृपया राखून ठेवावा. प्रश्नाला न्याय मिळू शकत नाही.

B-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : मंत्री महोदय, या प्रश्नावर उत्तर देत आहेत. मंत्री महोदयांना उत्तर देण्याची अजून संधी मिळाली नाही. माझे असे म्हणणे आहे की, हा तारांकित प्रश्न सभागृहाची प्रॉपर्टी झाली असली तरी ज्यांनी प्रश्न विचारला आहे त्यांना बोलण्याची संधी मिळाली पाहिजे. त्यांचे याबाबत काय म्हणणे आहे, हे सभागृहाने ऐकून घ्यावे.(अडथळा). ज्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे त्यांचे याबाबत काय म्हणणे आहे हे तरी ऐकावे.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील व मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. आपण स्लीग द्यावे. सन्माननीय सदस्य त्यावर अधिक माहिती देतील. मी स्वतः लातूरला जाऊन आलेला आहे, तेथे 144 कलम लागू झालेले आहे. अजूनही मंत्री महोदय सांगतात की, तेथील पाण्याबाबत एकही तक्रार नाही. मंत्री महोदयांनी कधी लातूर एमआयडीसीमध्ये भेट दिली आहे का ?

श्री.गिरीश बापट : अध्यक्ष महोदय, हे खरे आहे की, लातूरमध्ये पाण्याची तीव्र टंचाई आहे. माननीय उद्योगमंत्री त्याबाबत माहिती देऊन उत्तर देत आहेत. पिण्याच्या पाण्याची अडचण आहे हे मान्य आहे. बरेच खाजगी उद्योजक स्वतः पैसे देऊन पाणी घेतात. मंत्री महोदयांकडे सर्व माहिती आहे त्यामुळे त्यांना उत्तर देऊ द्यावे.

श्री.अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाशी आम्ही सहमत आहोत. मंत्री महोदयांचे उत्तर समाधानकारक नसून दिशाभूल करणारे आहे. त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवावा अशी आम्ही मागणी करतो.

तालिका सभाध्यक्ष : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मंत्री महोदयांना प्रश्न विचारावेत.

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, मी माझे उत्तर पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. त्यातूनही आपले समाधान झाले नाही व आपण हा प्रश्न राखून ठेवला तर माझे काही म्हणणे नाही. पण माझे उत्तर रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. पाण्याची भीषण टंचाई लातूरमध्ये आहे, हे जगजाहीर आहे. तेथे दोन औद्योगिक क्षेत्रे आहेत. लातूर औद्योगिक क्षेत्रात 747 उद्योग आहेत, त्यापैकी 53 बंद आहेत. परंतु पाण्याचा प्रश्न निर्माण होण्यापूर्वीपासून ते वेगवेगळया कारणाने बंद आहेत. तसेच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.52056.....

श्री.सुभाष देसाई .....

अतिरिक्त लातूर औद्योगिक क्षेत्रात 313 पैकी 1 उद्योग पूर्वीपासून बंद आहे. आमच्याकडे कोणत्याही उद्योगाने तक्रार केलेली नाही की, पाण्याअभावी आम्ही उद्योग बंद करीत आहोत. आमचे उत्पादन आम्ही बंद करीत आहोत असे कोणत्याही उद्योगाने सांगितलेले नाही. एक तर तेथील उद्योगांना औद्योगीक कारणासाठी पाण्याची फारशी गरज नाही. जेवढी गरज आहे तेवढी टँकर मागवून ते पूर्ण करतात. सहा विंधन विहीरीपैकी तीन विंधन विहिरींना दररोज 150 घनफुट पाणी लागलेले आहे. त्यातून पिण्याच्या पाण्याची काही गरज भागविली जात आहे. म्हणून पाण्याअभावी उद्योग बंद पडत आहेत हे खरे नाही. यावर आमचे बारकाईने लक्ष आहे. त्यांना निरनिराळया प्रकारचा सपोर्ट व पाठींबा देण्याकरिता एमआयडीसी तत्पर आहे.

श्री.अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांचे उत्तर हे अतिशय दिशाभूल करणारे आहे. पाण्याअभावी उद्योग बंद पडत नाहीत हे आपण सांगत आहात, पण या विधानावर आमचा अजिबात विश्वास नाही. लातूर जिल्हयातील पाणी टंचाई परिस्थिती सर्वांना ज्ञात आहे.

अध्यक्ष महोदय, एमआयडीसीने उद्योगांना पाणीपुरवठाच बंद केलेला आहे. आता मंत्री महोदय सांगतात की आम्हाला कोणी कळविलेले नाही. अतिशय दिशाभूल करणारी उत्तरे आम्हाला मिळत आहेत. तेथील पाणीपुरवठा बंद होणार होता तर उद्योग खात्याने, एमआयडीसीने उद्योगांना पाणी पुरविणे हे त्यांचे कर्तव्य आहे. पाणी संपणार आहे हे त्यांच्या लक्षात आले नाही का, तेथे धनेगाव धरणातून पाणीपुरवठा होतो, या धरणात पाणी उपलब्ध होण्याकरिता एमआयडीसीने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ? यावर मंत्री महोदयांनी उत्तर दिले पाहिजे.

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, मी उपाययोजनाबाबत माहिती दिली आहे. तेथे सहा विंधन विहीरी आहेत. (अडथळा) दुसरीकडून पाणी उपलब्ध झालेले नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

तालिका सभाध्यक्ष : मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्या. त्यांचे उत्तर झाल्यावर सदस्यांनी बोलावे. आता मंत्री महोदयांनी उत्तर सुरु केलेले आहे. मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर विरोधी पक्ष नेत्यांनी हरकतीचा मुद्दा विचारावा. अगोदरच हरकत घेतली तर कसे चालणार. असे वातावरण सभागृहासाठी चांगले नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.52056.....

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, प्रश्न विचारणारे सन्माननीय सदस्य त्या मतदारसंघातील आहे. त्यांनी सांगितले आहे की, ही वस्तुस्थिती नसून हे उत्तर दिशाभूल करणारे आहे. सदस्यांनी मतदारसंघाबाबत दिलेली माहिती आपण या सभागृहात खरी मानतो व गृहीत धरतो. त्यामुळे मंत्री महोदयांनी हा प्रश्न प्रतिष्ठेचा करु नये. मंत्री महोदय मेक इन महाराष्ट्रमध्ये व्यस्त होते. अधिकाऱ्यांनी याबाबतच्या प्रश्नावर आणलेल्या फाईलवर मंत्री महोदयांनी सही करुन दिलेली आहे. अजूनही हे उत्तर सुधारण्याची संधी आहे. त्यांनी प्रतिष्ठेचा प्रश्न करु नये. मी स्वत: लातूरला जाऊन आलो आहे, वस्तुस्थिती भयानक आहे. त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवावा.

तालिका सभाध्यक्ष : मंत्री महोदय उत्तर देत आहेत. मंत्री महोदयांनी सांगितले की, 331 पैकी 1 उद्योग बंद आहे.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, एमआयडीसीने पाणी बंद केलेले आहे. स्थानिक आमदारांनी दिलेली माहिती सत्य मानण्यात यावी. (अडथळा).

श्री.ग.आ.देशमुख : अध्यक्ष महोदय, तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात व मंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या उत्तरात विसंगती आहे. तारांकित प्रश्नाच्या पहिल्या उपप्रश्नाला उत्तर देताना अंशत: खरे आहे असे म्हटलेले आहे. आता मंत्री महोदयांनी सभागृहात उत्तर दिले आहे की, पाण्यामुळे एकही उद्योग बंद पडलेला नाही. लेखी उत्तरामध्ये अंशत: खरे आहे हे एकदा मान्य केलेले आहे. तोंडी उत्तरामध्ये ते खरे नाही असे म्हणतात. ही विसंगती अगोदर दूर केली पाहिजे. मी विचारु इच्छितो की, अंशत: खरे आहे याचा अर्थ काय ? किती उद्योग बंद पडलेले आहेत ?

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, अंशत: खरे आहे याचा अर्थ असा आहे की, 747 उद्योगापैकी 53 उद्योग बंद आहेत. मी असे म्हणू शकत नाही की उद्योग अजिबात बंद नाहीत. 53 उद्योग बंद आहेत हे मी मान्यच केलेले आहे. पण ते उद्योग पाण्यामुळे बंद झालेले नाहीत.

तालिका सभाध्यक्ष : तारांकित प्रश्नातील पहिल्या उप प्रश्नात असे विचारण्यात आले आहे की, लातूर एमआयडीसीतील सुमारे 600 व इतर तालुक्यातील सुमारे 600 असे 1200 उद्योग असून त्यापैकी 50 टक्के उद्योग पाण्याअभावी बंद पडल्याचे माहे फेब्रुवारी, 2016 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ? या प्रश्नाच्या उत्तरात अंशत: खरे आहे असे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष .....

म्हटले आहे. किमान आपण पाणीटंचाईच्या काळात पिण्यासाठी दिले पाहिजे. हा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न नसून उद्योगाकरिता लागणाऱ्या पाण्याचा प्रश्न आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे की, यावर आपण सुधारित उत्तर देत आहात का ?

श्री.दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, माझे म्हणणे नीट ऐकून घ्यावे. तारांकित प्रश्नाच्या उपप्रश्न क्रमांक 2 मध्ये म्हटले आहे की, असल्यास, जिल्हयातील या उद्योगामध्ये सुमारे 20 हजार कामगार कार्यरत असून त्यातील निम्मे उद्योग बंद केल्यामुळे दहा हजार मजुरांवर बेकारीची वेळ आली असून सदर प्रश्नाची तीव्रता लक्षात घेता राज्य शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करणार आहे ?

अध्यक्ष महोदय, या प्रश्नावर दिलेले उत्तर वाचले तर यामध्ये मजुरांवर कोठेही बेरोजगारीची वेळ आली की नाही याचे उत्तर नाही. प्रश्नाची तीव्रता लक्षात घेऊन आपण कोणत्या उपाययोजना करणार आहात याचे उत्तर नाही. मी सुस्वातीला सांगितले की, मी मंत्री महोदयांना दोष देत नाही. कारण कळत न कळत हे घडले असण्याची शक्यता आहे. आम्हीसुध्दा मंत्री असताना आमच्याकडेही असे काही तरी उत्तर पासऑन केले जायचे, आम्ही घाईत असलो की सही करायचो. पण यामुळे सभागृहात मंत्री महोदयांची फजिती होती. माझे अजूनही हेच मत आहे की, मंत्री महोदयांनी माननीय अध्यक्षांना विनंती करावी की हा प्रश्न राखून ठेवावा व मी सुधारीत उत्तर देतो. यामधील फॅक्ट सभागृहासमोर येऊ द्यावी. हा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न नसून उद्योगाचा प्रश्न आहे. आपण उद्योगाच्या बाबतीत याची सविस्तर माहिती सभागृहात दिली पाहिजे.

यानंतर सी-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.52056.....

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

एखाद्या मंत्रिमहोदयांनी लेखी उत्तरापेक्षा वेगळे तोंडी उत्तर दिले तर सभागृहाच्या नियमाप्रमाणे तशा प्रकारचे विसंगत उत्तर शासन म्हणून त्यांना देता येत नाही. सभागृहाच्या प्रथा व परंपरेनुसार हा प्रश्न सुस्वातीलाच राखून ठेवणे आवश्यक होता. माननीय मंत्री महोदयांनी तशा प्रकारची विनंती केलेली आहे की, हा प्रश्न राखून ठेवला तरी त्यांची काही हरकत नाही. हा प्रश्न सुरुवातीलाच राखून ठेवणे आवश्यक होता. यामध्ये विनाकारण सभागृहाचा वेळ जात आहे. योग्य उत्तर सभागृहासमोर आले पाहिजे.

श्री.अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा. या प्रश्नाबाबत योग्य माहिती आल्यानंतर ती सभागृहासमोर मांडण्यात यावी.

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय,मी पुन्हा सांगतो की, पाण्याअभावी उद्योग बंद पडलेले आहेत आणि कोणावर बेरोजगारी व उपासमारीची वेळ आलेली आहे, अशी परिस्थिती नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर) : माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, पाण्याअभावी उद्योग बंद पडलेले आहेत, असे म्हणणे त्यांच्याकडे आलेले नाही. आपण म्हणता त्याप्रमाणे लेखी उत्तर छापता येत नाही. मंत्री महोदयांकडे पाण्याअभावी उद्योग बंद पडलेले आहेत, अशा प्रकारचे निवेदन आलेले नाही.

श्री.अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, पाण्याअभावी उद्योग बंद नाहीत, असे माननीय मंत्री यांनी सांगितलेले आहे. एमआयडीसी उद्योगांना पाणीपुरवठा करीतच नाही. एमआयडीसीने उद्योगांना पाणीपुरवठा करणे बंद केलेले आहे, मग उद्योग कसे काय चालतील ?

तालिका सभाध्यक्ष : उत्तर चुकीचे असेल तर मंत्री महोदयांवर हक्कभंग आणा.

श्री.अमित देशमुख : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री जे उत्तर देत आहेत, ते वस्तुस्थितीला धरुन नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येतात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य, माननीय मंत्री यांच्याकडे पाण्याअभावी उद्योग बंद आहेत, अशा प्रकारचे निवेदन आलेले नाही.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सभागृहात दिलेली माहिती खरी मानून त्याप्रमाणे कार्यवाही केली जाते. सन्माननीय सदस्य श्री.अमित देशमुख सांगत आहेत की, लातूर जिल्हयामध्ये एमआयडीसीने उद्योगांना पाणीपुरवठा करणे बंद केलेले आहे. मी स्वतः लातूर जिल्हयामध्ये या संदर्भात भेट दिलेली आहे. खरोखर लातूर येथे पाण्याची परिस्थिती भीषण आहे. मी स्वतः अतिशय जबाबदारीने हे सांगत आहे की, एमआयडीसीने उद्योगांना पाणीपुरवठा करणे बंद केलेले आहे. यावर अधिक प्रश्नोत्तरे करण्यापेक्षा सदरहू प्रश्न राखून ठेवण्यात यावा, अशी आमची विनंती आहे. या प्रश्नाचे सुधारित उत्तर आल्यानंतर ते सभागृहासमोर मांडण्यात यावे.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय विरोधी पक्ष नेते माननीय मंत्री म्हणत आहेत की, पाण्याअभावी त्या भागामध्ये उद्योग बंद आहेत, असे निवेदन त्यांच्याकडे आलेले नाही.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आपल्या सभागृहाची परंपरा अशी आहे की.....(अडथळा).....

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उठून एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभाध्यक्ष : आपण सांगितल्याप्रमाणे मी यापूर्वी माननीय मंत्री यांना विचारणा केली की, हा प्रश्न पिण्याच्या पाण्यासंदर्भातील नसून उद्योगांना करण्यात येणा-या पाणीपुरवठयासंबंधीचा आहे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, आपल्या सभागृहाची अशी परंपरा आहे की, स्थानिक आमदारांनी दिलेली माहिती सभागृहामध्ये खरी मानण्यात येते. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.ग.आ.देशमुख, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी आपापले म्हणणे मांडलेले आहे. हा प्रश्न काही प्रतिष्ठेचा प्रश्न नाही. सुधारित उत्तर आल्यानंतर ते सभागृहासमोर सादर करण्यात यावे, तोपर्यंत सदरहू तारांकित प्रश्न राखून ठेवण्यात यावा. लातूर जिल्हयामध्ये पाण्याची भीषण परिस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी मानण्यात येत नसेल तर आम्ही सभागृहात बसतच नाही. आम्हाला सांगावे की, सभागृहात येऊ नका. आम्ही सभात्याग करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभाध्यक्ष : माननीय मंत्री यांनी दिलेले उत्तर समाधानकारक वाटत नसेल तर इतर आयुधांच्या माध्यमातून सबंधित प्रश्नाचे उत्तर शासनाकडून घ्यावे. माननीय मंत्री यांनी दिलेले उत्तर समाधानकारक वाटत नसेल तर माननीय मंत्री यांच्या विरुध्द हक्कभंग आणावा. आता मला सभागृहाची बैठक चालविण्यस सहकार्य करावे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खोटी असेल तर त्यांच्यावर हक्कभंग आणावा. आपण यावर निर्णय द्यावा. आमची माहिती खोटी असेल तर आमच्यावर हक्कभंग आणावा. आमची त्याकरिता तयारी आहे. माननीय अध्यक्ष महोदय, आता आपण यावर निर्णय द्यावा, अशी आमची विनंती आहे.

तालिका सभाध्यक्ष : ठीक आहे. आता मी यावर निर्णय देत आहे. यानंतर जे सांगायचे आहे ते सांगावे. सन्माननीय सदस्य श्री.अमित देशमुख व सन्माननीय सदस्य श्री.त्र्यंबक भिसे हे लातूर जिल्हयाचे स्थानिक आमदार आहेत. तारांकित प्रश्नाच्या उत्तरामध्ये शासनाने पहिल्या प्रश्नाला हे अंशतः खरे आहे असे उत्तर दिलेले आहे. हा प्रश्न औद्योगिक वापराकरिता लागणा-या पाण्यासंदर्भातील आहे. शासनाने लेखी उत्तरामध्ये प्रश्न क्रमांक 2 करिता जे खुलासे दिलेले आहेत, त्यामध्ये पिण्याच्या पाण्यासंदर्भात व विंधन विहिरीसंदर्भात खुलासे केलेले आहेत. सदरहू तारांकित प्रश्नांतर्गत 10 हजार मजूरांना कामावरुन काढून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे, या प्रश्नांची उत्तरे नाहीत म्हणून हा प्रश्न मी राखून ठेवत आहे. (अडथळा)

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे.

तालिका सभाध्यक्ष : आता प्रोसिजर बरोबर आहे. आता सभागृहाची बैठक चालू द्यावी. सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील अध्यक्ष असतांना आपणच आम्हाला शिकविलेले आहे की, प्रश्नोत्तराच्या तासात किमान दहा प्रश्नांवर चर्चा होणे आवश्यक आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. आता या सभागृहात हे रलिंग द्यायची वेळ आलेली आहे की, सदस्यांनी काही प्रश्न विचारले तरी मंत्र्यांना काही उत्तर देता येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.52056.....

श्री.दिलीप वळसे-पाटील....

प्रश्नाशी संबंधित असो वा नसो मग उरलेले उत्तर तोंडी प्रश्नाच्या माध्यमातून देता येईल, असा निर्णय दिला तर मग तो प्रिसीडंट बनेल. भविष्यकाळात अशी अडचण येणार नाही.

तालिका सभाध्यक्ष :आतापर्यंत असे अनेक प्रश्न हाताळलेले आहेत, असा प्रश्न कधी उद्भवलेला नाही. ज्या ज्या काळी होईल, त्याप्रमाणे त्याचा निर्णय घेतला जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील दापोली वाकवली खेड भरणे रस्त्याची झालेली दुरवस्था

(२) * **५२२८० *श्री.संजय* कदम** (दापोली) *:* सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील दापोली वाकवली खेड भरणे रस्ता राज्य महामार्ग क्र. १६२ वर किमी १८/०० ते २२/०० या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली **आहे,** हे खरे आहे **काय,**

(२) **असल्यास,** सदरहू रस्त्यावर फार मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वारंवार अपघात होत असून या मार्गावर रहदारी करणे अवघड झाले **आहे,** हे खरे आहे **काय,**

(३) **असल्यास,** या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण विनाविलंब करण्यात यावे अशा आशयाचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ **जानेवारी,** २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिले **आहे,** हे ही खरे आहे **काय,**

(४) **असल्यास,** उपरोक्त मागणीबाबत शासन विचार करणाररआहे **काय,** या रस्त्याची सुधारणा व रुंदीकरण तातडीने करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार **आहे, नसल्यास,** विलंबाची कारणे काय **आहेत?**

श्री. चंद्रकांत पाटील : (१) नाही.

(२) नाही.

(३) होय.य

(४) कि.मी. २८/०० ते २९/०२० मध्ये रुंदीकरणासाठी रु. २०० लक्ष व कि.मी. २४/०० ते कि.मी. २६/००, कि.मी. २६/६०० ते २६/७३०, कि.मी. २६/७८८ ते २६/९९० कि.मी. २७५६५ ते २७९१५ मध्ये सुधारणा व डांबरीकरण करण्यासाठी सुमारे रु. ३४० लक्ष रक्कमेची आवश्यकता आहे. सदर कामे **निधी,** निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

श्री.संजय कदम : अध्यक्ष महोदय, रत्नागिरी जिल्हयातील खेड-दापोली महामार्गावर नेहमी अपघात होतात. गेल्या आठवडयामध्ये एका डॉक्टर दाम्पत्याला जीव गमवावा लागला. तेथे दोन आयटीआय विद्यार्थी अपघातामुळे मृत्युमुखी पडले. पर्यटकाचा सततचा ओढा असलेल्या मार्गाची दूरवस्था झालेली आहे.

.....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.52280.....

श्री.संजय कदम.....

या अपघात होणा-या रस्त्यावर आंदोलन झाले होते. मी स्वत: आंदोलनामध्ये होतो. रस्त्याच्या दुरुस्तीबाबत सन्माननीय मंत्री अर्थसंकल्पामध्ये तरतूद करतील, असे वाटले होते. परंतु तशी तरतूद त्यामध्ये दिसली नाही. या रस्त्याकरिता 3.80 कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे, या रस्त्याला किती निधी देणार आहे, त्याचे काम कधी पूर्ण होणार आहे?

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पामध्ये रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यातील दापोली -वाकवली- साक्रोली खेड भरणी रस्त्याकरिता 1,10,00,000 रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. लहान पूलाच्या रुंदीकरणासाठी रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यातील दापोली - वाकवली- साक्रोली खेड भरणी रस्त्याकरिता व लहान पूलाचे रुंदीकरण दीड कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यातील दापोली-वाकवली -साक्रोली रस्त्यावरील भरणी रस्त्याकरिता साखळी क्रमांक 16400 करिता 35 लाख रुपयांची तरतूद शासनाने केलेली आहे. या व्यतिरिक्त हा रस्ता अतिशय खराब झालेला आहे. तो जांभा दगड आणि पाऊस संपल्यानंतर डांबराने भरलेला आहे. असे असतानाही या दूरवस्था झालेल्या रस्त्याचे दुरुस्तीचे काम केले पाहिजे. त्याकरिता 3,40,00,000 लाखाची आणखी आवश्यकता आहे. नजीकच्या काळामध्ये रस्ते दुरुस्ती या शीर्षकाखाली निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच, सदरहू रस्ता सुस्थितीत आणण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.संजय कदम : अध्यक्ष महोदय, सदर रस्ता रुंदीकरणाचा प्रस्ताव संपूर्ण नागरिकांचा आहे. तेथे सातत्याने अपघात होत आहेत. यामधील 75 टक्के जागा शासनाची आहे. उर्वरित जागा संपादनाकरिता संबंधित नागकरिकांनी ती सोडलेली आहे. या जागेवर रस्ता रुंदीकरण झाले तर अपघात वाचतील. शासनाने रस्ता रुंदीकरणाचे काम प्राधान्याने सुरु करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 52280.....

श्री. चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात उपोषण केलेले होते. सदरहू रस्ता खेड शहरातून जाणारा 4.5 कि.मी.इतका लांब रस्ता आहे. यामधील 1 कि.मी. रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी लॅन्ड ॲक्विजिशन पूर्ण झालेले आहे. उर्वरित 3.5 कि.मी. रस्त्याचे रुंदीकरण करणे शक्य नाही कारण त्याच्या आजुबाजूला अनेक दुकाने आणि घरे आहेत. सद्य:स्थितीत 1 कि.मी. रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी भूमिअधिग्रहनाचे काम पूर्ण झालेले आहे. सदरहू रस्ता नजीकच्या काळात पूर्ण करण्याचे काम केले जाणार आहे.

तालिका सभाध्यक्ष (श्री. योगेश सागर) : ठीक आहे. आता पुढील प्रश्न चर्चेला घेण्यात येईल.

.....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात असलेल्या राईस मिलच्या मालकांनी सेस बुडविल्याबाबत

(३)* ४१७८८ श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय पणन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात असलेल्या राईस मिलच्या मालकांनी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात १० लाख रुपयांचा सेस बुडविल्याची बाब माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजार समिती कडून अद्याप सेस वसुलीबाबत कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बाब १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बुडालेला सेस वसुल करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. राम शिंदे, श्री. चंद्रकांत पाटील यांच्याकरिता : (१) नाही. सन २०१३-१४ मध्ये बाजार समितीने रु.३९,३०,९८१/- इतका सेस वसूल केलेला आहे. तथापि, रु.१० लाख इतका सेस बुडविल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) ते (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, कृषी उत्पन्न बाजार समितीमधील किती राईस मिल आहेत, यापैकी कृषी उत्पन्न बाजार समिती किती राईलस मिल चालवित आहेत, प्रायव्हेट राईस मिल किती आहेत, प्रायव्हेट मिलकडून किती पैसा घेण्याचे बाकी आहे आणि यापैकी किती पैसा दिलेला आहे इत्यादी प्रश्नांच्या संदर्भातील खुलासा मंत्री महोदयांनी करावा.

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय सावकारे यांनी विचारलेल्या प्रश्नांना मी उत्तरे देणार आहेत.

अध्यक्ष महोदय, रामटेक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून मुख्य बाजार समिती रामटेक आणि उप बाजार समिती मौदा या ठिकाणी मार्केट कमिटी कार्यरत आहे. सन 2013-2014 मध्ये राईस मिलच्या संदर्भात विभागाने बाजार समितीच्या माध्यमातून राईससाठी धान खरेदी हे मार्केट कमिटीमधून खरेदी करावे आणि पूर्वी जर अशा प्रकारे खरेदी केली जात नसेल तर मार्केट कमिटीच्या माध्यमातून खरेदी करण्याबाबत सांगितले होते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41788.....

प्रा. राम शिंदे.....

अध्यक्ष महोदय, 65 राईस मिल आहेत. यापैकी रामटेक बाजार समितीच्या कार्यकक्षेत 10 राईस मिल आहेत. या माध्यमातून समितीचा 12.55 लाख रुपये एवढा सेस जमा झालेला आहे.

श्री. संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, प्रायव्हेट मिलकडून किती पैसा घेण्याचे बाकी आहे आणि त्यापैकी किती पैसा दिलेला आहे ?

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, खाजगी, सरकारी, मार्केट कमिटी किंवा को. ऑपरेटिव्ह कमिटीच्या माध्यमातून राईस मिल चालविले जात असून, त्यासंदर्भातील अधिक माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही.

अध्यक्ष महोदय, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बाजार फी आणि देखरेख फीच्या संदर्भात अचानक वाढ झालेली आहे. याबाबत सन 2013-2014 मध्ये डीडीआर, नागपूर यांना अशा पध्दतीने वाढ झाल्यामुळे चौकशी नेमण्याबाबत सूचना केलेली होती. यानुसार दिनांक 31-03-2016 रोजी चौकशी समिती नेमली होती. चौकशी समितीचा 8 दिवसांमध्ये रिपोर्ट येणे अपेक्षित आहे. दरवर्षी सेस मिळत होता. परंतु, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बाजार फी आणि देखरेख फीच्या संदर्भात अचानक 39 लाख रुपयांची वाढ झालेली आहे. त्यामुळे डीडीआर, नागपूर यांच्या माध्यमातून 8 दिवसांच्या आत विशेष पथके नेमून चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राईस मिलच्या माध्यमातून धान्य किती खरेदी केले, त्याचा भरडा किती झाला, दोन्ही मधील तफावत किती आहे आणि तफावतीची रक्कम वसूल करण्यासंदर्भात विशेष पथके नेमून चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यानुसार चौकशी समितीचा 8 दिवसांमध्ये रिपोर्ट येणे अपेक्षित आहे. चौकशी रिपोर्ट आल्यानंतर वसूलीची कार्यवाही केली जाणार आहे.

श्री. संजय सावकारे : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी डीडीआर, नागपूर यांच्या माध्यमातून 8 दिवसांच्या आत विशेष पथके नेमून चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असे उत्तर दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सचिव कार्यरत असतात. कृषी उत्पन बाजार समितीच्या माध्यमातून सचिवांची नेमणूक केली जाते. माझ्या मतदारसंघातील एका तक्रार

.....4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.41788.....

श्री. संजय सावकारे.....

संबंधित डीडीआर यांच्याकडे दिली होती. त्यावेळी डीडीआर यांनी आमचा सचिवांवर कोणताही अधिकार नाही, असे उत्तर दिले होते. सचिवांच्या माध्यमातून व्यापाऱ्यांना नाहकपणे त्रास दिला जातो. तसेच आमच्या भागातील विरोधी सदस्यांना बैठकीचा अजेंडा देखील पाठविला जात नाही. या सचिवांवर कोणाचा अंकुष असतो. डीडीआरचा सचिवांवर कंट्रोल असतो काय ? सचिवांची नेमणूक कोणाकडून केली जाते, हा कोणाच्या अख्यत्यारित काम करीत असतो, अशा सचिवांनी अनियमितता केली असेल तर त्याच्या विरोधात कोणामार्फत कारवाई केली जाते ?

प्रा. राम शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या मतदारसंघातील मार्केट कमिटीच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केलेला आहे. सचिवांची नेमणूक पणन संचालकांच्या माध्यमातून पॅनलच्या माध्यमातून केली जाते. तसेच काहीअंशी स्थानिक पातळीवर अशा प्रकारच्या सचिवांची नेमणूक देखील केली जाते. पणन विभागाचे सचिवांवर नियंत्रण असते. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या मतदारसंघातील मार्केट कमिटीच्या अनुषंगाने जी तक्रार दिलेली आहे, त्यासंदर्भात कारवाई करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात येतील.

तालिका सभाध्यक्ष: ठीक आहे. आता पुढील प्रश्न चर्चेला घेण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पुणे जिल्ह्यातील दौंड व शिरूर या दोन तालुक्यांमधील भीमा नदीवरील पूलाच्या बांधकामाबाबत

(४) * ५२२७६ श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील दौंड व शिरूर या दोन तालुक्यांमधील भीमा नदीवर मोठा पूल नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याने टाकळी ते टाकळी भीमा रस्त्यावर भीमा नदीवर मोठा पूल बांधणेबाबतचे निवेदन मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टाकळी ते टाकळी भीमा रस्त्यावर भीमा नदीवर मोठा पूल बांधणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली ी वा करण्यात येत आहे,
(३)३ नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय.
(२) व (३) प्रश्नांकित पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे निये ाजन राहील.

ॲड. राहुल कुल : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी प्रश्नांकित पूलाचे निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील, असे उत्तर दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, सदरहू पूल पुणे जिल्ह्यातील दौंड आणि शिरूर तालुक्याला जोडणारा पूल आहे. हा पूल निकषात बसणार आहे. त्याचबरोबर रांजणगाव आणि कुरकुंभ अशा दोन एमआयडीसीच्या जवळील रस्ता आहे. त्यामुळे सदरहू पूल लवकरात लवकर होणे ही काळाची गरज आहे आणि तशा प्रकारची सर्वसामान्य जनतेची मागणी आहे. सदर पूल निकषात बसणार असल्यामुळे त्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे. सदरहू पूलास निधी आणि मंजुरी केव्हापर्यंत दिली जाणार असा माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी रस्त्याच्या संदर्भातील अतिशय महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. सदरहू पूल पुणे जिल्ह्यातील दौंड आणि शिरूर तालुक्याला जोडणारा महत्वाचा पूल आहे. सद्यःस्थितीत सदर पूलाचे सर्व्हेक्षणाचे आणि अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरु आहे. यावर्षी नाबार्डमध्ये 15 कोटी रुपयांच्या आसपास खर्च येणार आहे, असा प्राथमिक अंदाज आहे. यासंदर्भातील अंतिम अंदाजपत्रक पूर्ण केले जाणार आहे. एप्रिलमध्ये नाबार्ड अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या कामांमध्ये सदर पूलाचा प्राधान्याने समावेश केला जाणार आहे.

.....6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.52276.....

श्री. बाबुराव पाचर्णे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करीत आहे.

अध्यक्ष महोदय, सदरहू पूल पुणे जिल्ह्यातील दौंड आणि शिरूर तालुक्याला जोडणारा महत्वाचा पूल आहे. माझ्या मतदारसंघातील टाकळी भीमा येथील जनतेची सदर पूल केव्हा पूर्ण केला जाणार, अशी मागणी केली जाते. यासंदर्भात मंत्री महोदयांनी आता सकारात्मक उत्तर दिलेले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी यापूर्वी त्या पूलाच्या कामाचे सर्व्हेक्षणाचे केलेले आहे. या कामासाठी 15 कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. एप्रिलमध्ये नाबार्ड अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या कामांमध्ये सदर पूलाचा प्राधान्याने समावेश केला जाईल असे मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. सदरहू पूलाचे काम लवकरात लवकर हाती घ्यावे, अशी मंत्री महोदयांकडे विनंती करीत आहे.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. राहुल कुल आणि सन्माननीय सदस्य श्री. बाबुराव पाचर्णे यांनी त्यांच्या मतदारसंघातील पूलाच्या कामाच्या संदर्भातील प्रश्न विचारलेला आहे. एका बाजूला भीमा नदी आणि तर दुसऱ्या बाजूला शिरूर तालुका आहे. त्या ठिकाणी अनेक पूल आहेत. पारगाव येथील नदीवरील पूल कमकुवत झालेला असून, तो केव्हा कोसळेल हे काही सांगता येत नाही. सदर पुलावर मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची वर्दळ असते. तसेच अनेक ठिकाणी नवीन पूल बांधले आहेत. परंतु, भरावाचा अभाव असल्यामुळे ते पूल सुरु झालेले नाहीत. अशा प्रकारचे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशन संपण्यापूर्वी या पूलाच्या संदर्भात मला तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिलीप वळसे-पाटील, ॲड राहुल कुल, बाबुराव पाचर्णे यांची एकत्रित बैठक घेण्यात यावी आणि सदर बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या अडचणी मंत्री महोदयांकडून दूर केल्या जातील काय ?

श्री. चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, त्या ठिकाणी तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. अशा ठिकाणच्या नद्यांवरील पूलांचे प्रश्न आहेत. राज्य शासनाच्या माध्यमातून आगामी दोन वर्षात काही महत्वाच्या विषयांवर लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. यामध्ये नदीवरील पूल आणि रेल्वे फाटकावरील आरओबीच्या संदर्भात विशेष लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. रेल्वे फाटकावरील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.52276.....

श्री. चंद्रकांत पाटील.....

आरओबीच्या संदर्भातील सर्व यादी केंद्र शासनाला 8 दिवसांच्या आत देण्याबाबत निर्णय झालेला आहे. यासाठी 50 टक्के रेल्वे आणि 50 टक्के केंद्र शासनाच्या माध्यमातून रेल्वे फाटकावरील आरओबी पूर्ण होतील.

अध्यक्ष महोदय, तीन विधानसभा मतदारसंघातील नद्यांवरील पूलांचे प्रश्न आहेत. यासंदर्भात अर्थसंकल्पीय अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक आयोजित करण्यासाठी संबंधित अधिकारी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

E-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील... ता.प्र.क्र. 52276....

लवकरात लवकर एक बैठक बोलावून त्या बैठकीमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, राहूल कूल आणि बाबुराव पाचर्णे या सर्व सन्माननीय सदस्यांना बोलाविण्यात येईल.

डॉ.पतंगराव कदम : अध्यक्ष महाराज, माननीय मंत्री महोदयांनी आताच रेल्वे क्रॉसिंगवरील आर.ओ.बी. साठी 50 टक्के राजचा हिस्सा आणि 50 टक्के केंद्र सरकारचा हिस्सा टाकण्यात येतो, परंतु यामध्ये खूप अडचणी आहेत असे सांगितले. कऱ्हाड- किर्लोस्करवाडी पासून ते सांगलीपर्यंत, तसेच रामनगर, भवानी नगर या ठिकाणी अनेक अडचणी आहेत. या सर्व रेल्वे फाटकांचा आपल्या यादीमध्ये समावेश करणार आहात काय?

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महाराज, संपूर्ण राज्यातील 118 रेल्वे क्रॉसिंगवर आर.ओ.बी. आहेत, या सर्वांचे एस्टिमेटस् तयार करून केंद्र सरकारकडे देणार आहोत. या वर्षीच्या हा प्राधान्यक्रमाचा विषय आहे.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सावंतवाडी तालुक्यातील मागणगाव खोऱ्यातील निळेली-शिवापूर या रस्त्यांची झालेली दुरावस्था

(5) * 43565 श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सावंतवाडी तालुक्यातील माणगाव खोऱ्यातील निळेली, दुकानवाड, शिवापूर या भागातून जाणाऱ्या निळेली-शिवापूर या सुमारे 14 किमी अंतराच्या रस्त्याची अत्यंत दूरावस्था झालेली असून वाहनधारकांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे सद रहू रस्त्यांचे मजबूतीकरणे, खडीकरण व डांबरीकरण करण्यात यावे म्हणून तेथील ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनक बांधकाम विभाग, साव्रतवाडी, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, मा.सार्वजनिक बांधकाममंत्री, जिल्हागिरी, सिंधुदुर्ग जिल्हा आदींकडे माहे डिसेंबर, 2015 मध्ये वा त्या दरम्यान निवदेनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याने दिनांक 6 जानेवारी, 2016 रोजी शिवापूर पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कार्यालयावर भव्य मोर्चा काढून एक निवेदन पुन्हा सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यस, निळेली ते शिवापूर या सुमारे 14 किमी अंतराच्या रस्त्याचे विनाविलंब मजबूतीकरण, खडीकरण व डांबीकरण करण्याचे काम हाती घेवून लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.चंद्रकात पाटील : (1) होय.

(2), (3) व (4) अंशत: खरे आहे.

तथापि, या मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले नाही.

प्रश्नांकित रस्त्याची लांबी ही कनेडी-कुपवडे-नारुर-वाडोस-शिवापूर-कलबिस्त-वेरले-सांगेली-धवडकी-दाणोलीचिलवडे-बांदा रा.मा.क्रम. 190 चा भाग आहे. निळेली (कि.मी. 50/500) ते शिवूर (कि.मी.68/010) या दरम्यान 17.60 कि.मी. लांबीचा रस्ता आहे. या भागातील रस्त्यावर पडलेले खड्डे डांबर मिश्रित खडीने भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. कि.मी. 57/500 ते कि.मी.60/500 मध्ये सुधारणा व डांबरीकरण करण्याचे रु. 100 लक्ष रक्कमेचे काम अर्थसंकल्पात व कि.मी. 60/500 ते कि.मी. 64/500 या लांबीतील डांबरी पृष्ठभागाचे नुतनीकरण करण्याचे काम योजनेतर कार्यक्रमात रु.120.30 लक्ष इतक्या रक्कमेस मंजूर असून दोन्ही कामे निविदा स्तरावर आहेत. दोन्ही कामे निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

श्री.निलेश राणे : अध्यक्ष महाराज, मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले आहे की, मागणीकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले नसून ते पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन आहे. मी कुडाळसंदर्भात प्रश्न विचारला होता, परंतु उत्तरामध्ये सावंतवाडीचे उत्तर छापून आले आहे. या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

रस्त्याचे फोटोग्रॉफस मी आणलेले आहेत. हा रस्ता डांबरमीश्रित झालेला नसल्यामुळे अंजनवाड, निळेली, दुकानवाड, शिवापूर या तीन चार गावांचा पावसाळ्यात चार महिने संपर्क तुटतो. पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन आहे काय?

श्री.चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महाराज, या रस्त्याचे तीन भाग तयार होतात. यातील एक भाग बरा आहे, दुसरा चांगला आहे आणि तिसरा भाग पूर्ण खराब झालेला आहे. त्यातील 1070 किलो मीटरचा रस्ता खराब आहे, त्यापैकी 7 किलो मीटरचे 2.20 कोटी रुपयांचे काम मंजूर असून 3.70 किलो मीटरचे अद्याप सर्वेक्षण, एस्टिमेटस आणि टेंडर काढणे बाकी आहे. 2.20 कोटी रुपयांचे काम पासाळ्यापूर्वी पूर्ण होईल आणि चार किलोमीटरचा रस्ता रिपेअर झाला नाही तर तीच अडचण पुन्हा येईल. म्हणून अधिवेशन संपल्यानंतर रस्ते दुरुस्तीतंर्गत एस्टिमेस्ट्स तयार करुन त्यामध्ये टाकता येईल काय, तसा विचार करुन तो पूर्ण करता येईल. पावसाळ्यापूर्वी 2.20 कोटी रुपयांमधून 7 किलो मीटरच्या रस्त्याचे काम पूर्ण होईल आणि उर्वरित रस्त्याचे काम पावसाळ्यापूर्वी लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करु.

श्री.वैभव नाईक : अध्यक्ष महाराज, निळेजी, शिवापूर या रस्त्यावरुन निर्मला नदी वाहते. पावसाळ्यात या नदीच्या पाण्यामुळे या रस्त्यावरील वाहतूक पूर्ण ठप्प होते त्यामुळे या पूलाची उंची वाढविणे गरजेचे आहे. या रस्त्यावरील खडीकरण, मजबुतीकरण, तसेच या पूलांची उंची वाढविणार आहात काय, त्यासाठी मंत्री महोदय वेगळी तरतूद करणार आहात काय, याबाबत मंत्री महोदय कृपया खुलासा करतील काय?

श्री.चंद्रकात पाटील: अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी नदीच्या पूलाची उंची वाढविण्याबद्दलचा प्रश्न उपस्थित केला आहे. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, याचे निकष ठरलेले आहेत. पावसाळ्यात जो पूल बारा तासपेक्षा जास्त वेळ पाण्यामध्ये राहतो, त्या पूलाचे काम प्राधान्याने हाती घेतले जाते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे माहिती घेऊन आवश्यकता असेल तर त्या प्रकारचे काम हाती घेता येईल.

श्री.हनुमंत डोळस : उक्त रस्त्याचे मजबुतीकरण करणे, डांबरीकरण, खडीकरण यासाठी किती खर्च अपेक्षित आहे, तो खर्च शासन करणार आहे काय?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत पाटील :अध्यक्ष महाराज, 10.70 किलो मीटरचा रस्ता खराब आहे, त्यातील 7 किलो मीटरच्या रस्त्याच्या कामाचे एस्टिमेटस तयार करुन वर्क ऑर्डर दिलेली आहे. उरलेल्या 3.70 किलो मीटरच्या रस्त्याचे एस्टिमेटस तयार करुन तोही रस्ता पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचा प्रयत्न करु.

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत

(६) * ५३१८८ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय आदिवासी विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये सद्यस्थितीत सुमारे ५००० शिक्षकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच, या रिक्त पदांवर सुमारे ३२०० शिक्षक रोजंदारी व तासिका तत्वावर काम करत असून त्यांनी शासन सेवेत कायम करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमधील रोजंदारी व तासिका तत्वावर काम करणाऱ्या शिक्षकांना शासन सेवेत कायम करण्याबाबत शासनाकडूननकोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे नाही.
शासकिय आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षकांची २०३५ पदे रिक्त आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गातील रिक्त पदांवरर तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर १२८९ कर्मचारी कार्यरत असुन त्यांनी कायम करण्याची मागणी केलेली आहे.

(३) व (४) विविध विभागांमध्ये अशा प्रकारच्या नियुक्त्या करण्यात आल्याने असे किती कर्मचारी कार्यरत आहेत त्यांचा एकत्रित तपशिल घेवून सामान्य प्रशासन विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महाराज, माझी एक छोटीशी दुरुस्ती आहे. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "शासकीय आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षकांची 2035 पदे रिक्त आहेत" असा उल्लेख केलेला आहे, याऐवजी "शासकीय आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षकांची 1749 पदे रिक्त आहेत" असे वाचावे.

श्री.भीमराव धोंडे : अध्यक्ष महाराज, शासकीय आश्रमशाळांमध्ये 1000 पदे रिक्त आहेत अशी सुधारणा केलेली आहे. 1000 कर्मचारी तासिकेवर काम करीत आहेत. या शिक्षकांना प्रत्येक तासाला किती मानधन दिले जाते? या कर्मचाऱ्यांचा एकूण तपशील गोळा करुन त्यांना कायमस्वरुपी करणार आहात काय, शासन किती महिन्यात हा प्रश्न सोडविणार आहे? आदिवासी खात्यामध्ये आर्थिक चणचण नसताना या लोकांना किती वर्षापासून तासिकेवर काम करावे लागते आहे, यासंबंधी मंत्री महोदय कृपया खुलासा करतील काय?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महाराज, या कर्मचाऱ्यांमध्ये विशेषत: शिक्षक काम करीत आहेत. या शिक्षकांची तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती केलेली असून विहित पध्दतीने नेमणूक केलेली नाही. असे कर्मचारी राज्य शासकीय सेवेत मोठ्या संख्येने काम करीत आहेत. यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडे माहिती पाठविलेली असून त्या विभागाचा निर्णय आल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून आदेश आल्यानंतर त्याप्रमाणे कायमस्वरूपी भरती प्रक्रिया करण्यात येईल.

तालिका सभाध्यक्ष : मंत्री महोदय सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे की, या शिक्षकांना तासाला किती मानधन दिले जाते?

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांनी विचारलेली माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.पांडुरंग वरोरा : अध्यक्ष महाराज, गेल्या चार पाच वर्षापासून संपूर्ण महाराष्ट्रातील आश्रमशाळांमध्ये रिक्त जागांवर तासिकेवर शिक्षक भरलेले असून ते अतिशय तुटपूंजे मानधनावर काम करीत आहेत. 1749 जागा रिक्त आहेत, त्यातील 1289 जागांवर बीए.बीएड., एम.बीएड., डीएड असे शिक्षक काम करीत आहेत. 1749 रिक्त जागांपैकी 1289 तासिका तत्वावर जे शिक्षक काम करतात, त्यांना प्राधान्याने शासकीय सेवेत कायमस्वरूपी करणार आहात काय?

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महाराज, मी मघाशी उत्तर दिल्याप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाकडून माहिती मागविलेली आहे. त्यांच्या सूचनेप्रमाणे भरतीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

श्री.ग.आ. देशमुख : अध्यक्ष महाराज, या रिक्त जागांवर तासिका तत्वावर भरती केलेली आहे, त्याचे कारण काय आहे? आदिवासी विभागाकडे पैसे असताना तासिका तत्वावर शिक्षकांची नेमणुक करण्याचे कारण काय आहे? आपल्या विभागाची सामान्य प्रशासन विभाग कशाला काळजी करणार, आपल्या विभागाची आपल्यालाच काळजी करावी लागेल. या रिक्त जागांवर किती दिवसात कायमस्वरूपी शिक्षक भरणार आहात?

श्री.विष्णू सवरा : अध्यक्ष महाराज, पदांची भरती करताना सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घ्यावी लागते. या अनुषंगाने आम्ही माहिती मागितलेली असून सामान्य प्रशासन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विष्णू सवरा...

विभागाकडून याबाबतची माहिती आल्यानंतर भरती प्रक्रिया करू. जे शिक्षक अगोदर पासून काम करीत आहेत, त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची शासनाची भूमिका आहे. ते शासनाच्या निकषात बसत असतील तर त्यांना कायम करू. यासाठी वेगवेगळे निकष दिलेले आहेत. विधि व न्याय विभागाकडून काही नियम ठरवून दिलेले आहेत.

यानंतर F-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 53188 .....

श्री. विष्णू सवरा ....

त्याप्रमाणे जे जे शिक्षक बसतील त्यांना यामध्ये कायमस्वरूपी नोकरी देण्याचा आमचा विचार आहे.

श्री. ग.आ. देशमुख : अध्यक्ष महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. मी शासनाला प्रश्न विचारलेला आहे की, तासिका बेसिसवर शिक्षकांची भरती केलेली आहे, ती कायमस्वरूपी किती दिवसांत करणार ? मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, सामान्य प्रशासन विभाग याला परवानगी देईल. सामान्य प्रशासन विभागाने शासनाला परवानगी द्यायची, अशातऱ्हेचे उत्तर आम्ही या सभागृहात प्रथमच ऐकत आहोत. तासिका बेसिसवर अनेक दिवस काम करणारे शिक्षक आहेत. आदिवासी विकास विभागाकडे पैसाही आहे त्यासाठी. आम्ही शासनाला प्रश्न विचारित आहोत की, या शिक्षकांची किती दिवसांत कायमस्वरूपी भरती करणार आहात ?

श्री. विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, मी सुरुवातीला सांगितले तसे, या शासनात विविध खात्यांमध्ये जवळपास 1 लाखांच्या वर जागा रिक्त आहेत. आपण शासन म्हटले तरी, आमचाही त्यामध्ये एक विभाग आहे. याकरिता अशाप्रकारच्या 28-29 विभागांची सर्व माहिती जीएडीने मागितलेली आहे. ज्यावेळेस असा निर्णय होईल, कारण शेवटी शासनालाच करायचे आहे. एकदा आदेश आला की, आम्ही ती भरती प्रक्रिया सुरु करणार आहोत.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नांदेड येथील विष्णूनगर आणि वजिराबाद या आदिवासी वसतिगृहांतील असुविधांबाबत

(७) * 40396 श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शर्डी) **:** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथे विष्णूनगर आणि वजिराबाद येथे 100 विद्यार्थी क्षमता असलेली दोन वसतिगृहे तर आनंदनगर भागातील 100 विद्यार्थी क्षमता असलेले एक मुलींचे वसतिगृह सुरु **आहे**, हे खरे आहे **काय**,

(२) **असल्यास**, आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पुरविल्या जाणाऱ्या सोयी सुविधांकडे शासनाने केलेले **दुर्लक्ष**, त्यामुळे अनेक महिन्यापासून येथील वसतिगृहातील बेडींग **साहित्य**, **गादी**, वॉटर **फल्टर**, स्पर्धा परिक्षा **वर्ग**, **टंकलेखन**, डीटीपी आदि सुविधा उपलब्ध नसल्याची बाब माहे **जानेवारी**, 2016 च्या मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली **आहे**, हे ही खरे आहे **काय**,

(३) **असल्यास**, आदिवासी वसतिगृहातील सुरक्षा **रक्षक**, सफाई कामगार या शासकीय कर्मचाऱ्यांना काढून टाकून त्यांच्या जागी क्रिस्टल या खाजगी कंपनीकडून सुरक्षा रक्षक व सफाई कामगारांची दिनांक 1 **जानेवारी**, 2016 पासून नियुक्ती करण्यात आली **आहे**, हे ही खरे आहे काय,

(४) **असल्यास**, खाजगी कर्मचाऱ्यांमुळे सुरक्षेचा प्रश्न कठीण झाला **असून**, स्वच्छतेकडेही दुर्लक्ष होत असून विद्यार्थी संख्या लक्षात घेता वसतीगृहांची क्षमता वाढविण्याबाबत तसेचच इतर मागण्यांसाठी किनवट येथील प्रकल्प कार्यालयाकडे वारंवार तक्रारी करुनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे खरे आहे **काय**,

(५) **असल्यास**, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे **काय**, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विष्णु सवरा : (१) **नांदेड** येथे आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, विष्णूनगर क्र.1 (**मंजूर** क्षमता **७५**), आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, वजिराबाद क्र.2 (**मंजूर** क्षमता **७५**) व आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, नांदेड (मंजूर क्षमता **७५**) अशी एकूण तीन वसतीगृहे कार्यरत आहेत.

(२) **सदर** वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह **भत्ता**, गणवेश **भत्ता**, सहलीचे पैसे इत्यादी रकमांचे वाटप करण्यात आलेले आहे. बेडींग **साहित्य**, गादी इत्यादी पुरविण्यासाठी **आयुक्त**, आदिवासी विकास यांच्याकडून कार्यवाही सुरू आहे. वॉटर फिल्टर पुरविण्यासाठी अपर **आयुक्त**, अमरावती यांच्याकडे कार्यवाही सूरू आहे. स्पर्धा परिक्षा **वर्ग**, **टंकलेखन**, डीटीपी यांच्या प्रशिक्षणाकरिता पात्र संस्थांची प्रकल्प कार्यालयामार्फत निवड करण्यात आली असून प्रशिक्षण वर्ग मार्च अखेर पर्यंत सुरू होतील.

(३) व (४) वसतिगृह स्वच्छता ठेवण्यासाठी माहे **डसेंबर**, 2015 पासून नांदेड येथील प्रत्येक वसतिगृहावर एक सफाईगार व तीन पहारेकरी कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेले असून नांदेड येथील कर्मचाऱ्यांचे किनवट प्रकल्पातील तालुका व ग्रामीण स्तरावरील शाळा व वसतिगृहांवरील रिक्त पदांवर समायोजन करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत सुरक्षा व्यवस्था व सफाईचे काम सुरळीत सुरू आहे.

वसतिगृह क्षमतेची वाढ करण्याची विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेऊन त्यानुषंगाने नागपूर विभागात रिक्त असलेल्या मुलांच्या 150 जागा व मुलींच्या 45 जागा अशा एकूण 195 जागा नांदेड येथील मुला-मुलींच्या वसतिगृहाकरिता वर्ग करण्यात आलेल्या आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

५) प्रश्न उद्‌भवत नाही.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 40396.....

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, एकूणच राज्यातील आदिवासी आश्रमशाळा, आदिवासी मुला-मुलींची वसतिगृहे यांची प्रचंड दूरवस्था झालेली आहे. त्यांमध्ये पदे रिक्त राहणे, स्वच्छतेच्या अभावी त्या आश्रमशाळेची दूरवस्था होणे, त्यामुळे आदिवासी मुलांची पूर्णपणे परवड या सर्व आश्रमशाळांत झाल्याचे चित्र दिसत आहे. माननीय मंत्री महोदयांच्या मतदारसंघातही कुपोषणाचे सर्वात जास्त बळी याच आदिवासी आश्रमशाळांमध्ये आहेत. हा नांदेड जिल्ह्यातील प्रश्न आहे. तेथे महिला अधीक्षिका असतानाही मोठ्या प्रमाणात आश्रमशाळेतील मुलींवर अत्याचार होत आहेत. त्यामुळे पालक त्या आश्रमशाळेत मुले पाठविण्यास तयार नाहीत, ही वस्तुस्थिती खरी आहे काय ?या आश्रमशाळेत, वसतिगृहात राहणाऱ्या मुलींवर अत्याचार होत आहे. तेथे नेमलेल्या अधीक्षक, महिला अधिकारी आहेत, यांच्याकडून दुर्लक्ष होत आहे. किंबहुना त्या भागात अधीक्षिकांवर काही दबाव आहे, त्यामुळे त्या शाळेमध्ये पालक आपल्या मुलींना पाठविण्यास तयार नाहीत, ही वस्तुस्थिती खरी आहे काय ? या आश्रमशाळेच्या दूरवस्थेबाबतचा प्रश्न विचारण्यात आल्यानंतर आदिवासी आश्रशाळांतील मुलींवर जो अत्याचार होत आहेत, त्याबाबत संवेदना म्हणून आपण तेथे स्वतः भेट दिली आहे काय, की फक्त अधिकाऱ्यांच्या भरवशावर सर्व राज्य चालले आहे ?

श्री. विष्णू सवरा : तसे नाही. अध्यक्ष महोदय, त्यांनी जो आरोप ठेवला आहे तसे नाही.

तालिका सभाध्यक्ष (श्री. योगेश सागर) : प्रश्नाचा गाभा वेगळा आहे व माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे.

श्री. विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षांनी नांदेड व त्या परिसरातील वसतिगृहांच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. आता त्यांनी मला विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, मी स्वतः सुध्दा अनेक आश्रमशाळा, वसतिगृहांमध्ये जात असतो व त्या ठिकाणची वस्तुस्थिती पाहत असतो. तेथे जे आंदोलन केले ते कशाकरिता केले, त्यांच्या मागण्या काय आहेत त्याकडेही आमचे लक्ष आहे. नांदेडला सुध्दा अशाप्रकारचे आंदोलन झाले, त्या ठिकाणी वसतिगृहात असलेल्या सुविधा काही ठिकाणी कमी मिळाल्या वगैरे आंदोलनाचे विषय होते. हा जो प्रश्न विचारलेला आहे, त्या प्रश्नाच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, नांदेडमध्ये 3 वसतिगृहे आहेत. त्यातील 2 वसतिगृहे मुलांची तर 1 वसतिगृह मुलींचे आहे. तेथे असलेल्या संख्येमध्ये वाढ करावी, अशाप्रकारची मागणी होती. त्याप्रमाणे आपण वाढवूनही दिलेले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

04-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) F-4

SSG/ ST/ AKN/ AKN/ ST/ 11:50

ता.प्र.क्र. 40396.....

श्री. विष्णू सवरा ....

वाढवून दिल्यानंतर आपल्याला ज्या सुविधा वेळेवर दिल्या पाहिजेत, त्या देण्यास काही वेळेस थोडा उशीर होत आहे. त्यांनी ज्या मागण्या केलेल्या आहेत त्या मागण्यांची पूर्तता करण्याचा आपण प्रयत्न करतो. परंतु, तरीही तेथे गाद्यांचा, शैक्षणिक व अन्य साहित्याचा प्रश्न निर्माण होतो. ते त्यांना वेळेवर कसे मिळेल, याबाबत आपला प्रयत्न असतो. हा प्रश्न नांदेड येथील वसतिगृहाच्या संदर्भातील आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केलेल्या सूचनांप्रमाणे आम्ही त्यांची पूर्तता करु. नांदेडच्या संदर्भात बेडिंगची अव्यवस्था झालेली आहे, याबाबतचा प्रश्न आहे. त्यांना वॉटर फिल्टर मिळालेले नाहीत, त्याची व्यवस्था आम्ही करीत आहोत. अचानक संख्या वाढल्यामुळे काही ठिकाणी अशाप्रकारची अव्यवस्था झालेली आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : मंत्री महोदय आपण सांगितलेला मुद्दा बरोबर आहे. परंतु, आदिवासी आश्रमशाळांमध्ये वेळेवर साहित्य पुरवठा होत नाही. एक तर तुमच्या खरेदीमध्ये प्रचंड भ्रष्टाचार आहे. स्वेटर, गाद्या खरेदीमध्ये भ्रष्टाचार आहे. तुमच्या आदिवासी विकास विभागाची ही सर्व भ्रष्टाचाराची प्रकरणे अतिशय गाजत आहेत. किमान आदिवासी मुलांचे शोषण होणार नाही, याची तरी काळजी घ्यावी. याबाबतीत सुधारित मार्गदर्शक तत्त्वे तयार करावी लागतील, तरच वेळेवर साहित्य जाईल. तरच आपण जे म्हणत असता की, आदिवासी विद्यार्थ्यांना कपडे, स्वेटर व इतर साहित्य वेळेवर मिळाले पाहिजे ते वेळेवर मिळणार आहे. अशी काही सुधारित मार्गदर्शक तत्व करण्याची आवश्यकता आहे, आपण ती करणार आहात काय ?

श्री. विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, या वर्षी अशाप्रकारच्या काही गोष्टींचा पुरवठा आपण वेळेवर करु शकलो नाही, त्याला वेगळी कारणे आहेत. काही प्रशासकीय आहेत, काही वेगवेगळे टेंडर रद्द होणे, कोर्टामध्ये जाणे अशाप्रकारे वेळ गेला, ही गोष्ट खरी आहे. यावर्षी आलेला अनुभव लक्षात घेता पुढच्या वर्षी म्हणजे सन 2016-2017 या वर्षात सर्व विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे साहित्य, सर्व प्रकारच्या सुविधा वेळेवर कशा मिळतील, याची आम्ही दखल घेऊ.

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांना माझे स्पेसिफिक 3 प्रश्न आहेत. पहिला प्रश्न म्हणजे हे कधी सुरु झाले ? कारण जर ते अगोदरच सुरु झाले असेल तर अजूनही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तेथे गादीची व्यवस्था नाही, इतर साहित्य नाही, वॉटर फिल्टरची व्यवस्था नाही, परीक्षावर्ग नाही. ज्या सर्व गोष्टी

...5/-

04-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) F-5

SSG/ ST/ AKN/ AKN/ ST/ 11:50

ता.प्र.क्र. 40396.....

प्रा. वर्षा गायकवाड .....

त्यामध्ये आहेत, त्या सर्वांचे उत्तर जवळपास नाही असे आहे व सर्वांवर कारवाई सुरु आहे, असे दिलेले आहे. त्यामुळे आपण जरी म्हणत असलात की, आम्ही सन 2016-2017 मध्ये लिस्ट करु बरोबर टाईम टू टाईम देऊ. परंतु, मंत्री महोदय माझी विनंती आहे की, याबाबत आपण अकाऊंटिबिलीटी फिक्स करणार आहात की नाही ? यामध्ये जो एवढा विलंब झालेला आहे, त्या संदर्भात आपण काय कारवाई करणार आहात ? खरेतर तेथील आयुक्त, उपायुक्त किंवा पीओंचे तेथे लक्ष देणे हे कामच आहे. परंतु, त्यांनी लक्ष दिलेले नाही. ज्या पध्दतीने संख्या वाढली, त्यावर नियंत्रण करण्याकरिता दुसरी वसतिगृह आहेत का हे पाहणेही त्यांचे काम होते. त्यामुळे या संदर्भात आपण काय ॲक्शन घेणार आहात ते सांगावे. भविष्याच्या दृष्टिकोनातून तुमच्या पॉलिसी निर्णयामध्ये तुम्ही काय अकाऊंटिबिलीटी फिक्स करणार, त्यासंदर्भात आम्हाला सांगावे.

श्री. विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, या विद्यार्थ्यांना साहित्य पुरवठा करणे वगैरे या संदर्भात ज्या अधिकाऱ्यांकडून दिरंगाई झाली असेल, त्या प्रमाणे त्यांच्यावर निश्चितपणे आम्ही कारवाई करु आम्ही तसे आदेश दिलेले आहेत. आम्ही त्याची माहिती घेऊ. आपल्याकडे अशाप्रकारे स्पेसिफिक माहिती असल्यास ती आमच्याकडे द्यावी, आम्ही त्याची निश्चितपणे गंभीर दखल घेऊ. परंतु, अशाप्रकारे जे अधिकारी किंवा कोणाची चूक झाली असेल तर, त्यांना कोणत्याही प्रकारची सहानुभूती दाखविण्याचे काही कारण नाही. आम्ही त्यांच्यावर कडक कारवाई करु परंतु, विद्यार्थ्यांना देण्यात येणारे शैक्षणिक व अन्य साहित्य वेळेवरच गेले पाहिजे याकडे आम्ही कटाक्षाने लक्ष देऊ, याबाबत सन 2016-2017 मध्ये दखल घेतलेली आहे.

डॉ. राहूल पाटील : अध्यक्ष महोदय, परभणी जिल्ह्यात सुध्दा 3 आदिवासी आश्रमशाळा आहेत, त्यातील 2 मुलांच्या व 1 मुलींची आहे. मला असे वाटते की, महाराष्ट्रात फक्त आमच्याच जिल्ह्यातील हॉस्टेल्स भाडेतत्त्वावर सुरु आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य प्रश्नोत्तराचा तास संपण्यापूर्वी आपण आपला प्रश्न विचारावा.

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 40396.....

डॉ. राहूल पाटील : अध्यक्ष महोदय, मी कलेक्टरांसमवेत व्हिजीट करुन यासाठी जागाही अलॉट केलेली आहे. त्या हॉस्टेलचे बांधकाम किती दिवसांत पूर्ण होणार आहे. तिन्ही हॉस्टेल्स सध्या भाड्याच्या इमारतीत सुरु असल्याने, शासन त्याचे बांधकाम कधी पूर्ण करणार आहे ?

श्री. विष्णू सवरा : अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभागामार्फत ज्या आश्रमशाळा व जी वसतिगृहे आहेत, त्याबाबत सांगावयाचे झाले तर जी वसतिगृहे भाड्याने चालवितात, त्या भाड्याच्या वसतिगृहाबाबतीतसुध्दा आपली स्वत:ची जागा घेऊन त्या ठिकाणी आपली स्वतंत्र इमारत बांधण्याचे सरकारचे धोरण आहे. त्याप्रमाणे निधीची उपलब्धताही आहे. सन्माननीय सदस्यांनी परभणी येथील प्रश्न विचारलेला आहे. त्यांनी मला त्याबाबतची माहिती द्यावी, त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

G-1/....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. वसंतराव चव्हाण : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी कामामध्ये किंवा सुविधा पुरविण्यामध्ये कमतरता झाली आहे, हे मान्य केलेले आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली जाणार आहे, यासंदर्भात मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

तालिका अध्यक्ष : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---*---

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: सदस्यांची अटक, स्थानबद्धता व सुटकेसंबंधी घोषणा

तालिका सभाध्यक्ष : मला माननीय अतिरिक्त मुख्य महानगर न्यायदंडाधिकारी, मुंबई यांचेकडून कळविण्यात आले आहे की, सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. बच्चू ऊर्फ ओमप्रकाश बाबाराव कडू यांना भारतीय दंड संहितेच्या कलम 34 सहीत कलम 332, 353, 504 अन्वये दिनांक 30/03/2016 रोजी अटक करुन दिनांक 31/03/2016 रोजी दुपारी 3.25 वाजता माननीय अतिरिक्त मुख्य महानगर न्यायदंडाधिकारी यांचे समक्ष हजर केले असता त्यांची दिनांक 31/03/2016 रोजी जामीनावर मुक्तता करण्यात आली.

---*---

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. / मु.शी. : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे

प्रा. राम शिंदे (पणन मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवतो :-

महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम 1983 च्या कलम 69 अन्वये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांचा सन 2014-2015 या वर्षाचा त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

तालिका सभाध्यक्ष : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

---*---

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : स्थगप प्रस्तावाच्या सूचना.

तालिका अध्यक्ष : आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनेस माननीय अध्यक्षांनी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

---*---

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी परवा नाशिक येथे असे विधान केले की, जे भारत माता की, जय म्हणणार नाही, त्यांना या देशात रहाण्याचा अधिकार नाही. त्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी काल खुलासा केला...(अडथळा)...

तालिका अध्यक्ष : जे बोलणार नाही, त्यांच्यासाठी ते आहे. आपण बोलत असल्यामुळे आपण खाली बसावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांना त्यासंदर्भातील खुलासा करावा लागतो. राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे पद हे घटनात्मक आहे. आम्ही घटनेला साक्ष ठेवून शपथ घेतो. यासंपूर्ण परिस्थितीचा विचार करता त्यांनी केलेल्या विधानाचा त्यांना खुलासा करावा लागतो. त्यांचे वक्तव्य हे राज्याचे मुख्यमंत्री म्हणून असणे आवश्यक आहे. परंतु त्यांच्या पक्षाची भूमिका पक्षाच्या कार्यकर्त्यांसमोर किंवा त्यांच्या प्रशिक्षण वर्गापुढे बोलणे शक्य आहे. ते बोलतात काय ते मला माहीत नाही. खरे म्हणजे आता त्यांना प्रश्न विचारण्याची वेळ आलेली आहे. आज राज्यामध्ये देशप्रेमाचे नाही तर देशद्रोहाचे धडे कोणाकडून घ्यायचे असा प्रश्न तयार झालेला आहे. देशपातळीवर त्याकरिता एनओसी घेण्याची वेळ आलेली आहे. देशप्रेमी कोणाला म्हणायचे आणि देशद्रोही कोणाला म्हणायचे अशी एनओसी आता तर माननीय मुख्यमंत्री कार्यालयातून मिळण्याची सोय झाल्याचे त्यांच्या कालच्या वक्तव्यावरुन दिसून येते.

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या या संपूर्ण भाषणाचा आशय पाहिला तर मला नेहमी प्रश्न पडतो की, आता राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील लोकांनी आता देशभक्ती सिद्ध केली पाहीजे, अशा प्रकारचे प्रश्न विचारायला लागले आहे. आमच्या पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. अब्दुल सत्तार यांनी परवा विधानसभेमध्ये भाषण केले. माहीमच्या दर्ग्यामध्ये तिरंगा फडकविला गेला. अशी कुठलीही परिस्थिती नाही की, भारत माता की जय म्हणण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी विधान करावे.

अध्यक्ष महोदय, राज्यामधील प्रचंड दुष्काळ व शेतकरी आत्महत्त्या या प्रश्नावरुन जनतेचे लक्ष विचलीत करण्यासाचे सरकारचे धोरण दिसते. नॉन इश्युला इश्यु करायचे. भारत माता की जय म्हणण्यासंदर्भात उल्लेख झाला, त्यामुळे माननीय मुख्यमंत्री काम करीत असलेल्या घटनेच्या पदाचा अवमान झालेला आहे. आमची मागणी आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी राज्यातील जनतेची माफी मागावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.....

अध्यक्ष महोदय, तिरंगा फडकविण्याचा अधिकार कोणाला आहे, भारत माता की जय म्हणण्याचा अधिकार कोणाला आहे. नागपूर शहरामध्ये 2000 साली मोर्चा निघाला होता. त्यावेळी आपल्या पक्षाच्या कार्यालयावर तिरंगा झेंडा लावायचा, त्यासाठी भडकळ चौकामध्ये लाठ्या-काठ्या घेऊन कोण उभे होते. तिरंगा फडकवू देणार नाही, अशी भाषा करणारी कोण माणसे होती. आपण तेव्हाची वर्तमानपत्र काढून पहावीत. त्या चौकामध्ये माननीय मुख्यमंत्री आमदार होते. माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी हे देखील आमदार होते.

अध्यक्ष महोदय, राज्यातील शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत. आमची भारत माता रडत आहे. आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांच्या महिलांकडे पहायला किंवा त्यांना मदत करण्यासाठी आमच्याकडे वेळ नाही. आपल्याच पक्षातील श्रीमती मैथीली जावकर या श्री. गणेश पांडये यांच्याकडून झालेल्या विनयभंगाबद्दल आपल्या पक्षाकडे न्याय मागत आहेत. हे प्रकरण पाहिल्यावर आमची भारत माता रडत आहे, असे दिसून येते. आपण कोणत्या भारत माता की जय विषयी गप्पा मारता. राज्यातील वातावरण गढूळ करायचे, अस्थिर करायचे, मूळ विषयापासून जनतेचे लक्ष विचलित करायचे हे सरकारचे धोरण आहे. यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी वापरलेले व्यासपीठ, त्यांनी घेतलेली घटनेची शपथ त्याचा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांनी माफी मागावी, अशी आमची स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून मागणी आहे.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, माझी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेमध्ये क्रमांक तीनवर स्थगन प्रस्तावाच्या सूचना दर्शविण्यात आलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, माझ्या माहितीप्रमाणे आज विधानसभेचे माननीय अध्यक्ष जालना जिल्ह्यातील अंबड येथे सकाळी लवकर हेलिकॉप्टरने गेले आहेत. विधानसभेचे अध्यक्ष नसले तर विधानसभेचे उपाध्यक्ष यासंदर्भातील निर्णय घेतात, अशी पद्धत आहे. परंतु विधानसभेच्या उपाध्यक्षांचे पद रिक्त आहे. माझ्या माहितीप्रमाणे तालिकेवर बसणारे सन्माननीय तालिका अध्यक्ष हे तालिकेवर 11.00 वाजता येतात. स्थगन प्रस्तावाच्या सूचना एक तास आधिच स्वीकारल्या जातात किंवा कोणत्या सूचना स्वीकारायच्या, कोणत्या सूचना नाकारायचा आहे, याबद्दलचा निर्णय अध्यक्ष महोदयांचा किंवा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अजित पवार...

ते नसतील तर उपाध्यक्ष महोदयांचा असतो. माननीय उपाध्यक्ष यांचे पद रिक्त आहे व अध्यक्ष महोदय, अंबड येथे गेले असल्यामुळे स्थगन प्रस्तावाच्या सूचनेसंबंधिचा निर्णय कोणी घेतला, यासंदर्भात सभागृहाला कळले पाहीजे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सर्वसाधारणपणे ज्यावेळी वित्तिय मागण्यांवर चर्चा होते, त्यावेळी आपण स्थगन प्रस्ताव घेत नसतो. त्यामुळे काल माननीय अध्यक्ष यांचेसोबत चर्चा करीत असताना त्यांनी ही सूचना केली होती की, आज मागण्यांवर चर्चा आहे व महत्वाचे स्थगन प्रस्ताव नाही, त्यामुळे स्थगन प्रस्तावाच्या सूचना दालनातच नाकारण्यात याव्यात, असे त्यांनी काल सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री आणि मला सूचविले होते. तसेच वित्तिय मागण्यांवर चर्चा असेल त्या दिवशी स्थगन प्रस्ताव घेतलेच नाही. फार आवश्यक विषय असेल तर परवानगीने घेता येतो...(अडथळा)...पूर्वी असे होत नव्हते...(अडथळा)...कार्यक्रम पत्रिकेवर दाखविण्यात आले असले तरी ते दालनामध्ये नाकारले आहेत, त्यामुळे त्यावर बोलता येणार नाही. यासंदर्भात अध्यक्ष महोदयांचे धोरण शिथिल आहे. मागील कालखंडामध्ये डिमांडवर चर्चा असेल त्या दिवशी स्थगन प्रस्ताव नाकारण्यात येत होते. ती परंपरा चालू ठेवायची नसल्यामुळे आता काही वेळेला संधी दिली जाते. आदरणीय अंकुशराव टोपे साहेबांचे निधन झाल्यामुळे माननीय अध्यक्ष अंबड येथे गेलेले आहेत. आता तालिका अध्यक्ष तालिकेवर आहेत. उपाध्यक्षांची निवड योग्य वेळी होईल.

तालिका अध्यक्ष : मला माननीय अध्यक्षांच्या कार्यालयातून फोन आला होता. मी स्वत: सकाळी 9.30 वाजता विधानभवन येथे आलो. स्थगन प्रस्तावाच्या सूचना एक तास अगोदर स्वीकारल्या जातात. त्यामुळे मी 10.00 वाजण्याला 5 मिनिटे कमी असताना अध्यक्ष महोदयांच्या चेंबर मध्ये आलो. त्यावेळी माझ्यासमोर स्थगन प्रस्तावाच्या सूचना ठेवण्यात आल्या. त्यासंदर्भात मी माननीय अध्यक्षांशी चर्चा केली. सदरहू स्थगन प्रस्तावाच्या सूचना नाकारण्यात याव्यात, अशी अध्यक्षांची सूचना होती. त्यामुळे माननीय अध्यक्षांच्या सूचनेप्रमाणे स्थगन प्रस्तावाच्या सूचना नाकारण्यात आल्या आहेत.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे हे सिनिअर नेते आहेत. त्यांनी यासंदर्भात वेगळी बाब सांगितली आणि आपण तालिका अध्यक्ष या नात्याने वेगळे सांगत आहात. आपल्या दोघांच्या सांगण्यामध्ये विरोधाभास आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर) : माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सांगितले की, ज्या दिवशी अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यावर चर्चा असते त्या दिवशी कामकाज पत्रिकेमध्ये स्थगन प्रस्तावाच्या सूचना दर्शविण्यात येतात. अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यावरील चर्चा सभागृहामध्ये जवळपास 7 ते 8 दिवस सुरु असतात. या 8 दिवसांच्या कालावधीमध्ये स्थगन प्रस्तावावरील सूचना कामकाज पत्रिकेमध्ये न दर्शविने योग्य नाही व तशी तरतूद नियमामध्ये देखील नाही. त्यामुळे या कालावधीमध्ये स्थगन प्रस्ताव कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविण्यात येतो. स्थगन प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे हा विधानसभा अध्यक्षांचा अधिकार आहे. सभागृहाची परंपरा आहे की, ज्या दिवशी अनुदानाच्या मागण्यावर चर्चा असेल व त्या दिवशी स्थगनाचा अतिशय महत्वाचा विषय असेल तर तो नाकारणे किंवा स्वीकारणे हा विधानसभा अध्यक्षांचा अधिकार आहे. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना औचित्याचे मुद्दे झाल्यानंतर बोलण्यासाठी परवानगी देण्यात येईल. आता कामकाम पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेले औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे.

तालिका सभाध्यक्ष : माननीय विरोधी पक्ष नेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, ...

(सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड आपल्या जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभाध्यक्ष : मी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड आपणास सांगू बोलण्याची अनुमती दिलेली नाही.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, मुंबई पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात माझा औचित्याचा मुद्दा आहे. मुंबई पोलीस दलातील कर्मचाऱ्यांचे कुटुंबिय उपोषणासाठी बसलेले असून त्यांचा आज उपोषणाचा दुसरा दिवस आहे. उपोषणकर्त्या महिलांची .....

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या जागेवर बसावे. माननीय विरोधी पक्ष यांनी आपला औचित्याचा मुद्दा सुरु ठेवावा.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, ...

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांना सभागृहात असे वागता येणार नाही. त्यांनी बाहेर मिडियाकडे जाऊन त्यांच्या समोर बोलावे.

श्री.एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सभागृहात माननीय विरोधी पक्ष नेते बोलत असून विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी त्यांचा मान ठेवावा. तुमचे भांडण आहे, मला माहिती आहे. काँग्रेस व राष्टवादी काँगेस पक्षाचे जमत नाही, हेही मला माहिती आहे. परंतु त्याबाबतचे प्रदर्शन सभागृहात करु नये. तुमचे किती कर्तृत्व आहे, काय आहे, एकदम लाख रुपये दिले, ॲम्ब्यूलन्स दिली, नुसरत का इशरत होती, त्याबाबत सर्व जगाला माहिती आहे. भारत माते विषयी तुमच्या मनात काही शंका आहे, याची शंका घेण्यास कारण नाही, अजिबात कारण नाही. जी राष्ट्रद्रोही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

आहे, जीने देशावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला..... त्यामुळे तुमच्या विषयी आमच्या मनात अजिबात शंका नाही. तुमच्या देश प्रेमाविषयी आम्हाला शंका नाही, भारत मातेच्या जय विषयी शंका नाही. इशरतच्या प्रेमाविषयी सुध्दा शंका नाही. माझी एवढीच विनंती आहे की, माननीय विरोधी पक्ष नेते बोलत आहेत, त्यांचा सन्मान ठेवावा. सन्माननीय सदस्यांनी त्यांचा विषय मांडण्यासाठी अन्य आयुधांचा वापर करावा. विरोधी पक्ष नेते यांना बोलू देण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

तालिका सभाध्यक्ष : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे, माननीय विरोधी पक्ष नेते बोलत आहेत.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी जो मुद्दा मांडला.... (अडथळा) ....

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.अजित दादा पवार यांना सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्ष नेते औचित्याच्या मुद्यावर बोलत असताना त्यांना सन्माननीय सदस्य अडथळा आणत होते, याशिवाय दुसरा कोणता मुद्दा नाही. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे आपण आता कामकाजात पुढे जाऊ या. औचित्याचे मुद्दे झाल्यानंतर मी आपणास बोलण्याची संधी देतो. आता औचित्याच्या मुद्यावर सभागृहात चर्चा सुरु आहे.

(सन्माननीय सदस्य सर्वश्री.जितेंद्र आव्हाड व अबू आझमी वेलमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करतात.)

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी वेलमध्ये येऊ नये. त्यांनी वेलमध्ये येण्याचे काही कारण नाही, त्यांनी आपल्या जागेवर जाऊन बसावे. आप अपनी जगह पर जाकर बैठिये. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी आपला औचित्याचा मुद्दा सुरु ठेवावा.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी जो मुद्दा मांडला ..... (अडथळा) .....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अशी भाषा सभागृहात चालत नाही. आपण बाहेर जाऊन सभा घ्यावी.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी केलेले वक्तव्य कामकाजातून काढून टाकावे, अशी माझी विनंती आहे.

तालिका सभाध्यक्ष : सदर बाब मी तपासून पाहतो.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ..... (अडथळा) ... त्यांनी उभे राहून काही विधान केले असते ..... (अडथळा) ... तर मंत्री महोदयांनी.....

अध्यक्ष महोदय, संविधानाबद्दल ज्यांना आदर नाही, राष्ट्रध्वजाबाबत अवमानकारक भूमिका घेतात, अशा लोकांनी राष्ट्र प्रेमाच्या व भारत मातेच्या गप्पा मारणे योग्य नाही. म्हणून याबाबतीत माननीय मंत्र्यांनी उत्तर देताना जे वक्तव्य केले ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे, अशी आमची मागणी आहे.

तालिका सभाध्यक्ष : मी तपासून पाहतो.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यचा प्रयत्न करतात.)

तालिका सभाध्यक्ष : मी सांगितले की, तपासून पाहतो, न तपासता मंत्री महोदयांचे वक्तव्य कामकाजातून काढून टाकणे शक्य नाही. इशरत जहाँ के बारे में आपका क्या कहना है ? वह आप अपनी जगह पर जाकर बताईए. मैं आपको बोलने के लिए मौका देता हूं.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, ...(अडथळा)

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य ..... (अडथळा) ..... सर्व सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर जाऊन बसावे. सन्माननीय सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी मागितलेली आहे, त्यांनी तो मांडावा.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य राष्ट्रध्वज घेऊन वेलमध्ये येतात.)

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा मांडण्यापूर्वी .... (अडथळा)..

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.हसन मुश्रीफ यांनी राष्ट्रध्वज उलटा धरला होता तो सिधा केला, हां केला.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. नाशिक जिल्ह्यातील सिंहस्थ नगर जवळील सहाव्या योजनेतील एका भूखंडावर सिडको प्रशासनाची सामाजिक सुविधा केंद्र नावाची इमारत आहे. मानव सेवा केंद्राला ही इमारत सिडकोने 16 वर्षापूर्वी भाड्याने दिली होती.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.हनुमंत डोळस ... (अडथळा) ... राष्ट्रध्वजाचा अवमान करुन .... (अडथळा) ..... सन्माननीय सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी आपला औचित्याचा मुद्दा सुरु ठेवावा.

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, मानव सेवा केंद्राने या इमारतीमध्ये ज्येष्ठ साहित्यिक व कविवर्य श्री.नारायण सुर्वे यांच्या नावाने वाचनालय सुरु करण्यात केले होते. त्यासंदर्भातील पत्र मी आपणास देतो. सभागृहाच्या माध्यमातून माझी विनंती आहे की, याप्रकरणी शासनास निवेदन करण्यास सांगावे.

अध्यक्ष महोदय, मद्यपान करुन वाहन चालविणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढत असल्याचे चित्र दिसत आहे. मद्यपान प्रकरणी परिवहन विभागातर्फे खाजगी वाहन व दुचाकी वाहन चालकांची तपासणी करण्यात येते. परंतु व्यावसायिक वाहन चालकांची .....

यानंतर I-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन राष्ट्रध्वज फडकावित घोषणा देत असतात.)

श्री. एकनाथ खडसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हसन मुश्रीफ यांनी राष्ट्रध्वज उलटा धरला आहे आणि त्याचा अपमान केलेला आहे. हा ध्वज उलटा फडकाविल्याचे आपण टी.व्ही.वर पाहू शकता. याचे चित्रीकरण टी.व्ही.वर पाहू शकता. त्यांनी ध्वज उलटा पकडला असल्यामुळे त्यांना या सभागृहामध्ये शिक्षा झाली पाहिजे. आपण यासंबंधी व्हीडीओ चित्रीकरण तपासावे. सन्माननीय सदस्य श्री. हसन मुश्रीफ आणि समाजवादी पक्षाचे सन्माननीय सदस्य यांनी ध्वज उलटा पकडल्यामुळे त्यांना शिक्षा झाली पाहिजे व त्यांचे सदस्यत्व रद्द झाले पाहिजे. त्यांनी राष्ट्रध्वज उलटा पकडून त्याचा अपमान केलेला आहे. आपण हे तपासून घ्यावे. खात्री करुन त्यांच्यावर कार्यवाही करावी अशी माझी विनंती आहे. (अडथळा.....)

तालिका सभाध्यक्ष : चित्रीकरण तपासून त्यावर निर्णय करु.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन राष्ट्रध्वज फडकावित घोषणा देत असतात.)

श्री. चरण वाघमारे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. भंडारा जिल्हा परिषदेमध्ये सन 2015-16 या आर्थिक वर्षात 3 लाखावरील 15 लाखापर्यंतची विकास कामे विनानिविदा ग्रामपंचायतीला देण्याबाबत मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी करुन शासन निर्णयाची अवहेलना केली आहे. (अडथळा.....) त्यामुळे या प्रकरणी संबंधितांवर कडक कार्यवाही करावी अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

तालिका सभाध्यक्ष : हे सभागृह म्हणजे जाहीर सभा नाही. या सभागृहामध्ये सर्वांनी शिस्तीने वागले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. अजित पवार आपण आपल्या पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना जागेवर बसण्यास सांगावे. हे सार्वभौम सभागृह असून जाहीर सभेचे स्थान नाही. सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड या सभागृहामध्ये शिस्तीने वागले पाहिजे. (अडथळा.....)

श्री. रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, या सभागृहामध्ये काँग्रेसच्या सन्माननीय सदस्यांनी ज्यावेळी राष्ट्रध्वज बाहेर काढला, त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. हसन मुश्रीफ यांना एवढेही कळले नाही की, त्यांनी राष्ट्रध्वज उलटा धरुन फडकविला आहे. ज्या सदस्याला राष्ट्रध्वज कसा पकडायचा हे कळत नाही. (अडथळा.....) त्यांनी या सभागृहाचा आणि देशाचा अपमान केलेला आहे. लोकप्रतिनिधी म्हणून ते अनेक वर्षे आहेत, मंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले आहे आणि त्यांना जर राष्ट्रध्वज पकडता येत नसेल तर त्यांच्यावर या सभागृहाच्या माध्यमातून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी आमची मागणी आहे. (अडथळा.....)

तालिका सभाध्यक्ष : माझ्याही लक्षात आले नव्हते. मी देखील त्यांना सांगितले की, आपण राष्ट्रध्वज उलटा पकडला आहे. त्याचे चित्रीकरण पाहून माननीय अध्यक्ष त्याचा निर्णय करतील. या परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज करणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(दुपारी 12 वाजून 24 मिनिटांनी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(अध्यक्षस्थानी माननीय तालिकाध्यक्ष श्री.योगेश सागर)

(काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, (अडथळा.....) याठिकाणी जी काही चर्चा सुरु आहे. मी सन्माननीय सदस्यांना आठवण करून देतो. नोव्हेंबर महिन्यात मलेशिया येथे आशियाई कॉन्फरन्स झाली होती. त्यावेळी आशियाच्या कॉन्फरन्समध्ये जपानच्या प्रधान मंत्र्यांना भेटताना राष्ट्रध्वज उलटा लावला जातो. त्याठिकाणी माननीय प्रधानमंत्री हस्तांदोलन करतात. रशियामध्ये आपले प्रधानमंत्री चालायला लागले होते. (अडथळा.....) त्यावेळी रशियाच्या प्रधानमंत्र्यांनी त्यांना थांबविले की, आपले राष्ट्रगीत सुरु आहे. याठिकाणी आम्ही हे जाणूनबुजून केलेले नाही. यामध्ये आमची एवढी अपेक्षा आहे की, राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी हा विषय प्रतिष्ठेचा करण्यापेक्षा राज्यातील जनतेची माफी मागावी.

K-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचे बोलणे झाल्यानंतर मी आपल्याला औचित्याच्या मुद्दयावर बोलण्याची संधी दिली. या सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी विरोधी पक्षाचे नेते बोलत आहेत. तेव्हा त्यांना अशाप्रकारे बोलणे आणि बाकीच्या सन्माननीय सदस्यांनी प्रोत्साहीत करणे, हे काही योग्य नाही. या सभागृहाचे काही औचित्य आहे, सार्वभौमत्व आहे, काही परंपरा आहे. या सभागृहाचा मानसन्मान आपण राखणार नाही काय? विरोधी पक्षनेते बोलत आहेत तोपर्यंत तरी सन्माननीय सदस्यांनी खाली बसायले पाहिजे. सन्माननीय सदस्यांचा हा जो ॲग्रेसिव्हपणा आहे. बाहेर जाहीर सभेमध्ये आपण राजकीय काम करतो, बोलतो हे वेगळे आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्य राजकीय प्रतिनिधीत्व करीत आहे. पण सभागृहामध्ये आपण या चर्चेवर विषय नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेते औचित्याचा मुद्दा मांडत होते. याबाबत सन्माननीय मंत्री महोदय, श्री.एकनाथराव खडसे यांनी आणि बाकीच्या सदस्यांनी सांगितले त्याची चित्रफित तपासू आणि माननीय अध्यक्ष आल्यानंतर यावर जो काही निर्णय करायचे असेल तो निर्णय करतील. आता आपण कामकाज सुरु करु या.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा मांडायला परवानगी द्यावी.

अध्यक्ष महोदय, त्यानंतर सन्माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी काही खुलासा केला. काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलत होते. त्याची दखल मंत्री महोदयांनी खुलासा करणे योग्य होते काय? जर या विषयाची पुन्हा पुन्हा चर्चा होत असेल तर कामकाजातून मंत्री महोदयांचे म्हणणे काढून टाकले पाहिजे असे म्हणण्याची गरज काय होती.

तालिकाध्यक्ष : जर ते रेकॉर्डवर असेल तर तपासून कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पांडुरंग बरोरा : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, तालुका शहापूर, जिल्हा ठाणे येथील 250 मेगावॅट घाटघर उदचंन प्रकल्पासाठी चोंढे, साकुर्ली व परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या. तसेच जमीन संपादित करतेवेळी शेतकऱ्यांच्या मुलांना सेवेत सामावून घेण्याचा निर्णय त्यावेळी शासनाने घेतला. याशिवाय धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना पात्र ठरविण्याकरिता जलविद्युत मंडळ एकलहरे, जि.नाशिक येथे प्रशिक्षण पूर्ण करुन नोकरीत सामावून घेण्यात न येणे, परिणामी स्थानिक शेतकरी व त्यांचे पाल्य यांच्यात निर्माण झालेला असंतोष व निराशेची भावना, याबात घाटघर उदंचन विद्युत प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या आहेत. तथापि, त्यांच्या मुलांना वा पाल्यांना सेवेत सामावून घेतले नाही. सदर प्रकल्पात नोकरीत सामावून घेण्याबबतची मागणी या आचित्याच्या मुद्याद्वारे मी शासनास करीत आहे.

....3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल राऊत : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईमध्ये धुम्रपान कक्षाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात हुक्का पार्लर चालविण्यात येत असून मुलूंड येथे गोरेगांव लिंक रोड, कन्टेनर यार्डच्या बाजूस असलेले द गुड वेब्स कॅफे आणि भांडूप येथे एल.बीएस मार्ग, ह्यूमा मॉल, 1 ला मजल्यावरील लिक्वीड ॲण्ड फम या हॉटेलमध्ये धुम्रपान कक्षाच्या नावाखाली अनधिकृपणे हुक्का पार्लर दिवस, रात्र चालविण्यात येत आहे. सदरचा हुक्का पार्लर नशेचा अड्डा बनलेला असून या हुक्का पार्लरमध्ये अल्पवनीय मुले, मुली शालेय विद्यार्थी हुक्कांची नशा करण्यासाठी येत असून अल्पवयीन मुले नशेच्या विळख्यात जात असणे, त्यामुळे हुक्का पार्लर बंद करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीने संबंधित पोलीस प्रशासनाकडे आणि महानगर पालिकेकडे तक्रार केली असता पोलीस प्रशासन आणि महानगर पालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करुन यावर कारवाई करण्याचे अधिकार आमच्या अखत्यारित नसल्याचे उत्तर देवून कारवाई करण्याचे अधिकारासाठी पोलीस प्रशासन महानगर पालिकेकडे बोट दाखवित असून महानगर पालिका प्रशासन पोलीस प्रशासनाकडे बोट दाखवून लोकप्रतिनिधींची दिशाभूल करीत असणे, धुम्रपान कक्षाच्या नावाखाली चालविण्यात येत असलेले हुक्का पार्लर बंद करुन चालविणा-यावर फौजदारी गुन्हे दाखल करुन कठोर कारवाई करावी व चालविणाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

.....

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेश (बाळा) काशिवार : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, उन्हाळयाची चाहूल लागताच विदर्भातील नदी, नाले, तळे आतापासून कोरडे होण्याच्या मार्गावर असणे, त्यामुळे यावर्षीसुध्दा विदर्भातील जनतेला पाण्यासाठी पायपीट करावी लागणार असल्याची शक्यता निर्माण होणे, एकीकडे एमजीपी आणि जिल्हा परिषदेच्या बहुतेक पाणीपुरवठा योजना बंद अवस्थेत असल्यामुळे जनतेला दुषीत पाण्याचा सामना करावा लागत असणे, त्यामुळे नागरिक आणि जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होणे, दुसरीकडे नाग नदीचे पाणी वैनगंगा नदीमध्ये सोडले जात असल्यामुळे वैनगंगा नदीच्या तीरावर वसलेल्या गावांना याचा फटका बसणे, त्यामुळे नागरिक, पशु-पक्षी यांना विविध रोगांची लागण होऊन ते मृत्यूमुखी पडल्याच्या घटना घडणे, याचा पर्यावरणाला सुध्दा मोठा फटका बसला असून नैसर्गिक संपदा सुध्दा नष्ट होण्याच्या मार्गावर असणे, भंडारा येथे कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे एक पद होते. ते गोठविण्यात आले असून गोंदिया आणि भंडारा जिल्हयासाठी एक पद दिले असून जे पद जसेच्या तसे प्रस्तापित करण्यात यावे अशी मी विनंती करतो.

.....

....5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, आमची एक विनंती आहे की, आम्ही औचित्य मांडतो. पण जो स्थगन मांडला आहे. त्याच्यावर स्लिंग नंतर द्यावे. मुंबई पोलीस दलातील कर्मचा-यांच्या विविध मागण्यांकरिता गेली 20 दिवस महिला उपोषण करीत आहेत. त्यातील काही महिलांची प्रकृर्ती चिंताजनक आहे. मी स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांना आणि माननीय गृह राज्यमंत्र्यांना याबाबतीत बैठक बोलवावी अशी विनंती केलेली आहे. यासंदर्भात 20 दिवस होऊन गेले आहेत. त्यांची एकही संघटना नाही त्याचा काही संबंध नाही. किमान मुंबई पोलीस दलातील जवान, राज्यातील पोलीसांचाही तोच प्रश्न आहे, मुंबईतील संख्या पोलीसांची संख्या अतिशय अपुरी आहे. ओव्हर टाईम करावा लागतो, कुटुंबाची राहण्याची व्यवस्था नाही, शिक्षणाची व्यवस्था नाही अशी मोठया प्रमाणात परवड आहे. ओव्हर टाईम करावा लागतो, सणासुदीच्या सुट्टया नसतात अशा वेळी त्यांनी किमान वेल्फेअरच्या दृष्टीने मागण्या केलेल्या आहेत. त्याबाबत आजच बैठक घेण्यासंदर्भात आपल्या स्तरावरुन राज्य सरकारला त्याच प्रकारचे निर्देश करावेत, अशी मी औचित्याच्या निमित्ताने विनंती करतो.

.....

तालिका सभाध्यक्ष : या संदर्भात शासनाने नोंद घ्यावी.

....6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हनुमंत डोळस : अध्यक्ष महोदय. मी अत्यंत सार्वजनिक व निकडीच्या महत्वाच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा आपल्यासमोर उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या माळशीरस तालुक्यातील कारुंडे येथे दिनांक 29 मार्च 2016 रोजी सकाळी 9.00 वाजता वीजेच्या वायरचे शॉर्ट सर्किट झाल्याने जवळ जवळ 10 लाखाचे नुकसान झाले असून या शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत मारुती जगन्नाथ गायकवाड यांच्या घरासह त्यांची इतर मुले व बंधु यांच्या एकूण 7 घरांची राखरांगोळी झाली. सुदैवाने मात्र कोणत्याही प्रकारची जीवीत हानी झालेली नाही. मात्र वित्त हानी व घरातील भांडीकुंडी यांचे नुकसान झालेले आहे. त्याचा संसार उघडयावर आला आहे. आपल्या मार्फत मी शासनास निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या परिसरातील नातेपुते ही मोठी बाजारपेठ असून या शहराच्या आजूबाजूला जवळ जवळ 37 खेडी आहेत. मात्र अचानक उद्‌भवणाऱ्या आगीसारखी घटना घडल्यास त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारची अग्नीशमन यंत्रणेची सुविधा नसल्याने अकलुज व माळशिरस सारख्या लांबच्या ठिकाणी असलेल्या मोठया ठिकाणाहून गाडी मागवावी लागते. त्यामध्ये बराच कालावधी जातो. गाडी येईपर्यंत सर्व उध्दवस्थ झालेले असते. नातेपुते येथे नवीन अग्नीशमन केंद्र उभारण्यात यावे असे आपल्या माध्यमातून विनंती करतो. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ही गाडी येण्यास विलंब झाल्यामुळे नुकसान मोठया प्रमाणात होते, नातेपुते किंवा जवळपास परिसरात अग्निशमन केंद्राची स्थापना करावी, सदर आगीमध्ये नुकसानग्रस्त गरीब शेतकरी, शेतमजूरांचे संसार जळून खाक झालेले असल्यामुळे शासनाने भरीव स्वरुपाची मदत करावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

.....

....7/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत खेडेकर : अध्यक्ष महोदय. मी अत्यंत सार्वजनिक व निकडीच्या महत्वाच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा आपल्यासमोर उपस्थित करीत आहे.

अध्यक्ष महोदय, विदर्भात विशेषत: सिंदखेडराजा मतदार संघात दिनांक 27 मार्च 2016 रोजी अवकाळी पाऊस गारपीट झालेली आहे. या अवकाळी पाऊसामुळे व गारपीटीमुळे सिंदखेडराजा तालुक्यातील सारखेर्डा परिसरामध्ये तसेच सवडद, मोहाडी, राताळी, शिंडी, गुण, वरोडी, उमनगाव, गोरेगांव, पाग्रीकाट्टी, सायाळा, तांदुळवाडी, पिंपळगाव, सोनाळा, देऊळगावराजा, चिखली या भागात रब्बी हंगामातील कांदा, भाजीपाला, आंबा, फळबाग, पिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. आधीच गेल्या दोन ते तीन वर्षापासून शेतकरी वर्ग निसर्गाच्या अवकृपेमुळे गारपीट, वादळी पाऊस, कोरडा दुष्काळाचा सामना करीत आहे. त्यातच यावर्षीही शेतकऱ्यांनी पिक घेण्याकरिता मोठया प्रमाणात खर्च केला होता. त्यातच पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे रब्बी हंगामातील गहू पिकामधील उत्पादनात मोठया प्रमाणात घट झाली असताना अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील सर्व पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी अधिक आर्थिक संकटात सापडलेला आहे. शेतकऱ्यांना दिलासा व आर्थिक मदत होण्याकरिता मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास विनंती करीत आहे.

.....

L-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री आसिफ शेख : अध्यक्ष महोदय, मेरा औचित्य का मुद्दा है. महाराष्ट्र में जितनी भी मसाजीद है, मदरसा है, दरगाह है, किसी भी समाज का धर्मस्थल बनाने का काम होता है, तो उसके लिए महानगरपालिका, जिला परिषद, ग्राम पंचायत, पंचायत समिति से बांधकाम के लिए जितनी भी परमिशन लगती है, उसके बारे में फाईल दाखिल करते है तो वह फाईल गृह विभाग के पास भेजी जाती है. वक्फ बोर्ड की एक बार परमिशन मिलने के बाद गृह विभाग की परमिशन की कोई भी आवश्यकता नहीं रहती है. मेरी विनती है कि गृह विभाग की परमिशन की जो अट डाली गई है, कहा गया है कि बांधकाम की परमिशन नहीं दी जानी चाहिए. यह अट हटायी जानी चाहिए. क्योंकि खाजगी जमीन पर मस्जिद, मदरसा और दरगाह बनायी जाती है. मेरी विनती है कि जो अट डाली गई है, उसको हटाया जाना चाहिए, धन्यवाद.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय केळकर : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सामान्य प्रशासन विभागाने दिनांक 06.12.2010 अन्वये सुधारित आदेश काढून अनुकंपा नियुक्तीसाठी वय वर्षे 40 वरुन कमाल मर्यादा 45 वर्षे करण्यात आली आहे, परंतु त्यातील अट दिनांक 06.10.2010 रोजी व त्यानंतर 40 वर्षे पुणे होत असेल केवळ त्यानाच 45 वर्यामर्यादेचा लाभ अनुज्ञेय असेल अशी असल्याने इतर अनुकंपा तत्वावरील प्रतिक्ष यादीतील उमेदवारांवर अन्याय होण्याची शक्यता आहे, शिवाय वयोमर्यादेमुळे प्रतिक्षा यादीतून नाव कमी झालेल्या उमेदवाराकडून त्यांच्या कुटुंबातील दुसऱ्या मात्र व्यक्तीचे नाव दिले जाते परंतु अनुकंपा नियुक्तीकरिता एकदा नाम निर्देश स्वीकारल्यानंतर दुसऱ्या वारसाचे नाव अनुकंपा प्रतिक्षा यादीत घेण्याचे प्रचलित शासन नियमात तदतूद नाही. तथापि, दिनांक 24.09.2013 रोजी तत्कालीन गृहमंत्री यांनी गडचिरोलीमध्ये शहीद पोलीस कुटुंबियाचे समवेत बैठक करुन अनुकंपा तत्वावरील यादीतील नामनिर्देशनात एक वेळ बदलण्याची शासन नियमात तरतूद करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते त्यांची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे, तसेच शासकीय कर्मचाऱ्यांचे निधन झाल्यानंतर 1 वर्षाच्या आत अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यावेळी कुटुंबाची मानसिक विचारात घेता त्यांचेमध्ये संभ्रभावस्था असते. त्यामुळे चुकीचे नावे सुध्दा नोंद केली जातात. प्रतिक्षा यादीनुसार वयाच्या 45 वर्षापर्यंत शासन सेवेत, नियुक्ती न मिळाल्यास सदर नाव काढले जाते, परिणामी मयत कर्मचाऱ्यांच्या वारसदारास शासकीय सेवेते, नियुक्ती मिळू शकत नाही, ही अन्यायकारक बाब आहे.

अध्यक्ष महोदय, यासाठी शासनाने अनुकंपा तत्वावरील यादीतील नामनिर्देशनात एक वेळा बदल करण्याची तरतूद करावी. अशा प्रकारे नियमात बदल करुन अनुकंपा तत्वावरील उमेदवारांना न्याय देण्याबाबत सुधारीत तरतूद करण्याची कार्यवाही करावी अशी मी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेश क्षिरसागर : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. कोल्हापूर महानगरपालिकेच्या हद्दीत विनापरवाना वाणिज्य व औद्योगिक कारणासाठी जागेचा वापर करणाऱ्या मिळकतधारकांना अकृषक सारा 5 पट स्थांतरित कर व 40 पट दंडाच्या सुमारे 27 हजार व्यावसायिकांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. सदर 40 पट दंड भरण्यास नागरिकांचा विरोध आहे, याबाबत त्यांच्यात संतापाची भावना निर्माण झाली आहे तसेच ज्या मिळकतधारक व व्यावसायिकांनी 2003 मध्ये करमणूक कर विभागात वाणिज्य कर भरला असतांनाही त्यांना तहसिलदारांकडून ना हरकतीची सक्ती जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित विभागाकडून होत आहे. सदर ना हरकत प्रमाणपत्र देण्यास संबंधित तहसिलदार चालढकल करित असल्यामुळे मिळकतधारक व व्यावसायिकांची प्रचंड हेळसांड होत आहे. व्यापाऱ्यांना कराच्या आणि 40 पट दंडाच्या नोटीसा कोणत्या कायद्याखाली देण्यात आल्या याबाबत मिळकतधारकांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, सदरहू स्थांतरित कर हा महाराष्ट्र राज्यामध्ये फक्त कोल्हापूर महानगरपालिकेकडूनच लागू केला गेला आहे. सदरहू स्थांतरित कर तात्काळ रद्द करण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्याकरिता मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास विनंती करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बाबुराव पाचर्णे : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरी देण्याचे अमिष दाखवून शिरूर तालुक्यातील शिक्रापूर परिसरातील अनेकांकडून लाखो रुपये उकळल्याचा प्रकार दिनांक 25 मार्च, 2016 रोजी उघडकीस आला, सार्वजनिक बांधकाम खात्यात 10 वी, 12 वी, पदवीधर, पदविकाधारक व अभियंते यांची मोठी भरती असून 20 मे रोजी भरती करण्यासाठी 5 ते 10 लाख रुपये एजंट मार्फत शिक्रापूर परिसरात गोळा केले आहेत. शिक्रापूर पोलीस स्टेशन मधील पोलिसांना पुणे येथील सांगवी मधील सुत्रधारासह 3 संशयीतांची नवे पोलिसांना मिळाली . या एजटांनी 28 जनांकडून 84 लाख रुपये घेतल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. या प्रकरणी अद्याप गुन्हा दाखल नसल्याने संशयीतांवर कुठलीही कार्यवाही केली नाही, या प्रकरणात अनेक लोकांना नोकरीच्या अमिशाने फसविले असण्याची शक्यता आहे.

अध्यक्ष महोदय, यापूर्वी श्री.नितीन नरके यांनी करोडो रुपयांचा घोटाळा केलेला आहे. पुन्हा अशा प्रकारे लोकांची व जनतेची फसवणूक होऊ नये. यासाठी पोलीस अधीक्षक पुणे यांना निर्देश देऊन सरकारने तातडतोब गुन्हा दाखल करून चौकशी करावी अशी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय राहंगडाले : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. तिरोडा जि.गोंदिया येथे शासनाच्या धोरणानुसार एमआयडीसीची स्थापना झाली होती. याकरिता 250 हेक्टर जमीन व सर्व सुखसुविधा एमआयडीसीकरिता उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. 2009 मध्ये याकरिता जागा अदानी पॉवर प्लँटला देण्यात आलेली आहे. त्यामुळे लघुउद्योगाकरिता जागा राहिल्या नाहीत. माझी शासनाला विनंती आहे की, तिरोडा तालुक्यामध्ये एमआयडीसीची स्थापना करावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. नाशिक जिल्हयातील सिंहस्थनगर जवळील सहाव्या योजनेतील एका भुखंडावर सिडको प्रशासनाची सामाजिक सुविधा केंद्राची इमारत आहे.

तालिका सभाध्यक्ष : आपण औचित्याचा वेगळा मुद्दा दिलेला आहे व आपण वेगळा विषय मांडत आहात.

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, माझा हा औचित्याचा मुद्दा वेगळा व महत्वाचा आहे. त्यामुळे तो घेण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, कवीवर्य नारायण सुर्वे यांच्या नावाचे वाचनालय नाशिक येथील सिडकोच्या एका जागेवर होते. नाशिकचे माननीय पालकमंत्री श्री.गिरीश महाजन येथे उपस्थित असल्याने जाणीवपूर्वक मी हा मुद्दा येथे मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, मानव सेवा केंद्राने या इमारतीत ज्येष्ठ साहित्यिक व कविवर्य नारायण सुवे्र यांच्या नावाने वाचनालय सुरु केले आहे. या वाचनालयाच्या दालनात सुर्वे यांना मिळालेले काही पुरस्कारही ठेवण्यात आलेले आहेत. त्यामुळे अशा ज्येष्ठ साहित्यिकाच्या नावाने सुरु केलेले वाचनालय या इमारतीत असल्याने ही इमारत सील करु नये असा आग्रह साहित्यप्रेमी व सामाजिक कार्यकर्त्यांनी केला होता. परंतु सिडको प्रशासनाने याची दखल न घेता इमारत सील केल्याने वाचनालय बंद अवस्थेत आहे. त्यामुळे साहित्यप्रेमी व सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. कविवर्य नारायण सुर्वे हे मराठी साहित्यातील सामाजिक बांधिलकी असलेले एक श्रेष्ठ प्रतिभावंत साहित्यिक होते. त्यांच्या कवितेने दीन, दलित, वंचित, कष्टाळू, शोषितांचे प्रतिनिधित्व केले. त्यांच्या कवितांनी मराठी साहित्याला एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवले आहे. त्यांच्या सामाजिक बांधिलकीची दखल घेवून शासनाकडून त्यांना पद्मश्री पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे. अशा थोर साहित्यिकाच्या ऋणात समाज असताना, त्यांच्या नावाने सुरु करण्यात आलेल्या वाचनालयावर सिडको प्रशासनाने केलेली कारवाई निश्चितच निंदनीय आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रताप सरनाईक....

अध्यक्ष महोदय, नाशिक शहरामध्ये कवीवर्य नारायण सुर्वे यांच्या नावाने वाचनालय बंद होत असताना तेथील पालकमंत्री श्री.गिरीश महाजन सध्या सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांना विनंती करतो की, दोन दिवसांपूर्वी ही महत्वाची घटना घडलेली आहे. कवीवर्य नारायण सुर्वे यांच्या नावाने छोटेसे वाचनालय होते, पण त्यांच्यासारख्या एका प्रतिभावंत कवीला मृत्यूनंतर अशा अवहेलना शासनाकडून मिळत असतील तर ते योग्य नाही. म्हणून पालकमंत्री यांनी सिडको प्रशासनाला ताबडतोब आदेश देऊन सील केलेले ग्रंथालय ताबडतोब उघडून साहित्यप्रेमींसाठी खुले करावे अशी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मुंबई उच्च न्यायालयात महाराष्ट्र शासनाच्या वतीने शपथपत्र दाखल केलेले आहे की, महिलांना मंदिर प्रवेशाकरिता कोणतीही बंदी केली जाणार नाही. त्यांना मंदिरात प्रवेश करण्यापासून रोखले जाणार नाही अशी राज्य शासनाच्या वतीने हमी देण्यात आली होती. पुरुषांबरोबर महिलांनाही समान न्याय देण्यात येईल याचीही हमी देण्यात आली होती. माननीय उच्च न्यायालयाने त्यासंबंधी निर्देश दिलेले होते. त्याचे पालन न झाल्याची बाब दिनांक 2.4.2016 रोजी शनी शिंगणापूर येथे आमच्या निदर्शनास आलेली आहे. तेथे गेलेल्या महिला कार्यकर्त्यांना मारहानही करण्यात आलेली आहे. त्यामुळे न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाने न केल्यामुळे न्यायालयाचा अवमान झालेला आहे व शासनाची दुटप्पी भूमिका जनतेसमोर आलेली आहे. न्यायालयाने निर्णय दिलेला असताना व राज्य शासनाने हमीपत्र दिलेले असतानासुध्दा तेथील पोलीस यंत्रणा न्यायालयाच्या निकालाची प्रत मागत आहे व तेथे आवश्यक ते संरक्षण तेथे न पुरविल्यामुळे मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

यानंतर एम-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई व उपनगरात अनेक मासळी बाजारातील विविध समस्यांमुळे मासे खरेदी करणा-या ग्राहकांना नाहक त्रास होत आहे. उखडलेल्या लाद्या,तडा गेलेल्या भिंती, शौचालयाची नादुरुस्ती, बंद पडलेल्या टयुबलाईटस,पिण्याच्या पाण्याची सोय नसणे अशा एक ना अनेक समस्यांमुळे ग्राहकांना व विक्रेत्यांना त्रास सहन करावा लागत आहे. अनेक मासळी बाजारात शौचालयाची दुरुस्ती न झाल्यामुळे ते वर्षानुवर्षे बंद असून त्यामुळे विक्रेते व ग्राहक यांची गैरसोय होत असणे. नियमित साफसफाई होत नसल्याने मासळी बाजारांची दयनीय अवस्था निर्माण झालेली आहे. बोरीवली येथील मच्छी मार्केटमधील प्रभाग समितीचे कार्यालय हे धोकादायक बिल्डींग म्हणून सरकविण्यात आलेले आहे. या मच्छी मार्केटमध्ये मच्छी विकणा-या भगिनींना....(अडथळा)

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्या हा महापालिकेचा विषय आहे.

श्रीमती मनिषा चौधरी : अध्यक्ष महोदय, यामुळे विक्रेते व ग्राहक यांना नाहक खूप त्रास होत आहे. त्यांच्या बाजाराचेही यामुळे नुकसान होत आहे.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. राज्य शासनाच्या उद्योग व कामगार विभागाने 10 फेब्रुवारी,2016 रोजी एक आदेश काढला होता. हा कॅबिनेट निर्णय आहे. काल रात्री पासून राज्यातील कामगार आणि माथाडी कामगार लाक्षणिक बंदवर गेलेले आहेत. शासनाने याचा गांभीर्याने विचार केला नाही तर बेमुदत बंद होण्याची शक्यता आहे. असे झाले तर राज्यामध्ये अन्न व नागरी पुरवठा होणार नाही. सर्व कारखाने बंद होतील. सभागृहामध्ये उद्योग मंत्री आहेत. माननीय उद्योगमंत्री यांनी कबूल केलेले आहे. माननीय पणन मंत्री, माननीय उद्योगमंत्री व माननीय कामगार मंत्री यांची संयुक्त बैठक लावावी. आम्हाला त्याप्रमाणे निर्देश दिले तर संप मागे घेऊ. पुढे आम्ही सहकार्य करायला तयार आहोत, त्याप्रकारचे निर्देश मंत्री महोदयांनी द्यावे.

श्री.सुभाष देसाई : अध्यक्ष महोदय, अशी संयुक्त बैठक आम्ही घेत आहोत.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नसीम खान : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सभागृहामध्ये हा मुद्दा मांडलेला आहे. दोन दिवसांपूर्वी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी नाशिक येथे ....(अडथळा)

तालिका सभाध्यक्ष : आता या विषयावर चर्चा होऊ शकत नाही. सभागृहाचे कामकाज आता पुढे गेलेले आहे.

श्री.नसीम खान : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री हे संविधानिक पदावर आहेत. ते कोणत्याही पक्षाचे नाहीत. पक्षाच्या कार्यक्रमामध्ये जाऊन राज्याचे माननीय मुख्यमंत्री जर अशा प्रकारचे गैर संविधानिक वक्तव्य करीत असतील तर ते चुकीचे आहे. त्यांनी माफी मागावी. याबाबत माननीय विरोधी पक्ष नेते यांनी मुद्दा मांडला होता. माननीय मुख्यमंत्री यांनी माफी मागावी. सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात यावे.

तालिका सभाध्यक्ष : या संदर्भात माननीय मुख्यमंत्री योग्य वेळी सभागृहात निवेदन करतील. कामकाज बाजूला ठेवण्यासारखा हा विषय नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, मला माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्य श्री.नसीम खान यांनी सांगावे की, काँग्रेसचा भारत माता की जय असे म्हणावयाला विरोध आहे का ?याची मला कृपया माहिती द्यावी.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.:मोहफुलावरील बंदी उठविण्यासंदर्भात कायद्यात दुरुस्ती करणेसंबंधी

मु.शी.: मोहफुलावरील बंदी उठविण्यासंदर्भात कायद्यात दुरुस्ती करणेसंबंधी डॉ.देवराव होळी,वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय राज्य उत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विदर्भातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर या जिल्ह्यांमध्ये मोहफुलांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असणे, अनेक नागरिक मोहफुल जमा करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी त्याची विक्री करीत असणे, परंतु शासनाने मोहफुलांच्या विक्रीवर आणलेली बंदी, त्यामुळे सदर व्यवसाय करणाऱ्या असंख्य नागरिकांवर आलेली उपासमारीची वेळ, ही बंदी उठविण्यासाठी नागरिकांनी धरणे, मोर्चे व उपोषणे याद्वारे केलेली मागणी, मोहफुलांवरील बंदी उठविण्याकरिता व कायद्यात दुरुस्तीकरिता नागपूर येथे केलेल्या उपोषणामुळे उपोषणकर्त्या व्यक्तीची खालवलेली प्रकृती, परंतु आजतागायत मोहफुलांवरील बंदी शासनाने न उठविणे, सदर मोहफुलांवरील बंदी उठविणे व कायद्यात दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे असणे, परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.देवराव होळी : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेच्या लेखी उत्तरामध्ये महाराष्ट्र दारु बंदी कायदा कलम 60(2) मधील मोहफूल....(अडथळा)

तालिका सभाध्यक्ष : राष्ट्रध्वजाच्या अपमानासंदर्भातील मुद्दा चित्रफीत तपासणीकरिता पाठविण्यात आलेला आहे.

डॉ.देवराव होळी : अध्यक्ष महोदय, 5 किलो ते 75 किलो मोहफूल साठवणुकीकरिता परवानगी आहे. आमच्या गडचिरोली जिल्हा, गोंदिया,भंडारा,चंद्रपूर,नागपूर या भागामध्ये मोहफूलाचे उत्पादन जास्त होते....(अडथळा)...

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे. आपल्या नेत्यांना बोलावयाचे आहे. निदान आपण सभागृहाचा डेकोरम पाळण्याकरिता सहकार्य करावे. आपल्या नेत्यांना बोलावयाचे आहे, त्यांना बोलण्याकरिता प्रथम आपण सर्वांनी जागेवर बसले पाहिजे.

डॉ.देवराव होळी : अध्यक्ष महोदय, स्वातंत्र्योत्तर 67 वर्षानंतरही गडचिरोली व इतर भागातील मोहफूल व गौण खनिजाकडे सरकारचे लक्ष गेलेले नाही. महाराष्ट्रातील गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर, चंद्रपूर या भागामध्ये मोहफूलाच्या खरेदी विक्रीकरिता मिनिमम सपोर्ट प्राईस शासनाने जाहीर करण आवश्यक आहे. (अडथळा)

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे. आपल्या नेत्यांना काही बोलावयाचे आहे. त्यांना आपले म्हणणे मांडण्याकरिता व सभागृहाचा डेकोरम पाळण्याकरिता सर्वांनी आपापल्या जागेवर बसावे.

डॉ.देवराव होळी : अध्यक्ष महोदय, मोहफूलाची खरेदी-विक्री कोणत्या विभागांतर्गत करण्यात यावी, त्याची विल्हेवाट कशी करावी, याकरिता मिनिमम सपोर्ट प्राईस शासनाने जाहीर केलेली नाही. शासनाने 5-75 किलो मोहफूल ठेवण्याची परवानगी दिलेली आहे. परंतु विदभर्ज्ञत या मोहफूलाचे उत्पादन हजारो टन या प्रमाणात होते. गडचिरोली जिल्हयातील आदिवासी व इतर जातीचे लोकही या मोहफूलाच्या व्यवसायामध्ये व्हॅल्यू ॲडिशन करण्यासाठी मोहफूल जमा करीत आहेत. शासनाने या संदर्भातील एमएसपी जाहीर करावी. राज्यात अन्य ठिकाणी द्राक्ष, काजू, संत्र, ऊस अशा अनेक फळाफुलांपासून दारुची व इतर पदार्थांची निर्मिती केली जाते.

.....6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.देवराव होळी.....

या उत्पादनांना मोठी बाजारपेठ उपलब्ध करुन दिली जाते. विदर्भातील मोहफुलाकरिता विक्री बंदी करण्यात आलेली आहे. ही बंदी उठविली पाहिजे. या मोहाला फुलाला महाराष्ट्रात विक्रीकरिता बंदी नसून कायद्याद्वारे त्याचे नियमन केलेले आहे, असे सांगितलेले आहे. मोहफूल आयात करण्यासाठी व त्यापासून मद्यनिर्मिती करणे नाकारता येणार नाही. मोहफूलापासून केवळ मद्यानिर्मितीच नाही तर खाद्यपदार्थही निर्माण करता येतात. शासनाने याकरिता एमएसपी जाहीर केलेली नाही ? या मोहफूलावर संशोधन करयासाठी सरकारने चांगले निवेदन केलेले आहे. मोहफुलाच्या झाडाची गणना करणे आवश्यक आहे. तसेच, मोहफुलाच्या झाडांची लागवड करणेही आवश्यक आहे. शासन या संदर्भात एमएसपी जाहीर करणार आहे का ? शासन विदर्भामध्ये मोहफुलापासून मद्यनिर्मिती करण्याकरिता परवानगी का देत नाही ?

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी जागेवर जाऊन बसावे. आपल्या नेत्यांना बोलावयाचे आहे. कृपया आपण सर्वांनी जागेवर जाऊन बसावे.

श्री.दिलीप कांबळे : अध्यक्ष महोदय, राज्यात दारु बंदी कायदा कलम 60(2) नुसार राज्यातील विशेषत: आदिवासी बांधवांना मोहफूल बाळगणे व वाहतूक करणे...

एन-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप कांबळे.....

5 किलोपर्यंत मोहफुल बाळगणे आणि तरतूद करण्यासाठी परवानगी आहे. शिवाय....(अडथळा)....

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये अतिशय महत्वपूर्ण आणि गंभीर प्रश्न उपस्थित झालेला होता. माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी या विषय मुख्यमंत्री स्पष्टीकरण करणार आहे, असे आश्वासन दिलेले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज सुरु ठेवणे हे योग्य होणार नाही.

अध्यक्ष महोदय, आपल्या देशात घटनेवर आधारित राज्याचा कारभार चालविला जाणार की, संघाच्या डायरेक्शनुसार राज्याचा कारभार केला जाणार आहे ? या प्रश्नाचे उत्तर आम्हाला दिले पाहिजे. संघाच्या माध्यमातून सरकारचे कामकाज चालविले जाणार आहे की, माननीय मुख्यमंत्र्याच्या माध्यमातून सरकारचे कामकाज चालविले जाणार आहे ? हे सभागृहाला कळले पाहिजे. या विषयी मुख्यमंत्री महोदय केव्हा निवेदन करणार आहेत, त्याचे उत्तर पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहातील सन्माननीय सदस्यांना देण्याची गरज आहे. मुख्यमंत्री महोदयांना सभागृहात तातडीने उपस्थित राहण्याबाबत सांगितले पाहिजे. या विषयी जी वक्तव्ये केलेली आहेत, त्यासंदर्भात माफी मागितली पाहिजे. आज देशात, समाजात आणि जनतेमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. महाराष्ट्र राज्याचा कारभार संघाच्या माध्यमातून चालविला जात आहे, अशा प्रकारचा जनतेमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. या विषयी मुख्यमंत्री केव्हा निवेदन करणार आहे ?

तालिका सभाध्यक्ष (श्री. योगेश सागर) : आज सभागृहात दोन प्रश्न निर्माण झाले होते. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एका प्रश्नाच्या संदर्भात सभागृहाचे लक्ष वेधले होते. तर त्यानंतर राष्ट्रध्वज ऊलटा फडकाविला होता, असा एक प्रश्न निर्माण झालेला होता. या विषयी सन्माननीय सदस्य श्री. नितेश राणे आणि इतर सन्माननीय सदस्यांची नावे माझ्याकडे आलेली आहेत....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

तालिका सभाध्यक्ष : या विषयी सन्माननीय सदस्य श्री. नितेश राणे आणि इतर सन्माननीय सदस्यांची नावे माझ्याकडे आलेली आहेत आणि मी त्यासंदर्भात चित्रफित तपासून घेऊन निर्णय दिला जाईल असे स्लिंग दिलेले आहे. तत्कालीन मंत्री श्री. हसन मुश्रीफ आणि...(गोंधळ)....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष .....

चित्रफित तपासून घेऊन निर्णय घेतला जाणार आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. अमिन पटेल यांना सांगू इच्छितो की, हा विषय अतिशय गंभीर आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात.)

तालिका सभाध्यक्ष : सदरहू विषयाच्या संदर्भात मुख्यमंत्री महोदय, हे योग्य वेळी निवेदन करणार आहेत आणि माननीय अध्यक्ष त्यासंदर्भातील निर्णय घेतील...(गोंधळ).....

अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज करणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक अर्ध्या तासाकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 12 मिनिटांनी 30 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.योगेश सागर)

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महाराज, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी माझ्या एका भाषणाचा संदर्भ देऊन या ठिकाणी एक मुद्दा उपस्थित केला आहे. मी काल मीडियाला स्पष्टीकरण देऊन सांगितले होते की, आपण माझे भाषण ऐका. माझे पूर्ण भाषण आपण ऐकले असते तर हा मुद्दाच या ठिकाणी उपस्थित झाला नसता. मी बोलताना एवढेच म्हणाले की, "भारत माता की जय" हा विषय विवादाचा होऊच शकत नाही. "भारत माता की जय" हा कोठलाही धार्मिक नारा नाही. मी उदाहरण देऊन सांगितले की, मी स्वत: मकदुम शहा बाबांच्या दर्ग्यावर गेलो. तेथे 603 वा ऊरूस होता. मकदुम शहा बाबा हे ज्यावेळेस इस्लाम या देशामध्ये आला, त्यावेळी ज्यांनी पहिल्यांदा कुराण शरीफ काय असते, हे लोकांना ज्यांनी समजावून सांगितले. असे मकदुम शहा बाबा यांच्या दर्ग्यावर 603 वा ऊरूसाला मी गेलो. मी भाषणात सांगितले की, त्यावेळी मुस्लीम समाजाचे 500 धर्मगुरु होते. ज्यांना मुस्लीम समाजात वरचा दर्जा, मानाचे स्थान आहे, असे 500 मुस्लीम धर्मगुरू एकत्रित झाले आणि हजारो मुस्लीम बांधवांच्या समोर त्या ठिकाणी तिरंगी झेंडा फडकावून "भारत माता की जय" असे नारे दिले. त्यावेळी मी सांगतले की, जे लोक "भारत माता की जय" हे मी म्हणणार नाही असे म्हणतात, जे लोक लोकू जाणुनबुजून त्याला एखाद्या विशिष्ट धर्माशी जोडण्याचा प्रयत्न करतात, त्या लोकांच्या मनामध्ये काळेबेरे आहे. या देशावर त्यांचे प्रेम नाही. मी या पलिकडे जाऊन सांगितले की, हिंदु, मुस्लीम, शिख, इसाई कोणीही असो, या देशामध्ये "भारत माता की जाय" म्हणावे असे कोणाचेही ऑब्जेक्शन नाही. सर्व समाज हे म्हणतात.

यानंतर P-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस .....

त्यामुळे काही लोकांना या देशामध्ये जाणीवपूर्वक विभाजन करावयाचे आहे आणि म्हणून अशाप्रकारे भारत माता की जय या मुद्याला वेगळ्या प्रकारे मांडण्याचा प्रयत्न या ठिकाणी चाललेला आहे आणि ज्यांचे या देशावर प्रेम नाही, त्यांना या देशात रहायची जागा नाही. मी कुठल्या धर्माचे, कुठल्या जातीचे नाव घेतले ?

अध्यक्ष महोदय, माझा सवाल आहे या ठिकाणी की, भारत माता की जय हे जर 500 मुस्लिम धर्मगुरु येऊन त्या ठिकाणी म्हणत असतील आणि त्याचा असा विपर्यास जर काही पक्ष करणार असतील तर, याचा अर्थ काय आहे, याचा अर्थ हा आहे की, या देशामध्ये एका विशिष्ट समाजावर तुम्ही प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आहात आणि त्यांच्यामध्ये एकप्रकारे विभाजनाचे बिजारोपण हे तुम्ही या ठिकाणी करीत आहात. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माझे पूर्ण भाषण ऐकले पाहिजे होते. मी काल त्याचे क्लॅरिफिकेशन देखील दिले. क्लॅरिफिकेशन पोस्ट दिलेले नाही तर भाषणात काय बोललो ते संपूर्ण क्लॅरिफिकेशन दिलेले आहे.

याकरिता आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. आपण कदाचित वाघा बॉर्डरवर गेला असाल नसाल गेला तर जाऊन बघा, त्या वाघा बॉर्डरवर केवळ 'वंदे मातरम' आणि 'भारत माता की जय' हे दोनच नारे असतात. त्या वाघा बॉर्डरवर भारताच्या बाजूने बसलेला हिंदू आहे, मुसलमान आहे, ख्रिश्चन आहे का सीख आहे याचा विचार नसतो. जो सैनिक त्या ठिकाणी आहे, त्या सैनिकाच्या मनामध्ये जात, धर्म नसतो तर प्रत्येक सैनिक त्या ठिकाणी 'भारत माता की जय' म्हणतो. त्या ठिकाणचा भारताच्या बाजूचा प्रत्येक नागरिक 'भारत माता की जय' म्हणतो. मला या गोष्टीचा आनंद आहे, या गोष्टीचा विश्वास आहे की, राज्यसभेत आदरणीय श्री. जावेद अख्तर यांनी भाषण करताना सांगितले की, 'भारत माता की जय' म्हणणे हा माझा अधिकार आहे. माझा अधिकार कोणी हिरावून घेऊ शकत नाही.

अध्यक्ष महोदय, मी हे सांगण्याचा प्रयत्न करीत आहे की, हा धार्मिक मुद्दा नाही. कुठल्याही धर्माशी संबंधित नाही. खरे म्हणजे काही लोकांना या मुद्याला धरून जाणीवपूर्वक या देशामध्ये विभाजनाचे बिजारोपण करावयाचे आहे. तुम्ही विचार करा की, ज्यावेळेस भारत माता की जय या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस .....

नाऱ्यावर अशाप्रकारे आपण प्रश्नचिन्ह उपस्थित करु, त्यावेळेस वाघा बॉर्डरवर लढणारा माझा जो सैनिक आहे, जो अनेक वर्षे झाले भारत माता की जय म्हणत आहे, त्याच्या मनावर काय परिणाम होईल ? आमचे जे हजारो स्वातंत्र्यसंग्राम सेनानी आहेत की, जे भारत माता की जय म्हणत फाशीवर गेले त्यांच्यावर काय परिणाम होणार आहे ? आमचे जे हजारो सैनिक भारत माता की जय म्हणत धारातिर्थी पडतात त्यांच्यावर काय परिणाम होणार आहे ?

अध्यक्ष महोदय, मी पुन्हा एकदा सांगतो की, मी कुठल्याही प्रकारे अशाप्रकारचे विधान केलेले नाही. तर ज्या लोकांचे या देशावर प्रेम नाही, जे लोक जाणीवपूर्वक विवाद करीत आहेत, अशा लोकांच्या संदर्भात मी बोललेलो आहे. त्यामुळे माझे स्पष्ट मत आहे की, अशा बाबीवर विवाद करुन या सभागृहाचा वेळ घालविण्याचा प्रयत्न या ठिकाणी करण्यात येऊ नये. भारत माता की जय हे आम्ही कालही म्हटले, आजही म्हणू, उद्याही म्हणू आणि संपूर्ण भारत म्हणेल.

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, ...

तालिका सभाध्यक्ष (श्री. योगेश सागर) : मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या म्हणण्यानुसार निवेदन केलेले आहे. आता त्यावर चर्चा कशाला ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, मी सभागृहात 2 मिनिटे उशिरा आल्यामुळे सुरुवातीला मुख्यमंत्री महोदय काय बोलले ते मी ऐकले नाही. माझा पहिला प्रश्न आहे की, आपण मुख्यमंत्री म्हणून हे भाषण केले की, संघाचा कार्यकर्ता म्हणून केले हे सांगावे. या देशात कोण राहणार आणि कोण राहणार नाही हे घटनेवर आधारित आणि नागरिकत्वाच्या कायद्यावर ठरेल. कोणी सांगितल्याने ते ठरणार नाही. आज जर एखाद्या मनुष्याने जय हिंद बोलले तर तुम्हाला ते चालत नाही ?...(अडथळा) ...

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मी या महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आहे आणि संघामध्ये मला केवळ राष्ट्रवाद शिकविलेला आहे, त्यामुळे त्याचा विषय आणण्याची आवश्यकता नाही. याठिकाणी जे बोललो तो संविधानसंमत बोललेलो आहे. या देशाच्या विरोधात जे लोक वागतात, त्यांच्यावर बोललो आहे. कुठल्या जातीवर, कुठल्या समाजावर, कुठल्या व्यक्तीवर बोललेलो नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस .....

मी सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण यांना विचारतो की, मी जर या ठिकाणी असे म्हटले असेल की, ज्यांचे या देशावर प्रेम नाही, मी जातीचे विचारले नाही, मी धर्माचे बोललेलो नाही, व्यक्तीचे बोललेलो नाही. मी जर हे बोललो असेन की, ज्यांचे या देशावर प्रेम नाही, त्यांना या देशात राहण्याचा अधिकार नाही, तर काय चुकले ? तुमचे म्हणणे असे आहे का की, ज्यांचे या देशावर प्रेम नाही, त्यांनी या देशात राहायचे ? त्यामुळे अतिशय चुकीचे, कारण नसताना केवळ हाय कमांडला खुश करण्याकरिता या ठिकाणी अशाप्रकारचे मुद्दे मांडले जात आहेत. ... (अडथळा) ...

(सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळेस घोषणा देतात)

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे. आता आपण लक्षवेधी सूचनेवरील चर्चा घेऊ या.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळेस घोषणा देतात)

पृ.शी.: मोहफुलावरील बंदी उठविण्यासंदर्भात कायद्यात दुरुस्ती करणेसंबंधी

मु.शी.: मोहफुलावरील बंदी उठविण्यासंदर्भात कायद्यात दुरुस्ती करणेसंबंधी डॉ.देवराव होळी,वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(चर्चा पुढे सुरु ...

डॉ. देवराव होळी : अध्यक्ष महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, मिनिमम सपोर्ट प्राईज मोहफुलावर देण्यात यावी. या मोह फुलांचा फळांच्या यादीत समावेश करण्यात यावा. सोबतच जी व्हॅल्यू ॲडिशन फळे आहेत जसे की, मोह फूल, जांभूळ, तेंदुचे झाड, चिंचेचे झाड व चारोळीचे झाड यांचे रोपवन करणार आहात काय, रोपवन करणार असाल तर ते किती दिवसांत करणार, या मोहफुलापासून प्रक्रिया उद्योग केव्हा व किती दिवसांत स्थापन करणार, गडचिरोली जिल्ह्यात या प्रक्रिया उद्योगांना नेहमीकरिता मान्यता देणार आहात काय ?

श्री. दिलीप कांबळे : अध्यक्ष महोदय, राज्यातील विशेषतः जे आदिवासी पट्टयातील जिल्हे आहेत, त्या जिल्ह्यांमध्ये मोफ फुलांचे उत्पन्न होते. मी या लक्षवेधी सूचनेच्या लेखी निवेदनात असे नमूद केले आहे की, ... (अडथळा) ...

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आपण कृपया आपापल्या जागेवर बसावे. ...(अडथळा) ...

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी जो खुलासा केलेला आहे, त्यामध्ये आणि वास्तवात प्रसार माध्यमात जे आले त्यामध्ये म्हणजे त्यांचे विधान आणि आज त्यांनी केलेला खुलासा यात मोठी तफावत आहे. खरे म्हणजे मुस्लीम समाजाच्या देशभक्तीबद्दल जर तुमच्या मनात शंका नाही किंवा कोणत्याही जाती-धर्माविषयी शंका नसेल ... स्वतः मुख्यमंत्री महोदय म्हणत आहेत की, आम्हाला कोणत्याही जाती-धर्माविषयी काही म्हणायचे नाही. मग पुन्हा पुन्हा भारत माता की जय हा विषय का काढला जातो? शंका तुमच्या मनात आहे, आमच्या मनात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळेस घोषणा देतात)

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ....

नाही. तुम्ही भारत माता की जय म्हणून संपूर्ण वातावरण विचलित करण्याचा प्रयत्न करीत आहात. खरे म्हणजे आपण घटनात्मक पदावर आहात. मुख्यमंत्री महोदयांकडे आमची एवढीच मागणी आहे की, आपण केलेल्या वक्तव्यामुळे एवढा मोठा वाद उद्‌भवला आहे. आमची एवढीच अपेक्षा आहे की, आपण झालेल्या प्रकाराबाबत आपण दिलगिरी तरी व्यक्त करावी. विनाकारण या राज्यामध्ये अल्पसंख्याकांच्या मनामध्ये त्यांच्या विषयी नेहमी जी शंका येते त्याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी जे विधान केले आहे आणि जे माध्यमांनी रिपोर्ट केले आहे, त्यामुळे खरे म्हणजे या देशातील सामान्य नागरिकांच्या, अल्पसंख्यांकांच्या, सर्व जाती-धर्माच्या लोकांच्या भावना दुखावलेल्या आहेत. या घटनात्मक पदावर असताना राज्याचे मुख्यमंत्री म्हणून आपण केलेल्या विधानाबद्दल राज्यातील जनतेची माफी मागावी, ही आमची मागणी आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मला तर आश्चर्य वाटते की, मी भारत माता की जय म्हटले म्हणून माफी मागायची ? या ठिकाणी खरे म्हणजे माझ्या मूळ भाषणात तफावत काही नाही. माझ्या मूळ भाषणात मी मकदूम शहा दर्ग्यावर काय घडले हे सांगितले आणि सांगितले की, भारत माता की जय हा धार्मिक नारा नाही. 500 मुसलमान धर्मगुरु जे सर्वोच्च आहेत, ते त्या ठिकाणी सांगतात की, भारत माता की जय, मग हा धार्मिक नारा कसा असू शकतो ? हे मी त्या ठिकाणी सांगितले. खरे म्हणजे माननीय विरोधी पक्ष नेते आपली माफी मागून माझा आपल्यावर आरोप आहे की, अशाप्रकारचे बिजारोपण करुन तुम्ही जाणीवपूर्वक अल्पसंख्याक समाजासमोर प्रश्नचिन्ह उभे करीत आहात. अल्पसंख्याक समाजाची माफी या ठिकाणी खरे तर तुम्ही मागितली पाहिजे, कारण अल्पसंख्याक समाजाकडून अशी मागणी आलेली नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

श्री. जावेद अख्तर यांनी सांगितले की, "भारत माता की जय" म्हणणे माझा अधिकार आहे. या सभागृहामध्ये देखील एका सन्माननीय सदस्याने "भारत माता की जय" म्हटले नाही, त्यावेळी तुमच्यासह सर्व सन्माननीय सदस्यांनी, या सभागृहाने त्या सन्माननीय सदस्यास ससपेंड केले. आज केवळ मतांच्या राजकारणाकरिता काहीतरी अशा प्रकारच्या बाबी टाकण्याचा प्रयत्न करु नका.

अध्यक्ष महोदय, मी त्या ठिकाणी जे बोललो तेच आज सभागृहामध्ये सांगितलेले आहे. त्यासंदर्भात आपण तपासून पाहू शकता. खरोखरच यांना राजकारण करायचे नसेल तर माझ्या खुलास्यानंतर यांनी हे बंद करावे आणि यांना राजकारण करायचे असेल तर माझे मुख्यमंत्री पद राहिले काय आणि गेले काय, "भारत माता की जय" हे मी म्हणतच राहील, "भारत माता की जय" हे मी म्हणतच राहील.

तालिका सभाध्यक्ष : आता आपल्याला येथे थांबायला पाहीजे. आता मी बोलण्याची संधी देऊ शकत नाही...(गोंधळ)... एक लक्षवेधी क्लीअर झाली असल्यामुळे आता लक्षवेधी क्रमांक दोन घेण्यात येईल.

---*---

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : ***तत्कालीन*** शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यकाळात आरक्षण डावलून नियुक्त्या करून कोटयवधी रूपयांचा ***केलेला*** गैरव्यवहार ***तसेच*** त्यांच्या कालावधीपूर्वीचे शिक्षण उपसंचालक यांनी पद मान्यता नाकारलेली असतानासुध्दा तत्कालीन शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी मराठवाड्यातील शैक्षणिक संस्थांना मोठ्या प्रमाणात चुकीच्या पदांना मान्यता दिल्यामुळे शासनाचे कोटयवधी रुपयांचे केलेले नुकसान.

मु. शी. : ***तत्कालीन*** शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यकाळात आरक्षण डावलून नियुक्त्या करून कोटयवधी रूपयांचा ***केलेला*** गैरव्यवहार ***तसेच*** त्यांच्या कालावधीपूर्वीचे शिक्षण उपसंचालक यांनी पद मान्यता नाकारलेली असतानासुध्दा तत्कालीन शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी मराठवाड्यातील शैक्षणिक संस्थांना मोठ्या प्रमाणात चुकीच्या पदांना मान्यता दिल्यामुळे शासनाचे कोटयवधी रुपयांचे केलेले नुकसान व इत्यादीसंबंधी सर्वश्री संजय शिरसाट, संदीपान भुमरे, अर्जुन खोतकर, सुभाष साबणे, गुलाबराव पाटील वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय शिरसाट (औरंगाबाद पश्चिम) : अध्यक्ष महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

"तत्कालीन शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यकाळात आरक्षण डावलून नियुक्त्या करून कोटयवधी रूपयांचा गैरव्यवहार करणे, त्यांच्या कालावधीपूर्वीचे शिक्षण उपसंचालक यांनी पद मान्यता नाकारलेली असतानासुध्दा तत्कालीन शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी मराठवाड्यातील शैक्षणिक संस्थांना मोठ्या प्रमाणात चुकीच्या पदांना मान्यता दिल्यामुळे शासनाचे कोटयवधी रुपयांचे केलेले नुकसान, आरक्षण डावलल्यामुळे मराठवाड्यातील अनेक पात्र उमेदवारांवर अन्याय होणे, याबाबत समिती नेमूनसुध्दा संबंधितांवर कोणतीच कारवाई न करता संबंधित तत्कालीन शिक्षण उपसंचालक व तत्कालीन शिक्षणाधिकारी, औरंगाबाद यांना त्याच विभागात पदोन्न्ती दिली जाणे, अशाच प्रकारे शिक्षण उपसंचालक कार्यालय, औरंगाबाद यांनी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, औरंगाबाद या संस्थेत आरक्षित जागेवर खुल्या प्रवर्गातील शिक्षकांना नियुक्त्या दिल्याचे उघडकीस येणे, मंठा आणि परतुर येथील शैक्षणिक संस्थांमध्येदेखील नियमांचे उल्लंघन करून नियुक्ती व पद मान्यता देवूनही संबंधितांविरूद्ध कोणतीच कारवाई न करता संबंधित अधिकाऱ्यांना महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळावर विभागीय अध्यक्ष या पदावर शासनाने नियुक्ती देणे, तसेच तत्कालीन शिक्षणाधिकारी यांना विभागीय शिक्षण उपसंचालक या पदावर पदोन्नती देणे, माहे मार्च, २०१६ मधील परिक्षा वेळेवर घेण्यास विभागीय मंडळाचे अध्यक्ष व संबंधित विभागाचे अधिकारी असमर्थ ठरणे, मराठवाड्यात वेळेवर प्रश्नपत्रिका पोहच न करणे, वेळेवर परिक्षा केंद्र बदली करणे, मोठ्या प्रमाणात परिक्षेमध्ये नक्कल करण्याच्या प्रमाणात झालेली वाढ, नुकतेच जालना येथील संस्कार निवासी वसतीगृहात अडीच हजार कोऱ्या उत्तरपत्रिका व स्टीकर सापडणे, बारावीच्या बनावट उत्तरपत्रिका लिहून गुणांकन देणारी टोळी कार्यरत असल्याचे उघडकीस येणे, यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत विविध संघटनांनी संबंधित अधिकारी यांना निलंबित करण्याची केलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभाध्यक्ष : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : हे राजकारणाचे ठिकाण नाही. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण शांत रहावे. आपण सभागृहामध्ये वैधानिक कामे करण्यासाठी येतो. हा विषय पुढे वाढविता येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. संजय शिरसाट यांनी प्रश्न विचारावा.

श्री. संजय शिरसाट : मराठवाडा विभागातील एचएससी बोर्डाचे अध्यक्ष श्री. ढेरे यांच्या विरोधात गेल्या तीन, चार महिन्यांपासून स्थानिक कर्मचारी आणि शिक्षकांनी उठाव केलेला आहे. त्यांच्या विरोधात अनेक वेळा आंदोलने केली. श्री. ढेरे हे ज्या विभागात काम करत आहेत. आता ते अध्यक्ष असून पूर्वी उप संचालक होते. उप संचालक असताना मराठवाड्यातील काही कॉलेजेसवर नियुक्त्या करण्यात आल्या होत्या...(गोंधळ)...

तालिका सभाध्यक्ष : माझी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विनंती आहे की, या विषयावर माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन वेळेस स्पष्टीकरणात्मक निवेदन केलेले आहे. या विषयावर आपण आता थांबले पाहीजे. महाराष्ट्रातील 12 कोटी जनता त्यांचे प्रश्न त्यांच्या सदस्यांच्या माध्यमातून मांडत असते. आता आपण पुढे गेलो आहे. आपली बाब वेगळ्या आयुधाद्वारे सादर करण्यात यावी. त्याचे उत्तर देण्यात येईल.

श्री. संजय शिरसाट : अध्यक्ष महोदय, श्री. ढेरे पूर्वी उप संचालक होते. शासनाच्या निर्णयामध्ये असे म्हटलेले आहे की, कोणत्याही शिक्षण संस्थेमध्ये जागा भरत असताना असलेले रिझर्वेशन प्रथम पूर्ण करावे...(अडथळा)...

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांची भूमिका मांडलेली आहे. खरे म्हणजे त्यांनी त्यांचाच ऑडीओ तपासून घेतला पाहीजे. "भारत माता की जय" म्हणण्याचा विषय पुन्हा पुन्हा उपस्थित करुन माननीय मुख्यमंत्री लोकांचे मन विचलीत करण्याचा प्रयत्न करीत आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनात तीच भावना आहे. परंतु आम्ही राष्ट्रवादाचा ठेका घेतलेला आहे, अशा पद्धतीचे बोलणे बरोबर नाही. सरकारची भूमिका समाजामध्ये, धर्मामध्ये तेढ निर्माण करणारी आहे. "भारत माता की जय" हा नारा पुढे केला जात आहे. आम्ही देखील सभागृहामध्ये "भारत माता की जय" म्हटले असून त्याबाबत आमचा काही आक्षेप नाही. परंतु पुन्हा पुन्हा तोच मुद्दा उपस्थित करुन धर्मकारण राजकारणामध्ये आणण्याचा

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मुख्यमंत्री महोदय प्रयत्न करीत आहेत. राज्यासमोर गंभीर समस्या असून त्यातून लोकांचे मन विचलीत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. राजकारण करण्याची भूमिका त्यांची आहे. आम्ही सरकारच्या भूमिकेचा निषध करतो आणि सभात्याग करतो.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, मला या गोष्टीचे दु:ख आहे. या ठिकाणी विरोधी पक्षाने सभात्याग केला जे की, कारण नसताना अल्पसंख्यांक समाजासमोर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचे काम ते करीत आहेत. आमचे स्पष्ट मत आहे की, अल्पसंख्यांक समाज हा पूर्णपणे देशभक्त आहे, "भारत माता की जय" हे ते देखील म्हणत आहेत...(गोंधळ)...

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी आपले स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यानंतरही वर्तमानपत्रातील बातम्या वाचून सभागृहामध्ये गोंधळ झाला. ती बाब क्लीअर झाल्यावर विरोधी पक्षाने मान्य करायला पाहीजे होते. परंतु पुन्हा तेच तेच बोलून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचा आणि महाराष्ट्रातील जनतेचा अवमान करण्याचा प्रयत्न काँग्रेस पक्षाकडून होत आहे. यातून देशभरामध्ये महाराष्ट्राची मान शरमेने खाली झुकेल. हे माननीय मुख्यमंत्री महोदयांचा अपमान करीत आहे. काँग्रेसने माननीय मुख्यमंत्र्यांची आणि राज्याची माफी मागितली पाहीजे, असा ठराव विरोधी पक्षाने मांडला पाहीजे.

तालिका सभाध्यक्ष : आता हा विषय संपलेला आहे. आता आपण पुढे जाऊया. यावर जास्त चर्चा करणे योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब आपण हा विषय सुरु झाला तेव्हा सभागृहामध्ये उपस्थित नव्हते. आपण सभागृहात नंतर आले. माझी विनंती आहे की, सर्व सन्माननीय सदस्यांनी शांत बसावे...(गोंधळ)...सन्माननीय सदस्य श्री. संजय शिरसाट आपण बोलण्यास सुरुवात करावी.

(विरोधी पक्षातील बरेच सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

श्री. संजय शिरसाट : अध्यक्ष महोदय, श्री. ढेरे यांनी उप संचालक असताना एक प्रस्ताव मंजूर केला. त्यापूर्वी देखील असाच एक प्रस्ताव आला होता की, बिंदु नामावलीप्रमाणे भरती करता येणार नाही. परंतु श्री. ढेरे हे त्या पदावर आल्यांनतर त्यांनी जवळपास 250 ते 300 कर्मचारी आणि प्राध्यापकांची कॉलेजमध्ये भरती केली. जे कर्मचारी 2002 साली भरती झाले होते, जे अर्धवेळ होते त्यांना 2014 साली पैसे देण्यात आले. शासनाचे जवळपास 200 ते 250 कोटी

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय शिरसाट.....

रुपयांचे नुकसान श्री. ढेरे यांच्यामुळे झालेले आहे. श्री. ढेरे यांचा सहकारी श्री. बलाटे हा अगोदर शिक्षणाधिकारी होता. श्री. ढेरे हे अध्यक्ष झाल्यावर श्री. बलाटे उप संचालक झाला व या दोघांनी मिळून शासनाला फसविलेले आहे. त्यांनी नियमबाह्य पदांची भरती केलेली आहे. आपण नेमलेला अधिकारी हा समकक्ष अधिकारी असल्यामुळे तो त्यांची चौकशी करु शकत नाही. त्यामुळे यासंदर्भातील चौकशी न्यायमुर्तीमार्फत करावी आणि श्री. बलाटे यांना तत्काळ निलंबित करणार आहात काय, असे माझे आपल्यामार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

श्री. विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय शिरसाट यांनी मांडलेला मुद्दा योग्य आहे. तत्कालीन शिक्षण उप संचालक, औरंगाबाद यांना निलंबित करण्यात आलेले आहे. परंतु ज्या वेळी भ्रष्टाचार होतो, त्यावेळी चुकीच्या बाबी करायला जे कोणे पैसे देऊन हे करतात आणि त्यांना जे अधिकारी मदत करतात, त्या अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करतो. परंतु ज्या संस्था, ज्या व्यक्ती चुकीच्या बाबी करुन फायदा घेतात, त्यांच्यावर सुद्धा एफआयआर केला जाईल. तसेच त्यांनी सांगितल्याप्रमाणे श्री.बलाटे, श्री. ढेरे यांची चौकशी समकक्ष अधिकाऱ्यामार्फत न करता, त्यांच्या वरील आयएएस अधिकारी किंवा तत्सम अधिकारी किंवा निवृत्त न्यायाधिश यांच्यामार्फत चौकशी करुन त्यांच्यावर नक्की कारवाई केली जाईल.

डॉ. जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, उत्तरामध्ये सांगितलेले आहे की, माध्यमिक विभागातील वैयक्तिक मान्यता शिक्षण अधिकारी कार्यालयाकडून देण्यात येत नाही. सदर प्रकरणी विभागीय शिक्षण उप संचालक कार्यालयातील सहायक संचालकामार्फत देण्यात येते. माझा प्रश्न असा आहे. त्यावेळेसचे श्री. बलाटे यांना निलंबित केले. त्यांच्याकडे प्रस्ताव देणाऱ्या सहायक उप संचालक यांचे नाव काय आहे आणि सहायक संचालकास निलंबित करणार आहात काय, असे माझे आपल्या मार्फत मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

...R/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, हा गहन प्रश्न असल्याने याप्रकरणी चौकशी करणे गरजेचे आहे. याप्रकरणी दोषी असणाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री.सुभाष साबणे : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी याप्रकरणी समर्पक उत्तर दिले आहे. ..... (अडथळा) ... कोणताही संशय नाही.

तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर): सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, तो विषय आता संपलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.साबणे यांनी आपले बोलणे सुरु ठेवावे.

श्री.सुभाष साबणे : अध्यक्ष महोदय, जोपर्यंत राखीव जागा भरल्या जात नाहीत तो पर्यंत खुल्या संवर्गातील जागा भरण्यात येऊ नये, असा शासनाचा आदेश असताना श्री.डेरे व श्री.बनाटे या दोन अधिकाऱ्यांनी संगनमत करुन संबंधित उमेदवाराकडून प्रत्येकी 20 ते 30 लाख रुपये घेऊन बोगस शिक्षकांची भरती केली आहे. अशा प्रकारे या अधिकाऱ्यांनी जवळपास 300 ते 400 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार करुन पैसे मिळविले आहेत. या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला आहे व अशा पध्दतीने पदभरती केल्याने राज्य शासनाचे आर्थिक नुकसानही केले आहे. सदरहू प्रकरणाची मराठवाड्यातील 4-5 जिल्ह्यात व्याप्ती असल्याने एसआयटी चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : अध्यक्ष महोदय, सदरहू प्रकरणी काही सन्माननीय सदस्यांनी निवृत्त न्यायाधिशांच्या माध्यमातून चौकशी करण्यात यावी, काही सन्माननीय सदस्यांनी एसआयटीच्या माध्यमातून तर काही सन्माननीय सदस्यांनी आय.एस.एस.अधिकाऱ्यांच्या माध्यमातून चौकशी करण्याची मागणी केली आहे. याप्रकरणी संबंधितांची बैठक घेऊन कडक उपाययोजना करण्यासंदर्भात कोणती चौकशी लावता येईल ती चौकशी लावण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

तालिका सभाध्यक्ष : लक्षवेधी क्रमांक तीन ही सन्माननीय सदस्य सर्वश्री नितेश राणे, हर्षवर्धन सपकाळ, अस्लम शेख, अमिन पटेल, डॉ.संतोष टारफे, श्रीमती निर्मला गावीत, श्री.अबु आझमी, यांनी उपस्थित केली असून त्यांच्यापैकी एकाने ती मांडावी.

श्री.नितेश राणे : अध्यक्ष महोदय, माजी मुख्यमंत्री तथा सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांना काही विषय मांडावयाचा आहे, त्यांना आपण बोलण्याची संधी द्यावी.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, तो विषय आता संपला आहे. त्याबाबत मी सांगितले आहे की, चित्रफित तपासून माननीय अध्यक्ष महोदय सभागृहामध्ये निवेदन करतील.

श्री.नितेश राणे : अध्यक्ष महोदय, राष्ट्रभक्ती आता आम्हाला शिकवणार का ? माझे नाव कसे घेता ? मी कधी झेंडा उलटा धरला होता ? याप्रकरणी चुकीच्या पध्दतीने माझे नाव गोवण्यात येत आहे. आता तुम्ही शिकवणार का आम्हाला राष्ट्रभक्ती ?

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.नितेश राणेजी आपले सभागृहातील वागणे व बोलणे बरोबर नाही.

श्री.नितेश राणे : अध्यक्ष महोदय, तुम्ही माझे नाव उगीचच घेत आहात आणि मी सहन का करावयाचे ?

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.नितेश राणेजी मी तुमच्या विरोधात बोललो नाही. सभागृहात झेंडे उलटे फडकले गेले त्यासंदर्भात मी सूचना दिल्या होत्या. माननीय मंत्री महोदय श्री.दिवाकर रावते यांनी देखील ही बाब खाली बसून सांगितली होती. त्यामुळे याप्रकरणी चित्रफित पाहून निर्णय सांगण्यात येईल, असे मी सांगितले आहे. याबाबत माननीय मंत्री सर्वश्री.दिवाकर रावते व रविंद्र वायकर बोलले होते. सदरहू प्रकरणी चित्रफितीमध्ये वेगळे काही ..... अशा पध्दतीने बोलता येणार नाही. राष्ट्रभक्ती कोण कोणाला शिकवेल हे तुम्ही आम्हाला सांगण्याची गरज नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: अनुदानाकरिता मागण्या.

मु.शी.: सन 2016-2017 च्या अनदानाकरिता मागण्या :

1) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

2) कौशल्य विकास आणि उद्योजकता विभाग

तालिका सभाध्यक्ष : आता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, कौशल्य विकास आणि उद्योजकता विभाग या विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक. एन-2,एन-3, एन-4, एन-5, झेडए-1, झेडए-2, झेडए-3 चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केला आहे.

(**प्रेस** : सोबत जोडलेले मागण्यांसंबंधीचे जोडपत्र छापावे.)

.....

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाअध्यक्ष : आता सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, कौशल्य विकास आणि उद्योजकता विभाग या विभागांच्या मागण्यांवर चर्चा होईल. मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांच्या विभागनिहाय याद्या सदस्यांना टपालखणाद्वारे (पिजन होल) वितरित करण्यात आल्या आहेत. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा जुलै, 2010 पासून मान्य झाली असल्यामुळे, आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे मी गृहीत धरतो.

या चर्चेसाठी तीन तास वेळ देण्यात येईल. या तीन तासापैकी सत्तारुढ पक्षास संबंधित मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. प्रत्येक सदस्याने भाषण सुरु करण्याचे वेळी विभाग, याच बरोबर बाब क्रमांक विवरणपत्रातील पृष्ठ क्रमांक यांचा उल्लेख करावा. पुरवणी मागण्यांवरील चर्चा संबंधित बाबींपुरतीच मर्यादित असल्यामुळे सदस्यांना मूळ अनुदान अथवा मूळ मागणी यावर चर्चा करता येणार नाही. आता प्रथेप्रमाणे माननीय विरोधी पक्ष नेते चर्चेला सुरुवात करतील. त्यानंतर इतर सदस्यांची भाषणे होतील.

आता सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग, नगरविकास विभाग, विधी व न्याय विभाग, गृहनिर्माण विभागाच्या मागण्यांवरील चर्चेला सुरुवात होईल. चर्चेला तीन तासांची वेळ आहे. आता माझ्याकडे बरीच नावे आलेली आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपली मते थोडक्यात मांडली तर अधिक जणांना बोलता येईल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, राष्ट्रध्वजाच्या संदर्भात सभागृहात उल्लेख करण्यात आला होता. सदर प्रकरणी चित्रफित पाहून आपणास जो निर्णय घ्यावयाचा असेल तो आपण घ्यावा. सदरहू प्रकरणी निर्णय घेणे ही बाब आपल्या अधिकार कक्षेतील असल्याने त्यास आम्ही आव्हान देणार नाही. विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांची मागणी आहे की, सदरहू प्रकरणी सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे तो आपण कामकाजातून वगळावा. चित्रफितीमध्ये जे काही दिसेल त्यावरील आपला निर्णय आम्ही मान्य करु.

तालिका सभाध्यक्ष : हा राष्ट्रध्वजाचा प्रश्न आहे, त्यामुळे मी बोलतो. आपणास मान्य नसेल तर सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी बोलावे. आपण त्यावेळी सभागृहात नव्हता. सभागृहात अनवधानाने राष्ट्रध्वज उलटा फडकविला गेला, हा प्रश्न वेगळा आहे. राष्ट्रध्वज मुद्दामहून उलटा फडकविण्यात आला, असे सांगितले नाही. राष्ट्रध्वज उलटा धरण्यात आला आहे, ही बाब मी निदर्शनास आणून दिली होती. त्यावेळी सदनामध्ये माननीय मंत्री सर्वश्री दिवाकर रावते व रविंद्र वायकर उपस्थित होते. त्यावेळी मी सन्माननीय सदस्यांचे नाव पुकारुन सांगितले होते. मी सन्माननीय सदस्य श्री.हसन मुश्रीफ यांचे नाव घेतले होते, त्यावेळी ही बाब त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी लगेच राष्ट्रध्वज सरळ धरला. हे त्यांनी जाणूनबुजून केले, असे मी म्हणत नाही. सदरहू प्रकरणी चित्रफित पाहून निर्णय करण्यात येईल. त्यानंतर आवश्यकता नसेल तर सर्व नावे वगळण्यात येतील.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, समोरील बाकावर बसून काही सन्माननीय सदस्यांनी काही नावांचा उल्लेख केला, ही नावे घेण्याचा त्यांचा हेतू आम्हाला माहीत नाही. चित्रफित पाहून निर्णय घेण्यासंदर्भात आमचा आक्षेप नाही. राष्ट्रध्वज जाणीवपूर्वक उलटा धरण्याचा प्रयत्न कोणीही करीत नाही. राष्ट्रध्वजाचा अवमान होईल अशी कोणतीही कृती आमच्याकडून होणार नाही. राष्ट्रध्वजाबद्दल आम्हाला अभिमान आहे. त्यामुळे राष्ट्रवाद आम्हाला शिकविण्याची गरज नाही. चित्रफित पाहण्यापूर्वी सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख कामकाजातून काढण्यात यावा. चित्रफित पाहिल्यानंतर योग्य तो निर्णय घ्यावा, अशी आमची विनंती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : माननीय विरोधी पक्ष नेते म्हणतात त्याप्रमाणे नावाचा उल्लेख झाला असेल तर तो काढण्यात येईल. आता अर्थसंकल्पावरील अनुदानाच्या मागण्यावरील चर्चा घेण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.अनिल गोटे यांना बोलण्यासाठी अनुमती देण्यात येत आहे. आपण कृपया विविदात्मक मुद्यावर बोलू नये.

श्री.अनिल गोटे : अध्यक्ष महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेते व विरोधी पक्षास सांगू इच्छितो की, भारत माता की जय !

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा विषय संपला आहे. आता या विषयावर बोलू नये. सन्माननीय सदस्य श्री.मंगल प्रभात लोढाजी आपका कुछ कहना है तो आप कह सकते है.

यानंतर S-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष : सम्माननीय सदस्य श्री मंगल प्रभात लोढा जी आपको क्या बताना है ?

श्री मंगल प्रभात लोढा : अध्यक्ष महोदय, मेरा छोटासा व्यवस्था का प्रश्न है. आज के लोकसत्ता अखबार में मॉडर्न टेनेन्सी ॲक्ट को लेकर एक बड़ी न्यूज छपी है. इस बारे में महाराष्ट्र में पहले भी बहुत सारी चर्चा हो चुकी है. सरकार से मेरा इतना ही निवेदन है. मैने जानकारी ली है. सरकार की तरफ से कोई नया कानून प्रस्तावित नहीं है. पूरे मुंबई और महाराष्ट्र में टेनेन्ट ॲक्ट को लोग परेशान है. इसलिए मेरा निवेदन है कि आप सरकार को, गृहनिर्माण विभाग के मंत्री जी को इस बारे में निर्देश दे कि कि वे आज का कामकाज समाप्त होने से पहले इस बारे में क्लेरिफिकेशन दे, ताकि कन्ट्रोवर्सी और आगे न बढ़े.

तालिका सभाध्यक्ष : सरकारने यावर निवेदन करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : अनुदानाकरिता मागण्या

मु. शी. : सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाकरिता मागण्या :
1. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
2. कौशल्य विकास आणि उद्योजकता विभाग

चर्चा पुढे सुरू.....

प्रा. वर्षा गायकवाड (धारावी) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या मागण्यांवर आपले विचार प्रकट करीत आहे.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय डॉक्टरसाहेब मी आपले म्हणणे नंतर ऐकून घेतो.

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्राचा सन 2015-16 चा आर्थिक पाहणीचा अहवाल आलेला आहे. आपण यामध्ये सामाजिक न्याय विभागासंबंधी बघितले तर 12 व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत केंद्र शासनाचा आणि राज्य शासनाकडून जो 28500 कोटी रुपयांचा निधी मिळालेला आहे. तो पाहिला तर सन 2015-16 मध्ये 6490 कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करुन दिला गेला असून त्यापैकी मागील दोन वर्षाचा म्हणजे सन 2014-15 आणि 2015-16 या वर्षाचे बजेट आपल्यासमोर सादर करण्यात आले आहे आणि त्या अंतर्गत मी सामाजिक न्याय मंत्र्यांना प्रश्न विचारु इच्छिते की, राज्यस्तरीय योजनांसाठी सन 2014-15 या वर्षामध्ये जवळपास 4044.26 कोटी रुपये ठेवले होते. मात्र या निधीपैकी 1720 कोटी रुपये इतकाच झालेला आहे. जिल्हा स्तरावरील खर्चासाठी 2000 कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यत आली होती. पण प्रत्यक्षात केलेला खर्च बघितला तर 1862 कोटी रुपये इतकाच करण्यात आलेला आहे. म्हणजे एकूण सन 2014-15 आणि 2015-16 चे बजेट बघितले तर 6044 कोटी रुपयांपैकी फक्त 3583 कोटी रुपये एवढाच निधी खर्च झालेला आहे. याचाच अर्थ असा आहे की, सन 2014-15 मध्ये आपण फक्त 50 टक्केच निधी खर्च करु शकला आहात. सन 2015-16 या वर्षाच्या बाबतीत बोलायचे झाले तर राज्यस्तरीय विविध योजनांसाठी 4090 कोटी रुपये इतका निधी ठेवला होता आणि त्यापैकी डिसेंबर अखेरपर्यंत आर्थिक पाहणी अहवालानुसार 744 कोटी रुपये खर्च झाले आहेत. जिल्हास्तरीय योजनांसाठी 2400 कोटी रुपयांच्या करण्यात आलेल्या निधीच्या तरतुदीपैकी डिसेंबर अखेरपर्यंत 1272 कोटी रुपये इतकाच निधी खर्च झालेला आहे. एकूण बोलायचे झाले तर 6490 कोटी रुपयांपैकी डिसेंबर अखेरपर्यंत 2017 कोटी रुपये इतकाच खर्च झालेला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. वर्षा गायकवाड.....

अध्यक्ष महोदय, आपण सामाजिक बांधिलकी ठेवता, मी सुध्दा सामाजिक बांधिलकी ठेवते, या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य सामाजिक बांधिलकी ठेवतात. केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या माध्यमातून विविध योजनांसाठी निधी दिला जातो. पण त्यावरील बजेटच्या नियतव्ययापैकी 40 ते 50 टक्के निधी खर्च होत असेल आणि बाकीचा निधी दुसरीकडे जात असेल तर मी या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छिते की, आपण या संदर्भात काय केलेले आहे. यंदा सुध्दा म्हणजे 2016-17 करिता जे बजेट दिलेले आहे. त्यामध्ये 11.8 टक्के म्हणजे 6725 कोटी रुपये इतक्या निधीचा नियतव्यय ठेवला आहे. मला यासंबंधी विनंती करावयाची आहे की, मागासवर्गीयांसाठी आलेला हा निधी शंभरटक्के खर्च केला पाहिजे. कारण सातत्याने आपण बघतो की, ज्या तऱ्हेने बजेट अलोकेट होते त्यानुसार निधी खर्च होत नाही. हा मागील अनुभव आहे. यामध्ये मग त्या राज्य सरकारच्या किंवा केंद्र सरकारच्या योजना असोत. त्या स्तरावर तो निधी खर्च होत नाही.

(अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्ष श्री. सुभाष साबणे)

अध्यक्ष महोदय, मला काही बाबी या अनुषंगाने निदर्शनास आणावयाच्या आहेत की, या ठिकाणी सांगण्यात आले की, शैक्षणिक विकास दृष्टीकोनातून मागासवर्गीय मुलींसाठी 50 वसतिगृहे बांधली जाणार आहेत. अध्यक्ष महोदय, मला संरक्षण द्यावे.

तालिका सभाध्यक्ष : सर्व सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये शांतता राखावी.

प्रा. वर्षा गायकवाड : अध्यक्ष महोदय, यंदाच्या वर्षी 6725 कोटी रुपयांचा जो नियतव्यय या विभागासाठी ठेवलेला आहे तो शंभरटक्के खर्च झाला पाहिजे अशी माझी मनापासून इच्छा आहे. कारण यासाठी मी जे रेकॉर्ड यासाठी आणले की, आपण सन 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये 50 टक्के निधी खर्च केला असून सन 2015-16 मध्ये आपण त्यापेक्षाही कमी म्हणजे 30 ते 40 टक्के निधी खर्च झाला आहे. त्यामुळे माझी अशी अपेक्षा आहे की, सन 2016-17 या वित्तीय वर्षाचा संपूर्ण नियतव्यय मागासवर्गीयांच्या विविध योजनासाठी खर्च झाला पाहिजे. अर्थसंकल्पात सांगितले की, आपला शैक्षणिक दृष्टीकोन सर्वात महत्वाचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उपदेश देताना सांगितले की, Knowledge is the Power. शिक्षण हे ज्याला गवसले त्याला सर्व काही गसवले असे समजावे. त्यामुळे शैक्षणिक विकास करणे ही आपली सर्वात मोठी जबाबदारी आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. वर्षा गायकवाड.....

त्यामुळे मागासवर्गीयांसाठी 50 वसतिगृहे आपण बांधणार असून त्यासाठी आपण 222 कोटी रुपयांचा नियतव्यय ठेवला आहे. पण आजच्या वृत्तपत्रामध्ये आपण बघितले तर मुंबई विभागात म्हणजे त्यामध्ये मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये बघितले तर जवळपास बघितले तर 125 वसतिगृहे आहेत. यासाठी 4 कोटी 40 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. परंतु याबाबतीत असे झाले आहे की, मुंबई विभागाच्या उपायुक्तांनी इतकी हलगर्जीपणा केला की, त्या 125 वसतिगृहामध्ये असलेल्या जवळपास 1 लाख विद्यार्थ्यांपर्यंत हा निधी पोहोचला नाही. 31 मार्चपर्यंत हे पैसे न मिळाल्यामुळे सदर निधी पुन्हा एकदा शासनाच्या तिजोरीत आले आहेत. त्यामुळे माझे आणखी एक सांगणे आहे की, वसतिगृहाच्या बाबतीत सामाजिक न्यायाचे प्रश्न पाहिले तर सुविधांचा अभाव, महिला अधिक्षिका नसणे, निकृष्ट दर्जाचा आहार असणे, या सातत्याने येणाऱ्या तक्रारी आहेत. मधल्या काळात माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, यासंबंधी आपण एक भरारी पथक तयार करु. त्यांनी सांगितले की, आमदारांची समिती स्थापन करु. माझा मंत्री महोदयांना सवाल आहे की, आपण याची कोणावर जबाबदारी निश्चित करणार आहात की, नाही. जे साहित्य खरेदी केले जाते ते त्या मुलांपर्यंत पोहोचत नाही. ऑनलाईन स्कॉलरशीप मिळणार असे सांगितले पण ती मुलांपर्यंत पोहोचत नाही. फॉरेनच्या शिक्षणासाठी निधी दिला जातो. ते पैसे वेळेवर मिळत नाहीत. एवढे मोठे बजेट असताना सुध्दा सातत्याने सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून या मुलांवर जो अन्याय होतो तो मी या माध्यमातून आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

अध्यक्ष महोदय, मधल्या काळामध्ये आम्ही एक चांगली योजना सुरू केली होती. त्या योजनेच्या माध्यमातून सांगू इच्छिते की, जे तरुण युवक आहेत त्यांना आम्ही मोटारीचे ट्रेनिंग द्यायचे आणि त्यांना ट्रेनिंग दिल्यानंतर लायसन्स द्यायचे, जेणेकरुन ते त्यांचा उद्योगधंदा पुढे सुरू करु शकतील, स्वतःच्या पायावर उभे राहतील अशी त्या योजनेची भूमिका होती. पण सद्यःस्थितीमध्ये परिस्थिती काय आहे तर मागील दीड वर्षापासून ती योजन बंद पडलेली आहे. परवा एका लक्षवेधी सूचनेला उत्तर देता असताना सन्माननीय राज्यमंत्री महोदयांचे असे म्हणणे होते की, अशा योजना बंद होऊ नयेत. या योजना गरीब मुलांपर्यंत जाऊन त्यांना व्यावसायिकदृष्ट्या आणि औद्योगिकदृष्ट्या परिपूर्ण करतात. त्यामुळे अशा योजना बंद होता कामा नये.

5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. वर्षा गायकवाड.....

अध्यक्ष महोदय, आपण दुसरी एक योजना सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून केली. ती योजना म्हणजे आयआयटी बेसच्या माध्यमातून आहे. अपेक्षा अशी होती की, आपली 30 मूले आणि 20 मुली यांना आपण आयआयटीचे एन्ट्रन्सचे ट्रेनिंग देणार की, जेणेकरुन ही मूले आयआयटीला प्रवेश घेतील आणि भविष्यामध्ये ते सायन्टीस्ट होतील, इंजिनिअर्स होतील असा उद्देश यामागे होता. परंतु जमिनीवरील रियॅलिटी आणि कागदोपत्रावरील रियॅलिटी यामध्ये फार जमीन आसमानचा फरक आहे. मागील दोन वर्षामध्ये या संदर्भातील एकही जाहिरात आलेली नाही, त्यामुळे ही सर्व मूले वंचित आहेत. या मुलांना आपण काय देत होतो तर वसतिगृहाची सुविधा, पुस्तके देत होतो, जेवणाची व्यवस्था करीत होतो. पण सातत्याने मागील दोन वर्षे या मुलांवर अन्याय होत आहे आणि ही मूले शिक्षणापासून वंचित राहत आहेत हे मी आपल्याला नम्रपणाने सांगू इच्छिते.

अध्यक्ष महोदय, अनुसूचित जातीच्या संदर्भात आपण नेहमीच बोलतो. आपण सुध्दा त्या समितीमध्ये आहात आणि मी सुध्दा त्या समितीमध्ये आहे. आपण नेहमीच असे म्हणतो की, ज्या पध्दतीने अन्याय किंवा अत्याचार होतात त्या संदर्भात आपण सातत्याने मागणी करीत असतो की,

T-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.वर्षा गायकवाड.....

अनुसूचित जाती आणि जमातीच्या आयोगाबाबत मी एक लक्षवेधी सूचना सुध्दा मांडलेली आहे. माननीय मंत्र्यांनी आश्वासन दिले आणि त्यानंतर एक बैठक झाली. बैठकीमध्ये सुध्दा आश्वासन देण्यात आले. परंतु आजही या आयोगाला सदस्य नाहीत, अध्यक्ष आहेत की नाही मला माहिती नाही. स्टाफ नाही, त्यासाठी स्वतंत्र कायदा नाही. महिला आयोग असेल किंवा बाल हक्क संरक्षण आयोग असेल या सर्व आयोगांना संविधानिक अधिकार दिलेले आहेत. त्यामुळे तेथे ते जाऊ शकतात, भेटू शकतात, त्यांना बोलू शकतात. त्याठिकाणी सिव्हील कोर्ट जसे चालते, तसे कोर्टही चालू शकते. माननीय मंत्र्याससमोर हीच इच्छा व्यक्त केली होती. अनुसूचित जाती आणि जमातीचे जे आयोग आहेत त्याला एक स्वतंत्र कायदा झाला पाहिजे, स्टाफ दिला पाहिजे, सदस्य दिले पाहिजेत आणि त्याचबरोबर त्याला संविधानिक अधिकार सुध्दा दिले पाहिजेत ही आमची मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मला मंत्री महोदयांनी त्यावेळेस आश्वासन दिले होते की, यासंदर्भात आम्ही लवकरच निर्णय घेऊ. परंतु अजून एक वर्षानंतरही हा लवकरचा निर्णय झालेला नाही. म्हणून ही गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणू इच्छिते. मधल्या काळामध्ये या आयोगाबाबत एक निर्णय आला की, यामध्ये अध्यक्ष असतो तो आयएस दर्जाचा सचिव असतो आणि जज्ज दर्जाचे सदस्य असतात. यांना फक्त 10 हजार रुपये मानधन दिले जाते आणि त्याठिकाणी काम करणाऱ्या शिपायाला 16 ते 17 हजार रुपयांचे मानधन दिले जाते. आपणास कल्पना असेल की, कुठलीही घटना घडल्यानंतर या लोकांना त्याठिकाणी जावे लागते. ट्रॅव्हलिंग अलाऊन्स म्हणून यांना गाडीसाठी 40 हजार रुपये दिले जातात. मधल्या काळात एक जीआर निघून ट्रॅव्हलिंग अलाऊन्स 40 हजार रुपयांवरुन 30 हजार रुपये करण्यात आला. त्यामुळे अनुसूचित जाती आणि जमातीच्या आयोगाकडील सदस्यांकडे 6 महिन्यांपासून गाड्या नाहीत. गाड्या नसल्यामुळे त्यांचे जाणे येणे बंद झालेले आहे. आयोगाकडे आज जवळपास दीड ते दोन हजार प्रलंबित केसेस आहेत. यातून जर गरीब माणसाला न्याय द्यायचा असेल तर यासाठी लवकरात लवकर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.वर्षा गायकवाड.....

अध्यक्ष महोदय, मुंबईमधील दामू नगर या वसाहतीमध्ये 99 टक्के लोक मागासवर्गीय आहेत. मागच्या काळामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले होते की, याठिकाणच्या लोकांना 25 हजार रुपये देण्यात यावे. त्यांचे त्याठिकाणीच पुनर्वसन करण्यात यावे. परंतु याठिकाणच्या मागासवर्गीय लोकांचे अजूनही पुनर्वसन करण्यात आलेले नाही. एक सामाजिक बांधिलकी म्हणून आपली भूमिका काय आहे? आग लागून जवळपास चार महिने उलटून गेलेले आहेत. तरीही लोकांना अजून घरे मिळालेली नाहीत. अशा परिस्थितीमध्ये सामाजिक दुष्टीकोनातून या लोकांमध्ये बघणार आहात की नाही. आपल्या राज्याने एक कायदा आणलेला आहे तो बहुतेक मंत्री महोदयांकडे असेल. आंध्रप्रदेश आणि कर्नाटक राज्याने कायदा केलेला आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्रात सुध्दा कायदा करण्याबाबत वारंवार विनंती करण्यात येत आहे. समस्या अशी आहे की, ज्यावेळेस मागासवर्गीयांसाठी बजेट ठेवले जाते. त्याच्या थोडे दिवस आधी ते कुठल्यातरी विभागामध्ये जाते. म्हणून हे बजेट ज्या माणसाच्या विकासासाठी ठेवलेले आहे, त्या माणसाच्या विकासापर्यंत न जाता दुसरीकडेच जाते. हा पैसा देशाच्या संविधानाच्या माध्यमातून लोकसंख्येच्या आधारावर मिळालेला आहे आणि तो मागासवर्गीयांसाठी मिळालेला आहे. म्हणून मी आपल्याला सांगू इच्छिते की, आंध्रप्रदेश आणि कर्नाटक राज्याने अनुसूचित जाती आणि जमातींसाठी जो कायदा केलेला आहे. या कायद्याच्या अंतर्गत पैसे डायव्हर्ट करता येत नाहीत. जेवढी लोकसंख्या असेल त्याप्रमाणात पैसे ठेवावे लागतात. आज अशी परिस्थिती आहे की, मागासवर्गीय विभागाने कोणतीही योजना केल्यानंतर बजेटसाठी वित्त विभागाकडे जावे लागते. एकदा मागासवर्गीयांचे बजेट जाहीर झाल्यानंतर सामाजिक न्याय मंत्री महोदयांनाच हा अधिकार मिळाला पाहिजे. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये महिलांना एअर होस्टेसचे ट्रेनिंग दिले पाहिजे असे सांगण्यात आले. अशा योजनांसाठी दोन-दोन वर्षे बजेटसाठी थांबण्याची आवश्यकता नाही, त्याची परवानगी घ्यायची गरज नाही. जर बजेट जाहीर केला असेल आणि त्या बजेटमध्ये ही योजना जाहीर केली असेल तर सदर योजना त्या माध्यमातून त्याठिकाणी करता यायला पाहिजे. अशाप्रकारचा अधिकार कायद्याच्या माध्यमातून मिळालेला आहे. हा कायदा जसा आंध्रप्रदेश आणि कर्नाटक राज्याने बनविलेला आहे. त्याप्रमाणे हा कायदा पुरोगामी महाराष्ट्र, प्रगत महाराष्ट्र, भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकराचा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.वर्षा गायकवाड.....

महाराष्ट्र अशा महाराष्ट्र राज्यामध्ये मगासवर्गीयांसाठी हा कायदा यायला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, आमची अशी अपेक्षा होती की, या अधिवेशनामध्ये हे विधेयक येईल. प्रत्येक वेळी कोणतीही घटना घडली की, समजा एखादे बौध्द विहार बांधले, एखादे चांगले शेत आले की विविध ॲक्ट्रॉसिटीच्या घटना घडतात. इंदापूरमधील घटना बघितली तर मायलेकींवर चोरीचा आळ आला म्हणून सर्वांसमोर विवस्त्र करण्यात आले. अशा तऱ्हेच्या घडत असतात. एखादी मुलगी ज्यावेळेस जीन्स घालते त्यावेळी तिला गावाच्या बाहर पाठविले जाते. अशा घटना घडत असताना आमची अपेक्षा होती की, या अधिवेशनामध्ये जातपंचायतचे जे विधेयक होते. ज्या महिलांवर बहिष्कार किंवा समाजावर बहिष्कार केले जातात आणि ज्याचे परिणाम महाराष्ट्रातील मागासवर्गीय समाजाला भोगावे लागतात. यावेळेस राज्य सरकारच्या माध्यमातून सामाजिक बहिष्कारापासून संरक्षण, अटकाव, प्रतिबंध व सुधारणा हे विधेयक येईल. परंतु दुर्दैवाने सांगावे लागते की या अधिवेशनामध्येही हे विधेयक आल्याचे दिसत नाही.

अध्यक्ष महोदय, आंतरजातीय विवाहासाठी 50 हजार रुपये दिले जातात. याचे कारण असे की यामुळे जातीमधील भेदभाद संपुष्टात येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की, जोपर्यंत रोटी आणि बेटीचे व्यवहार होणार नाहीत तोपर्यंत हा जातीवाद मिटणार नाही. एकमेकांच्या घरी खाल्ले पाहिजे आणि वेगवेगळ्या जातीमध्ये लग्न विवाह झाला पाहिजे. त्याशिवाय हा जातीवाद मिटणार नाही. म्हणून आपण आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देऊन 50 हजार रुपये देतो. माझ्याकडे अशा काही केसेस आल्या की, एखाद्या मागासवर्गीय महिलेने नेपाळी माणसाबरोबर लग्न केले आणि तो माणूस तिला सोडून निघून गेला. अशा वेळेस या महिलांची परिस्थिती इतकी दुर्दैवी होते की, ज्यावेळी ती महिला घटस्फोटीत असते, तिचा नवरा तिला सोडून जातो. अशा वेळेस त्या महिलेच्या मुलाची जात काय लावायची. ज्याप्रमाणे आपण वडिलांचे नाव लावतो त्याप्रमाणे आईचे सुध्दा नाव लावतो. म्हणून माझी नम्रतेची विनंती आहे की, जर एखाद्या मुलाला वाटत असते की आपल्या आईची जात लावावी तर त्याला तसा अधिकार मिळाला पाहिजे. असे मी खूप उदाहरणे सांगू शकते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.वर्षा गायकवाड.....

अध्यक्ष महोदय मला आणखी एक सांगायचे आहे की, अनुसूचित जातीतून बौध्द धर्मात धर्मांतर करणाऱ्यांना संरक्षण दिले पाहिजे. भारतीय संविधानातील कलम 341 च्या तरतूदीनुसार अनुसूचित जातींना संरक्षण मिळाले. केंद्राकडून राज्यनिहाय त्याची यादी सुध्दा घोषित झालेली आहे. केंद्र शासनाच्या दिनांक 8 ऑगस्ट, 1950 च्या अधिसूचनेनुसार संविधान अनुसूचित जाती आदेश 1950 घोषित करण्यात आला. नंतरच्या काळामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली लाखोंच्या संख्येने लोकांनी धर्मांतर केले आणि लोक बौध्द झाले. पूर्वी हा धर्मांतरीय समुह अनुसूचित जातीमध्ये होता. त्यानंतर आरक्षण विषयक मिळणाऱ्या सर्व लाभास प्रतिबंध झालेला आहे. आज जर लोकसंख्या बघायची झाली तर अनुसूचित जातीच्या लोकांची संख्या 17 टक्के आहे. तर आज बजेटमध्ये त्यांच्यासाठी 11.8 टक्के निधी मिळाला. कारण नवबौध्दांना धर्मांतर बदलामध्ये घेण्यात आलेलेच नाही. आज आमदरांच्या 29 सीट आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या सन 2001 च्या सेन्सस नुसार 4.8 टक्के होते आणि सन 2011 च्या आकडेवारीनुसार सेन्सस मुंबई महानगरपालिकेच्या बजेटमध्ये 6.7 टक्के होते. आज मुंबई महानगरपालिकेमध्ये 227 पैकी 11 नगरसेवक हे मागासवर्गीय आहेत. जर सन 2011 च्या सेन्सस नुसार घेतले तर फक्त 15 नगरसेवक येणार आहेत. हे फार अन्यायकारक आहे. आज अशी परिस्थिती आहे की, धर्मांतर केलेल्या लोकांना अनुसूचित जातीमध्ये घेतले. यासंदर्भात विविध न्यायालयांचे दाखले आहेत. यामध्ये न्यायालयाने सुध्दा सांगितलेले आहे. महाराष्ट्र शासनाने दिनांक 17 जानेवारी, 1998 च्या धर्तीवर बौध्दांचे धर्मांतर पहिल्यांदा ईबीसी आणि ओबीसीमध्ये केले. नंतर त्यांचा समावेश अनुसूचित जातीमध्ये केला. यासाठी विविध रिट पिटशीन झाले, उच्च न्यायालयामध्ये लोक गेले. केंद्राकडून परिपत्रक आले.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती वर्षा गायकवाड .....

मंत्रालयाने 20 नोव्हेंबर 1990 च्या परिपत्रकातील परिच्छेद एक नुसार काय सांगितलेले आहे. संविधान अनुसूचित जाती आदेश सन 1950 मध्ये ज्याचा उल्लेख आहे. अशा रितीने बौध्द धर्मात धर्मांतर केले तरी आरक्षण विषयक लाभ सुधारणा आदेश 1990 नुसार हे स्पष्ट केले आहे. मात्र या परिपत्रकातील, परिच्छेद क्रमांक 3 मध्ये जाती प्रमाणपत्राचा नमूना सुधारीत न केल्यामुळे आपण या ठिकाणी आहोत. धर्मांतर ज्यांनी केलेले आहे. त्यांना लाभ देत नाही. अगोदर केंद्र सरकारच्या 31 जुलै 1990 मध्ये गाईड लाईन्स् आलेल्या आहेत. त्याच्यामध्ये त्यांनी सांगितले आहे की, Removal of the bar of Scheduled Caste convert to the Buddhism from being deemed to be the member of the Scheduled Caste. त्यांनी सर्व गोष्टी मान्य केलेल्या आहेत. त्यांच्या परिच्छेद 3 नुसार आपण पाहिले तर बी आणि सी नुसार पाहिले तरी त्या व्यक्तीला जेव्हा प्रमाणपत्र मिळेल तेव्हा तो कास्टमध्ये असला पाहिजे. तुम्हाला त्याच्यामध्ये घ्यायचे असेल तर. पूर्वी आपण कोण होतो ? आता आपण बुध्दीस्ट झालेलो आहोत. त्यामुळे हे धर्मात्तर झालेले आहे. हे केंद्र शासनामध्ये आणि राज्य शासनामध्ये हा जो नमूना आहे हा नमूना एकत्र आला पाहिजे. त्याप्रमाणे हे आरक्षण मिळाले तर त्याच्यामुळे जी तफावत आहे किंवा एक दुरु आहे ती बदलून जाईल. ही सुध्दा एक महत्वपूर्ण गोष्ट आहे. मोठया थाटामाट फार मोठया अपेक्षा केल्या होत्या. मानीय श्री.बडोले साहेबांसोबत सर्वजण गेले, देशाचे माननीय पंतप्रधान आले, इंदूमिलचे भूमीपूजन झालेले आहे. पटकन काम सुरु होईल ही अपेक्षा होती. 11 नोव्हेंबरला सुरु झालेल्या इंदू मिलचे भूमीपूजन कधी काम होते याची वाट बघत होतो. त्या कामाच्या माध्यमातून कशा त-हेने विकास होईल, कारण आम्ही सुध्दा आमची मते त्या ठिकाणी मांडली होती. विधान परिषदेमध्ये असेल किंवा विधानसभेमध्ये सातत्याने कॉन्स्टीटयुशनचा अभ्यास असला पाहिजे. कारण या देशाचे कॉन्स्टीटयुशन हे फार मोठे आहे. अशी आमची अपेक्षा होती की, ते आता जमिनीवर दिसायला लागेल. पण दुर्देवाने अजूनही काम सुरु झालेले नाही. त्या जमिनीच्या बाबतीत आजही काही धोरण आलेले नाही. असे असताना घाईघाईने भूमीपूजन केले.

....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती वर्षा गायकवाड.....

अध्यक्ष महोदय, लंडनचे घर घेतले त्याबद्दल मनापासून आभार मानते. तुम्ही मिलला सामाजिक न्याय विभागाचे पैसे दिले असतील त्याचे मनापासून आभार. माझी मनापासून एक इच्छा आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कोणत्या एका समाजाचे नव्हते, धर्माचे नव्हते, डॉ.बाबासाहेबांना तेवढे मर्यादित नाही केले पाहिजे, ते देशाचे राष्ट्र भक्त होते. अर्थ शास्त्र, राजकारण, शैक्षणिक या सर्व क्षेत्रातील त्यांचा गाढा अभ्यास होता. म्हणून माझी मागणी आहे की, इंदू मिलसाठी पैसा खर्च करणार असाल तर त्यासाठी लागणारा पैसा हा जनरल बजेटमधून व्हायला पाहिजे. ही आपल्या माध्यमातून मागणी करतो. सातारा येथे भिमाबाईंचे स्मारक आहे. तेथे एक बौध्द विहार बांधलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आईचे स्मारक कसे असले पाहिजे ? म्हणून माझी विनंती आहे की, भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची 125 सावी जयंती आपणकरित आहोत. 170 कोटी रुपये या कार्यक्रासाठी ठेवलेले आहेत. म्हणून अपेक्षा अशी आहे की, माता रमाबाई स्मारक असेल, भिमाबाई स्मारक असेल, नाशिकचे काळाराम मंदिर असेल, महाडचे चवदार तळे असेल किंवा पुण्याची पर्वती असेल या सर्वांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सत्याग्रहाचा इतिहास आहे. हा इतिहास जोपासला पाहिजे. एका पिढीपासून दुस-या पिढीपर्यंत गेला पाहिजे. तुम्ही जे 125 वर्षाच्या निमित्ताने जे पैसे ठेवलेले आहेत. ते पैसे या विकासाच्या कामाला वाहिले गेले पाहिजे. एक जागतिक लेव्हलचे स्मारक व्हायला पाहिजे. मी आपल्या माध्यमातून विनंती करते.

अध्यक्ष महोदय, सन 2014 आणि 2015 मध्ये त्या समुदायावर 60 टक्यांपेक्षा जास्त गुन्हे वाढलेले आहेत. अद्याप जर पाहिले तर पोलीस तपास चालू आहे. अपेक्षा काय होती ? केंद्र सरकारने संमत केलेला सुधारीत ॲट्रोसिटी कायदा 2015 नुसार तपासणी व्हावी अशी आमची अपेक्षा होती की, प्रत्येक जिल्हयासाठी स्पेसिफिकली ॲट्रोसिटीसाठी कोर्ट निर्माण व्हायला पाहिजे. जलद न्यायालय निर्माण व्हायला पाहिजे. ज्याच्या माध्यमातून केस च्या संदर्भात सुध्दा लवकर निपटारा व्हायला पाहिजे. जेणेकरुन या केसेस वाढता कामा नयेत. आज अशी परिस्थिती आहे की, राज्यात मागासवर्गीय समाजावर वाढणारे अत्याचाराचे प्रमाण ही गोष्ट मी आपल्या निदर्शनास आणू

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती वर्षा गायकवाड.....

इच्छिते. विशेष सहाय्य विभागाच्या माध्यमातून येण्यापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाची कृषी सहाय्य योजना, घरकुल योजनेसंदर्भात बोलेले आहे. यांबंधीची मधल्या काळामध्ये लक्षवेधी झाली. घरकुला संदर्भात चर्चा झाली. या विषयावर सुध्दा चर्चाकरित असताना सातत्याने कशा अटी शिथिल करता येईल हे पहायला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, बी.पी.एल. च्या लिस्ट शहरामध्ये मिळणे फार मुश्किल आहे. बी.पी.एल.ची अट तुम्ही काढून टाका. जे निकष लोकांना त्रास देणारे असतील असे निकष काढून टाका. जेणेकरुन ही योजना कशी यशस्वी करता येईल या दृष्टीकोनातून प्रयत्न करा. सामाजिक न्याय विभागामध्ये पदे किती रिक्त आहे आहे ? सामाजिक न्याय विभागाकडे जवळपास 2776 पदे रिक्त आहेत. लाखोच्या संख्येने विद्यार्थी इंजिनिअरींग, मेडिकलला प्रवेश घेतात, लोक निवडणूक लढवितात तेथे आवश्यक असलेले जातीचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी किती त्रास सहन करावा लागतो. यासाठी विभागीय आयुक्त, अतिरिक्त जिल्हाधिका-यांकडे जबाबदारी दिली. आज परिस्थिती काय आहे ? त्या कार्यालयात सातत्याने फेऱ्या माराव्या लागतात. मी अभिनंदन करु इच्छिते की, त्यांनी राजस्व अभियांनाच्या माध्यमातून लोकांना डोमेसिाईल वैगरे प्रमाणपत्रे दिली. त्याचपध्दतीने एक मुव्हमेंट चालू केली पाहिजे ज्या वेळी विद्यार्थी इयत्ता 9 वी मध्ये येतो. त्यावेळेला त्याला त्याच्या जातीचा दाखला, व कास्ट व्हॅलिडीटी प्रमाणपत्र मिळाले पाहिजे. ज्या मुलांना प्रमाणपत्र मिळत नाही त्यांच्यावर अन्याय होतो. त्यांना सातत्याने पाठपुरावा करावा लागतो.

अध्यक्ष महोदय, विशेष सहाय्य विभागाच्या बाबतीत बोलणार आहे. संजय गांधी, इंदिरा गांधी, श्रावण बाळ निराधार योजना या दोन योजनेसाठी दोन अपत्ये असतील 1000/- रुपये केले पूर्वी जे 900/- रुपये होते. आपदग्रस्तांना पुर्वी 600/- रुपये मिळत ते तुम्ही 700/- रुपये केले. म्हणजे जवळपास 100/- रुपये वाढविण्याचे काम या सरकारच्या माध्यमातून झालेले आहे. मी जेव्हा माननीय श्री.सुधीर मुनगंटीवार साहेबांचे भाषण एकले होते. त्यामध्ये त्यांनी सुरुवातीलाच म्हटले

....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती वर्षा गायकवाड.....

की, महिलांसाठी निराधार, घटस्फोटीत, विधवा, परितक्त्या, आपधीन महिलांसाठी आधार देणारे हे बजेट आहे. महिलांच्या इतर प्रश्नांच्या बाबतीतील असतील किंवा संजय गांधी योजने बाबत असतील, याबाबत प्रत्येक वेळेला अर्धातास चर्चा असायची. आता फक्त 100 रुपयांची वाढ केलेली आहे. 700/- रुपयांमध्ये आज कोणत्या महिलेचे घर चालते. याचे मला तुम्ही उत्तर द्यावे. याच्या योजनेबाबत तुमच्या अटी जाचक आहेत. मुंबई सारख्या शहरामध्ये घरकाम करणारी महिला किती कमावते, 2000/- रुपये जरी तिने कमविले तर ती तुमच्या योजनेची पात्र होत नाही. 21 हजार रुपयांच्या वर त्या महिलेचे उत्पन्न असले तर ती महिला पात्र नाही असा योजनेचा नियमच आहे. आज मुंबई सारख्या शहरामध्ये, ग्रामीण भागात सुध्दा एखादी महिला रोजगार हमीचे काम करीत असेल तर ती महिला श्रीमंत झाली का ? तिला आधाराची गरज आहे. असे असताना तुम्ही इन्कम सोअर्स वाढविणार आहात की, नाही ? 21 हजाराची अट ठेवलेली आहे. त्या महिलेले मुले किती सांभाळतात हा वेगळा प्रश्न आहे. अशी परिस्थिती असताना त्या महिलेला मुले असतील त्यांची वये 25 वर्षे असे पर्यंत सवलत ही अट आहे. ही वयाची मर्यादा वाढवा. तहसिलदार कार्यालयातून उत्पन्नाचा दाखल घ्यावा लागतो.

अध्यक्ष महोदय, मी सातत्याने उत्पन्नाच्या दाखल्यासाठी फॉर्म भरते, 31 मार्चला मला उत्पन्नाचे व वास्तव्याचे प्रमाणपत्र मिळाले. 1 जानेवारी ते प्रमाणपत्र चालत नाही. यामध्ये दोष कुणाचा आहे. पुन्हा फॉर्म भरा, पुन्हा ॲफिडेव्हीट बनवा, गरीब महिलेला तुम्ही 700/- रुपये देता, तिला ॲफिडेव्हीटला किती पैसे लागतात, तुम्ही तिला सातत्याने कामाला बोलावणार. तुम्हाला खरच सामाजिक न्याय मांडायचा असेल पोटतिडकी असेल तर मी अपेक्षा करते की, येणा-या उत्पन्नाची मर्यादा वाढवावी, तुम्ही वाढविलेले पैसे अजून वाढवावेत, तहसिलदार कार्यालयातून येणारे उत्पनाचे प्रमाणपत्र किंवा वास्तव्याचा दाखला असेल तो टाईम बॉंड पध्दतीमध्ये मिळाला पाहिजे. या योजनांचे महिलांना तीन-तीन महिने पैसे मिळत नाहीत. त्या महिला मला भेटायला येतात. याबाबत तहसिलदार किंवा कलेक्टरना फोन केला ते म्हणतात आता पैसे मिळणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती वर्षा गायकवाड.....

हयातीचा दाखला हा आता नवीन आलेला आहे, काही महिलांना चालता येत नाही, वयोवृध्द असतात तरी प्रत्येक महिलेने तिथे जाऊन दाखविले पाहिजे की, मी जिवंत आहे. ही कोणती नवी परंपरा आहे. ज्यावेळी लोकप्रतिनिधी अशा महिलांच्या बाबतीत पत्र लिहून पाठवितो त्यावेळी तो त्याची जबाबदारी घेतो. भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे 125 सावे वर्ष आहे. यावर्षी शासनाच्या वतीने केंद्र शासनाच्या वतीने, विविध पाटर्यांच्या वतीने सातत्याने एक कार्यक्रम राबवितो आहोत.

V-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती वर्षा गायकवाड .....

ज्याच्या माध्यमातून विचाराचे मंथन व्हावे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार लोकांपर्यंत जावेत. म्हणून सामाजिक न्याय विभागाच्या बजेटमध्ये 170 कोटी रुपये ठेवलेले आहेत. पण या रकमेतून काय केले जाणार आहेत, याबाबत तुमचे विचार आम्हाला कळू द्या. मी अण्णाभाऊ साठे महामंडळाबाबतच्या लक्षवेधी सूचनेचे उत्तर नंतर वाचले. मागील काळात लाभार्थ्यांना बीज भांडवल देणे आपण बंद केले होते का ? कारण 2014-2015 मध्ये लाभार्थ्यांची संख्या 18342 होती. यावर्षी लाभार्थ्यांची संख्या 6 वर आलेली आहे. तुम्ही योजना बंद केल्या होत्या का, बंद केल्या असतील तर 6 लाभार्थी कसे आले आहेत ? संत रोहिदास चर्मोद्योग महामंडळामध्येही मागील वर्षीपेक्षा लाभार्थ्यांची संख्या या वर्षी कमी झालेली आहे. तसेच मिळणारी रक्कमही कमी झालेली आहे. आपण 6725 कोटीचे बजेट यावेळी दिलेले आहे. एवढे बजेट असताना तुम्ही लोकांना उद्योगधंद्यासाठी प्रवृत्त करणार नसाल, मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह व्यवस्थित चालविणार नसाल, मागासवर्गीयांना व्यवस्थित शिष्यवृत्ती देणार नसाल, मागासवर्गीयांच्या विविध योजना बंद करीत राहिलात तर हे बजेट 40-50 टक्केच खर्च होणार आहे. आपणाकडून ही अपेक्षा नाही. या सर्व बाबींकरिता मी नापसंती व्यक्त करते. याबाबत मी एवढेच सांगू इच्छिते की, आपणाकडून अपेक्षा आहे. आपण सर्व जण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानणारे आहोत. त्यामुळे समाज आपल्याकडे बघत आहे. आपणा सर्वांकडे लोकांच्या नजरा आहेत. मला अपेक्षा आहे की, आपल्या माध्यमतून सामाजिक न्याय विभागाचे बजेट 100 टक्के खर्च होईल व पुढील वेळी भाषण करीत असताना मला तुमचे अभिनंदन करण्याची संधी मिळेल. ही अपेक्षा व्यक्त करुन आपल्या सर्वांचे आभार मानून थांबते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. आज दुपारी 3 वाजता माननीय जलसंपदा मंत्री यांनी सोलापूरच्या पाणी प्रश्नाबाबत मिटींग आयोजित केलेली आहे. ही मिटींग वारंवार होते आहे, आजची मिटींगची तिसरी वेळ आहे. मागील आठवडयात मी याबाबत औचित्याचा मुद्दा मांडला होता. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर या विषयावर भाषण देखील केले. दर दोन-तीन महिन्यांनी ही मिटींग आयोजित केली जाते पण या मिटींगचे आमंत्रण सोलापूरमधील विरोधी पक्षाच्या आमदारांना आमंत्रण दिले जात नाही. महानगरपालिकेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना बोलावले जाते पण आमदारांना का डावलले जाते अशा प्रश्न माझ्या मनात निर्माण झालेला आहे. म्हणून मी शासनाचे लक्ष वेधत आहे. आता जेव्हा अशी मिटींग होईल तेव्हा आपण विरोधी पक्षाच्या आमदारांना नक्कीच बोलवावे अशी विनती आहे.

अध्यक्ष महोदय, पॉईंट ऑफ प्रोसीजर असा आहे की, कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागावर चर्चा होत आहे पण मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत.

तालिका सभाध्यक्ष : संबंधित मंत्री महोदयांना बोलवण्याचा निरोप दिलेला आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती प्रणिती शिंदे यांच्या पहिल्या प्रश्नाबाबत माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माननीय जलसंपदा मंत्री महोदयांना तशा प्रकारची सूचना दिलेली असून ते तुम्हाला मिटींगला बोलावतील.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय जलसंपदा मंत्री यांनी मी तशी विनंती केलेली आहे पण वारंवार या गोष्टी घडत आहेत. म्हणून या निमित्ताने आपण अशा बैठकांकरिता विरोधी पक्षाच्या आमदारांच्या उपस्थितीबाबत स्पष्ट निर्देश देण्याची गरज आहे. राज्याच्या विकासामध्ये सर्वांचाच सहभाग आहे. त्या त्या भागातून जे लोकप्रतिनिधी निवडून गेलेले आहेत त्यांना तेथील जनतेचे प्रश्न माहिती असतात. लोकप्रतिनिधींना जनतेचे प्रश्न सोडवायचे आहेत. आमदार कोणत्या पक्षाचे आहेत हे न पाहता भविष्यात सर्व आमदारांना अशा बैठकांना बोलावण्यासाठी आपणाकडून निर्देश देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, कौशल्य विकास विभागाचे मंत्री व राज्यमंत्री सभागृहात दिसत नाहीत. आपण त्यांना लवकर बोलवा. निदान त्यांनी केलेला कौशल्य विकास आम्हाला पहावयास मिळेल

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

दिनांक 31 मार्च रोजी बजेट डिस्ट्रीब्युशन सिस्टीम बंद पडल्याबाबत

डॉ.जयप्रकाश मुंदडा : अध्यक्ष महोदय, दिनांक 31 मार्च रोजी दोन तास शासनाची बजेट डिस्ट्रीब्युशन सिस्टीम बंद झाली होती. मी दोन दिवसाच्या सुट्टीमध्ये मतदारसंघात गेलो होतो तेव्हा मी शनिवारी कलेक्टर ऑफीसमध्ये गेलो होतो. कोणत्या कामाला किती पैसे मिळाले याची विचारणा केल्यानंतर तेथे एवढेच सांगण्यात आले की, बीडीएस बंद झाल्यामुळे हा निधी वितरीत होऊ शकला नाही. म्हणून या बीडीएसद्वारे जेवढा निधी शासनाकडून वितरीत झालेला नाही, तो निधी शासन पुढील वर्षी ॲडीशनल म्हणून देणार आहे का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पातील समाजकल्याण विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर मी काही मुद्दे मांडणार आहे. माझ्या मतदारसंघात डॉ.बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटरचे काम सुरु आहे. जवळपास 100 कोटी खर्च करुन या सेंटरचे काम करण्यात आलेले आहे. याकरिता 37 कोटीचा पहिला हप्ता मिळाला होता व कामाला सुरुवात झालेली होती. परंतु आता 37 कोटीचे काम पूर्णत्वास जात आहे आणि या कामाकरिता दुसरा हप्ता मिळाला तर यामध्ये सातत्य राहिल. यामुळे अत्यंत महत्वाकांक्षी असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटरची इमारत पूर्णत्वास जाण्यास मदत होईल. म्हणून माझी माननीय समाजकल्याण मंत्री यांना विनंती आहे की, या सेंटरकरिता दुसरा हप्ता लवकरात लवकर देण्याची व्यवस्था करावी.

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये रमाई घरकुल योजना राबविण्यात येते. विशेषत: माझ्या मतदारसंघात ही योजना महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहे. मागील एक वर्षापासून या योजनेत ज्या घरांचे बांधकाम झाले पाहिजे होते, त्यामध्ये अक्षम्य दिरंगाई अधिकाऱ्यांकडून होताना दिसत आहे. तसेच जी घरे बांधण्यात येत आहेत ती अत्यंत निकृष्ट दर्जाची आहेत, त्यामुळे त्यामध्ये भ्रष्टाचार होताना दिसत आहे. रमाई घरकुल योजना अत्यंत गरीब लोकांकरिता राबविण्यात येते त्यामुळे या लोकांना त्रास होऊ नये, तसेच ही घरे टिकावू बनली पाहिजेत. तसेच यामध्ये भ्रष्टाचार होऊ नये अशी माझी शासनाला विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, अनुसूचित जाती नवबौध्द औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरिता माझ्या मतदारसंघात समाजकल्याण खात्यामार्फत इमारत बांधण्यात आलेली आहे. तेथे सुरुवातीस 13 ट्रेड देण्यात आलेले होते, यापैकी 3 ट्रेड तेथे सुरु झाले आहेत. 3 पैकी 2 ट्रेड व्यवस्थीत सुरु असून 1 नाममात्र आहे. माझी विनंती आहे की, नागपूर विभागात नवबौध्दांकरिता ही केवळ एकच औद्योगिक संस्था आहे. त्यामुळे ही प्रशिक्षण संस्था अत्यंत मजबूत व्हावी. आता आपण कौशल्य विकास देशभर व राज्यभर करीत आहोत. यातून गरिबांना विशेषत: मागासवर्गीयांना कौशल्य शिक्षण चांगल्या रितीने मिळाले पाहिजे अशी मी शासनाकडे मागणी करतो. कारण माझ्या मतदारसंघात सुशिक्षित बेरोजगार महिला व पुरुष मोठया संख्येने आहेत. त्यांना रोजगार न मिळाल्याने गंभीर परिस्थिती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

04-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) V-5

PNG/ ST/ AKN/ 14:40

डॉ.मिलींद माने .....

नागपूर शहरात व विशेषत: माझ्या मतदारसंघात निर्माण झालेली आहे. गरिबांची शिकलेली मुले हॉटेलमध्ये व्यवसाय करताना दिसत आहेत. मुलीसुध्दा हॉटेलमध्ये वेटरचे काम करताना दिसत आहेत. मुलींना रात्री-बेरात्री घरी यावे लागते व अवांछीत प्रकाराला बळी देखील पडावे लागते. म्हणून कौशल्य विकासाची केंद्रे मजबूत झाली पाहिजेत. नवबौध्दांसाठी असलेली औद्योगिक प्रशिक्षण संस्था जास्त सशक्त करण्यासाठी समाजकल्याण विभागाने विशेष लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

यानंतर W-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.मिलिंद माने.....

आंतरजातीय विवाह करणा-या जोडप्यांना खात्यातर्फे जे अनुदान देण्यात येते, त्याबाबतचे प्रस्ताव खात्याकडे येतात, त्यावेळी त्यांच्यावर वेळीच विचार करणे आवश्यक आहे. या प्रस्तावांना मान्यता देण्याकरिता खात्याच्या माध्यमातून विलंब होतो. कालांतराने या अनुदानाबाबत आंतरजातीय विवाह करणारे जोडपेही विसरुन जातात. अधिकारी याची दखल घेत नाही. यामधून आम्हाला कोठेतरी भ्रष्टाचाराचा गंध येत आहे. या संबंधीच्या प्रस्तावांचा वेळेतच निपटारा करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, शिष्यवृत्ती योजनांच्या संदर्भात शासनाच्या माध्यमातून एसआयटी गठित करण्यात आलेली आहे. बोगस विद्यार्थी व बोगस कॉलेजेसचा यामधून शोध घेऊन त्यांना योग्य ती शिक्षा होणे आवश्यक आहे. काही चांगल्या शाळा कॉलेजेसमधील बोगस नसलेल्या विद्यार्थ्यांनाही या एसआयटी चौकशीला सामोरे जावे लागते. यामध्ये पोलिसांचा हस्तक्षेप आहे. यामुळे अनेक प्रॉब्लेम्स होत आहेत. एका वर्षापूर्वी शिकणा-या विद्यार्थ्यांकडेही या एसआयटीमार्फत पोलीस घरोघरी चौकशी करिता जात आहेत. एका लग्न झालेल्या मुलीच्या सासरी पोलीस शिष्यवृत्ती योजनेची चौकशीचे नाव घेऊन गेले. त्या मुलीची विद्यार्थिनी म्हणून चौकशी करीत असताना शिष्यवृत्तीत झालेल्या घोटाळयाचे नाव घेतले जाते. यामुळे मुलगी सासरच्यांच्या नजरेस येते व तिला नाहक अत्याचाराला बळी पडावे लागते. या प्रकरणांमधील पोलिसांचा अवास्तव हस्तक्षेप कमी करण्यात यावा. यामधील खरे जे गुन्हेगार असतील, ज्यांनी कायदे मोडले असतील, शासनाच्या पैशांचा अपहार केला हे कागदोपत्री सिध्द झाल्यानंतरच पोलीस पाठवून त्याच्याविरुध्द एफआयआर दाखल करण्यात यावी. तरच ही चांगली बाब होईल.

अध्यक्ष महोदय, अनेक संस्था शिष्यवृत्तीचा फॉर्म विद्यार्थ्यांकडून घेत नाहीत. प्रक्रिया पूर्ण करीत नाहीत. यामुळे अधिकारी देखील विवंचनेमध्ये पडलेले आहेत. यासंदर्भात अधिका-यांनाही चौकशीला विनाकारण सामोरे जाण्याची भिती वाटत आहे. अनेक विद्यार्थ्यांचे यामुळे नुकसान होतांना दिसत आहे. जे खरे लाभार्थी विद्यार्थी आहेत, त्यांना नियमानुसार स्कॉलरशीप देण्याकरिता अधिका-यांना नियमानुसार काम करावे लागते. अधिका-यांना याकरिता जातीचा, उत्पन्नाचा दाखला व्हेरिफाय करण्याकरिता विलंब लागण्याची शक्यता आहे. एका विद्यार्थ्याचे अनेक शाळा कॉलेजेसमध्ये नाव आहे की नाही हे पाहणे देखील गरजेचे आहे. ...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.मिलिंद माने.....

समाजकल्याण खात्यातील अअिधिका-यांची संख्या कमी आहे. समाजकल्याण खात्यातील कर्मचा-यांकडे आधीच कमी काम आहे का ? त्यांच्याकडे काम जास्त असल्याने या कामांकरिता चार-पाच वर्षे व्हेरिफिकेशनची कामे होणार नाही. याकरिता विलंब लागण्याची शक्यता आहे. पर्यायाने लाभार्थी व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेनुसार शिष्यवृत्तीचा लाभ वेळेवर मिळणे आवश्यक आहे. माझ्या मतदारसंघामध्ये एकखाजगी औद्योगिक संस्था आहे. समाजकल्याण खात्यामार्फत किंवा उद्योग खात्यामार्फत अनेक महिलांना कौशल्य शिक्षण देण्यासाठी सरकारी जागा उपलब्ध आहे. ही जागा खाजगी औद्योगिक संस्थेची आहे. उप्पलवाडी औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे त्याचे नाव आहे. शासन ती जागा अधिग्रहित करुन त्यावर कौशल्य विकासाच्या अनेक गोष्टी सुरु करु शकते. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे.

अध्यक्ष महोदय, मागासवर्गीय वसतिगृहे आणि तेथील जेवण व राहणीमान अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे. काही ठिकाणी भेटी दिली असता मी स्वतः पाहिलेले आहे. विशेषतः आदिवासी विद्यार्थ्यांची तेथे गंभीर परिस्थिती आहे. तेथील विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना अन्याय व अत्याचाराला बळी पडावे लागते. हॉस्टेलमधून विद्यार्थिनींना गावकरी मुले उचलून पळवून नेतात. मुलींना संडासचा वापर बरोबर करता येत नाही म्हणून तो संडास बंद करुन घेतलेला आहे. रुममध्ये अंधार असतो. कोंदट वासामध्ये मुलींमध्ये राहावे लागते. निकृष्ट दर्जाचे गहू व तांदूळ जेवण बनविण्याकरिता वापरले जातात. यावर शासनाने फ्लाईंग स्क्वाड निर्माण करुन नियंत्रण ठेवले पाहिजे. मागासवर्गीय महिला बचत गटांना रोजगार योजना मिळण्याकरिता समाजकल्याण खात्याच्या माध्यमातून लक्ष दिले गेले तर बरे होईल. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिताव मागण्यांना विरोध करण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्प बनवित असताना काहीतरी उद्देश डोळ्यासमोर ठेवून तो बनविला जातो. त्या माध्यमातून माननीय अर्थमंत्री व संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांनी काही टार्गेट्स अचीव्ह करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, तशी अपेक्षा असते. सन्माननीय मंत्री श्री.राजकुमार बडोले आपण खाली बघत असता, कधी कधी वर बघत जा. आपण खाली बघत असल्यामुळे आम्हाला कळत नाही की, आपण आमच्या भाषणातील मुद्दयांची नोंद घेत आहात की, झोपलेला आहात. सन्माननीय मंत्री महोदय आपण अधुन मधून वर पाहत जा आम्हाला बरे वाटते.

अध्यक्ष महोदय, आपल्या राज्याची संकल्पना ही कल्याणकारी राज्याची आहे. कल्याणकारी राज्यामध्ये ज्यावेळी कल्याणाची व विकासाची गोष्ट केली जाते त्यावेळी केंद्र सरकारपासून ते राज्यसरकारपर्यंत एकच प्रमुख गोष्ट पाहिली जाते, ती म्हणजे प्रगती झाली की नाही ? प्रगती झाली की नाही हे मानव विकास निर्देशांक यावरुन तपासले जाते. मानव विकास निर्देशांक निश्चित करण्याकरिता तीन गोष्टी मेजर केल्या जातात. यामध्ये आरोग्यदायी दीर्घायुष्य, ज्ञान, दर्जेदार राहणीमान या तीन गोष्टींचा समावेश होतो. या माध्यमातून कोणता भाग प्रगत आहे, कोणता भाग अप्रगत आहे, याकरिता उक्त तीन गोष्टींचे पॅरामीटर्स लावले जातात. आपल्या देशात आणि राज्यात ज्याप्रमाणे बजेट सादर केले जाते, त्यावेळी देशाची व राज्याची योजना ठरते. पंचवार्षिक व वार्षिक योजना ठरत असते. या सर्व योजनांमधून अर्थमंत्री महोदय अर्थसंकल्प सादर करतात. गेल्या वर्षीचा नियतव्यय किती होता ? सुधारित अंदाज किती झालेला आहे ? प्रत्यक्षात खर्च किती झालेला आहे ? या सर्व गोष्टींचा अंदाज घेऊन आम्ही तुमच्या कामांचे मुल्यमापन करण्याच्या ऐवजी आपणच आपल्या सर्व विभागांच्या कामांचे मुल्यमापन केले पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्या प्रा. वर्षा गायकवाड यांनी केलेला आहे आणि आपण सर्वांनी ही गोष्ट समजून घेण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, सन 2014-2015 मध्ये आपल्या विभागाला 6044 कोटी रुपयांचा नियतव्यय मिळाला होता. आपल्याला देशात आणि राज्यात एससी आणि एसटी वर्गातील लोकसंख्येच्या आधारे बजेटचे अलॉकेशन केले जाते. त्यामुळे कोणी आपल्यावर मेहरबानी करीत नाही. कदाचित केंद्र किंवा राज्याने अशा प्रकारची भूमिका घेतली नसती तर आपल्या विभागाला नियतव्यय मिळाला नसता. आपल्या विभागाला जो नियतव्यय मिळतो, तो खर्च योग्य कारणांसाठी होतो की नाही, हे पाहण्याची गरज आहे. सन 2014-2015 मध्ये आपल्या विभागाला 6044 कोटी रुपयांचा नियतव्यय मिळाला होता. त्यापैकी 3583 कोटी रुपये खर्च केले आणि 2460 कोटी रुपये आपल्याला विभागाला खर्च करता आले नाही. विभागाने केवळ 59 टक्के खर्च केलेला आहे. एका बाजूला निधी मिळत नाही म्हणून आपण सर्वजण ओरडत असतो आणि दुसऱ्या बाजूला मिळालेला निधी खर्च केला जात नसेल तर ते अतिशय दुर्दैवी आहे. सन 2014-2015 मध्ये जी परिस्थिती होती तिच परिस्थिती सन 2015-2016 मध्ये झालेली आहे. सन 2015-2016 मध्ये आपल्या विभागाला 6490 कोटी रुपयांचा नियतव्यय मिळाला होता आणि त्यापैकी फक्त 2017 कोटी रुपचे खर्च झाले आहेत. म्हणजे फक्त 31 टक्केच खर्च झालेला आहे. जी अवस्था सामाजिक न्याय विभागाची आहे, तिच अवस्था आदिवासी कल्याण विभागाची आहे. आज कामकाजपत्रिकेवर आदिवासी विभागाच्या मागण्या नसतील तरी मी बोलणार आहे. सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात सर्वांना न्याय देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, आज सत्ताधारी पक्षाने मेक इन इंडिया आणि स्मार्ट सिटीच्या संदर्भातील घोषणा केलेल्या आहेत. समाजातील शेवटचा उपेक्षित घटक, समाजातील अडचणीमध्ये असलेल्या लोकांना, डोंगर कपाऱ्यामध्ये राहणारा माणूस, गावात राहणाऱ्या लोकांना न्याय मिळवून द्यावयाचा असेल तर आपल्या विभागाने जास्त काळजी आणि जबाबदारी घेण्याची गरज आहे. परंतु, मला या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

ठिकाणी दुर्दैवाने सांगावे लागत आहे की, आपल्या विभागाकडून अशा लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी योग्य ती काळजी घेतली जात नाही. म्हणून मी सुरुवातीलाच अनुदानाच्या मागण्यांना विरोध केलेला होता. आपल्या विभागाला उपलब्ध करुन देण्यात आलेली तरतूद ही 100 टक्के खर्च करणे किंवा अतिरिक्त पुरवणी मागणी करुन खर्च करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विभागासाठी सन 2014-2015 मध्ये 4814 कोटी रुपयांचा नियतव्यय मिळाला होता. परंतु, आदिवासी विभागाने 4032 कोटी रुपये खर्च केले आहेत. म्हणजे 83 टक्के खर्च केलेला आहे. आदिवासी विभागासाठी सन 2015-2016 मध्ये 5170 कोटी रुपयांचा नियतव्यय मिळाला होता. यापैकी केवळ 1718 कोटी रुपयांचा खर्च केलेला आहे. गेल्या वर्षभरात आदिवासी कल्याण विभागासाठी केवळ 33 टक्के खर्च झालेला आहे. आदिवासी बांधव मराठवाडा, विदर्भ, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या संख्येने राहत आहेत. अशा सर्व आदिवासी बांधवांवर अन्याय करण्याचे काम दोन्ही बाजूंकडून झालेले आहे. सन 2016-2017 मध्ये 6725 कोटी रुपयांचा नियतव्यय मिळाला आहे. यामध्ये जिल्हा योजनासाठी 2400 कोटी रुपये तर राज्यस्तरीय योजनांसाठी 4325 कोटी रुपये मिळाले आहेत. जिल्हास्तरीय योजनांमध्ये डीपीडीसी आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून खर्च केला जातो. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून खर्च केला जातो. मंत्री महोदयांनी ही सर्व आकडेवारी पाहिल्यानंतर असे लक्षात येईल की, जिल्हा स्तरीय योजनांसाठी जो निधी मिळतो, तो मोठ्या प्रमाणावर खर्च केला जातो. परंतु, राज्यस्तरीय योजनांसाठी जो निधी मिळतो, तो निधी मोठ्या प्रमाणावर खर्च होत नाही. याची कारणे मंत्री महोदयांनी तपासून घेण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, आज मंत्रालय, डायरेक्टरेट आणि एजन्सीज आहेत. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर विलंब होत असतो. सन 2014-2015 मध्ये राज्यस्तरीय योजनांवर फक्त 42 टक्के खर्च झालेला आहे आणि जिल्हास्तरीय योजनांवर 93 टक्के खर्च झालेला आहे. सन 2015-2016 मध्ये

....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

राज्यस्तरीय योजनांवर फक्त 18 टक्के खर्च झालेला आहे आणि जिल्हास्तरीय योजनांवर 53 टक्के खर्च झालेला आहे. याचा अर्थ 4090 कोटी रुपयांच्या बजेटपैकी केवळ 744 कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे. मग अशा वेळी मागासलेल्या समाजाला कसा न्याय मिळणार असा देखील प्रश्न निर्माण झालेला आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी कृषी विभागाचे बजेट सादर केलेले आहे. माझ्या हातात ग्रीन बुक आहे. सदर पुस्तकात सर्व विभागांसाठी कृषी आणि संलग्न सेवांसाठी 5412 कोटी रुपये दिल्याचा उल्लेख केलेला आहे. जनरल बजेटनुसार पुढील कार्यवाही केली जाणार आहे. आज कार्यक्रम अंदाजपत्रक आणि मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना, अर्थसंकल्पातील तरतूदी तपासल्यानंतर आपल्या विभागातील सर्व योजनांचा समावेश केल्याचे दिसून येत आहे. माझी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, सदरहू दोन्ही पुस्तकातील सर्व योजनांचा अभ्यास करुन पुढील योग्य ती कार्यवाही करण्याची गरज आहे. योजना खूप आहेत. पण या सर्व योजना शेवटच्या माणसांपर्यंत पोहचत नाहीत. त्यामुळे खऱ्या लाभार्थ्यांना न्याय मिळत नाही.

अध्यक्ष महोदय, सन 2015-2016 मध्ये उद्योग, खनिज हेड अंतर्गत 30 कोटी 3 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. सद्यःस्थितीत यामधील एक रुपयाही खर्च झालेला नाही. याकडे कोणाचेही लक्ष नाही.

अध्यक्ष महोदय, सन 2015-2016 मध्ये सामान्य आणि आर्थिक सेवा योजनेंतर्गत एकाही रुपयांची तरतूद केलेली नाही. या वर्षी या विभागासाठी किती तरतूद केलेली आहे, याचे उत्तर मला मंत्री महोदयांनी देण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, मी 25 ते 26 वर्षापासून सभागृहात काम करीत आहेत. कोणतीही चर्चा झाली तर ती मतदारसंघापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला जातो. मतदारसंघातून निवडून आल्यानंतर सभागृहात लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण सर्वजण काम करीत असतो. अशा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

वेळी आपण राज्याचे आमदार असतो. अशा वेळी सर्वांनी राज्याचा एकत्रित विचार केला पाहिजे. सर्व सन्माननीय सदस्यांनी राज्याच्या विकासासाठी एकत्रितपणे भूमिका मांडण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, 1 कोटी 32 लाख एवढी अनुसूचित जातीची लोकसंख्या आहे आणि अनुसूचित जमातीची लोकसंख्या ही 5 कोटींच्या आसपास आहे. उर्वरित पॅरामिटर्स बघत असताना एखादे स्मारक, पुतळा आणि लोककल्याणाच्या योजना केल्या जातील असे सांगितले जाते. ह्युमन डेव्हलपमेंट इंडेक्समध्ये गरोदर मातांचे मृत्येच प्रमाण किती आहे, हे सुध्दा आपण सर्वांनी तपासून घेतले पाहिजे.

Y-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील....

बेरोजगारांचे उच्चाटन करण्यासाठी आपल्या विभागाच्या कोणत्या योजना आहेत, यासंदर्भात शासनाची भूमिका स्पष्ट करण्याची गरज आहे. मानवी विकास निर्देशांकात महाराष्ट्र राज्याचे स्थान हे देशामध्ये सहाव्या क्रमांकावर आहे. राज्यात साक्षरतेचे प्रमाण 82 टक्के असून त्यामध्ये 79 टक्के प्रमाण हे अनुसूचित जाती या प्रवर्गापर्यंत पोहोचलेले आहे. आपल्या विभागाची तरतूद खर्च न झाल्यामुळे त्याचे चांगले परिणाम आपल्याला दिसून येत नाहीत, त्यामुळे हे सरकार या समाजाला न्याय देण्यामध्ये अपयशी ठरलेले आहे. आपल्या विभागात सुधारणा करण्याच्यादृष्टीने मंत्री महोदयांनी काम केले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, अनुसूचित जातीच्या प्रवर्गावर अत्याचाराचे व गुन्ह्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. एका बाजूला आपण राज्याच्या विकासासाठी छोट्या मोठ्या गोष्टींसाठी तरतूद करतो, परंतु दुसऱ्या बाजूला शिक्षणासाठी तरतूद करतो. शिक्षणासाठी तरतूद हा महत्वाचा विषय आहे. आज ज्या आश्रमशाळा काढलेल्या आहेत, जी वसतिगृहे काढलेली आहेत, तेथे कोणत्या दर्जाचे जीवन विद्यार्थी/विद्यार्थीनी जगत आहेत, त्याचा मंत्री महोदयांनी अभ्यास केला पाहिजे. समाजकल्याण खात्याच्या अंतर्गत शिक्षकांच्या किती जागा रिक्त आहेत, किती नॉन टिचींगच्या जागा रिक्त आहेत, वसतिगृहातील विद्यार्थ्यांना कोणत्या दर्जाचे अन्न दिले जाते, या गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे. आदिवासी विभागातंर्गत विद्यार्थ्यांना साधे स्वेटर देता आले नाही. खरोखरच आपण चांगल्या दृष्टीकोनातून त्यांच्याकडे बघणे आवश्यक आहे. त्या विद्यार्थ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न आपण करतो आहे काय, हा खरा प्रश्न आहे. अनुसूचित आयोगाकडे 1057 प्रकरणे प्रलंबित आहेत, याबाबतीत शासनाने प्रयत्न करावेत. जो माणूस न्याय मागतो, कोर्टात वेगवेगळ्या केसेस करतो, त्या माणसाच्या राज्य सरकारच्या किंवा केंद्र सरकारच्या अखत्यारित असलेल्या आयोगाकडे एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित रहात असतील तर यासंदर्भात विशेष मोहिम हाती घेऊन या सर्व मंडळींना न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, आपण जेव्हा सामाजिक न्याय विभागाचा विचार करतो तेव्हा एका विशिष्ट वर्तूळापुरतीच चर्चा करतो. सामाजिक न्याय विभागात, समाजकल्याण विभाग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, ओबीसी, एसबीसी तसेच अपंग या सर्व प्रवर्गातील प्रश्नांचा विचार झाला पाहिजे, परंतु तसे केले जात नाही. आपण आदिवासी विभागाची चर्चा करतो, तेव्हा त्यांच्या विभागातील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील....

लोकांचीच चर्चा करतो, परंतु ओटीएसपी विभागातील लोकांची चर्चा आपण करीत नाही. दुर्दैवाने आपण आपली सर्व दैवते लहान करुन टाकली आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सर्व जगाचे होते. भारतरत्न पुरस्कार मिळालेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांना आपण एवढे लहान करण्याचा प्रयत्न करतो. त्यांचा आदर्श, विचार बाजूला राहतात. त्यामध्ये आमचा स्वार्थ, हेतू पुढे येतो. सर्वांकडे शेती असेलच असेही नाही. सर्वांना पाणी लिफ्ट करता येईल, असे नाही. सर्वच मंडळींचा ऊस कारखान्यात जाईल असेही नाही. सर्वच जण चांगले पिक घेतील असेी नाही. जो समाज वर्षानुवर्षे अंध:कारामध्ये पिचलेला, अडचणींमध्ये आहे, त्याच्या दहा पिढ्यांमध्ये कोणी शिक्षण घेतले नाही. अशा कुटुंबातील मुला/मुलींना चांगले शिक्षण कसे मिळेल, ते पुढे कसे जातील, याचा तरी विचार केला पाहिजे. मी केवळ बोलत नाही. मी या राज्याचा शिक्षण मंत्री होतो. माझ्याकडे उच्च व तंत्र शिक्षण खात्याचा चार्ज होता. या राज्यामध्ये इंजिनिअर्स, पॉलिटेक्निक कॉलेजेसमध्ये आम्ही जागा वाढविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर अशी परिस्थिती पुढे आली की, विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो, परंतु त्यांच्याकडे फी भरायला पैसे नाहीत. त्यावेळी आम्ही राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय घेतला आणि राज्यातील मागासवर्गीय आणि आदिवासी विद्यार्थ्यांची एमबीए, मेडिकल, इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निक तसेच कोठल्याही व्यावसायिक अभ्यासक्रमाची तो खाजगी कॉलेजमध्ये जरी शिकत असला तरी चालेल, परंतु त्याची 100 टक्के फी राज्य सरकारच्या तिजोरीतून भरत होतो. आज मला मंत्री पदावरुन बाजूला होऊन सहा वर्षे झाली आहेत, परंतु अजूनही ती सवलत सुरु आहे. त्याच्या कुटुंबातले कोणी इंजिनिअर्स, डॉक्टर्स झाले नव्हते, त्यांना राज्य सरकाराने ही संधी दिली आहे. तेव्हा ही संधी दिली नसती तर कदाचित 500 ते 100 वर्षे त्याला इतरांच्या बरोबर आणण्यासाठी गेले असते. आता ते विद्यार्थी शिकण्यासाठी जातात, तेव्हा त्यांची रिऐंबर्समेटची फी समाजकल्याण संचालनालयाकडून मिळण्यामध्ये अनेक प्रकारच्या अडचणी येतात. आम्ही सर्वजण संस्था चालकांना पिंजऱ्यात उभे करतो आणि त्यांना सांगतो की, त्यांची फी घेऊ नका. सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे तुम्ही पगार द्या. बाकीच्या काय सवलती पाहिजे त्या एआयसीटीआयकडून सांगण्यात येते. आणखी त्यामध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील....

काय सुधारणा करायला पाहिजे, हे विद्यापीठ सांगते. परंतु चार चार वर्षे रिऐंबर्समेंटची फी संस्था चालकांना मिळत नसेल, त्यांना समाजकल्याण खात्यामध्ये जाऊन काय काय करावे लागते, हे मी या ठिकाणी जाहिरपणे बोलणार नाही. आज ते त्रस्त झालेले लोक आहेत. ही सरकारची कोठेतरी जबाबदारी आहे. सरकारने संस्था वाढविल्या नाहीत, पण या सर्व खाजगी संस्थांवर ही सर्व जबाबदारी टाकली. शासनाने निर्णय घेऊन टाकावा की, हे काम खाजगी संस्थांना द्यावयाचे किंवा नाही? परंतु ते करता आले नाही तर या विद्यार्थ्यांची गती कुंठित झाल्याशिवाय राहणार नाही. शासनाने या दोन विभागाकडे कमी पाहिले तरी चालेल, परंतु आदिवासी विभागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ते ज्या शिक्षण संस्थेत शिकतात, तेथिल स्थिती चांगली असली पाहिजे. एवढेच नव्हे तर तेथिल वातावरण चांगले पहिजे. तेथे सुधारणा झाल्या पाहिजेत. अशा प्रकारच्या सुधारणा झाल्यानंतर मग बाकीच्या काही गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे. बाकीच्या बोलण्यासारख्या बऱ्याच गोष्टी आहेत. आर्थिक उन्नतीचे बरेच कार्यक्रम आहेत. माननीय राज्य मंत्री श्री.दिलीप कांबळे आणि मंत्री महोदय श्री.राजकुमार बडोळे आपण एकदा या सर्व योजनांचा आढावा घ्यावा आण त्यानंतर कोणती योजना चालू ठेवावी कोणती योजना बंद करायची, याचा विचार करावा. एजेंट लोक किती योजनांचा फायदा घेतात. खऱ्या अर्थाने सर्वसामान्यापर्यंत किती योजना जाऊन पोहोचतात, याचा अभ्यास केल्यानंतर यातील किती योजना चालू ठेवायच्या, किती बंद ठेवायच्या याचा निर्णय घेतला तर त्याचा फायदा निश्चितच या विभागाचे कामकाज करण्यामध्ये होईल. अशा प्रकारचे काम आपल्या हातून घडावे, अशी मी अपेक्षा करतो. सामाजिक न्याय विभागाने बाकीच्या सर्व विभागांना बरोबर घेऊन गेलेच पाहिजे. आज जो संघर्ष चालू आहे. काही वर्षापूर्वी आम्ही पाकिस्तान, चीन या देशाबरोबर आम्ही लढतो होतो, परंतु आता आपापसात, राज्यात लढायला लागलो आहे. आता राज्य बाजूला राहिले असून विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, कोकण असे एकमेकांच्या विरोधात लढायला लागलो आहे.

यानंतर Z-1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

आता ही लढाई तेथेच थांबणार नाही तर त्याच्या पुढे जिल्ह्या-जिल्ह्यापर्यंत लढाई जाणार आहे. पाण्याचा, विकासाचा नाही तर अजून कशाचाही प्रश्श्न असू दे शेवटी तालुक्यापर्यंत, गावा व समाजापर्यंत ही लढाई जाऊन पोहोचणार आहे. ही लढाई एवढी वाढण्यापूर्वी जो पिचलेला मागासलेला माणूस आहे, आम्हालाही हे मान्य आहे की, त्यांना आरक्षण दिलेच पाहिजे. याबाबत आम्ही कोणतीही वेगळी भूमिका मान्य करणार नाही, त्यांना न्याय दिला पाहिजे. त्या न्यायामध्ये तुम्ही बाकीच्या गोष्टी म्हणजे आपल्या योजना काय आहेत हे पाहिले तर, त्यांना कोंबड्या देणे, शेरडू देणे, घोंगडी देणे या योजनांमुळे माणसे मोठी होणार नाहीत, कुटुंबे सुधारणार नाहीत. कुटुंब सुधारावयाची असतील तर त्यांना चांगल्या आरोग्य सुविधा, चांगले पाणी प्यायला दिले पाहिजे. शक्य झाले तर, त्यांना शेतीमध्ये मदत केली पाहिजे. त्यांना चांगले शिक्षण दिले पाहिजे, शिक्षण मिळाले तर त्यांना नोकरीची हमी दिली पाहिजे. या सर्व गोष्टी केल्या तरच तुम्हाला तुमच्या विभागाला न्याय देता येईल नाही तर मग दरवर्षी प्रमाणे आले बजेट, चर्चा झाली, तुम्ही उत्तर दिले, आम्ही घरी गेलो आणि मग खाली मात्र जो सावळा गोंधळ सुरु आहे तो तसाच चालू आहे असे दिसेल.

कोणत्याही प्रकारच्या राजकारणामध्ये, कुठल्याही प्रकारच्या आरोपामध्ये, कुठल्याही प्रकारचा दोष न लावता फक्त मला असे वाटते की, यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टिकोनातून काय काय करता येईल ते आपण आपल्या सर्व सहकाऱ्यांकडून समजून घेऊन यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करावा.

केवळ मागच्या वर्षीच्या तरतुदी तुम्ही खर्च केलेल्या नसल्याने या वर्षीचे तुमचे हे टार्गेट पाहिजे. तरतुदी खर्च होतात. सन्माननीय सदस्य डॉ. सुनील देशमुख हे अर्थ राज्यमंत्री होते त्यांना माहीत आहे की, शेवटच्या दिवशी 31 मार्चला पैसे कसे खर्च होतात. मी देखील अर्थमंत्री होतो. वर्षभरात हा पैसा योग्य पध्दतीने कसा खर्च होईल, याच्या प्रायॉरिटीज एकदा ठरवाव्यात. कोणत्या गोष्टीला पहिले प्राधान्य द्यायचे, कोणत्या गोष्टीला दुसरे प्राधान्य द्यायचे असे ठरवून त्याप्रमाणे जर तुम्ही हे पैसे खर्च केले तर, आपल्याला निश्चितपणे सामान्य माणसाला न्याय देता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील, छत्रपती शाहू महाराजांच्या स्वप्नातील सामाजिक न्यायाची संकल्पना हीच आहे. जोपर्यंत तुम्ही त्या माणसाचे आर्थिक जीवन सुखाचे, आनंदाचे करणार नाही,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

तोपर्यंत समाजातील ही अशांतता, अस्वस्थता थांबणार नाही. ती थांबवायची असेल, खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचा विकास करावयाचा असेल तर, केवळ मुंबई, पुण्याकडे पाहून चालणार नाही, केवळ उद्योगपतींकडे, केवळ व्यापाऱ्यांकडे, केवळ बागायतदार शेतकऱ्यांकडे पाहून चालणार नाही तर हा जो वंचित व शेवटचा माणूस आहे त्याच्याकडे जास्त लक्ष देण्याची आवश्यकता आहे. ते लक्ष तम्ही द्यावे, अशाप्रकारची मी विनंती करतो. तुम्ही गेल्या वर्षी खर्च केला नाही, म्हणून तुमच्या मागण्यांना विरोध करून मी थांबतो, जय हिंद. जय महाराष्ट्र.

.....

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये बोलण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक वर्षांचा इंदू मिलचा प्रश्न व त्यासाठी अतिशय चांगल्या पध्दतीने घेतलेला निर्णय, जपान मधील किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व प्रक्रियेतील जी जी घटनास्थळे असतील, त्या सर्वांबाबत या शासनाने खूप चांगल्या पध्दतीने अतिशय प्रगतीशील अशा पध्दतीची भूमिका घेऊन एक ठोस अशा पध्दतीचे काम करण्याचे आणि संपूर्ण मागासवर्गीय समाजाला खूप चांगल्या पध्दतीने एक दिशा देण्याचे जे काम केले आहे, त्याबद्दल प्रथम मी शासनाच्या या यंत्रणेचे अभिनंदन करतो. खूप वर्षांपासून या सर्व विषयावर चर्चा होत होती परंतु प्रश्न सुटत नव्हते. प्रश्न सोडवयाचे आणि ते कशा पध्दतीने सोडवयाचे हे या सरकारकडून शिकावे अशा पध्दतीचे चित्र या सरकारने तयार केले, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तेवढे कमी आहे.

अध्यक्ष महोदय, माणगावच्या परिषदेचासुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनक्रमाशी खूप मोठा संबध आहे. या विधानसभेमध्ये या विषयावर चर्चा झाली होती. कोल्हापूर जिल्ह्यातील माणगाव परिषदेला एक ऐतिहासिक महत्व असल्याने तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक स्मारक व्हावे, त्या परिसराचा विकास व्हावा याकरिता या विषयावर एक लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती. या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून तत्कालीन समाजकल्याण मंत्री आणि शासनाने 10 कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करुन देण्याची घोषणाही केली. मागासवर्गीय बांधवांच्या अपेक्षा, भूमिका व भावनांना हरताळ फासून आजपर्यंत तेथे काही झाले नाही. खूप मोठे काम आपण करण्यास निघालो आहोत, अशावेळेस आमच्या कोल्हापूर जिल्ह्यातील तमाम लोकांच्या, मागासवर्गीय बांधवांच्या मनात असणाऱ्या अपेक्षा, भूमिका, भावना याच्याशी सुसंगत असा निर्णय आपण घ्यावा. माणगाव परिषद जी अत्यंत ऐतिहासिक आहे, तेथे 10 कोटी रुपयांचा निधी देण्याबाबत पूर्वीच्या शासनाने घेतलेला निर्णय आपण मान्य करावा. कारण पूर्वीची बरीचशी कामे आता आपण करीत आहोत असे म्हणण्यास काही हरकत नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य दिलीप वळसे-पाटील यांनी मघाशी दोन मुद्दे सांगितले आहेत, त्या मुद्यांशी सुसंगत अशापध्दतीची माझी भूमिका व भावना आहेत. मला प्रश्न एवढाच पडतो की सन्माननीय सदस्य दिलीप वळसे-पाटील यांनी हे मागच्या वेळेसही सरकारला ठासून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

04-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) Z-4

SSG/ ST/ AKN/ AKN/ ST/ 15:20

श्री. प्रकाश आबिटकर ....

सांगितले असते तर खूप काही चांगले झाले असते. कारण बऱ्याचशा स्कीम्स अशा आहेत की, आपण त्या कशासाठी करीत आहोत, हा प्रश्न आहे. मी बजेटचे पुस्तक वाचले आहे. मी प्रथमच येथे पाहिले आहे आहे की, मागासवर्गीय महिलांना विकासासाठी 500 रुपये इतके अनुदान आहे. 500 रुपये इतक्या अनुदानात त्यांनी त्यांचा उद्योग उभा करायचा आहे. मंत्री महोदय आपण एकदा संबंधित यंत्रणेतील आपल्या सचिवांना बोलवा, त्यांच्या घरातील एखाद्याला 500 रुपये द्या आणि एकदा व्यवसायाला सुरुवात करण्यास सांगा. प्रश्न असा येतो की, एखादी योजना करताना पाट्या टाकण्याचे पूर्वीचे काम पुढे नेण्यापेक्षा ज्या योजना अत्यंत आवश्यक असतील त्याकरिता निधी दिला पाहिजे. ज्या योजना थांबवाव्या लागतील, त्या थांबविल्या पाहिजेत. तरच या संपूर्ण प्रक्रियेला गती देण्याचे काम करीत आहोत, असे चित्र दिसेल. माझी विनंती आहे की, अशा बऱ्याचशा योजना आहेत की, ज्यांचा काही उपयोग नाही. या योजनांच्या बाबतीत कागदोपत्री केवळ पाट्या टाकण्याचे काम करणे म्हणजे फक्त एक प्रोसिजर ऑफ वर्किंग आहे. ते तत्काळ थांबवूया आणि अतिशय भरीव, ठोस व या समाजाला दिशा देण्यासारखे काम करण्याच्या दृष्टिकोनातून आपण पुढे गेलो तरच या सर्व गोष्टींना खूप न्याय दिल्यासारखे होईल. अशा पध्दतीचे काम करण्यासाठी आपण पुढे जाऊया, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, अनुदानीत वसतिगृहे आणि मागासवर्गीय शासकीय वसतिगृहे याबाबत सांगावयाचे झाले तर परवा माझ्या मतदारसंघातील राधानगरी येथील वसतिगृहाला भेट देण्याबाबत शासकीय रेक्टरने मला आग्रह केला. मला तेथील मुले भेटली. तेथील सर्व सुविधा पाहिल्यानंतर मला असे वाटले की, अरे हे तर एखाद्या चांगल्या खाजगी टेक्नीकल इन्स्टिट्युटपेक्षाही चांगले असे आपले वसतिगृह आहे. खूप चांगल्या पध्दतीने आपण योजना घेतल्या. त्यांनी मला तेथे बोलावण्याचे कारण मला समजले की, तेथे सर्व चांगले आहे परंतु तेथे गरम पाण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे मुलांची पावसाळ्याच्या दिवसात खूप गैरसोय होते. ते माझ्याकडे कालपर्यंत माझ्या आमदार निधीतून त्याकरिता पैसे देण्याबाबत आग्रह करीत होते. आमदार निधीतून त्याकरिता निधी देण्याची प्रोव्हिजन नाही. आमदारांच्या स्थानिक विकास निधीत याबाबतची तरतूद नाही. खूप चांगले काम तेथे केले आहे. आपण खूप चांगल्या पध्दतीच्या योजना आणल्या आहेत, त्यामध्ये ही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

04-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) Z-5

SSG/ ST/ AKN/ AKN/ ST/ 15:20

श्री. प्रकाश आबिटकर ....

सुध्दा एक सूचना घ्यावी व त्याप्रमाणे केले तर, ती छोटीशी परंतु, खूप महत्त्वाची अशी गोष्ट आहे.

अध्यक्ष महोदय, तेथे अवतीभोवती खाजगी संस्थांमार्फत चालविली जाणारी जी अनुदानीत वसतिगृहे आहेत, त्यांचे सर्व प्रश्न घेऊन आम्ही बऱ्याच वेळेस भांडत असतो. तेथे रेक्टरपासून, पहारेकरी, चौकीदार, स्वयंपाकी या लोकांना 4 ते 5 हजार एवढा अत्यंत नाममात्र पगार दिला जातो. खरे म्हणजे त्या लोकांची खूप मागणी आहे की, आमचा कोणत्या तरी वेतन आयोगात समावेश करावा. पाचवा व सहावा वेतन आयोग राहू द्या परंतु, किमान आम्हाला वेतनावर घ्या, काही तरी करा, आम्हाला स्थिरता द्या. आपण अनेक गोष्टींना न्याय देत आहोत. या आमच्या सर्व अनुदानीत खाजगी स्वयंसेवी संस्थांच्यावतीने चालविण्यात येणाऱ्या हॉस्टेल मधील सर्वांबाबत त्याच पध्दतीची भूमिका घ्यावी. त्यांना स्थिरता देण्याच्या दृष्टिकोनातून वेतनावर घेण्याची त्यांची जी मागणी आहे, त्या मागणीस आपण न्याय दिला तर खूप चांगल्या पध्दतीची गती आणि खूप चांगल्या पध्दतीची प्रगती करण्यासाठी महत्त्वपूर्ण अशाप्रकारचे काम होईल.

मंत्री महोदय, आम्ही महामंडळाच्या बाबतीतील लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याचे उत्तरसुध्दा आपण दिले होते. उत्तर देताना आपण ज्या पध्दतीची भूमिका आणि भावना मांडली त्यावरून एकच गोष्ट लक्षात येते की, एजंटांचा सुळसुळाट झाल्यानंतर एखाद्या चांगल्या योजनेचाही कसा बट्टयाबोळ होऊ शकतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे ही सर्व महामंडळे आहेत. आज आमच्या कोल्हापूर जिल्ह्यात आम्ही पाहतो की, तेथे संपूर्ण परिसरात सर्व एजंटच फिरत असतात. त्या सर्व एजंटपेक्षाही या सर्व यंत्रणेला योग्य पध्दतीने पारदर्शक काम करून पात्र व योग्य लाभार्थ्यांना न्याय देण्याच्या दृष्टिकोनातून अधिकाधिक चांगल्या पध्दतीने काम करणाच्या सक्तीच्या सूचना सर्व महामंडळाच्या लोकांना द्याव्यात. त्या दिल्या तर त्याचा निश्चितपणे चांगला उपयोग होईल.

माझी दुसरी विनंती अशी आहे की, या सर्वांबरोबर शैक्षणिक कर्जाची जी योजना आहे, तिचा निधी आपण जितका वाढवाल तितका कमी आहे. कारण आता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, डिग्री, डिप्लोमाचे कोर्सेस आमची मुले शिकू लागली आहेत. मार्केटमधील सद्यःस्थितीमुळे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आज बँका या लोकांना कर्ज देण्यास थोडी टाळाटाळ करतात. अशावेळेस जर ही योजना आपण अधिक चांगल्या पध्दतीने चालविली तर, अनेक समाजातील मागासवर्गीय मुलांना खूप चांगल्या

...6/-

श्री. प्रकाश आबिटकर ....

पध्दतीची संधी मिळेल. त्यासाठी टार्गेट वाढवावे. टार्गेट वाढविल्यास या योजनेचा खूप चांगल्या पध्दतीने उपयोग होईल त्या दृष्टिकोनातून आपण निर्णय घ्यावा, अशी मी विनंती करतो.

AA-1/...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश आबिटकर.....

ग्रामपंचायतीपासून जिल्हापरिषद, पंचायत समित्यांमध्ये देखील आपण जे टारगेट देतो किंवा बजेटमध्ये जी तरतूद करतो, त्या प्रोव्हीजन प्रमाणे काम करण्यापेक्षा फक्त कागदोपत्री जे काम होते, त्या कामापेक्षा सुद्धा या लोकांना योग्य सूचना दिल्या तर निश्चितपणाने याचे काम चांगले होऊ शकेल.

अध्यक्ष महोदय, आमच्याकडे एक चांगली योजना आहे. परंतु ती आम्हाला माहितच नाही. मी डीपीडीसीमध्ये देखील माननीय पालकमंत्री यांच्यासमोर आपल्या विभागाला विचारले होते. पॉवर ट्रीलरसाठी आपण 60 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. एवढी तरतूद केली परंतु कितीतरी सन्माननीय सदस्यांना किंवा आम्हाला याबाबतची माहिती नाही. मी डिपीडीसीमध्ये सांगितले. तेथील समाजकल्याण विभागाचा अधिकारी आणि तेथील एजंट यांचे नाते असते. कुठला तरी एक बचतगट काढला जातो आणि त्याच्या माध्यमातून त्या, त्या ठिकाणी ती कामे होतात. माझी विनंती आहे. या सर्व योजनांबाबतची माहिती पुस्तिका काढावी किंवा यासंदर्भात जनजागृती करण्यात यावी. या माध्यमातून पात्र आणि योग्य पद्धतीच्या अनेक लाभार्थ्यांना योजनेचा उपयोग होणे आवश्यक आहे. या योजनेचा उपयोग झाल्यास भविष्यात खूप चांगल्या पद्धतीने शासनाला मागासवर्गीय समाजासाठी जी अपेक्षित प्रगती व्हावी, असे वाटते ती होण्याच्या दृष्टीने हा अत्यंत चांगला उपक्रम ठरेल. या उपक्रमासाठी आपण अधिकाधिक चांगल्या पद्धतीने काम करणाऱ्या सर्व यंत्रणेला देखील आपण पुढे न्यावे.

अध्यक्ष महोदय, आपण जिल्हा परिषदेला चांगली योजना दिलेली आहे. बैलगाडी, ठीबक सिंचन इत्यादी योजना आहेत. परंतु या योजनेसाठी असलेले बजेट खूप वर्षापासून विशेष घटकाला ठराविक नॉर्म्सचे दिलेले असून त्याच्या पुढे आपण गेलेलो नाही. माझी विनंती आहे की, त्याची आपण सर्वांनी सद्यस्थिती बघावी. आज बैलजोडीला किती रुपये लागतात आणि त्याकरिता आपण किती निधी देत आहोत, यासंदर्भात बघावे. हे पैसे देखील वेळेवर मिळत नाही. उशिरा मिळालेला न्याय हा देखील अन्याय असतो. अशा पद्धतीने या प्रक्रियेमध्ये लोकांना अडचणीला सामोरे जावे लागत आहे. यामध्ये चांगला बदल केला तर याचा निश्चितच चांगला फायदा होईल. तो लाभ होण्याच्यादृष्टीने आपल्या यंत्रणेच्या माध्यमातून अधिकाधिक चांगल्या पद्धतीचे काम व्हावे, अशी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(अध्यक्षस्थानी तालिका सभाध्यक्षा श्रीमती देवयानी फरांदे)

श्री. प्रकाश आबिटकर.....

अध्यक्ष महोदय, मी आपल्या सर्व योजनांची आणि आम्ही सूचविलेल्या मुद्यांबाबत आपण योग्य कार्यवाही करावी, अशी विनंती करतो आणि आपल्या मागण्यांना पाठींबा देतो.

अध्यक्ष महोदय, कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागावर मी थोडे बोलणार आहे. या विभागामध्ये काय योजना आहेत, हेच अजून कळालेले नाही. आपण खास करुन बेरोजगारांच्या सोसायटीला बेरोजगार सेवा संस्थेला 1200 रुपयांचे अनुदान देत आहोत. हे अनुदान कशासाठी देतो, त्याचा हेतू काय आहे, आपण त्यातून अपेक्षित काय साध्य करीत आहोत. जर योजना उपयुक्त नसेल तर ती बदलण्यात यावी किंवा थांबविण्यात यावी, जेणे करुन इतर काही करता येऊ शकेल. वर्षानुवर्षे तेच एम्लॉयमेंट ऑफीसर आहेत. त्या एम्लॉयमेंट ऑफीसमधून आजपर्यंत किती मुलांना रोजगार मिळाला, किती जण नोकरीला लागले, या सर्व बाबींच्या प्रश्नोत्तरामध्ये आपल्याला खूप मोठी पोकळी जाणवेल. या सर्व घटनांमध्ये बऱ्याच ऑफिसेसने खूप चांगल्या प्रकारे प्रगती केलेली आहे. टेलिफोन ऑफीसने चांगली कात टाकली असून ते चांगल्या पद्धतीने काम करीत आहेत. प्रत्येक विभागामध्ये खूप चांगल्या पद्धतीने प्रगती झालेली आहे. परंतु एम्लॉयमेंट ऑफीसाध्ये पूर्वी होती तीच माणसे व पूर्वी होती तीच स्किम व मानसिकताही तीच आहे. आमच्याकडे रेडीओला एक जाहीरात असायची की, "आमच्या आबा, आजोबा पासून मगदूम चहाच पितो". म्हणजे आहे तेच आहे. पलिकडील बाजूला जाण्याची मानसिकताच नाही. नेमके हे चालवितो कशासाठी असा प्रश्न तयार होईल. आपण एका बाजूला बेरोजगारांना 1200 रुपये अनुदान देत आहोत. बेरोजगार संस्था आपण कशासाठी चालवितो. याचे आऊटपूट काय निघते, हे देखील त्यांना विचारणे आवश्यक आहे. त्यांच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या योजना, उपक्रम या सर्व बाबींचा योग्य पद्धतीने आढावा घेणार घेण्याची गरज आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्या हितासाठी चांगल्या योजना अधिक गतीमान कराव्यात आणि जे योग्य नसेल ती बाब थांबविण्याच्या दृष्टीकोनातून पुढे जावे, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, प्रमोद महाजन कौशल्य प्रशिक्षण योजना ही नाविण्यपूर्ण योजना असून अत्यंत महत्वपूर्ण आहे. या माध्यमातून केलेली तरतूद आणि त्यातून आपला हेतू चांगल्या पद्धतीने

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश आबिटकर.....

साध्य होण्यासाठी या यंत्रणेतील प्रत्येक माणसाला गतीमान काम करण्यासाठी सूचना देण्यात याव्यात. योजना कितीही चांगली असली तरी ती राबविणारी यंत्रणा व त्यांची मानसिकता महत्वाची आहे. ती योजना, ती मानसिकता अधिक गतीमान करण्याच्या दृष्टीकोनातून सूचना दिल्या तर निश्चित महाराष्ट्रातील असंख्य बेरोजगार मुलांना चांगली संधी उपलब्ध होईल. तशा आपल्याकडून सूचना व्हाव्यात अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, खाजगी आयटीआयचे अनेक प्रश्न आहेत. तसेच अलिकडील काळामध्ये आपण पीपीटी बाबतची भूमिका घेतली. याचा उपयोग अधिक चांगल्या पद्धतीने करण्याची गरज आहे. विशेषत: तरुण मुलांना रोजगाराचे चांगले साधन निर्माण झालेले आहे. आयटीआयच्या माध्यमातून रोजगार निर्मिती होऊन तरुण मुलांच्या हाताला काम मिळणार आहे. ते अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने चांगले निर्णय घ्यावेत, अशी मी विनंती करतो. मी या दोन्ही विभागाच्या पुरवणी मागण्यांना पाठींबा देतो आणि थांबतो. धन्यवाद.

---*---

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. निलेश राणे : अध्यक्ष महोदय, माझी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. आपल्या माध्यमातून राज्य शासनाकडून काही माहिती घ्यायची आहे. रविवार, दिनाक 3 एप्रिल 2016 पासून जे.जे. रुग्णालयातील डॉक्टर्स स्ट्राईकवर गेलेले आहेत. त्यामुळे उपचाराकरिता कोणीही नसल्यामुळे असंख्य रुग्णांचे हाल होत आहेत. सदरहू निवासी डॉक्टरांचा तेथील प्रशासनाबरोबर वाद आहे. त्यामुळे डॉक्टरांची स्ट्राईक थांबवून किंवा यामध्ये योग्य तो हस्तक्षेप करुन डॉक्टरांनी पुन्हा कामावर रुजू होण्यासाठी राज्य सरकारकडून काय कार्यवाही केली जाणार आहे, यासंदर्भात आपल्या माध्यमातून राज्य सरकारने माहिती द्यावी, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारची डिजीटल इंडिया ही महत्त्वाकांक्षी संकल्पना आहे. राज्य सरकार देखील ही संकल्पना राबवत आहे. राज्य सरकारने ज्या शिक्षकांकडे डिजीटल फोन असेल, ॲन्डरोईड फोन असेल, स्पीकर फोन असेल त्या त्या शाळांना डिजीटल स्कूल म्हणून घोषित करणे सुरु केलेले आहे. म्हणजे शिक्षकाकडे केवळ फोन असला तरी ती शाळा डिजीटल स्कूल म्हणून जाहीर करण्यात येत आहे. अशा 11 जिल्ह्यामधील ट्रायबल डॉमिनेटेड शाळा डिजीटल इंडिया खाली जाहीर केलेल्या आहेत. तसेच सदरहू फोन शिक्षकांनी स्वतः घ्यायचे आहेत. अशा पद्धतीने डिजीटल इंडिया किंवा डिजीटलायजेशनची संकल्पना असेल तर त्याबाबतीत राज्य शासनाने भूमिका स्पष्ट करावी. धन्यवाद

तालिका सभाध्यक्षा : शासनाने दखील घ्यावी.

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अमित देशमुख (लातूर शहर) : अध्यक्ष महोदय, आजच्या सामाजिक न्याय आणि कौशल्य विकास आणि उद्योजकता विकास या विभागांच्या मागण्यांवर चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आपण हे वर्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 125 वे वर्षे म्हणून देशभरामध्ये, राज्यभरामध्ये साजरे करीत आहोत. त्यानुषंगाने या वर्षी मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पाला अतिशय महत्व आहे. म्हणून या अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्र शासनाने सामाजिक न्याय या विभागांतर्गत ज्या तरतुदी केलेल्या आहेत, याला अतिशय महत्व आहे. महाराष्ट्र सरकारने काही महिन्यापूर्वी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाकरिता मुंबईतील इंदू मिलच्या जागेमध्ये भूमिपूजन केले. महाराष्ट्राच्या, भारताच्या आणि जगाच्या भावना या स्मारकाशी जोडलेल्या आहेत. मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, स्मारकाचे भूमिपूजन देशाचे पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्र मोदी यांचे शुभहस्ते झाले. परंतु अजूनही तेथे काम सुरु झाल्याचे पहायला मिळत नाही. सदरहू भूमिपूजन संपन्न झाले. एखाद्या कामाचा शुभारंभ करण्यासाठी आपण भूमिपूजन करतो, अशी आपली कल्पना आहे. परंतु महाराष्ट्र सरकारने हे भूमिपूजन अगदी घाईमध्ये केले आणि त्यानंतर पुन्हा त्या इंदूमिलकडे पाहिले देखील नाही. त्यामुळे यासंदर्भात महाराष्ट्र सरकारच्या वतीने मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सभागृहाला आणि महाराष्ट्राला किंबहुना देशाला याची महिती दिली पाहिजे.

...BB/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमीत देशमुख.....

याप्रकरणी सभागृहाला, राज्याला किंबहुना देशाला याची माहिती शासनाने दिली पाहिजे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती आपण देशामध्ये साजरे करणार आहोत. याप्रकरणी शासन दिशाभूल करीत आहे का, यासंदर्भात सभागृहाला या सरकारने माहिती द्यावी.

अध्यक्ष महोदय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकरिता मागील अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यावरील चर्चेच्या वेळी विद्यापीठाकरिता शासनाच्यावतीने काही आर्थिक तरतूद घोषित करावी, अशी आम्ही सभागृहामध्ये मागणी नोंदविली होती. त्याबाबत त्यावेळी सरकारने कोणतेही भाष्य केले नाही. तसेच, यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये देखील विद्यापीठाकरिता आर्थिक तरतूद केल्याचे जाणवत नाही. विभागांच्या अनुदानाच्या मागण्यावरील चर्चेतून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला ज्या योजना राबवावयाच्या आहेत त्याकरिता किमान 125 कोटी रुपये तरतूद करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मराठवाड्यातील पानगाव, ता.रेणापूर जिल्हा लातूर येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चैत्यस्मारक आहे. या स्मारकाच्या ठिकाणी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी आहेत व त्यांचे तेथे जतन करण्यात येत आहे. या स्मारकास राज्य स्मारकाचा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी आम्ही पूर्वी नोंदविली आहे. त्यासंदर्भात कोणतीही पावले राज्य सरकारकडून उचलण्यात आली नाहीत. सदरहू मागणी मी अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यावरील चर्चेच्या निमित्ताने पुन्हा नोंदवू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय, आदिवासी घटकातील विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप देण्यात येते परंतु ती वेळेवर मिळत नाही. अनेक विद्यार्थ्यांची स्कॉलरशीपची रक्कम सरकारकडे थकलेली आहे. वाढत्या महागाईच्या तुलनेत या विद्यार्थ्यांना देण्यात येणारी स्कॉलरशीपची रक्कम अत्यल्प आहे. स्कॉलशीपच्या रकमेमध्ये वाढ करण्यात यावी, अशी मागणी मागासवर्गीय समाज, समाजातील विद्यार्थी, नेते, कार्यकर्ते व संशोधकाकडून करण्यात येत आहे. त्याकरिता सदरहू प्रकरणी योग्य ती उपाययोजना करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमीत देशमुख.....

अध्यक्ष महोदय, मागासवर्गीयांच्या उत्थानासाठी अनेक महामंडळांची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळासाठी करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतूदीमध्ये सरकारने वाढ केली पाहिजे. महामंडळाकडून दिली जाणारी अनेक कर्ज प्रकरणे प्रलंबित आहेत. या कर्ज देण्याच्या प्रकरणांच्या कोणत्याही कामाला गती असल्याचे आम्हाला जाणवत नाही. उद्योग, व्यवसाय करण्यासाठी अनेक गरजूंनी कर्ज मिळण्याकरिता महामंडळाकडे अर्ज केले आहेत. परंतु ती कर्ज प्रकरणे अनेक वर्षापासून मंजूर होत असताना आम्हाला दिसत नाही. या महामंडळाकडे सरकारचे लक्ष नाही. या महामंडळांना गती देण्याचे काम सरकारकडून करण्यात यावे, अशी माझी अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यावरील चर्चेच्या निमित्ताने मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, कौशल्य विकास व उद्योजकता विकास यासंदर्भात राज्य सरकारची भूमिका काय आहे, हे आम्ही अजून समजू शकलो नाही. कौशल्य व उद्योजगता विकासांतर्गत किती युवक व युवतींचा विकास करण्यात आला आहे ? राज्यात प्रचंड बेकारी आहे. आपण कोणत्याही गावामध्ये गेला तर त्या गावातील लोकसंख्येनुसार शिक्षित व अशिक्षित 100 ते 1200 या प्रमाणात तरुण बेकार आहेत. मुलांच्या बेरोजगारी बद्दल आपण विचार करतो, त्यांच्या प्रमाणेच अनेक सुशिक्षित मुली सुध्दा बेरोजगार आहेत. राज्यात किती तरुण व तरुणी बेरोजगार आहेत, यासंदर्भात राज्य सरकारने श्वेतपत्रिका प्रसिध्द करावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, "मेक इन इंडिया", "मेक इन महाराष्ट्र", "मॅग्नेटीक महाराष्ट्र" या योजनांची घोषणा शासनाने केली आहे. "मॅग्नेटीक महाराष्ट्र" या योजनेतील मॅग्नेटीक म्हणजे काय ? याबाबत मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात भाष्य करावे, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहामध्ये नमूद केले की, येणाऱ्या काळात 30 लाख नोकऱ्या नव्याने उपलब्ध होणार आहेत. मागील 15 महिन्यामध्ये किती लोकांना नोकऱ्या मिळाल्या ? याबाबत चर्चेच्या उत्तराच्या वेळी मंत्री महोदयांनी भाष्य करावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यात अनेक पदवीधर बेरोजगार असून राज्यात सुरु असलेल्या पोलीस भरतीमध्ये ते मुलाखती देण्यासाठी गेले आहेत. मुखातीसाठी आलेल्या या बेरोजगार तरुणांमध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमीत देशमुख.....

बी.कॉम, एम.एस्सी., एम.बी.ए. अश पधवीधरांचा समावेश आहे. राज्यात नोकऱ्या मिळत नसल्याने हे पदवीधर पोलीस भरतीकडे वळत आहेत, यासंदर्भात सरकारने विचार करण्याची आवश्यकता आहे. या राज्याची दयनीय अवस्था झाली असून त्यास कोण कारणीभूत आहे, याचा सरकारने विचार करण्याची वेळ आली आहे. अशाच प्रकारची अवस्था राहिली तर राज्याचा क्रमांक आता 7 व्या किंवा 8 व्या क्रमांकावर आहे, तो काही वर्षात घसरण होऊन 20 किंवा 30 व्या क्रमांकावर जाऊ शकतो. यामुळे सरकारने मांडलेल्या अर्थसंकल्पाला काही अर्थ आहे असे मला वाटत नाही. मी या अनुदानाच्या मागण्यांचा निषेध करतो, व माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद !

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पावरील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि कौशल्य विकास आणि उद्योजकता विकास विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांना समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सर्वांगिण विकासासाठी योजना राबविल्या जातात. त्यासंदर्भात "जाता जात नाही ती जात" अशा काही भावना मागासवर्गीय समाजातील दलित कुटुंबाच्या होत्या.

अध्यक्ष महोदय, "पानी तेरा रंग कैसा, जिस में मिलाओ उसके जैसा", अशाच भावनेने की काय, ज्याचा व्यवसाय त्याच्याशी निगडीत आहे त्याची जात निर्माण झाली की काय असा भास वाटतो.

अध्यक्ष महोदय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती राज्य सरकारच्या माध्यमातून साजरी करण्यात येत आहे. या राज्यात व देशात अनेक सरकारने येऊन गेली. परंतु पहिल्याच वेळी स्वाभिमानाने या राज्य सरकारच्या माध्यमातून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती साजरी होत आहे. त्याबद्दल मी मुख्यमंत्री महोदय व सरकारचे अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, परदेशामध्ये शिक्षण घेत असताना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव केले होते ते घर खरेदी करण्यासंदर्भातील विषय मोठ्या प्रमाणात चर्चिला गेला होता. या घराच्या खरेदीकरिता राज्य सरकारने कोणताही विचार समोर न येऊ देता निर्णय घेतला. या सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची अस्मिता जागृत ठेवण्याकरिता कितीही खर्च झाला तरी त्यांनी परदेशात शिक्षण घेताना वास्तव्य केलेले घर खरेदी करण्याची तयारी दर्शविली. त्यानुसार या सरकारने ते घर खरेदी केले. त्याबद्दल या सरकारचे कौतुक देशभर होत आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

यानंतर CC-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुधाकर भालेराव....

याचे कौतुक देशभर होत आहे याचा मला सार्थ अभिमान आहे. परंतु या बरोबरच बारा बलुतेदारांमध्ये विखुरलेल्या आणि सामाजिक न्यायापासून उपेक्षित असलेला हा समाज आहे. या समाजावर होत असलेला अन्याय दूर करुन त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे माझी पहिली मागणी असेल की, गावाकोसाच्या बाहेर जीवन जगणारा, दीन दलित दुबळा वर्ग, भूमिहीन, आर्थिक परिस्थितीने अत्यंत व्याकूळ असलेल्या या समाजातील एखाद्या व्यक्तीचे आकस्मिक निधन झाले आणि त्याचे गावकोसाच्या बाहेर विल्हेवाट लावायची झाली तर स्मशान भूमी नाही. या देशाला स्वातंत्र्य मिळून 69 वर्षे पूर्ण होत आली आहेत. असे असताना या कुटुंबातील व्यक्ती मरण पावला तर त्याच्या विल्हेवाट लावण्यासाठी स्मशानभूमी आजही अस्तित्वात नाही. म्हणून माझी पहिली मागणी आहे की, ग्रामीण भागातील ज्या ज्या गावात सामाजिक व्यवस्था अस्तित्वात आहे, त्या ठिकाणी सामाजिक न्याय विभागाने स्मशान भूमी उभारावी, जेणेकरुन त्याला शेवटचा श्वास घेताना समाधानकारक घेऊन त्याची विल्हेवाट लावण्यात येईल. या कामी आपल्याला स्मशानभूमीचा पॅटर्न राबवावा लागेल. सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे पाटील साहेब मी आपल्याला खास करुन सांगू इच्छितो की, गेल्या 5 वर्षाच्या कालावधीत मी आमदार असताना माझ या मतदार संघातील एका गरीब कुटुंबाच्या व्यक्तीला अंत्यविधीसाठी घेऊन जाण्याचा प्रसंग आला असता तेथील एक शेतकऱ्याने तो अत्यंविधी अडविला होता. मला पोलिस स्टेशनला याची माहिती देऊन पोलिसांचे संरक्षण त्यासाठी घ्यावे लागले आणि पोलिस संरक्षणामध्ये अंत्यविधी पार पाडावा लागला. अशी जर अवस्था असेल तर सामाजिक न्याय विभागाचा भाग म्हणून ज्या जाती व्यवस्थेमध्ये अशा प्रकारच्या अडचणी आहेत त्या सोडविण्यापासून आपल्याला सुरूवात करावी लागेल. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहे की, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. वाघिणीचे दूध प्यायल्यानंतर जसा घुरघुरला पाहिजे अशा पध्दतीचे हे शिक्षण महत्वाचे केंद्र आहे. परंतु आज आमच्या विद्यार्थ्यांची जी हालत किंवा स्थिती आहे त्यामध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे, परिवर्तन होणे आवश्यक आहे. सामाजिक न्याय विभागाच्या मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आजपर्यंत जे काही झाले ते पाठीमागे निघून गेले, अशा पध्दतीची भूमिका घेऊन या सभागृहात बजेटमध्ये या विभागासाठी जी तरतूद झालेली आहे तो निधी शंभर टक्के खर्च झाला पाहिजे, अशी आपण भूमिका घेतली पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुधाकर भालेराव....

अध्यक्ष महोदय, शिक्षणाचा प्रसार आणि प्रबोधन मोठ्या प्रमाणावर होण्याची गरज आहे. अशिक्षित समाज प्रगतीशील मार्गावर शंभरटक्के जाऊ शकत नाही. त्यासाठी निश्चितपणे सामाजिक न्याय व्यवस्थेच्या माध्यमातून प्रबोधन करण्याची गरज आहे. अशा प्रकारचे प्रबोधन करुन गरीब समाजातील विद्यार्थ्यांना पुढे आणण्याचा प्रयत्न केला तर निश्चितपणे चांगला फायदा होऊ शकतो. गाव जले, हनुमान बाहर, गावकुसाच्या बाहेर एक हनुमंत रायाचे मंदिर असते आणि त्याच्या बाजूला पूर्वापार असलेल्या दोन दलितांच्या वस्ती असतात. पूर्वापार असलेला मांग, महार आणि आजचा बौध्द आणि नवबौध्द अशी वाईट अवस्था आहे.

अध्यक्ष महोदय, मातंग समाजाची आज काय अवस्था आहे, मी अर्धनग्न अवस्थेत पोत्राजचे आंदोलन केले होते. भारत देशामध्ये अनोख्या आंदोलनामध्ये माझा 7 वा नंबर आल्याचे मिडियाने त्या ठिकाणी दाखविले. मला त्यावेळी काय वाटले असेल, मी देखील माणूसच आहे. मी लोकप्रतिनिधी आहे. मी पोत्राज व्हावे आणि आंदोलनामध्ये 7 नंबर यावा. माझी अशी भावना नव्हती तर जो समाज पिछडा आहे, जो समाज दारिद्र्यावस्थेमध्ये जीवन जगतो आहे, आदिवासीनंतर शेवट्या पायरीवर जगणारा जो समाज आहे, त्या समाजाची भावना काय आहे ? या संदर्भात मी एक उदाहरण सांगू इच्छितो की, एखाद्या ठिकाणी घोड्यांची लाईन लावली आणि त्यामध्ये 2-3 लंगडे घोडे ठेवले, एक आंधळा ठेवला आणि एक सशक्त असा ताकदवाला घोडा ठेवला आणि त्यांच्या लाईनमध्ये आम्हाला ठेऊन घोड्यांची शर्यत लावली असेल तर कोणता घोडा पुढे जाईल. नंबर 1 असलेलाच जाईल, ताजातवाना असलेलाच जाईल. जो शिकलेला आणि समजदार असेल तोच जाईल. परंतु जो विखुरलेला आहे आणि अत्यंत दुबळा आहे, त्याची परिस्थिती नाजूक आहे, त्याला ज्ञान नाही, तो अज्ञानी आहे, त्याला कसल्याही प्रकारचे ज्ञान नसेल, तो पिछाडलेला असेल तर तो काय करेल ? अशा प्रकारच्या अनुसूचित जातीमध्ये 59 जाती आहेत. परंतु या 59 जातींमधील काही जातींना शंभरटक्के न्याय मिळत नाही, अशी अवस्था आहे. म्हणून मातंग समाजासाठी आदिवासींच्या धर्तीवर एक विकास खाते निर्माण करण्याची गरज आहे, अशी मागणी मी या सभागृहामध्ये करीत आहे. त्याचप्रमाणे या समाजाला वेगळे आरक्षण देण्याची गरज आहे. अनुसूचित जातीमधील 59 जातींना 4 वर्गांमध्ये विभागण्याची गरज आहे. मागच्या युतीच्या सरकारमध्ये ज्याप्रमाणे हटकर, भंडगर, धनगर, बंजारा, वंजारा या जातींसाठी वन, टू, थ्री, फोर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुधाकर भालेराव....

करुन एक वेगळे आरक्षण, त्याच आरक्षणामधून केले. आरक्षण म्हणजे वेगळे आरक्षण करण्याची गरज नाही तर फक्त 13 टक्के आरक्षणामधून फक्त अ,ब,क,ड अशा चार प्रमुख जाती कराव्यात. त्या जातींमध्ये त्या त्या पोटजाती मर्ज कराव्यात. अध्यक्ष महाराज, मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, अनुसूचित जातींमध्ये 59 जाती असल्या तरी त्या महाराष्ट्रामध्ये 59 जाती अस्तित्वात आहेत की, नाहीत हे सांगता येत नाही. पण त्यांच्या पोटजाती मात्र विखुरलेल्या असून त्या त्यामध्ये दर्शविल्या आहेत. प्रामुख्याने 4 जातींमध्ये विभागणी केली आणि त्या त्या जाती त्या त्या पोटजातीमध्ये मर्ज केल्या तर त्या जातींमध्ये जिसकी संख्या भारी उसकी उतनी भागीदारी असे करावे. मी वेगळे मागत नाही तर त्याच 13 टक्के आरक्षणामध्ये फक्त त्या त्या जाती व्यवस्थेला, त्या त्या वर्ण व्यवस्थेला, नोकरी धंदा आणि शैक्षणिक क्षेत्रात अडचणीत आलेल्या विद्यार्थ्यांना सर्व बाबींसाठी लाभ मिळाला पाहिजे. यासाठी अ,ब,क,ड करुन वेगळे आरक्षण करण्याची गरज आहे. या मागणीसाठी असंख्य कार्यकर्ते राज्यभर आंदोलने करीत आहेत. मंत्री महोदयांना ही नामी संधी आहे. या समाज व्यवस्थेमध्ये न्याय मिळाला पाहिजे. प्रत्येकाला त्याचा हिस्सा मिळाला पाहिजे. अशा प्रकारची भावना माझ्या प्रश्नाला उत्तर देताना आपण घ्यावी, अशी मी आपणास विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, आज अण्णाभाऊ साठे महामंडळाची काय अवस्था आहे, या संबंधी मी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्या अनुषंगाने काही प्रश्नांची उत्तरे अनुत्तरीत राहिली आहेत. त्या दिवशी मी विचारणा केली होती की, या महामंडळासाठी किती निधी वितरीत केला आहे, आणि आता किती निधी शिल्लक आहे तर काहीही नाही. या महामंडळाची अत्यंत दुर्दशा झालेली आहे. आपण किती दिवस तो समाज वंचित ठेवणार आहात. या महामंडळासाठी लवकरात लवकर पहिल्या टप्प्यामध्ये 500 कोटी रुपयांचा निधी मिळण्याची आवश्यकता आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये पहिला निधी संपल्याबरोबर पुन्हा 500 कोटी रुपयांचा निधी देण्याची आवश्यकता आहे आणि आपण हा निधी द्याल अशी मी मागणी व अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी एवढीच विनंती करतो की, गावकुसाच्या बाहेरील समाज व्यवस्थेसाठी आणि विखुरलेल्या दलित वर्गासाठी सामाजिक न्याय विभाग हे अत्यंत महत्वाचे आणि जबाबदारचे खाते निर्माण झालेले आहे. या समाज व्यवस्थेतील सुधारणेसाठी या विभागाचे योगदान

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुधाकर भालेराव....

लाभणे ही काळाची गरज आहे. नियमाचे पालन करुन आणि त्यामध्ये सुधारणा करुन या सामाजिक व्यवस्थेतील स्तर उंचाविण्यासाठी या खात्याचा उपयोग झाला पाहिजे, अशी भावना या सभागृहाची आहे. म्हणून या ठिकाणी मागासवर्गीयांच्या औद्योगिक सहकारी उत्पादक संस्थेच्या बाबतीत काय परिस्थिती आहे तर राज्यभरामध्ये कार्यरत असलेल्या औद्योगिक संस्थांमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे.

DD-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधाकर भालेराव.....

ज्या अशिक्षित समाजामध्ये औद्योगिक समाजाच्या संस्था आहेत. परंतु त्या चालविणारे चातुर्वण व्यवस्थेतील काही लोक आहेत याची सुध्दा विचार करण्याची गरज आहे. याठिकाणी एखादी औद्योगिक संस्था उभी करायची. त्यामध्ये एखाद्या चातुर्वण व्यवस्थेतील माणूस उभा करायचा आणि त्यात दलाली निर्माण करुन एखाद्या गरीब समाजव्यवस्थेतील माणसांना हाताशी धरुन एखादी संस्था रजिस्टर करायची. आज करोडो रुपयांच्या बजेटमध्ये कुठल्याही प्रकारचा फायदा मागासवर्गीयांसाठी मिळालेला नाही. म्हणून यात सुधारणा करण्याची गरज आहे ती तात्काळ झाली पाहिजे. आम्ही किती दिवस वाट बघायची, आम्ही विकासापासून कोसो दूर आहोत. औद्योगिक क्षेत्राच्या माध्यमातून, खाजगी संस्थांच्या माध्यमातून काही लाभ देण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि हे केले तरच यामध्ये सुधारणा होऊ शकते. कायद्याच्या तरतूदीमध्ये बदल करुन औद्योगिक संस्थेला सहकार्य करीत असाल आणि याची माहिती घेतली तर लक्षात येईल. 7 कोटी रुपयांची योजना किती वर्षे चाललेली आहे. कोणत्या योजनेला किती पैसा दिलेला आहे आणि ती योजना कार्यान्वित झाली की नाही. 100 टक्के कार्यान्वित होऊन त्याच्यावर काही उत्पादन शुल्क वाढलेले आहे काय? गरीब समाजातील घटक व्यवस्थेला त्याचा फायदा झालेला आहे काय? तर याचे नाही हे उत्तर अपेक्षित आहे. कशा पध्दतीने सामाजिक व्यवस्थेमध्ये सुधारणा होणार आहे. गरीब समाजातील लोकांचा ज्या-ज्या ठिकाणी शिक्षणाचा स्तर उंचावलेला आहे त्याचा सामाजिक न्यायव्यवस्थेमार्फत सर्वे झाला पाहिजे. त्या-त्या समाजघटकातील लोकांचा सर्वे झाला पाहिजे. माझी मागणी आहे की, विकासापासून दूर असलेल्या घटकाला 100 टक्के न्याय द्यायचा विचार केला तर त्यांचा सर्वे झालाच पाहिजे. या सर्वेनुसार ज्याला आपण जनगणना म्हणतो. मागासवर्गीयांची, 12 बलुतेदारांची , 18 पगड जातीतल्या 59 जातींचा सर्वे व्हायला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, अनुसूचित जातीची 1 कोटी, 32 लाख लोकसंख्या असल्याची आकडेवारी वाचतो. आकड्यांची खरी आकडेवारी का देऊ शकत नाही. आपल्याकडे काही साधन नाही काय? ज्या गावामध्ये ग्रामसेवकापासून माहिती घेऊ शकता, ज्या गावात नगरसेवकाच्या माध्यमातून माहिती घेऊ शकता. त्या-त्या वस्तीचा सर्वे करुन सामाजिक जनगणना होण्याची आवश्यकता आहे. ही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधाकर भालेराव.....

सामाजिक जनगणना या कालखंडामध्ये झाली तरच येणाऱ्या काळामध्ये सामाजिक व्यवस्था सुधारल्याशिवाय राहणार नाही. अशा पध्दतीचा आत्मविश्वास मला ठिकाणी द्यावासा वाटतो. म्हणून राज्य सरकारच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात उपलब्धी सुरु आहे. पारदर्शक अशा पध्दतीचे सरकार चालले आहे. आम्हाला सार्थ अभिमान आहे की, निश्चितरुपाने कुणी कशाही पध्दतीचा विरोध केला तरी मागासवर्गीयांसाठी राज्य सरकार अत्यंत दानशूर अशा पध्दतीचे व्यक्तीमत्व आणि पारदर्शक व्यक्तीमत्व असलेले मुख्यमंत्री महोदयांच्या रुपाने एक युवा नेता आम्हाला लाभलेला आहे. आमच्याकडे झुकतेमाप दिल्याशिवाय राहणार नाही असाही आम्हाला विश्वास आहे. सामाजिक व्यवस्थेवर बोलण्यासाठी भरपूर असे काही आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासामध्ये आणि शेवटच्या स्तरामध्ये अडचणीत असलेल्या माणसाला न्याय देण्यासाठी प्रामुख्याने जबाबदारी घेतली आणि ती जबाबदारी शेवटच्या स्तरापर्यंत पोहचविण्याची काळाची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभागामार्फत जो पैसा जिल्हा स्तरावर जातो. सदर पैसा जिल्हा स्तरावर गेल्यावर का हस्तांतरित करण्यात येत नाही, का अधिकारी याठिकाणी काम करीत नाहीत याचीही चौकशी व्हायला पाहिजे. दिलेल्या पैशाचा वापर गोरगरीब समाजातील लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी, ज्या योजनांसाठी दिलेला आहे ती योजना कार्यान्वित झाली का नाही याचा सुध्दा अहवाल मागविण्याची आवश्यकता आहे. दलितवस्ती सुधार योजनेच्या अंतर्गत मोठ्या प्रमाणात याठिकाणी बजेट दिले जाते. दलित वस्ती असते तरी किती? गावाच्या बाहेर 10-15 छोटी छोटी घरे असतात आणि या वस्तीमध्ये काय लागणार आहे. दलितवस्तीचे एक गाव हातात घेतल्यानंतर त्याचे काम पूर्णच झाले पाहिजे. एका दलितवस्तीच्या समोर एक रस्ता, एक दिवाबत्तीचा खांब असेल तर कसे चालेल. "झूम बराबर झूम शराबी, तुम्हारे बराबर हमारी खराबी." अशी परिस्थिती जर नशिबाने आली तर निश्चितरुपाने विकास घडून येणार. मी माननीय मंत्री श्री.बडोले आणि माननीय मंत्री श्री.दिलीप कांबळे यांचे अभिनंदन करेन. त्यांनी एक महत्वपूर्ण भूमिका घेतलेली आहे. आदर्श गावामध्ये दलितवस्तीचे काम करायचे असेल तर त्या गावातील काम सर्वंकष निकषाने परिपूर्ण विकास झाला पाहिजे अशा पध्दतीचा निर्णय घेतलेला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुधाकर भालेराव.....

अध्यक्ष महोदय, या सामाजिक उणिवा लक्षात घेता फक्त मागासवर्गीय समाज म्हणूनच नाही तर इतरत्र समाजामधील ब्राम्हण समाज असला तरीही, लोक ब्राम्हण समाजाला खूप शिव्या देतात, ब्राम्हण समाजाने काय पाप केले. जन्माला आल्यानंतर नामकरण करण्यासाठी ब्राम्हण लागतो. मेल्यानंतर अंतविधी पूर्ण करण्यासाठी सुध्दा ब्राम्हण लागतो. तरी ब्राम्हण समाजाला कशासाठी बोलले पाहिजे. सर्वोतोपरी समाजाचा विकास हा ध्यास समाजाने घेतला असेल तर निश्चितरूपाने कुठल्याही जातीव्यवस्थेमध्ये निर्माण झालेल्या अडचणी आहेत. त्या अडचणी दूर करण्यासाठी सामाजिक न्याय विभाग आहे. या सामाजिक न्याय विभागामार्फत अनेकवेळा काय झाले आणि कुठे काय झाले याची चौकशी करण्याची आवश्यकता नाही. परंतु येणाऱ्या 12 बलुतेदारांचा विकास हाच आमचा अंतिम ध्यास, या पध्दतीने काम झाले पाहिजे. अशा पध्दतीची भावना याठिकाणी व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, या अनंत अडचणींमध्ये मी कितीवेळ याठिकाणी समालोचन करावे आणि त्याच्यावर किती प्रमाणात याठिकाणी बोलावे. या बजेटमध्ये निश्चितरूपाने तरतूद झालेली आहे, अत्यंत चांगले बजेट आहे, काळजी करण्याची गरज नाही. अभी तो यह झाँकी है, आने वाले दिन बहुत बाकी है. आगे आगे देखो होता है क्या ? मेक इन इंडिया हमारा है. 30 लाख लोगों को रोजगार मिलने वाला है. येणाऱ्या काळामध्ये निश्चितरूपाने चांगला संदेश या बजेटच्या माध्यमातून जाणार आहे. डमरु वाजवायची गरज नाही. तुमच्या काळात डमरु वाजवायची वेळ होती म्हणून डमरु वाजवून पळवले. आता डमरु वाजवायची गरज नाही. डमरु वाजवले म्हणून कमरु तुमचे झाले. म्हणून आता सुधारणा करण्याची वेळ आलेली आहे. येणाऱ्या काळामध्ये अत्यंत महत्वाचा दिवस आहे. सामाजिक व्यवस्था सुधारण्यासाठी या बजेटमध्ये तरतूद झालेली आहे. मोठ्या प्रमाणात सामाजिक उणिवा असलेल्या आणि सामाजिक ज्ञान असलेले माननीय मंत्री श्री.राजकुमार बडोले आणि माननीय राज्यमंत्री श्री.दिलीप कांबळे यांनी याठिकाणी चांगला निर्णय घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल केदार : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर भालेराव यांनी अत्यंत चांगले असे वक्तव्य केले. आम्हाला काहीही अडचण नाही. कारण सभागृहामध्ये बोलण्याचा सर्वांना अधिकार आहे. परंतु मी त्यांना याठिकाणी आवर्जून एवढेच सांगू इच्छितो की, सन 2015-2016 मध्ये समाजकल्याण विभागाचे जे बजेट होते. त्याचा आकडा किती होता याची कृपाकरून माहिती करून घेण्यात यावी. सन 2015-2016 मध्ये किती खर्च झाला आणि शेवटच्या दिवशी रिॲप्रुपेममेंटमध्ये या विभागाचे पैसे कुठे गेले याची माहिती करून घेण्यात यावी. एवढेच मला याठिकाणी सांगायचे आहे.

EE-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑडर्र आहे. सभागृहामध्ये सामाजिक न्याय, कौशल्य विकास, उद्योजकता विभागाची चर्चा सुरु आहे. दुर्दैवाने कौशल्य विकास विभागाचे माननीय राज्यमंत्री, मंत्री येथे उपस्थित नाहीत. दोन तापांपासून चर्चा सुरु आहे. पूर्ण वेळ सचिव नाहीत, मंत्री महोदय उपस्थित नाहीत. कौशल्य विकास विभागाचा मोठा कार्यक्रम देशाचे पंतप्रधान माननीय श्री.नरेंद्रजी मोदी यांनी सुरु केलेला आहे. पण राज्य सरकारची या विभागाबाबतची भूमिका किती दुर्लक्षित आहे. हा विषय मी आपल्या सभागृहाच्या माध्यमातून शासनाला सांगू इच्छितो.

तालिका सभाध्यक्षा : माननीय मंत्री महोदयांना निरोप दिलेला आहे. ते येणार आहेत.

.....2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दीपिका चव्हाण (बागलाण) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 च्या अर्थसंकल्पात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, कौशल्य विकास आणि उद्योजकता विभाग यावर चर्चा करण्यासाठी मी उभी आहे.

तालिका सभाध्यक्षा : सन्माननीय सदस्य श्री.पाटील साहेब आपण जागेवर बसावे, मी तुम्हाला बोलण्याची संधी देते.

श्रीमती दिपिका चव्हाण : अध्यक्ष महोदय, सन 2015-16 हे वर्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 साव्या जयंतीनिमित्त समता व सामजिक न्याय वर्षे साजरे करणे यासाठी 170 कोटी रुपयांचा नियतव्यय शासनाने प्रस्तावित केलेला आहे.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑडर्र आहे. मगाच पासून सन्माननीय सदस्य कौशल्य विकास मंत्री आले नाहीत म्हणून लक्ष केंद्रीत करीत आहेत. आपण सांगता मंत्री महोदय येत आहेत. आता सभागृहात कॅबिनेट मंत्री सुध्दा नाहीत.

श्रीमती दिपिका चव्हाण : अध्यक्ष महोदय, या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून शासनाने लंडन येथे सन 1921-22 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे शिक्षण घेत असताना त्यांचे ज्या इमारतीमध्ये वास्तव्य होते ती इमारत खरेदी करुन डॉ.बाबासाहेबांचे स्मारक म्हणून तिचा विकास करण्यात येणार आहे. मात्र त्या ठिकाणी कोणकोणते उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्या इमारतीचा दुरुस्ती देखभाल निगरानी राखण्याची जबाबदारी कोणावर सोपविण्यात येणार आहे. तसेच त्यासाठी वार्षिक किती खर्च अपेक्षित आहे. याबाबत शासनाने अद्याप कार्यक्रमाचे नियोजन केले नाही. त्याचबरोबर न्युयॉर्क येथे डॉ.बाबासाहेबांची 125 वी जयंती साजरी करण्यात येणार आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार आहे. मात्र त्या ठिकाणी स्मारक उभारण्याच्या दृष्टीने करावयाच्या कामाबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही. तरी त्याबातचा खुलासा देखील शासनाने करावा तसेच या जयंतीनिमित्त राज्यात कोणकोणते कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात येणार आहेत. याची माहिती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दीपिका चव्हाण.....

सभागृहाला मिळणे आवश्यक आहे. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यदिव्य स्मारक राज्यात जिल्हयांच्या ठिकाणी उभारण्यात यावे व त्यासाठी अंदाजपत्रकात भरीव रक्कमेची तरतूद करावी.

अध्यक्ष महोदय, शैक्षणिक विकासाच्या दृष्टीकोणातून मागासवर्गीय मुलांमूलीकरिता शासकीय वसतिगृह बांधण्यासाठी 220 कोटी रुपये केलेल्या तरतूदीमधून राज्यात मुलांमुलींसाठी कोणकोणत्या ठिकाणी वसतिगृह बांधण्यात येणार आहेत. याबाबत देखील खुलासा व सभागृहाला माहिती द्यावी. तसेच मागासवर्गीय मुलींना निकृष्ट दर्जाचा आहार मिळतो, तसेच त्यांना वागणूक देखिल चांगली मिळत नाही. आदिवासी बांधवांना स्वेटरसुध्दा दिले जात नाही.

अध्यक्ष महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना ही एक नविन योजना युती शासनाने अनुसूचित जातीच्या शेतक-यांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनविण्यासाठी सुरु करण्यात येणार आहे. या योजनेसाठी लाभार्थीला रुपये 2 लाखापर्यंचे अनुदान तसेच विहिरीवर विद्युत पंप बसविणे आणि जेथे ग्रीडमधून वीजपुरवठा शक्य नसेल तेथे सौरउर्जेतून वीज जोडणी करुन मागास वर्गीय शेतक-यांना शेतीची उत्पादकता वाढविण्यास मदत करण्यात येणार आहे. तथापि, या योजनेच्या संदर्भात अनुसूचित जातीच्या शेतक-यांसाठी शेतीची अट, वार्षिक उत्पन्न, तसेच या योजनेअंतर्गत राज्यात एकूण किती लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी कोणत्या अटी व शर्ती घालण्यात येणार आहेत. याबाबतचा खुलासा शासनाने करावा कारण गेल्या अनेक वर्षापासून अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांसाठी शासनाची विशेष घटक योजना कार्यरत असून या योजनेअंतर्गत मागासवर्गीय शेतकऱ्यांना विहीर खोदणे, विहिर दुरुस्ती, निविष्टासंच, कृषि अवजारे बी-बियाणे, बैलजोडी, विद्युत पुरवठा व खते मोफत देऊन मागासवर्गीय शेतकऱ्यांसाठी राबविली जात आहे. त्यामुळे शासनाने आता सुरु केलेली डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व पूर्वीच्या विशेष घटक योजना यामध्ये द्विरुक्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी नव्याने सुरु करण्यात यावयाच्या योजनेबाबत शासनाने खुलासा करावा.

.....4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दीपिका चव्हाण.....

अध्यक्ष महोदय, दिनांक 13 ते 17 फेब्रुवारी, 2016 रोजी वांद्रा-कुर्ला कॉम्पलेक्स, येथे आयोजित केलेल्या मेक इन इंडिया व मेक इन महाराष्ट्र या कार्यक्रमात माननीय पंतप्रधानानी भारतातील तरुणाई परफॉर्मिंग ॲसेटस् बनण्याची गरज आहे असे आव्हान देशातील तरुणांना केले. आज भारत तरुणांचा गट म्हणून ओळखला जातो. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी अर्ध्याहून अधिक लोकसंख्या ही 19 ते 35 वयोगाटातील आहे. ही तरुणांची लोकसंख्या जोपर्यंत परफॉर्मिंग ॲसेटमध्ये स्थांतरीत होत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने भारताला "डेमॉग्राफीक डिव्हिडंटचा " फायदा घेता येणार नाही. याचाच अर्थ असा की, या तरुणांमध्ये कौशल्य निर्माण करुन त्यांना रोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. भारतात दरवर्षी साधारणत: 2 कोटी तरुण वयाची 18 वर्षे पूर्ण करतात. 19 ते 29 या वयोगटातील 20 कोटी तरुणांना रोजगाराची गरज आहे. आज आपल्याकडे कृषि सेवाक्षेत्र आणि उत्पादन किंवा उद्योग क्षेत्र हे रोजगार निर्मितीची प्रमुख क्षेत्रे आहेत. कृषि क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील योगदान हे 70 टक्याहून अधिक होते ते आता कमी होऊन 13 टक्यांवर आलेले आहे. गेल्या 20 वर्षामध्ये सेवायोजनांचा अर्थव्यवस्थेतील वाटा प्रचंड वाढला आहे. आज घडीला सेवाक्षेत्राचे योगदान हे 60 टक्यापर्यंत वाढले आहे. मात्र सेवाक्षेत्रामध्ये रोजगार निर्मितीची क्षमता खूप कमी आहे. सध्या उद्योगक्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील योदान 23 टक्के आहे. उद्योग क्षेत्रातून 30 टक्के लोकांना रोजगार मिळू शकतो असे माननीय पंतप्रधानांनी मेक इन इंडियाच्या कार्यक्रम प्रसंगी सांगून तरुण व बेरोजगार तरुणांना गाजर दाखविले आहे.

अध्यक्ष महोदय, मेक इन इंडियाच्या प्रदर्शनामध्ये महाराष्ट्राच्या दालनात राज्याच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन होईल असे काहीच दिसले नाही. राज्यात नेमके काय चालले आहे. गुंतवणुकीला कोठे संधी आहे. याबाबतची माहिती पुस्तिका देखील प्रेक्षकांना उपलब्ध होऊ शकली नाही, अशी तक्रार अनेक प्रेक्षकांनी केली आहे. मेक इन इंडियाच्या कार्यक्रमाच्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी मेक इन इंडियाच्या माध्यमातून महाराष्ट्रात 6 लाख 11 हजार कोटी रुपयांची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दीपिका चव्हाण.....

गुंतवणुक होणार असून त्यातून आपल्या राज्यात 28 लाख लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहेत असे माननीय मंत्र्यमंत्र्यांनी सांगितले असेल तरी किमान कौशल्यावर आधारित रोजगार मिळण्याच्या संधीवर माननीय मुख्यत्र्यांनी अवाक्षर देखील काढले नाही. त्यामुळे मेक इन इंडिया व मेक इन महाराष्ट्र या कार्यक्रमामध्ये किमान कौशल्य आत्मसात केलेल्या तरुण वर्गाच्या हाताला काहीच लागले नाही.

FF-1 .....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती दीपिका चव्हाण .....

अध्यक्ष महोदय, राज्यातील 15 हजार गावांमध्ये दुष्काळ पडलेला आहे. पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न बिकट झालेला आहे. यामुळे नापिकी होऊन कर्जबाजारी शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. असे जिव्हाळयाचे प्रश्न राज्यासमोर आ वासून उभे असताना त्यांचा विचार न करता मेक इन इंडियासारख्या भपकेबाज खर्चिक व पंचतारांकित कार्यक्रमास एका आठवडयात तब्बल 70-80 कोटींची उधळण युती शासनाने केली असून दुष्काळग्रस्त महाराष्ट्राची कुचेष्टा केली आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यात पडलेल्या भीषण दुष्काळामुळे लातूर एमआयडीसीमधील 600 व जिल्हयातील एकूण 1200 उद्योग पाण्याअभावी बंद पडले आहेत. त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रश्न मुख्यमंत्री महोदयांसमोर नसल्याचे दिसते. मेक इन इंडिया, मेक इन महाराष्ट्र या योजना देखील मृगजळासारख्याच आहेत. मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष पाटील (अलिबाग) : अध्यक्ष महोदय, मी अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यावर बोलण्याकरिता उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील यांनी चांगले विचार मांडले आहेत. मी पुन्हा त्याच बाबींची पुनरावृत्ती करणार नाही.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय खात्याचे नाव बदलण्याची मागणी मी या निमित्ताने करतो. कारण दिलेला निधी लोकांपर्यंत पोहचविण्यात हे खाते अपयशी ठरलेले आहे. सर्वात जास्त निधी या खात्याला देऊनसुध्दा तो निधी गरिबांपर्यंत पोहचविण्यासाठी सामाजिक न्याय खाते अपयशी ठरले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे 125 वी जयंतीवर्ष आपण साजरे करीत आहोत, त्यांची कर्मभूमी रायगड जिल्हा व कोकण आहे, त्यांनी सत्याग्रह केलेले चवदार तळे महाड येथे आहे. मागच्या आठवडयात महाडमुळे बराच वादंग झाला होता. महाड येथे चांगले सभागृह तत्कालीन मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी व मंत्री महोदय श्री.मोरे यांनी बांधले होते. पण आता या सभागृहाकडे शासनाचे दुर्लक्ष आहे त्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा. आलेला निधी जोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थेकडे जात नाही, तोपर्यंत तो खर्च होणार नाही. मला सांगण्यास आनंद वाटतो की, पूर्वी 2 लाख रुपये दलित वस्तीकरीता खर्च करण्यास परवानगी होती. तत्कालीन पालकमंत्री श्री.सुनील तटकरे यांनी प्रयत्न केले व 20 लाख रुपये निधी दलित वस्तीकरिता खर्च करण्याची कायद्यात तरतूद केली होती. असा क्रांतीकारक निर्णय आता सामाजिक मंत्री महोदयांनी घ्यावा. आता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले जात आहे पण त्यांच्या विचारसरणीने काम केले पाहिजे. मी निश्चित सांगतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत रायगड जिल्हा होता. आमचे नेते नारायण नागू पाटील यांनी शेतकऱ्यांचा संप केला होता, त्याचे नेतृत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले होते. त्यावेळी उच्चवर्णीयांनी नारायण नागू पाटील यांच्यावर बहिष्कार टाकला. म्हणून सर्वप्रथम बहुजन समाजाचे नेतृत्व स्वीकारणारा रायगड जिल्हा आहे. रायगड जिल्हयामध्ये जरीचा सत्याग्रह व आंदोलन झाले त्यामुळे कुळ कायद्याची निर्मिती झाली. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक तेथे झाले पाहिजे. तुम्ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक लंडनला केलेले आहे. पण जेथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आंदोलन केले तेथे् स्मारक व्हावे. येथे सामाजिक न्याय मंत्री श्री.राजकुमार बडोले यांनीही भेट दिली होती.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यावर सभागृहात चर्चा सुरु आहे. मी या खात्याचा मंत्री आहे व या खात्याचे राज्यमंत्री आज उपलब्ध नाहीत. वरच्या सभागृहात माझ्या चार लक्षवेधी सूचना चालू आहेत. त्यामुळे येथे उपस्थित मंत्री महोदय त्याचे नोटींग घेतील. कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या मंत्री महोदयांनी या सभागृहात उपस्थित रहावे अशी वारंवार मागणी येत आहे. मी वरच्या सभागृहातील कामकाज संपवून उत्तराकरिता स्वतः येथे येणार आहे.

श्री.सुभाष पाटील : अध्यक्ष महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी माझ्या मतदारसंघातील मुरुड येथे वकीलीचे काम केलेले आहे. तेथेही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 125 व्या जयंतीनिमित्त त्यांचे तेथे यथोचित स्मारक झाले पाहिजे. आज सामाजिक न्याय विभागामार्फत संजय गांधी निराधार योजना ही महत्वपूर्ण योजना राबविली जाते. पण दुर्दैवाने 15 महिन्यांपासून याकरिता अध्यक्ष नाही त्यामुळे लाभार्थ्यांची निवड करणे अडचणीचे झालेले आहे. या निमित्ताने माझी मागणी आहे की, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष आमदार असावेत जेणे करुन लाभार्थ्यांची निवड करणे शक्य होईल. मी माझ्या मतदारसंघातील संजय गांधी निराधार योजनेतील बोगस 1200 नावे कमी केली आहेत. खऱ्या लाभार्थ्यांची त्यामध्ये निवड झाली पाहिजे. संजय गांधी निराधार योजनेच्या देण्यात येणाऱ्या पेन्शनमध्येही वाढ केली पाहिजे. आज त्यांचे 4-4 हजार रुपये तुम्ही अखर्चित निधी ठेवत आहात. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये बजेटच्या 20 टक्के रक्कम आरक्षित केली जाते. मी रायगड जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होतो. समाजातील शेवटच्या घटकाला त्या योजनेचा लाभ झाला पाहिजे म्हणून आम्ही कॉम्प्युटर वापरण्याकरिता लोकांना दिले व यामुळे शैक्षणिक क्रांती झाली. राज्य सरकारने या योजनेचे केंद्रीकरण न करता विकेंद्रीकरण केले पाहिजे. आलेला निधी मार्च महिन्यात न देता त्या अगोदर दिला पाहिजे. कारण या अगोदर ई-टेंडरींग नव्हती. त्यामुळे मंत्रालयातून मर्जीतील लोकांना कामे दिली जात होती. ई-टेंडरींगमुळे 3 लाखाची मर्यादा असल्यामुळे बराच निधी अखर्चित राहिलेला आहे म्हणून यामध्ये सुधारणा करावी. रायगड जिल्हयामध्ये अनुसूचित जमातीचे 3.5 लाख लोक आहेत. पण आदिवासी विकास मंत्री फक्त 70

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष पाटील.....

हजार लोकांनाच योजनेचा लाभ देतात. आम्ही वारंवार मागणी केलेली आहे. आज त्यांच्या विभागाच्या खूप मागण्या आहेत. आम्ही बराच पत्रव्यवहार केलेला आहे. एक ठिकाणीही तुम्ही निधी खर्च करीत नाहीत. लोकप्रतिनिधी तुमच्याकडे मागणी करतात तेथे तुम्हाला निधी देण्यास काय अडचण आहे ? 5 टक्के निधी पेसा योजनेतून तुम्ही आदिवासींना देता तरीही रायगडमधील 2.5 लाख लोकांना या योजनेचा लाभ होत नाही. हा अन्याय या निमित्ताने दूर करावा.

अध्यक्ष महोदय, अण्णाभाऊ साठे महामंडळात घोटाळा झाला आहे. घोटाळा करणारे जेलमध्ये गेले आहेत. पण त्या समाजातील लोकांना लाभ मिळाला पाहिजे म्हणून अण्णाभाऊ साठे महामंडळाला तत्काळ निधी देऊन त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्याची मागणी मी या निमित्ताने करतो. पुढील वर्षी सामाजिक न्याय विभागाचा एकही पैसा अखर्चित राहता कामा नये.

अध्यक्ष महोदय, आदिवासी विकास विभागाचे मंत्री येथे उपस्थित आहेत. त्यांना विनंती आहे की, आदिवासी केवळ कर्जत तालुक्यात नाहीत. रायगड जिल्हयामध्ये 15 तालुके असून या प्रत्येक तालुक्यामध्ये आदिवासी आहेत. त्यांनाही आदिवासींचे लाभ दिले पाहिजेत. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबाबत मी आपले आभार मानतो व थांबतो. धन्यवाद.

.....5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)

श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर मी बोलण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभागाने मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था निर्माण केल्यानंतर लाभार्थ्यांनी शासनाच्या लाखो रुपयांना चुना लावलेला आहे. मागील 15 वर्षात एकंदरीत पाहिले तर या संस्था निर्माण झाल्या व एका विशिष्ट लोकांना या संस्थांचा निधी देण्यात आला. आजही त्याची वसूली केली जात नाही म्हणून नव्याने निर्माण होणाऱ्या संस्थांना अनुदान दिले जात नाही. आज असंख्य मागासवर्गीय तरुण नवीन उद्योग निर्माण करु इच्छित आहेत पण त्यांना नव्याने अनुदान दिले जात नाही. त्यामुळे बुडविलेल्या संस्थांची चौकशी करण्यात यावी व वसूली करावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो. आपले सरकार आल्यानंतर लोकांच्या खूप मोठया अपेक्षा आहेत. तांडा वस्ती सुधार योजनेतून शेवटच्या घटकापर्यंत न्याय द्यायचा असेल तर त्यांच्या अध्यक्षांची आपण नेमणूक करावी, गेल्या दीड वर्षाच्या कालावधीत या नेमणूका झालेल्या नाहीत. जोपर्यंत शेवटच्या घटकाला न्याय देण्याकरिता या योजनेचा अध्यक्ष नेमत नाही, याची कमिटी निर्माण होत नाही, तर त्यांना कशा प्रकारे न्याय देऊ शकू हा खरा अर्थाने प्रश्न आहे.

यानंतर जीजी-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(अध्यक्षस्थानी माननीय अध्यक्ष)

श्री.ज्ञानराज चौगुले.....

माझी अशी विनंती आहे की, कृपया यावर लवकरात लवकर अध्यक्ष नेमून या योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे, अशी व्यवस्था शासनाने करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, केंद्रीय अनुदानित जाती आश्रमशाळा युती शासनाच्या काळात मंजूर केल्या होत्या. त्यानंतर पंधरा वर्षाच्या काळामध्ये त्या शाळांची काय अवस्था झालेली आहे ? या शाळांना निधी वेळेवर मिळत नाही. त्या शाळा व्यवस्थितपणे चालविल्या जात नाहीत. आता हे नवीन शासन सर्वसाधारण मागासवर्गीय घटकांना अनुदान देण्याची भाषा बोलत आहे. या आश्रमशाळांना शासनाने तत्काळ अनुदान द्यावे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी त्यांच्या भाषणामध्ये मागासवर्गीय सर्व योजनांच्या संदर्भामध्ये सुंदर विवेचन केलेले आहे. जे फ्रीशीपचे कोर्सेस कालबाहय झालेले आहेत,त्यांचे अनुदान बंद करुन काळाची गरज असलेल्या नवीन कोर्सेसकरिता शासनाने अनुदान देण्यास मान्यता द्यावी. आय.टी., नर्सिंग या कोर्सेसला शासनाने अनुदान दिले पाहिजे. व्हीजेएनटी, ओबीसी, एसबीसी या घटकातील विद्यार्थ्यांकरिता शासनाने हे अनुदान लागू करावे. नव्याने फ्रीशीपचा विचार करावा. जुने सरकार आणि नवीन सरकार अशी केवळ तुलना करुन भागणार नाही.

अध्यक्ष महोदय, दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजना मागासवर्गीयांसाठी असलेली हिताची योजना आहे. ज्यांच्याकडे जमीन नाही त्यांना जमीन देण्याची भाषा या माध्यमातून केली जात आहे. शासकीय दराप्रमाणे जमीन देण्याची भाषा केली जात आहे. शासकीय दरामध्ये जमीन उपलब्ध होत नाही. मार्केट रेटपेक्षा जास्त भाव व्यवहारात द्यावा लागतो. याचाही बारकाईने विचार व्हावा. या जमिनी घेण्यासाठी प्रचलित दर न मागता काही अतिरिक्त पैसे देऊन घ्यावे लागले तरी तशा पध्दतीने उपलब्ध करुन घ्याव्यात. मागासवर्गीयांच्या उत्कर्षाकरिता त्यांना जमिनी द्याव्यात.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.ज्ञानराज चौगुले.....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय मंत्री श्री.दिलीप कांबळे यांचे मी आभार मानतो. त्यांनी लोकशाही अण्णाभाऊ साठे मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळातील भ्रष्टाचाराची चौकशी करण्याकरिता सीआयडी चौकशी लावलेली आहेत. महामंडळाच्या तत्कालीन अध्यक्षांना त्यांनी जेलमध्ये पाठविलेले आहे. परंतु एवढेच करून भागणार नाही. त्या योजनेत ज्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे, इतरही मंडळी आहेत. मंडळात झालेल्या भ्रष्टाचाराच्या माध्यमातून कमाविलेले सर्व पैसे वसूल करणे गरजेचे आहे. भविष्यकाळात महामंडळाचा कारभार सुरक्षित व पारदर्शी पध्दतीने चालण्याकरिता ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. माननीय उद्योगमंत्री यांचेही मी आभार मानतो. औद्योगिक क्षेत्रात 20 टक्के जागा मागासवर्गीयांकरिता त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय,मी आता शेवटचा व अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडत आहे. या वर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 वा जयंती महोत्सव साजरा केला जात आहे. माझ्या मतदारसंघातील सालेगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थि व इतर साहित्य आहे. हे साहित्य व अस्थि ठेवण्याकरिता एक चांगले सभागृह बांधण्याची गरज आहे. याकरिता जागा उपलब्ध आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य व अस्थि या दलित समाजापुरती मर्यादित नसून सर्व समाजाला त्या प्रेरणादायी आहेत. दलितांच्या उत्कर्षाकरिता त्या भागामध्ये हे सभागृह बांधण्याची आवश्यकता आहे. दलित समाजाच्या उत्कर्षाकरिता सर्व योजनांची अंमलबजावणी तंतोतंतरित्या व काटेकोरपणे होणे आवश्यक आहे. जयंती आणि पुण्यतीथी एखादे तैलचित्र डोक्यावर घेऊन गावभर झिंग येऊन नाचण्याकरिता साज-या केल्या जात नाहीत तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आचार व विचार ख-या अर्थाने कृतीत आणण्याकरिता जयंती महोत्सव साजरा करणे आवश्यक आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थि व इतर साहित्य ठेवण्याकरिता एक चांगले सभागृह उपलब्ध असलेल्या जागेवर बांधण्याकरिता शासनाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. शासनाने इंग्लंड येथे जमीन घेतलेली आहे. इंदू मिलचा प्रश्न सोडविलेला आहे,याबद्दल मी त्यांचा मन:पूर्वक ऋणी आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रणिती शिंदे (सोलापूरद शहर-मध्य) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, वारंवार मी वेगवेगळया आयुधांच्या माध्यमातून हा प्रश्न सभागृहात मांडून त्यावर शासनाचे लक्ष वेधण्याकरिता प्रयत्न करीत आहे. कौशल्य विकास आणि उद्योजकता विकास विभागाच्या मागण्यांवर आज चर्चा सुरु आहे. गेल्या तीन दिवसांपासून महाराष्ट्रातील महिलांवर एक मोठे संकट कोसळलेले आहे. अनेकदा या सभागृहात मी त्याच्याबद्दल आवाज उठविण्याचा प्रयत्न केलेला आहे. सरकार गांभीर्याने त्याकडे लक्ष देत नाही. याबाबत माझ्या मनात प्रश्न उद्भवलेला आहे. परवा माननीय श्री. नितीन गडकरीजी सोलापूर जिल्हयात आले होते. त्यावेळी आमचे पालकमंत्री आणि सत्ताधारी पक्षाचे आमदारही त्यांच्यासमवेत आले होते. त्यांनी देखील या विषयाचा उल्लेख भाषणात केला होता. परंतु वेळेअभावी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यावर काही भाष्य केले नाही. ते त्यावर काहीतरी बोलतील अशी आम्हाला अपेक्षा होती. हा विषय महिला विडी कामगारांचा आहे. कौशल्य आणि उद्योजकता विकासासंदर्भातील आहे, म्हणून यावर मी बोलू इच्छित आहे. गेल्या एक महिन्यापासून आपल्या देशामध्ये विडी कामगारांच्या कारखानदारांचा संप चालू आहे. यामुळे या ज्या महिला विडी कामगार आहेत, त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. 01 एप्रिल,2016 पासून केंद्र शासनाने विडी विरोधक कायद्याची अंमलबजावणी केलेली आहे. विडीच्या पॅकेटवर 85 टक्के कॅन्सरची चिन्हे नमूद करण्यास केंद्र शासनाने कायद्यानुसार सांगितलेले आहे. अनेक वर्षांपासून डब्ल्यूएचओची भारत सरकारकडे ही मागणी होती. केवळ या विडी कामगार उद्योगावर पर्यायाने महिला विडी कामगार त्यावर अवलंबून असल्यामुळे कोणत्याही शासनाने याची सक्ती केली नव्हती. परंतु आता ती सक्ती करण्यात आली आहे. आम्ही या कायद्याच्या विरोधात नाही. या विडी उद्योगावर महाराष्ट्रात कमीत कमी 5 लाख महिला विडी कामगार अवलंबून आहेत. सोलापूरात 85 हजार महिला कामगार अवलंबून आहेत. देशभरात कमीत कमी 2 कोटी केवळ महिला विडी कामगार या उद्योगावर अवलंबून आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती प्रणिती शिंदे.....

या उद्योगावर महिला कामगार आणि त्यांचे परिवार अवलंबून आहेत. काही परिवारातून केवळ महिला या उद्योगातून कमवित आहेत. त्यांचे पती कमवित नाहीत. या शासनाच्या एका निर्णयामुळे 2 कोटी विडी कामगार महिलांचा संसार उध्वस्त होत आहे, हे मला शासनाच्या निदर्शनास आणावयाचे आहे.

अध्यक्ष महोदय, माझी एवढीच मागणी आहे की, शासनाने कायद्याची अंमलबजावणी करावी. परंतु एवढया सर्व महिला विडी कामगारांच्या आयुष्याचा प्रश्न आहे. तेलंगणा राज्यात देखील एवढया मोठया प्रमाणात महिला विडी कामगार आहेत. त्यांनी त्यांच्या विधानसभेत एक ठराव मान्य केला. त्यामध्ये असे नमूद केले की, आम्ही हा कायदा लागू करणार नाही. केवळ 50 टक्के कॅन्सरची चिन्हे पॅकेटवर नमूद करण्यात येतील. कायद्यानुसार विडी पॅकेटवर 85 टक्के कॅन्सरचे चिन्ह नमूद केले तर पूर्ण पॅकेट कव्हर होते. खाली ब्रॅण्डिंगकरिता कमी भाग राहतो. उद्योजकता आणि कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून शासन या ज्या 85 लाख युवकांना रोजगार देणार आहे. राज्यातील 3 लाख महिला विडी कामगारांना वा-यावर सोडले तर कसे होईल ? म्हणून मी सरकारचे लक्ष वेधू इच्छिते की, केंद्रीय विडी विरोधी कायद्यानुसार विडी उद्योग बंद केला तर महिला विडी कामगारांना पर्यायी रोजगार देणे आवश्यक आहे. तसे न करता विडी उद्योग बंद करण्याचा निर्णय सरकार घेऊ शकत नाही. त्याकरिता महाराष्ट्र शासनाने त्यामध्ये हस्तक्षेप केलाच पाहिजे, अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, तेंदू पत्ता, तम्बाखू यांचे उत्पादन आपल्याच राज्यातून होत असते, यापेक्षा मोठे मेक इन महाराष्ट्र काय होऊ शकते ? सभागृहात पालकमंत्री उपस्थित आहेत, त्यांनी काल याबाबत उल्लेख केला होता. काल माझ्या मतदारसंघामध्ये एका विडी कामगार महिलेने आत्महत्या केलेली आहे. राज्यातील शेतक-यांवर जे संकट आलेले आहे, तेच या महिला विडी कामगारांवर आलेले आहे. या विडी कामगार महिला प्रचंड प्रमाणात कर्जबाजारी असतात. एसकेएस, मायक्रो फायनान्सचे प्रतिनिधी रोज या महिलांच्या उरावर वसूलीकरिता येऊन बसतात. हे लोक महिला कामगारांच्या डोक्यावर वसूलीकरिता येऊन बसतात.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

04-04-2016 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) GG-5

JN/ AKN/ ST/ 16:30

श्रीमती प्रणिती शिंदे.....

त्यांच्या घरी लग्न किंवा मयत असली तरीही त्यांच्याकडून 100 रुपये वसूल करुन घेऊन जातात. या महिलांना मासिक पगारच केवळ 2000 ते 3000 रुपये इतका असतो. यामुळे या कर्जाची परतफेड या महिला करु शकत नाहीत.

एचएच-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती प्रणिती शिंदे.....

मुख्यमंत्री महोदयांनी या गोष्टीकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. या विषयासंदर्भात लोकसभेतील सन्माननीय खासदारांची एक समिती नेमली होती. सदर समितीमध्ये भारतीय जनता पार्टी, काँग्रेस, शिवसेना, सीपीआय अशा विविध पक्षातील सन्माननीय खासदारांचा समावेश आहे. सदर समितीने लेबर मिनिस्ट्रीला निवेदनाद्वारे सदर कायद्यात सवलत देण्याबाबत सूचना केलेली होती.

अध्यक्ष महोदय, हे मी पटलावर ठेवत आहे. 85 टक्क्यावरून 60 टक्के करावी, अशी सर्वांची मान्यता आहे. आपण त्यासंदर्भातील निर्णय द्यावा किंवा तेलंगनाच्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाकडून त्यासंदर्भातील प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवून ते आम्हाला मान्य नाही, असे सांगण्याची आवश्यकता आहे. 3 लाख महिलांना आपल्या विभागामध्ये ॲबझॉर्ब करण्याचा प्रयत्न करावा, अशी मी विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, मी कुष्ठरोगाच्या वसाहतीच्या संदर्भात बोलणार आहे. महाराष्ट्रामध्ये 34 कुष्ठरोगाच्या वसाहती आहेत. याबाबतचा उल्लेख माननीय वित्तमंत्र्यांच्या अर्थसंकल्पात झालेला नाही. कुष्ठरोगाच्या वसाहतींची अवस्था अतिशय दयना आहे. महाराष्ट्रात 7500 कुष्ठरोगी आहेत. ही आकडेवारी सामाजिक न्याय विभागाने दिलेली आहे. शासनाने महाराष्ट्रात कुष्ठरोगींसाठी एक वेगळी योजना राबविण्याची गरज आहे. शासनाच्या अनेक योजना असून, त्यामध्ये अनेक अटी आणि तरतुदी केलेल्या असतात.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्या श्रीमती प्रणिती शिंदे यांनी टेबलावर जे ठेवले आहे, ते कृपया आतमध्ये ठेवावे. ते सभागृहात आणता येत नाही.

श्रीमती प्रणिती शिंदे : अध्यक्ष महोदय, ती खाल्ली जात आहे. कुष्ठरोगींसाठी एक वेगळी योजना राबूवन कायपालट करावा अशी मी मंत्री महोदयांना विनंती करीत आहे. या योजनेसाठी एकही अट न ठेवता अशा कुष्ठरोग्यांच्या मुलांसाठी रिक्षा परमिट, घरकुल योजनांचा लाभ द्यावा, अशी मी मागणी करीत आहे. त्यांना देखील केशरी कार्डची सक्ती केली जाते. अशा लोकांना सरसकट पिवळे कार्ड देऊन न्याय द्यावा अशी मी मागणी करीत आहे.

.....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती प्रणिती शिंदे.....

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पद्मशाली समाज मोठ्या प्रमाणावर आहे. मग त्यामध्ये विडी कामगार आणि यंत्रमाग कामगारांचा समावेश आहे. यंत्रमाग विभागातील कामगारांमध्ये देखील पद्मशाली समाजाचा समावेश आहे. पद्मशाली समाजातील लोकांकडे जात पडताळणी करुन घेण्यासाठी 1968 च्या पूर्वीचे पुरावे मागितले जातात. ही अट रद्द करावी अशी माझी आग्रही मागणी आहे. पद्मशाली समाज हा आंध्रप्रदेश सोडून महाराष्ट्रात आलेला आहे. अशा लोकांनी वेगवेगळ्या पध्दतीने महाराष्ट्रात रोजगार सुरु केलेला आहे. अशा लोकांकडे 1968 च्या पूर्वीचे पुरावे नाहीत. त्यामुळे पद्मशाली समाजाला न्याय देण्यासाठी 1995 च्या पूर्वीचे पुरावे ग्राह्य धरण्याची परवानगी द्यावी अशी विनंती करीत आहे.

अध्यक्ष महोदय, भटक्या विमुक्त समाजामध्ये कैकारी समाज आहे. कैकारी समाजाला एसस्सीचा दर्जा फक्त विदर्भात दिला जात आहे. परंतु, महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये एसस्सीचा दर्जा दिला जात नाही. कैकारी समाजावर क्षेत्रीय बंधन आहे. अशा प्रकारचे बंधन उठवून सरसकट महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये एसस्सीचा दर्जा दिला जावा अशी मी आपल्या माध्यमातून मागणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी रमाई आवास योजनेंतर्गत बांधकाम परवाना आणि सातबाराची अट शिथिल केल्याबद्दल आभार व्यक्त करीत आहे.

अध्यक्ष महोदय, मी उपस्थित केलेल्या सर्व मागण्यांवर मंत्री महोदय लक्ष दिले देतील आणि मुख्यमंत्री महोदयांचे लक्ष वेधतील अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण या ठिकाणी संपविते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शशिकांत शिंदे : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या मागण्यांसंबंधी कोणते मंत्री उत्तर देणार आहेत.

अध्यक्ष : हे सन्माननीय सदस्यांना उत्तराच्या वेळी समजणार आहे.

.....4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. पंकज भोयर (वर्धा) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागातील मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी पहिल्या प्रथम सामाजिक न्याय विभागाच्या मागण्यांवर बोलणार आहे. आमच्या शासनाने 17 महिन्यांच्या कालावधीत अनेक ऐतिहासिक निर्णय घेतलेले आहेत. आमच्या शासनाने 17 महिन्यांच्या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लंडन येथील निवासस्थान, इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यदिव्य स्मारक उभारणे, महिलांसाठी 50 नवीन वसतीगृहांना मंजुरी देणे असे अनेक ऐतिहासिक निर्णय घेतलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी भाषण करीत असतांना एक खंत व्यक्त करुन दाखविली होती. आपल्या देशात छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले असे जगविख्यात थोर पुरुष होऊन गेले आहेत. आपण सर्वांनी स्वार्थाकरिता त्यांचा उपयोग जातीप्रमाणे विभागून घेतलेला आहे. असे न करता, सर्वांना समान न्याय देण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभागामध्ये एससीबीसी, व्हीजेएनटी, ओबीसी प्रवर्गाचा समावेश आहे. त्यांच्या न्याय मागण्यांवर सभागृहाने विचार करण्याची गरज आहे. दिनांक 29 मे, 2003 मध्ये राज्य शासनाने इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा महत्वपूर्ण ऐतिहासिक निर्णय घेतलेला होता. प्रत्यक्षात केंद्र शासनाने त्यांच्यासाठी 1998 मध्ये योजना लागू केली होती. परंतु, एक पंचवार्षिक योजना गमाविल्यानंतर 2003 सालापासून राज्यामध्ये ही योजना सुरु झाली होती. ओबीसी प्रवर्गामधील इंजिनिअरचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षणाची सोय मिळाली असा त्यांचा समज झाला. परंतु, असे विद्यार्थी ज्यावेळी शिक्षण घेण्यासाठी गेले, त्यावेळी त्यांना 50 टक्के फी महाविद्यालयात भरावी लागणार, असे लक्षात आले होते. शासन निर्णयात असे नमूद केलेले आहे की, ज्या पध्दतीने अनुसूचित जाती आणि जमातीसाठी ही योजना लागू आहे, त्याच पध्दतीने त्याच धर्तीवर त्याच अटी आणि शर्तीसहित इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देखील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. पंकज भोयर.....

त्या योजना लागू राहील. संबंधित विद्यार्थ्यांना महाविद्यालयात गेल्यानंतर 50 टक्के फी भरावी लागली, याचे चिंतन मंत्री महोदयांनी करावे, असे मला या ठिकाणी वाटत आहे. अनुसूचित जाती, जमातीमधील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण घेण्यासाठी एकूण 950 योजनांचा लाभ मिळतो. मात्र इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांना केवळ 150 अभ्यासक्रमाकरिता ही योजना लागू आहे. यामधील 800 अभ्यासक्रम कोठे गेले याबाबत विभागाला कोणतीही माहिती देता आली नाही. मी यासंदर्भात संबंधितांकडे वारंवार पाठपुरावा केलेला आहे. विधिमंडळातील इतर मागासवर्ग समितीमध्ये माझी सदस्य म्हणून नेमणूक झाली. समितीमध्ये सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुटे हे समिती प्रमुख म्हणून काम करीत आहत. समितीमधील सर्व सन्माननीय सदस्यांनी अनुसूचित जाती, जमातीमधील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण घेण्यासाठी एकूण 950 योजनांचा लाभ दिला जातो आणि इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांना केवळ 150 अभ्यासक्रमाकरिता ही योजना लागू आहे, यामधील 800 अभ्यासक्रम कोठे गेले अशी विचारणा सामाजिक न्याय विभागाकडे केली होती. त्यावेळी सामाजिक न्याय विभागाने इतर सर्व अभ्यासक्रम झेडमध्ये टाकले आहेत, असा खुलासा दिला होता. समितीने झेडग्रुपची डेफिनेशन विचारली होती. शासनाकडे एग्रुप, बीग्रुप, झेडग्रुप, अभ्याक्रम लागू आहे, यासंदर्भातील कोणतीही यादी किंवा ॲथेंटीक डॉक्युमेंट नसल्यामुळे मी या विषयी मंत्री महोदयांकडून न्यायाची अपेक्षा करणार आहे. एससी, एसटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सर्व अभासक्रम लागू आहे, त्याच धर्तीवर इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम लागू करावा, अशी माझी आग्रही मागणी आहे. संबंधित विद्यार्थ्याने बीई मॅकेनिकलचे शिक्षण घेतले तर त्याला शिष्यवृत्ती मिळते. त्यानंतर असा विद्यार्थी एमईचे शिक्षण घेण्यासाठी जातो, त्यावेळी त्याची शिष्यवृत्ती बंद झाल्याचे त्याला समजते. परिणामी त्याचे शिक्षण अर्धवट राहते. यासंदर्भात विभागाने योग्य तो खुलासा देण्याची गरज आहे. या विषयाच्या संदर्भात समितीने सामाजिक न्याय विभागाची अनेक वेळा साक्षी घेतलेल्या आहेत. सदर साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांना त्याचे उत्तरे देता आले नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.पंकज भोईर....

सन 2011-2012 पासून सामाजिक न्याय विभागाने शिष्यवृत्ती देण्याची ऑन लाईन देण्याची योजना सुरु केली आहे. विद्यार्थ्यांना ऑन लाईन शिष्यवृत्तीचा फायदा झाला किंवा कसे, यावर चिंतन करण्याची गरज आहे. यावर्षी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, ओबीसी, तसेच एसबीसी अशा प्रवर्गातील जवळपास 18 लाख विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी अर्ज केले, परंतु मार्च महिना अखेर केवळ 6 लाख विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर झाले. यासंदर्भात आम्ही विभागाला माहिती विचारली तर आम्हाला सांगण्यात येते की, हे काम आम्ही मास्टेक कंपनीला दिलेले आहे. मास्टेक कंपनीला विचारले तर तेथे फक्त दोन कर्मचाऱ्यांचा स्टॉफ आहे त्यामुळे हे दोन कर्मचारी सात लाख विद्यार्थ्यांना न्याय देऊ शकणार नाही. मास्टेक कंपनीशी करार कसा केला, त्यांना बिलापोटी किती रक्कम दिली, वेळोवेळी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळते की नाही, याबाबत मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात खुलासा केला पाहिजे.

अध्यक्ष महाराज, मला सांगण्यास खेद वाटतो की, ओबीसी प्रवर्गासाठी वसतिगृहे तसेच निवासी आश्रमशाळा एकही नाही, परंतु जेथे आवश्यकता नसताना इतर प्रवर्गासाठी आश्रमशाळा काढली जाते. माझ्या भागात विमुक्त जाती भटक्या जमातीसाठी एक आश्रमशाळा काढली आहे, परंतु तेथे विमुक्त जाती, विमुक्त जमातीचे विद्यार्थी अत्यंत कमी असून शिक्षकांची संख्या जास्त आहे. विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या आश्रमशाळांमध्ये ज्या जागा रिक्त आहेत तेथे 20 टक्के, 30 टक्के ओबीसी प्रवर्गातील मुलांना शिक्षणाची संधी दिली पाहिजे. ओबीसी प्रवर्गाचा अनुशेष अनेक क्षेत्रामध्ये आहे. सामाजिक न्याय विभाग ओबीसी प्रवर्गाला न्याय देऊ शकत नसेल तर ओबीसी वर्गाकरिता एक स्वतंत्र खाते निर्माण करावे, अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिपक चव्हाण (फलटण) : अध्यक्ष महाराज, सन 2016-2017 च्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, कौशल्य आणि उद्योजकता विभागाच्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांना विरोध करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, उपयोजनेकरिता निधी खर्च करण्यामध्ये सरकारची उदासिनता दिसून येते. अनुसूचित जातीकरिता 4072 कोटी रुपये खर्चाविना पडून आहेत. जवळ जवळ 68 टक्के निधी अखर्चित राहिला आहे. आदिवासी विभागामध्ये 3045 कोटी रुपये अखर्चित आहेत. सरकार नवीन घोषणा करते, परंतु त्याची अंमलबजावणी मात्र करीत नाही. शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्य 125 व्या जयंती निमित्ताने 170 कोटी रुपयांची तरतूद केली. राज्यातील संपूर्ण मागासवर्गीय मुला/मुलींच्या वसतिगृहासाठी 220 कोटी रुपयांची तरतूद केली, परंतु ही अल्पशी तरतूद आहे. परंतु ही वसतिगृहे पूर्ण करावयाची असतील तर यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली पाहिजे. शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना जाहिर केली. मागील वर्षात विशेष घटक योजनेमध्ये जे अपयश आलेले आहे, ज्या प्रमाणात त्या समाजातील लोकांना फायदा मिळायला पाहिजे होता, तेवढ्या प्रमाणात मिळाला नाही. शासनाने योजना जाहिर केली, परंतु त्या योजनेचे निकष जाचक आहेत. या योजनेसाठी उत्पन्नाच्या अटीमुळे लाभार्थी कसे निवडावेत, यासंदर्भात स्पष्टता असली पाहिजे तरच ही योजना यशस्वी होऊ शकेल.

अध्यक्ष महाराज, राज्यात वेगवेगळे महामंडळे आहेत. इतर मागासवर्गीय महामंडळ, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ या महामंडळाच्या माध्यमातून लोकांचा विकास झाला पाहिजे. या महामंडळांची परिस्थिती बघितली तर यामध्ये अनेक केसेसमध्ये गैरव्यवहार झालेले आहेत. या महामंडळांच्या माध्यमातून बँका लाभार्थ्यांना कर्ज देत नाहीत. एखाद्या लाभार्थ्याला कर्ज दिले तर त्या कर्जाचे हप्ते महामंडळाच्या माध्यमातून गेले पाहिजेत, परंतु तसे होत नाही. महामंडळ आणि बँका यांच्यामध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. या बाबींमध्ये शासनाने मध्यस्थी करण्याची गरज आहे. बऱ्याच वेळेला दलित कुटुंबावर अन्याय होतो. एखादे प्रेम प्रकरण असेल किंवा इतर किरकोळ घटना घडल्या असतील तर शासनाने त्यासाठी सामाजिक प्रतिबंधक कायदा जाहिर केलेला आहे, परंतु त्याची अंमलबजावणी लवकरात लवकर केली तर अशा गोष्टींना आळा बसेल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिपक चव्हाण...

अध्यक्ष महाराज, सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून अनेक योजना कार्यान्वित आहेत. यासंदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या की, या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाहीत म्हणून शासनाने या योजनेचे निकष शिथील केले पाहिजेत. संजय गांधी निराधार योजनेची रक्कम 1500 रुपयांपर्यंत वाढविली पाहिजे. यासाठी उत्पन्नाची अट 25 हजार रुपये आहे ती 50 हजार केलीतर खऱ्या अर्थाने या लोकांना फायदा होऊ शकेल.

अध्यक्ष महाराज, विधवा स्त्रियांसाठी 45 वर्षे वयाची अट आहे ती कमी केली पाहिजे. एखादी स्त्री तरुणपणी विधवा झाली तर त्या तरुणीने कोणाकडे मदत मागायची? म्हणून वयाची अट काढून टाकावी. सर्व विधवा महिलांना मदत मिळाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महाराज, कास्ट व्हॅलिडिटीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी सन 1950 पूर्वीचे पुरावे मागितले जातात. विमुक्त जाती, भटक्या जमाती प्रवर्गासाठी 1961 पूर्वीचे तर ओबीसी साठी 1965 पूर्वीचे आणि एसबीसी प्रवर्गासाठी 1995 पूर्वीची पुरावे मागितले जातात. अशा वर्गवारीतील मुलांचे पालक हे अशिक्षित असतात त्यामुळे अशा प्रकारचे पुरावे त्यांचेकडे मिळत नाहीत. म्हणून पुराव्याचा कालावधी दहा वर्षानी कमी केला पाहिजे जेणेकरुन वंचित लोकांना याचा फायदा होऊ शकेल.

अध्यक्ष महाराज, अपंगाची 2776 पदे रिक्त आहेत. ही पदे लवकरात लवकर भरली पाहिजेत. गेल्या पंधरा, सोळा वर्षात 8 लाख 20 हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळाली नाही, यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेण्याची गरज आहे.

अध्यक्ष महाराज, घरकुल योजनेसाठी दारिद्रय रेषेची अट रद्द करावी. आंगणवाडी सेविकांना अतिशय तुटपूंजे मानधन दिले जाते. महाराष्ट्र राज्य हे देशात प्रगत राज्य आहे. इतर राज्यामध्ये आंगणवाडी सेविकांना 7 हजार रुपये मानधन मिळते, याप्रमाणे आपल्या राज्यातील आंगणवाडी सेविकांना मानधन दिले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, ऑगस्ट, सप्टेंबर मध्ये ग्राम पंचायतीच्या निवडणुका झालेल्या आहेत, परंतु अजूनही त्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र मिळाले नाही. जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिपक चव्हाण...

महिन्याची मुदत दिली जाते म्हणून लवकरात लवकर जात प्रमाणपत्रे त्यांना मिळाली पाहिजेत. मी या अर्थसंकल्पाच्या मागण्यांना विरोध करुन माझे दोन शब्द पुरे करतो.

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुरेश गोरे (खेड-आळंदी) : अध्यक्ष महाराज, सन 2016-2017 च्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर सहमती दर्शविण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. जिल्हा परिषदेचा 20 टक्के निधी वैयक्तिक लाभाच्या योजनेसाठी खर्च केला जातो. या योजनेसाठी लाभार्थी दारिद्रयरेषेखालील असावा किंवा त्याचे उत्पन्न 50 हजार रुपये असावे, अशी अट आहे. यामुळे दारिद्रय रेषेखालील बीपीएल लोकांना त्याचा लाभ घेता येत नाही, ही अडचण आहे. बीपीएलचे जे अर्ज येतात, त्यामध्ये 50 हजार रुपये उत्पन्नाची अट असल्यामुळे बीपीएल तरुणांना या योजनेचा लाभ घेता येत नाही, ही मुख्य अडचण आहे. त्याकरिता ग्रामसभेमधून लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक आहे.

यानंतर JJ-1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुरेश गोरे ...

त्यामध्ये बीपीएल कार्डधारकांना प्राधान्य द्यावे, अशा सूचना आपल्या खात्यामार्फत देणे गरजेचे आहे. वैयक्तिक लाभाच्या योजना आहेत, त्यामध्ये आम्ही अनेकवेळा पाहतो की, वारंवार एकाच कुटुंबातील बऱ्याच व्यक्तींना दरवर्षी त्याचा लाभ दिला जातो. त्यावर काही बंधने असणे गरजेचे आहे. एकाच कुटुंबाला किती वेळा मदत द्यावी, याबाबत काही नियम असावेत, काही नियंत्रण असावे, अशी आमची मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, शासकीय वसतिगृहात इयत्ता आठवी पासून ते पदवीपर्यंतचे शिक्षण घेण्याकरिता प्रवेश दिला जातो. अनेक खाजगी वसतिगृहांमध्ये इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. त्यामुळे इयत्ता पहिलीपासूनच्या विद्यार्थ्यांना यामध्ये वंचित राहावे लागते, ही मुख्य अडचण आहे. शासकीय व खाजगी दोन्ही वसतिगृहांमध्ये इयत्ता पहिलीपासून प्रवेश देण्याची मुभा असावी, अशी एक सूचना नव्याने करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, बहुतांश वसतिगृहांमध्ये आम्ही पाहतो की, कॉम्प्युटर लॅबची सोय नाही. विभागस्तरावर कॉम्प्युटर लॅबची सोय आहे, मात्र तालुकास्तरावरील वसतिगृहांमध्ये कॉम्प्युटर लॅबची सोय नाही. ती करण्याची व्यवस्था या अर्थसंकल्पामध्ये असली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, ज्या भागामध्ये एमआयडीसीचे मोठे क्षेत्र आहे, अशा ठिकाणी मागासवर्गीयांसाठी व्यवसाय प्रशिक्षणाच्या काही सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. या एमआयडीसीमध्ये मागासवर्गीयांकरिता प्रशिक्षण केंद्र सुरु करावे, त्यासाठी काही सहकार्य करावे, अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

अध्यक्ष महोदय, एमआयडीसीमध्ये किंवा त्या कार्यक्षेत्रामध्ये महिला कामगारवर्ग फार मोठ्या प्रमाणावर काम करतो, तेथे महिलांकरिता वसतिगृहाची सोय व्हावी. महिलांच्या सुरक्षेसाठीची व्यवस्था त्या वसतिगृहात असावी, अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघात विशेषत: चाकण येथे मोठे औद्योगिक क्षेत्र असून तेथे औद्योगिकरण झालेले आहे. तेथे मागासवर्गीय वसतिगृह सुरु करण्याची मी मागणी करतो. शासकीय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुरेश गोरे ...

वसतिगृहांची क्षमता, त्यामध्ये असलेली संख्या वाढविली पाहिजे. खेड, चाकण या माझ्या मतदारसंघातील मोठ्या शहरांमध्ये एस.सी. व एस.टी. प्रवर्गातील मुलामुलींकरिता अनाथाश्रम सुरु करण्याची मागणी मी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, एस.सी., एस.टी. व व्हीजेएनटी प्रवर्गातील इयत्ता पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांना वर्षाला आपण शिष्यवृत्तीपोटी 500 ते 1000 रुपये देतो. गेल्या 10 वर्षांमध्ये त्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ झालेली नाही. ती वाढ आता करणे आवश्यक आहे. 500 ते 1000 रुपयांत आताच्या परिस्थितीत काही होईल असे मला वाटत नाही. त्यामुळे आता त्यात वाढ करणे, ही या खात्याची गरज आहे. विशेष घटकांतील मुलांमुलीकरिताच्या वसतिगृहांची संख्या वाढवावी. मोठ्या लोकसंख्येच्या गावात अशी वसतिगृहे असावीत. विशेषतः ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये वसतिगृहे सुरु करण्याची मागणी मी या निमित्ताने करतो. अशा मोठ्या गावांची यादी मी मंत्री महोदयांकडे देत आहे. त्या गावामध्ये मोठे क्षेत्र असल्याने दुसऱ्या ठिकाणी असलेल्या वसतिगृहात जाण्याकरिता विद्यार्थ्यांना लांबचा प्रवास करावा लागतो, अशा अनेक गैरसोयी पाहिल्या तर जागोजागी अशी वसतिगृहे उभी करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, या विभागीय अनुदानाच्या मागण्यांवर बोलताना या अर्थसंकल्पाला सहमती दर्शवून मी थांबतो.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राहूल कुल (दौंड) : अध्यक्ष महोदय, अर्थसंकल्पीय विभागीय मागण्यांच्या चर्चेमध्ये मी शासनाला पाठिंबा देण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, शासनाने चांगला न्याय देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून केलेला आहे. परंतु, काही बाबतीत मात्र सुधारणा होणे अपेक्षित आहे. राज्यामध्ये एकूण 25 जात पडताळणी समित्या आहेत. या माध्यमातून या समाजाला न्याय मिळण्याची अपेक्षा आहे, परंतु, त्यातील फक्त 3 समित्यांवर पूर्ण काळ अध्यक्ष आहेत. इतर समित्यांवर मात्र पर्यायी व्यक्ती किंवा दुसऱ्या व्यक्तीकडे चार्ज दिलेला आहे. त्यामुळे त्या ठिकाणी जात पडताळणीचे कामकाज म्हणावे तितक्या सुरळीतपणे होत नाही. भ्रष्टाचाराच्या प्रचंड तक्रारी आहेत. प्रचंड शिथिलता या कामकाजामध्ये आहे. यामध्ये बदल करण्याची अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यमंत्री महोदयांनी एका प्रश्नाच्या उत्तरामध्ये सांगितले होते की, विशेषत: भिल्ल, फासेपारधी या समाजाकडे कोणत्याही प्रकारचे पुरावे उपलब्ध नाहीत. आपण मुस्लीम समाजातील मागासवर्गीयांना मौला, मौलवी या त्यांच्या मंडळीकडून दिल्या जाणाऱ्या दाखल्यानुसार जात पडताळणी प्रमाणपत्र देतो. तशाच प्रकारची काही तरी नवीन व्यवस्था विशेषत: भिल्ल, फासेपारधी या समाजाकरिता तसेच इतर जातींकरिता निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, धनगर आरक्षणाच्या बाबतीतील प्रश्न बरेच वर्षे प्रलंबित आहे. मुख्यमंत्री महोदयांनी सातत्याने आश्वासन दिलेले आहे, त्याबाबतीतही शासनाने त्वरित निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, अपंग, अंध मुलांकरिता आपण शाळा सुरु केल्या. परंतु, त्यांचे अनुदान मिळत नाही. या शाळा सुरु आहेत. परंतु, बऱ्याच ठिकाणी त्यांना अनुदान मिळत नाही, तेथील कर्मचाऱ्यांना पगार मिळत नाही, अशी परिस्थिती आहे. या संस्थांना त्वरित अनुदान द्यावे, अशाप्रकारची मागणी मी करतो.

अध्यक्ष महोदय, काही जिल्ह्यांमध्ये मतीमंद विद्यार्थ्यांकरिता अतिशय चांगल्याप्रकारे शाळा सुरु आहेत. मतीमंद विद्यार्थी हा पालकांसमोरचा अतिशय गंभीर प्रश्न आहे. या विद्यार्थ्यांना सांभाळण्याचे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राहूल कुल .....

काम काही शाळा करीत आहेत. याबाबत काही तरी दूरगामी निर्णय व्हावा. मतीमंद विद्यार्थ्यांकरिता चांगल्या पध्दतीने सुरु असलेल्या या शाळांना अनुदान देण्याच्या बाबतीत शासनाने काही तरी धोरण राबवावे, अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, इतर योजनांकरिता चांगल्याप्रकारचा निधी उपलब्ध आहे. परंतु, तांडा वस्तीसाठी मात्र निधीची कमतरता आहे. तांडा वस्तीसाठी जादाचा निधी उपलब्ध करावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, शासनाने वेगवेगळ्या प्रकारच्या मर्यादा वेगवेगळ्या वैद्यकीय सोयींकरिता किंवा दारिद्र्यरेषेकरिता निश्चित केलेल्या आहेत. आता वैद्यकीय सेवा मिळावी याकरिता 50 हजार रुपयांच्या उत्पन्न मर्यादेची अट आहे. परंतु, आताच्या परिस्थितीचा विचार केला तर, कुठलेच कुटुंब 50 हजार रुपयांच्या उत्पन्न मर्यादेच्या अटीमध्ये बसत नाही. या सर्वच अटींबाबत शासनाने फेरविचार करुन बदलण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघातील दौंड या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणावर मागासवर्गीय लोकसंख्या आहे. तेथे निवासी शाळा व वसतिगृह सुरु करावे, अशाप्रकारची खूप दिवसांपासूनची मागणी आहे. यावर्षी तरी त्यावर निर्णय व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, कौशल्य विकासासंदर्भात पंतप्रधान महोदयांनी एक चांगला कार्यक्रम हाती घेतलेला आहे. परंतु, त्याविषयी खूप शंका सर्वसामान्य जनतेमध्ये आहेत. यामधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना आपण नोकरीमध्ये प्राधान्य दिले किंवा त्यांना शासनाच्या माध्यमातून काही अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिले तरच या कार्यक्रमाचा उपयोग होईल. त्या दृष्टिकोनातून शासनाने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अनेक सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, ...

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य आपण खाली बसावे. या चर्चेकरिता मंत्री महोदयांच्या उत्तरासहित 3 तास इतका वेळ होता. आपण चर्चेकरिता 3 तास दिलेले आहेत. अजून मंत्री महोदयांची उत्तरे बाकी आहेत. त्यानंतर म.वि.स. नियम 293 अन्वयेची चर्चा आहे. त्या चर्चेवरील सर्व भाषणेही आपल्याला आज संपवायची आहेत. त्यामुळे ज्या सन्माननीय सदस्यांना मागण्यांवर बोलण्याकरिता संधी मिळाली नाही, त्यांनी कृपया म.वि.स. नियम 293 अन्वयेच्या चर्चेमध्ये बोलावे. आता मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री. दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या आर्थिक वर्ष सन 2016-2017 च्या सभागृहाला सादर केलेल्या योजनांतर्गत ... (अडथळा) ....

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, विनंती आहे की, आज सामाजिक न्याय व इतर विभागाच्या मागण्यांवरील चर्चा आहे. त्यामुळे कोणावर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. अध्यक्ष महोदय, आपण म्हटल्याप्रमाणे म.वि.स. नियम 293 अन्वयेच्या चर्चेकरिता आम्ही उशिरापर्यंत थांबू व त्या चर्चेला न्याय देऊ.

अध्यक्ष : उद्या पुन्हा सत्ताधारी पक्षाचा म.वि.स. 293 अन्वयेचा प्रस्ताव आहे. आजची म.वि.स. नियम 293 अन्वयेची चर्चा उद्यावर गेली तर उद्या या म.वि.स. नियम 293 अन्वयेच्या प्रस्तावांवर चर्चा कधी करणार ?

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : अध्यक्ष महोदय, आपली उशिरापर्यंत चर्चा करण्याची सूचना आम्ही अमान्य केलेली नाही. आपण आपल्या सूचनेप्रमाणे पुढे जाऊ.

अध्यक्ष : मी अजून केवळ दोन सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देईन.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री आसिफ शेख (मालेगाव मध्य) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 की अनुदानों की मांगों पर बोलने के लिए मैं खड़ा हुआ हू.

अध्यक्ष महोदय, मैं सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग तथा कौशल्य विकास एवं उद्योजगता विभाग पर अपने विचार व्यक्त करना चाहता हूं. यहाँ पर सामाजिक न्याय विभाग के मंत्री महोदय उपस्थित है. एक साल पहले नागपुर अधिवेशन में,...मुस्लिम शाह छप्परबंद समाज पहले ओबीसी वर्ग में आता था. लोकशाही आघाडी सरकार ने इनको वीजेएनटी का दर्जा दिया. संपूर्ण महाराष्ट्र में इस समाज को न्याय मिला इस तरह का शासन ने उस समय निर्णय लिया. बीच के कार्यकाल में मुस्लिम शाह छप्परबंद जो समाज है, जिसके दाखले पर मुस्लिम शाह छप्परबंद लिखा रहेगा उसका ही विजेएनटी में माना जाता है. नागपुर के अधिवेशन में आश्वासन दिया गया था कि इस बारे में एक महीने में बैठक लेकर निर्णय लिया जाएगा. मेरी मांग है कि इस बारे में तीन पूरावे न लेते हुए, पहले एक पूरावे पर विजेएनटी का प्रमाणपत्र मिलता था, लेकिन अब तीन पूरावे मांगने के कारण समस्या आती है. सभी लोग पूरावे नहीं ला पाते है. वह तो मुस्लिम है. उसको पूरावे की आवश्यकता नहीं है. उनके आगे छप्परबंद लिखा होना चाहिए या शाह या फकीर लिखा होना चाहिए. एक पूरावा लाया जाएगा तो भी उसको प्रमाणपत्र मिलना चाहिए. फकीर, शाह या छप्परबंद लिखा है तो उसके आधार पर प्रमाणपत्र मिलना चाहिए. आप सभी पूरावे मांगेंगे तो वह समाज सभी पूरावे नहीं ला सकता. यह समाज बहुत ही बिकट परिस्थिति में रहता है. मुस्लिम बिरादरी में यह समाज भीख मांगकर अपना गुजरबसर करता है. उसको पहले की सरकार ने न्याय दिया था. लेकिन आज उनके साथ अन्याय हो रहा है. यह बड़े दुख की बात है. मेरी विनती है कि इस बारे में आप अपने जवाब में जरूर खुलासा कीजिए.

अध्यक्ष महोदय, मालेगांव क्षेत्र में, मालेगांव तालुका में एक भी वसतीगृह नहीं है. लेडिज होस्टल नहीं है. अल्पसंख्यक विभाग को हमने प्रपोजल दिया है. मालेगाव शहर में वसतीगृह और लेडिज होस्टल होना चाहिए. मेरी मांग है कि आप इसको मंजूरी दीजिए. मैं अल्पसंख्यक विभाग का बहुत आभारी हूं कि उन्होंने मालेगाव शहर में आईटीआई कॉलेज की मंजूरी एक सप्ताह पहले दी. इसकी फाईल कौशल्य विकास विभाग के पास बजट के लिए आयी है. इसका बजट मंजूर करते हुए हमारी मांग पूरी की जानी चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

---*---

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मेघा कुलकर्णी (कोथरुड) : अध्यक्ष महोदय, 2016-2017 च्या सामाजिक न्याय विभागाच्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभी आहे.

अध्यक्ष महोदय, ज्येष्ठ नागरिक या विभागाच्या अंतर्गत येतात. परंतु या विषयावर कोणी सन्माननीय सदस्य बोलले नसल्यामुळे यावर मी थोडे बोलणार आहे. मी माननीय मंत्री महोदयांचे आभार मानते. याचे कारण म्हणजे हिवाळी अधिवेशनामध्ये मी यासंदर्भातील लक्षवेधी मांडली होती. तेव्हा केंद्रातील नियमाप्रमाणे महाराष्ट्रात सुद्धा ज्येष्ठ नागरिकांच्या वयाची अट 65 वर्षावरुन 60 वर्ष करण्याबाबत अतिशय सकारात्मक भूमिका घेतली होती.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये जवळजवळ दीड कोटी ज्येष्ठ नागरिक असून त्यातील जवळजवळ 30 लाख ज्येष्ठ नागरिक 60 ते 65 या वयोगटात येतात. आतापर्यंत इतर राज्यांमध्ये ज्या पद्धतीने 60 ते 65 या वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना न्याय मिळतो. 14 वर्षे हा लढा फेस्कॉप आणि एस्कॉपच्या माध्यमातून लढला जात असताना ज्येष्ठ नागरिकांना 14 वर्षे न्यायापासून वंचित ठेवले गेले. माननीय मंत्री महोदयांनी मागील अधिवेशनामध्ये आश्वासन दिले होते की, आता पुढील काळामध्ये ज्येष्ठ नागरिक न्यायापासून वंचित रहाणार नाही. त्यांचे अनेक प्रश्न आहेत. त्यांच्या आरोग्याचा प्रश्न आहे, सुरक्षिततेचा मुद्दा आहे, उपजिविकेच्या साधनांचा मुद्दा आहे, अपुरा पैसा आणि त्यांच्या मुलांकडे देखील तेवढ्या मोठ्या प्रमाणात त्यांना सांभाळण्याची ताकद नसेल तर अशा वेळी त्यांच्याकडेही औषधोपचारासाठी पुरेसा पैसा उपलब्ध रहात नाही. आपल्या डोळ्यासमोर घरेलू कामगार महिला येते की, जी 60 वर्षानंतर काबाडकष्ट करु शकत नाही. हमाल जमातीतील लोक, शेतकरी, कष्टकरी, कामगार वर्गातील लोकांना देखील श्रावणबाळ योजना, संजय गांधी योजना किंवा एसटीची सवलतीची योजना इत्यादींचा लाभ द्यायचा असेल तर लवकरात लवकर यासंदर्भातील जीआर मंजूर होणे आवश्यक आहे. परंतु या अर्थसंकल्पामध्ये याकरिता तरतूद केलेली नाही. सरकार अडचणीत आहे, मोठ्या प्रमाणात सरकारवर कर्ज आहे. परंतु ज्येष्ठ नागरिकांची जबाबदारी शासनाने उचलली असल्यामुळे आपण इतर कॅटेगिरीला न्याय देतो त्याप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांच्या कॅटेगिरीला देखील न्याय देण्याच्या दृष्टीने या अर्थसंकल्पामध्ये आवश्यक ती तरतूद करण्यात यावी, अशी मी विनंती करते. मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानते आणि थांबते. धन्यवाद.

---*---

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदीप नरके (करवीर) : अध्यक्ष महोदय, मी 2016-2017 च्या कौशल्य विकास आणि सामाजिक न्याय विभागाच्या अनुदानाच्या मागण्यांवर माझे मत मांडण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान चालू झालेले आहे. या अभियानाबद्दल मला एवढेच सुचवायचे आहे की, कौशल्य विकास योजनेमध्ये लघूउद्योग आणि औद्योगिकरणामध्ये असणारे कोर्सेस समाविष्ट न करता, शेतीपुरक व्यवसायाचाही समावेश करण्यात यावा. आपण पाहिले तर देशात आणि राज्यामध्ये 55 ते 60 टक्के लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत आणि 45 टक्के लोक नागरिकरणामध्ये आलेले आहेत. या कौशल्य विकास योजनेमध्ये शेतीपुरक योजना घेण्यात याव्यात. कौशल्य विकास योजनेमार्फत त्याकरिता मार्गदर्शन करण्यात यावे. गुळ उत्पादन, ग्रीन हाऊसेस किंवा शेतीमधील नवनवीन प्रयोग असतील ते या योजनेमध्ये समाविष्ट करण्यात यावेत.शेती व्यवसायातून आणि शेतकऱ्यांच्या माध्यमातून आलेला पैसा राज्यामध्ये आला, तर इतर व्यवसाय वाढीसाठी त्याचा उपयोग होतो. हा दृष्टीकोन ठेवून शेतीपुरक उद्योगाला या योजनेमध्ये समाविष्ट करुन घेण्यात यावे. तसेच संजय गांधी श्रावणबाळ योजनेच्या अनुदानासंदर्भात मंत्री महोदयांनी घोषणा केली. त्यानुसार 1 हजार रुपये दिले जाणार आहे. आपले विधानपरिषदेतील एका प्रश्नाचे उत्तर मी वाचले आहे. त्यानुसार आपण संजय गांधी किंवा श्रावणबाळ योजनेसाठी 1500 रुपयांचे अनुदान देणार आहात. आज हजार आणि पंधराशे रुपयांमध्ये काहीच येत नाही. माझी मागणी आहे की, या अनुदानामध्ये जास्तीत जास्त वाढ करुन राज्याचा हिस्सा वाढवावा.

अध्यक्ष महोदय, संजय गांधी श्रावणबाळ योजनेच्या पात्र लाभार्थ्यांचा दरवर्षी सर्व्हे केला जातो. या सर्व्हेमध्ये अनेक लाभार्थी अपात्र होत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये माझ्या मतदार संघामध्ये किंवा वेगवेगळ्या मतदार संघातील अनेक पात्र लाभार्थी अपात्र होत आहेत. मला वाटते की, हा सर्व्हे दरवर्षी घेतला जाणार आहे. त्यामुळे पूर्वीच्या सर्व्हेमध्ये पात्र असलेल्या लाभार्थ्यांना या सर्व्हेमधून अपात्र केले तर यामध्ये योग्य होणार नाही. पूर्वीच्या यंत्रणा पात्र, अपात्र ठरविताना सक्षम होती की, नाही यासंदर्भात विचार करावा लागेल. पात्र लाभार्थ्यांना अपात्र करु नये, अशी मी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. चंद्रदीप नरके.....

अध्यक्ष महोदय, ग्रामपंचायतीच्या निवडणूका झाल्या आणि अनेक सरपंच आणि उप सरपंचाची सहा महिन्यात जात पडताळणी करायची होती. परंतु जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यालयातून सहा महिन्यात जात प्रमाणपत्राची पडताळणी न झाल्यामुळे अनेक ठिकाणी ग्रामपंचायत सदस्य किंवा सरपंच अपात्र होत आहेत. याकरिता जात प्रमाणपत्र पडताळणी समिती दोषी आहे. त्यामुळे ग्रामपंचायत सदस्यांवर अशा पद्धतीचा अपात्रतेचा निर्णय घेण्यात येऊ नये. सामाजिक न्याय विभागामार्फत सहा महिन्याच्या आत पडताळणी करावी किंवा ज्यांचे अर्ज पडताळणीसाठी सहा महिन्यापूर्वी आले आहे आणि अशा प्रमाणपत्राची पडताळणी समिती करु शकली नाही, तर अशा सदस्यांना अपात्र करु नये, अशी मी विनंती करतो आणि थांबतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मला आपल्याकडून माहिती हवी आहे. कृपया मला बोलण्याची संधी द्यावी.

अध्यक्ष महोदय, दिनांक 31 मार्च 2016 रोजी 293 चा प्रस्ताव ऑनलेग ठेवण्यात आला होता. त्या दिवशी प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल म्हणून सर्वजण क्रिकेट बघत असताना मी सभागृहामध्येच बसून होतो. परंतु प्रस्तावावर चर्चा झाली नाही. दिनांक 1 एप्रिल रोजी देखील प्रस्ताव होईल असे वाटत असताना डिमांडची चर्चा 7.30 ते 8.00 वाजेपर्यंत चालल्यामुळे प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही. आज देखील विभागावर चर्चा सुरु आहे. किमान हा प्रस्ताव चर्चेला येणार आहे काय, एवढीच माहिती आपल्याकडून हवी आहे.

अध्यक्ष : सदरहू प्रस्ताव आजच चर्चेला येणार असून आजच पूर्ण करायचा आहे.

---*---

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलडाणा) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा उपस्थित करीत असताना मी माननीय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. मतिमंद मुलांसाठी आणि मुलींसाठी बालगृह चालविली जातात. गेल्या काही काळामध्ये सदरचा कारभार महिला व बाल कल्याण विभागाच्या माध्यमातून चालविला जात होता. मात्र हा विभाग आपल्याकडे हस्तांतरित झाल्यानंतर ही बालगृह चालविण्यासंदर्भात आपल्या विभागाने दिनांक 22 जून 2015 रोजी एक जीआर काढला होता. सदरच्या जीआरमध्ये कर्मचाऱ्यांची नेमणूक मोठ्या प्रमाणात केली, परंतु त्याठिकाणचा लाभार्थी, म्हणजेच मतिमंद बालकाकरिता दरमहिन्याला 990 रुपयांचीच तरतूद करण्यात आली आहे.

...LL/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हर्षवधर्न सपकाळ.....

परंतु बालगृहातील मतीमंद बालकासाठी दरमहा 990 रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या तरतूदीप्रमाणे प्रती दिवशी 30 रुपये यानुसार त्या मतीमंद बालकाचा आहार, औषधावरील खर्च कसा होईल, हा मोठा प्रश्न आहे. माननीय मंत्री श्री.बडोले साहेब श्री.संजयबाबा बाफळकरांच्या बालगृहाला भेट देण्यासाठी गेले होते त्यावेळी त्यांनी तेथील दयनीय अवस्था पाहिली आहे. तेथील समस्यांच्या अनुषंगाने त्यावेळी मंत्री महोदय सहमत झाले होते. परंतु त्यानंतर त्यांनी बालगृहातील मतीमंद बालकांसाठी देण्यात येणाऱ्या दरमहा 990 रुपये या अनुदानामध्ये कोणतीही वाढ केली नाही. आजच्या विभागावरील अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेच्या उत्तरात मंत्री महोदयांनी बालगृहांना देण्यात येणाऱ्या अनुदानामध्ये वाढ करण्याची घोषणा करावी, अशी माझी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्यात अनेक प्रकारचे सर्वेक्षण झाले आहेत. त्यानुसार मतीमंद बालकांच्या संख्येच्या प्रमाणात बालगृह उपलब्ध नाहीत. या बालगृहामध्ये वाढ करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मतीमंद बालक किंवा बालिका 18 वर्षांची झाल्यावर कायद्यानुसार त्यांना बालगृहाच्या बाहेर काढावे लागते. बरेच मतीमंद बालक रस्त्याच्याकडेला किंवा इतर ठिकाणी सापडलेले अनाथ बालक आहेत, त्यांना बालगृहाच्या बाहेर कसे काढणार ? अशा बालकांना बाहेर काढल्यानंतर त्यांना कोठे पाठवावे, याबाबत स्पष्टता नाही. याप्रकरणी कायद्यामध्ये बदल करण्यात यावा, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगला मुद्दा मांडला आहे.

श्री.हर्षवर्धन सपकाळ : अध्यक्ष महोदय, मोताळा तालुका येथे वसतिगृह सुरु करण्यात येईल, अशी घोषणा मंत्री महोदयांनी सभागृहात केली होती. वर्ष संपले तरी सदरहू वसतिगृह सुरु झाले नाही. आगामी वर्षात सदरहू वसतिगृह सुरु करावे, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामचंद्र अवसारे (भंडारा) : सन 2016-17 अर्थसंकल्पातील विभागावरील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्या राज्याने सुरु केलेली रोजगार हमी योजना संपूर्ण देशाने स्वीकारली. सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभाग यांच्याकरिता घटनेतील तरतूदीनुसार एकूण अर्थसंकल्पाच्या अनुक्रमे 11 टक्के व 7 टक्के रक्कम ठेवण्यात येते. यामधील अनुसूचित जमातीच्या विकासाकरिता 7 टक्के रक्कम ठेवण्यात येते.

अध्यक्ष महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांनी अनेक वेळा सभागृहात मागणी केली आहे की, आमदार निधी वाढवून देण्यात यावा. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, सामाजिक न्याय विभागातून निधीतून आमदार निधीकरिता 2 कोटी रुपये वाढवून देण्यात यावेत. तसेच, अनुसूचित जमातीच्या निधीतून 2 कोटी रुपये आमदार निधीसाठी दिला तर त्या-त्या क्षेत्रातील आमदारांच्या माध्यमातून अनुसूचित जाती व जमातीसाठी वेगळा प्लॅन करुन विकास साधता येईल.

अध्यक्ष महोदय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या सुवर्ण जयंती महोत्सवाच्या निमित्ताने प्रत्येक मतदार संघातील एका गावाचा विकास करण्याचे मंत्री महोदयांनी निश्चित केले आहे. सदरहू प्रकरणी कोणत्याच मतदार संघाकरिता तरतूद करण्यात आली नाही. प्रत्येक मतदार संघाकरिता सदरहू गावाच्या विकासाकरिता 50 लाख रुपयांची तरतूद केली तर त्या गावाचा किंवा खेड्याचा विकास करता येईल.

अध्यक्ष महोदय, अनुसूचित जाती व जमातीसाठी अनुक्रमे 11 व 7 टक्के निधीची तरतूद घटनेतील तरतूदीमुळे करण्यात येते. दुसऱ्या कोणत्याही विभागाकरिता अशा प्रकारे वेगळ्या निधीची तरतूद करण्यात आली नाही. देशाच्या संसदेमध्ये रेल्वे विभागाचे बजेट स्वतंत्रपणे मांडण्यात येते. त्याप्रमाणे सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभागाचे स्वतंत्रपणे बजेट मांडण्यात आले तर आदिवासी विकास विभाग किंवा सामाजिक न्याय विभागाचा बॅकलॉग राहणार नाही. त्यामुळे या विभागांना स्वतंत्रपणे बजेट मांडण्याची संधी देण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) : अध्यक्ष महोदय, सन 2016-17 अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकरिता मागील वर्षाच्या बजेट मधील 11 हजार 74 कोटी रुपये तरतूदीतून 10,492 कोटी रुपये तरतूद करण्यात आली होती व यापैकी 8,477 कोटी रुपये तरतूद विभागास उपलब्ध करुन देण्यात आली. या विभागाच्या 2 हजार कोटी रुपये निधीला कट लावण्यात आला आहे. सुधारित अंदाज नियतव्ययामध्ये निधीला शेवटच्या महिन्यामध्ये कट लावण्यात आला व 8,477 कोटी रुपये निधी विभागाला उपलब्ध करुन देण्यात आला.

अध्यक्ष महोदय, आता यावर्षी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाला 12,202 कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे, असे अर्थसंकल्पामध्ये सांगण्यात आले आहे. तसेच, 11.1 लोकसंख्येच्या आधारावर अनुसूचित जमाती उपयोजनेंतर्गत 6,725 कोटी रुपये तरतूद उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. मागील वर्षी सुधारित अंदाजांतर्गत 2 हजार कोटी रुपये कट विभागाच्या निधीला लावण्यात आला आहे. यावर्षी विभागाला उपलब्ध करुन दिलेली 12,202 कोटी रुपये तरतूद सरकारने कोणत्याही परिस्थितीत पूर्ण खर्च करावी.

अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी तारांकीत प्रश्न क्रमांक 36 प्रश्न विचारला होता. त्यामध्ये विचारणा करण्यात आली होती की, राज्यातील 5 महामंडळाच्या माध्यमातून राज्यातील मागासवर्ग प्रवर्गातील अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त भटक्या जाती व जमाती यांच्या कल्याणासाठी योजना राबविण्याकरिता त्यांना कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी, आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी भागभांडवल का उपलब्ध करुन दिले नाही ? यासंदर्भात माननीय मंत्री यांनी उत्तर दिले आहे की, आम्ही नियतव्यव उपलबध करुन दिला होता परंतु वित्त विभागाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाला पैसे उपलब्ध करुन दिले नाही. या 5 महामंडळांच्या माध्यमातून सामान्य मागासवर्गीय लोकांच्या उत्थानासाठी, त्यांच्या विकासाठी कर्ज देण्याकरिता राज्य सरकारने भाग भांडवल उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरिता विभागाने मागणी केली पंरतु वित्त विभागाने पैसे दिले नाही. हा निधी देण्याकरिता वित्त विभागाने

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गोपालदास अग्रवाल.....

मान्यता का दिली नाही, याबाबतची माहिती अनुदानाच्या मागण्यावरील चर्चेस उत्तर देताना मंत्री महोदयांनी द्यावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेंतर्गत लाभार्थ्यांना दरमहा 600 रुपये अनुदान देण्यात येते. एवढ्याशा रकमेमध्ये एका माणसाचा किंवा कुटुंबाचा उदरनिर्वाह होऊ शकत नाही. मला दु:खाने सांगावे लागत आहे की, या योजनेंतर्गत ज्या लोकांना 600 रुपये मानधन मिळत होते त्यांच्या मानधनामध्ये वाढ करुन वित्त मंत्री महोदयांनी ते केवळ 700 रुपये इतके केले आहे. ज्या लाभार्थ्यांना दोन अपत्ये आहेत त्यांना 1000 रुपये मानधन मिळेल परंतु 31 मार्च, 2016 पर्यंत लाभार्थ्यांना अपत्य असो किंवा नसो, दोन अपत्यापर्यंत 600 रुपये मानधन देण्यात येत होते. आता मंत्री महोदयांनी 600 रुपये मानधनात वाढ करुन ते 700 रुपये केले. ज्या लाभार्थ्यास एक अपत्य आहे त्यास 850 रुपये मानधन व दोन अपत्ये असणाऱ्या लाभार्थ्यास 1000 रुपये मानधन करण्यात आले आहे. आमची अनेक वर्षापासून मागणी आहे की, संजय गांधी योजना किंवा श्रावण बाळ योजनेंतर्गत देण्यात येणारे मानधन कमीत कमी 1000 रुपये करण्यात यावे. परंतु आता ते दोन अपत्ये असणाऱ्या लाभार्थ्यांनाच मिळणार आहे, इतर लाभार्थ्यांना ते 700 रुपयेच मिळणार आहे. याप्रकरणी शासनाकडून विचार करण्यात येईल, अशी माझी अपेक्षा आहे.

अध्यक्ष महोदय, अनेक योजनांच्या माध्यमातून वसतिगृहाची मागणी अनेक सन्माननीय सदस्यांनी केली आहे. मंत्री महोदय आमच्या जिल्ह्याचे पालक मंत्री आहेत. त्यांना आमच्या जिल्ह्यातील प्रत्येक योजनेबद्दल जिव्हाळा आहे. परंतु मला दु:खाने सांगावे लागते की, राज्य सरकारच्या माध्यमातून 10 कोटी 7 लाख रुपये माझ्या मतदार संघामध्ये वसतिगृहासाठी देण्यात आले परंतु ते खर्च झाले नाही. सदरहू निधी मागील 3 वर्षापासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पडून आहे, तरी देखील वसतिगृहाचे बांधकाम अद्यापपर्यंत सुरु करण्यात आले नाही.

यानंतर MM-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गोपालदास अग्रवाल.....

एकच मागणी मी या चर्चेच्या माध्यमातून करु इच्छितो की, मागासवर्गीयांच्या अनेक औद्योगिक सहकारी संस्थांना आपण अनुदान देतो. अशा प्रकारच्या 182 संस्थांना आपण 1-1 कोटी रुपयांचे अनुदान दिले आहे. पण यापैकी 71 संस्थांद्वारे एकही काम करण्यात आलेले नाही. त्यामुळे शासनाने दिलेले अनुदान लोकांना मदत करण्यासाठी झाले असले तरी या 71 संस्थांच्या माध्यमातून मागासवर्गीयांपर्यंत ते पोहोचविण्यात आले नसल्यामुळे त्या संस्थांची चौकशी करुन त्यांना दिलेली संपूर्ण अनुदानाची रक्कम त्यांच्याकडून पुन्हा वसूल झाली पाहिजे. एकूण 372 औद्योगिक सहकारी संस्थांना या योजनेचा फायदा देण्यात आला आहे. पण त्यापैकी 71 संस्थांनी कोणतेही काम केलेले नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या संस्थांवर कडक कार्यवाही करुन त्यांना दिलेले अनुदान परत घ्यावे, अशी मी मागणी या ठिकाणी करीत आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी दु:खाने सांगावेसे वाटते की, आता कौशल्य विकासाची चर्चा सुरू असून या ठिकाणी संबंधित खात्याचे कॅबिनेट मंत्री किंवा राज्यमंत्री उपस्थित नाहीत.

श्री. दिलीप कांबळे : अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी येऊन सांगून गेलेले आहेत आणि त्यांच्या विभागाशी संबंधित सूचनांचे टिपण घेतले जात आहे.

श्री. गोपालदास अग्रवाल : अध्यक्ष महोदय, या विभागाचे मंत्री या ठिकाणी सुरूवातीपासूनच नाहीत. माझी मागणी आहे की, आमच्या गोंदिया जिल्ह्यामध्ये महिलांसाठी आयटीआय सुरू केले पाहिजे आणि सरकारने त्या दृष्टीने पावले उचलावीत अशी मी विनंती करतो आणि या विभागाच्या मागण्यांना विरोध करतो.

2.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री मंगल प्रभात लोढा (मलबार हिल) : अध्यक्ष महोदय, मैं सन 2016-17 की अनुदानों की मांगों पर बोलने के लिए खड़ा हुआ हूं.

अध्यक्ष महोदय, मैं कौशल्य विकास विभाग के बारे में कहना चाहता हूं कि कौशल्य विकास महाराष्ट्र में आने वाले समय में गेम चेंजिंग कार्यक्रम होने वाला है. महाराष्ट्र के बच्चे होशियार है, मेहनती है. वे दुनिया में जहां भी गए वहां उन्होंने नाम कमाया है. नासा में गए, दुनिया के बेस्ट हॉस्पिटल में गए, बेस्ट कॉलेजेस में गए, बेस्ट इन्स्टिट्युट में गए. माननीय मुख्यमंत्री जी के विशेष अनुरोध से कौशल्य विकास के कार्यक्रम ने गति पकड़ी है. मेरी दो छोटी छोटी सूचनाएं है. महाराष्ट्र में जितनी भी सरकारी स्कूल्स है. चाहे वह जिला परिषद, पंचायत समिति, महानगरपालिका के स्कुल्स हो. वहां पर स्कूल के समय के बाद कौशल्य विकास केंद्र खोलने की अनुमति सरकार ने प्रदान करनी चाहिए. 3.00-4.00 बजे सभी स्कुल्स बंद हो जाती है. 4.00 बजे से 10.00 बजे तक स्कुल्स में जगह खाली रहती है. मैं मंत्री महोदय से विनती करना चाहता हूं कि सभी स्कुलों में जो सरकार द्वारा अनुमोदित हो, वहा, सरकारी विद्यालयों में ऐसे कौशल्य विकास केंद्र खोलने की, अनुमति देने का निर्णय सरकार ने लेना चाहिए.

अध्यक्ष महोदय, आप कौशल्य विकास केंद्र खोलने का काम शुरु कर रहे है. यह संख्या 15-20 हजार तक जाने वाली है. जो टिचर्स है उनकी ट्रेनिंग के लिए कोई प्रावधान नहीं किया गया है. हमें एकसाथ इतने टिचर्स मिलने वाले नहीं है. टिचर आधा काम इधर करेगा और आधा काम उधर करेगा. मेरा सरकार से निवेदन है कि कौशल्य विकास केंद्र में जितने विद्यार्थियों को हम पढ़ाना चाहते है, यह उतना ही महत्वपूर्ण है कि हम उतने टिचर्स भी तैयार करे. टिचर अच्छे होते है तो बच्चे भी अच्छे होते है. इसलिए सरकार से निवेदन है कि 6 विभागों में, अमरावती, नागपुर, पुना, कोंकण और औरंगाबाद में कौशल्य विकास के लिए टिचर विभाग केंद्र खोले जाने चाहिए.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय विभाग के बारे में कहना चाहूंगा कि महामानव डॉ.बाबासाहब आंबेडकर जी की 125 वीं जयंती है. हम मंगलसूत्र के लिए केवल 10 हजार रुपये पिछले दस सालों से दे रहे है. आज मंगलसूत्र की कीमत बहुत बढ़ गई है. एससी, एसटी के

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री मंगल प्रभात लोढा.....

बच्चों की शादी के सबंध में मैंने मंत्री महोदय को पत्र भी लिखा है. मेरा निवेदन है कि महामानव डॉ.बाबासाहब आंबेडकर जी की 125 वीं जयंती के उपलक्ष्य में सरकार एससी, एसटी के बच्चों की शादी के समय मंगलसूत्र के लिए दस हजार रुपये की राशि को बढ़ाकर 25 हजार रुपये की जानी चाहिए. इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सामाजिक न्याय विभाग व कौशल्य विकास विभागाच्या अर्थसंकल्पिय अनुदानाच्यावर बोलत असताना ओबीसींचा लढा लढणारे आमचे लोकनेते कै. गोपिनाथ मुंडे यांनी यांनी ओबीसींसाठी लढा लढविला आहे. मी माझ्या सरकारचे अभिनंदन करते की, माझ्या सरकारने ओबीसींसाठी अनेक प्रकारच्या चांगल्या योजना घेतलेल्या आहेत. तथापि, सन्माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास काही त्रुटी आणून देऊ इच्छिते की, मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांसाठी अनेक ठिकाणी वसतिगृहे आहेत. परंतु शिक्षण घेणाऱ्या ओबीसी मुलींसाठी आणि नोकरी करणाऱ्या ओबीसी महिलांसाठी कोठेही वसतिगृहे नाहीत. तरी सन्माननीय समाजकल्याण मंत्री महोदयांनी नोकरी करणाऱ्या ओबीसी महिलांसाठी आणि शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी मुंबईमध्ये व महाराष्ट्रामध्ये वसतिगृहे निर्माण करण्यात यावीत अशी मी त्यांना विनंती करते. अध्यक्ष महोदय, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने वसतिगृहे आहेत. परंतु महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून येणाऱ्या ओबीसी मुलींसाठी त्या ठिकाणी कोणतेही आरक्षण नाही. सन्माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्या ठिकाणी किमान 30 टक्के जागा ओबीसींसाठी राखीव ठेवण्यात याव्यात. तसेच पूर्वी गटई कामगारांना स्टॉल दिले जात होते. परंतु त्यांना आता असे स्टॉल देण्याचे बंद केले आहे. कारण त्यांना आता देण्यासाठी जागाच शिल्लक नाही. या संदर्भात समाजकल्याण विभागाने पुढाकार घेऊन त्यांना मुंबईमध्ये जागा द्याव्यात.

अध्यक्ष महोदय, ओबीसींना शिष्यवृत्तीसाठी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र देण्यासाठी असलेली उत्पन्नाची मर्यादा वाढवून 10 लाख करण्यात यावी. जे बूट पॉलिस करणारे गटई कामगार आहेत, त्यांना 1980 मध्ये रेल्वेने लायसन्स दिलेले होते. परंतु आता प्लॅटफार्म वाढले आहेत, नवीन स्टेशन्स वाढलेले आहेत. परंतु बूट पॉलिस करणाऱ्यांना रेल्वेकडून आता लायसन्स दिले जात नाहीत. आपण समाजकल्याण विभागामार्फत ही लायसन्स मिळवून देण्यात यावीत.

अध्यक्ष महोदय, शालेय विद्यार्थ्यांना ओबीसी प्रमाणपत्र मिळवावायचे असेल तर अनेक ठिकाणी अधिकाऱ्यांकडून पैशाची मागणी केली जाते. याला जर आळा घालावयाचा असेल तर शालेय सत्र सुरू होण्याआधीच महसूल विभागाने विशेष कक्ष उघडला पाहिजे. ओबीसींच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती मनिषा चौधरी.....

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी लागणारे जात पडताळणीचे प्रमाणपत्र 2-3 महिन्यात मिळाले पाहिजे. यासाठी कमाल कालावधी तीन महिन्यांना ठेवण्यात यावा आणि जर ते या कालावधीत मिळाले नाही तर ते मिळाले असे गृहित धरावे अशी मी विनंती करते.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्रामध्ये ओबीसी समाज 51 टक्के आहे. ज्याप्रमाणे आदिवासी किंवा मागासवर्गीय समाजासाठी घरकूल ही योजना लागू आहे. त्यामुळे सरकारने ओबीसींसाठी घरकूल योजना लागू करायला हवी. ओबीसींसाठी मंत्रालय नाही. ओबीसींसाठी आज वेगळ्या मंत्रालयाची मी मागणी करीत आहे. या संदर्भात माझी महत्वाची मागणी आहे की, ओबीसींचा सर्व्हे झालेला आहे. पण हा सर्व्हे आजपर्यंत जाहीर झालेला नाही. मी या ठिकाणी मागणी करते की, हा सर्व्हे लवकरात लवकर जाहीर करावा.

अध्यक्ष महोदय, पालघर जिल्हा हा नवीन जिल्हा निर्माण केलेला आहे. आमच्या पालघर जिल्ह्यामध्ये ओबीसी समजाचे प्रमाण जास्त आहे. परंतु या जिल्ह्यातील 22 टक्के असलेले आरक्षण कमी करुन आता 19 टक्क्यांवर आणले आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी याकडे लक्ष देऊन पालघर जिल्ह्यातील ओबीसींचे 19 टक्क्यांवर आणलेले आरक्षण 22 टक्के करावे, अशी मी विनंती करते. क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने महाराष्ट्रामध्ये ओबीसींसाठी आपण वसतिगृहे निर्माण करावीत. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप कांबळे (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, या सदनामध्ये जवळ जवळ 22 सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. या चर्चेला सुरूवात करीत असताना सन्माननीय सदस्य प्रा. वर्षा गायकवाड, ज्येष्ठ सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील, कु. प्रणिती शिंदे, श्री. सुधाकर भालेराव, श्री. प्रकाश आबिटकर, श्रीमती दिपीका चव्हाण, श्री. ज्ञानराज चौगुले, डॉ. प्रकाश भोईर, श्री. चंद्रदीप नरके, ॲड. राहूल कूल, श्री. मेधा कुलकर्णी, डॉ. मिलिंद माने, श्री. सुरेश गोरे, श्री. सुभाष पाटील, श्रीमती मनिषा चौधरी, तसेच श्री. गोपालदास अग्रवाल, डॉ. रामचंद्र अवसरे, श्री. मंगलप्रभात लोढा, श्री. शेख आसिफ, या मान्यवर सदस्यांनी भाग घेतला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, माझी पॉईंट ऑफ इनफॉरमेशन आहे. सभागृहामध्ये माननीय मंत्री उपस्थित असताना माननीय राज्यमंत्री उत्तर देत आहेत. एखाद्या चर्चेला उत्तर दिले तर मी समजू शकतो. परंतु विभागीय मागण्या असताना माननीय मंत्र्यांना निर्णय घेण्याचे सर्व अधिकार आहेत. ते सर्व अधिकार आता माननीय राज्यमंत्र्यांना माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले आहेत. त्यामुळे मला असे वाटते माननीय मंत्री श्री.राजकुमार बडोले यांनी उत्तर द्यायला पाहिजे होते. माझी काही हरकत नाही कुणीही उत्तर दिले तरी चालेल.

.....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजकुमार बडोले (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या अनुदानावरील मागण्यांवर सभागृहातील 22 सदस्यांनी यात भाग घेतलेला आहे. सामाजिक न्याय विभाग हा अत्यंत महत्वाचा विभाग आहे. महाराष्ट्रातील जवळपास 80 टक्के जागा या सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत येतात. यामध्ये भाग घेताना श्रीमती वर्षा गायकवाड, श्री.दिलीप वळसे-पाटील, डॉ..जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री.प्रकाश आबिटकर, अमित देशमुख, सुधाकर भालेराव, ज्ञानदेव चौगुले, मिलिंद माने, प्रकाश पाटील, दिपक चव्हाण, सुरेश गोरे, श्रीमती मेधा कुलकर्णी, सर्वश्री.चंद्रकांत नरके, हर्षवर्धन सपकाळ, ॲड.रामचंद्र अवसरे, सर्वश्री.गोपालदास अग्रवाल, मंगलप्रभात लोढा, श्रीमती मनिषा चौधरी इत्यादींनी या चर्चेमध्ये भाग घेतला. सन्माननीय सदस्या श्रीमती वर्षा गायकवाड यांनी चर्चेत भाग घेताना अनेक विषयासंदर्भात याठिकाणी बोलल्या. विशेषत: त्यांनी जो विषय मांडला होता त्यात सन 2014-2015 , 2015-2016 मध्ये ज्या तरतूदी अर्थसंकल्पात केल्या होत्या. तो पूर्ण खर्च झाला नाही असे त्यांनी याठिकाणी सांगितले. सन 2015-2016 च्या सामाजिक न्याय विभागाच्या मागण्यांसाठी सर्वसाधारण क्षेत्र होते त्यासाठी 345.54 कोटी व अनुसूचित जाती उप योजनेसाठी 4,457.04 कोटी तसेच अर्थसंकल्पीय अंदाज एकूण 11 हजार 076 आणि 74.6 कोटी एवढी होती. सुधारित अंदाजपत्रकात 10, 492 कोटी होता. त्यापैकी प्रत्यक्ष खर्च 8,477.71 कोटी इतका झाला. सन 2016-2017 साठी अनुसूचित जाती उप योजनेसाठी जो नियतव्यय 6,625 कोटी मंजूर झाला आहे. तो खर्च व्हावा अशी त्यांची मनापासून तळमळ आहे. आम्ही सुध्दा त्या समाजाची लोक असल्याने आमची सुध्दा तळमळ हीच आहे. अनुसूचित जाती आणि मागासवर्गीय समाजाचा सर्वंकष विकास झाला पाहिजे अशी आमची मनापासून भावना आहे आणि हा खर्च सरकार नक्की खर्च करेल असे मी मनापासून सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, 50 वसतीगृहांच्या बाबतीत सांगण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची 125 वी जयंती सामाजिक व समता वर्ष म्हणून यावर्षी साजरी करीत आहोत. या वर्षी मुलींची 50 वसतीगृहे सुरु केलेली आहे. यातील काही वसतीगृहे सुरु केलेली आहेत आणि बाकीची सर्व वसतीगृहे येणाऱ्या काळात जमिनीची उपलब्धता झाल्यानंतर सुरु करण्यात येतील. काही ठिकाणी

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजकुमार बडोले.....

भाड्याच्या इमारती पाहणे सुरु आहे. लवकरात लवकर ही वसतीगृहे सुरु करुन ग्रामीण भागातील जास्तीत जास्त मागासवर्गीय समाजाच्या मुली शहरामध्ये शिकण्यासाठी येतात त्यांच्यासाठी निवासाची व्यवस्था करु मुख्यतः नागपूर, पुणे, मुंबई याठिकाणी वसतीगृहे सुरु केलेली आहेत. तसेच ग्रामीण भागामध्येही बऱ्याच ठिकाणी वसतीगृहे सुरु करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, मघाशी म्हटल्याप्रमाणे मुंबई विभागातील 4.4 कोटी रुपये 125 वसतीगृहामध्ये द्यायचे होते ते खर्च झाले नाहीत. वर्तमानपत्रामध्येही यासंदर्भात बातमी आली होती. यानिमित्तीने एवढेच सांगू इच्छितो की, बीडीएसवरील जी तरतूद रात्री 10.00 वाजता आली होती. 4.4 कोटी रुपये खर्च झाला नसेल तर का खर्च झाला नाही याबाबत संबंधितांची चौकशी करुन कारवाई करण्यात येईल. हा वसतीगृहाचा प्रश्न असल्याने आणि हे पैसे राज्य शासनाकडे असल्याने याबाबत पाठपुरावा करुन पैसे लगेच उपलब्ध करुन देण्यात येतील. मागच्या वर्षभरामध्ये मोटार ड्रायव्हिंग सुरु झाले नाहीत यासंदर्भात विचारणा करण्यात आली. मोटार ड्रायव्हिंग स्कूल चालविण्यासंदर्भातील ज्या तरतूदी आणि नियम होते त्याचे पालन होत नसल्याने बंदी करण्यात आली होती. परंतु मोठ्या प्रमाणात मोटार ड्रायव्हिंगसाठी नव्याने ई-टेंडरिंग काढायला दिलेले आहे. काही दिवसांमध्ये हे मोटार ड्रायव्हिंग सुरु होतील.

अध्यक्ष महोदय, आयआयटीच्या संदर्भातील इंटरन्स परीक्षेबाबत प्रशिक्षण दिले जात होते. ते प्रशिक्षण योग्य प्रमाणात दिले जात नाही याबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. कारण आम्ही बार्टीच्या माध्यमातून अनेक प्रशिक्षण घेत आहोत. अनेक जिल्ह्याच्या ठिकाणी सुध्दा प्रशिक्षणाच्या सोयी करुन दिलेल्या होत्या. परंतु आयआयटीच्या परीक्षेसंदर्भात ज्या काही संस्था प्रशिक्षण देत आहेत यात आणखी वाढ करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल. अनुसूचित जाती जमाती आयोग स्थापन करण्याच्या संदर्भात संविधानिक दर्जा नाही. स्टाफ उपलब्ध नाही. आयोगाच्या सदस्यांना याठिकाणी 10 हजार रुपये मानधन दिले जाते ते कमी पडते आणि चतुर्थ श्रेणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजकुमार बडोले.....

कर्मचाऱ्याला त्यापेक्षा जास्त पगार आहे. परंतु सदस्याला मानधन कमी आहे. 40 हजारावरून 30 हजार रुपये मानधन करण्यात आलेले आहे. अशा अनेक गोष्टी याठिकाणी सांगण्यात आलेल्या आहेत. या आयोगाला संविधानिक दर्जा देण्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली होती. संविधानिक दर्जा देण्याच्या संदर्भात जी कार्यवाही करायला पाहिजे ती सुरु आहे. याबाबत लवकरच कार्यवाही करु हे याठिकाणी सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, दामू नगर येथील मागासवर्गीय लोकांचे पुनर्वसन झाले नाही. माननीय मुख्यमंत्री सभागृहात आहेतच. त्यांच्यासोबत चर्चा करून पुनर्वसनाबाबत लवकरच निर्णय घेऊन कार्यवाही करण्यात येईल एवढेच यानिमित्ताने सांगू इच्छितो. अनुसूचित जाती जमाती उप योजना कायदा जो आंध्र प्रदेश आणि कर्नाटकच्या धर्तीवर महाराष्ट्रात कायदा करण्यात यावा. याबाबत बऱ्याच लोकांची तसेच लोकप्रतिनिधींनी याठिकाणी मागणी केलेली आहे. ही अत्यंत रास्त अशी मागणी आहे. बऱ्याच वेळा सरकारवर आरोप लावले जातात की, मागासवर्गीयांचा पैसा दुसरीकडे वळविला जातो. आम्ही प्रामाणिकपणे सांगतो की, मागासवर्गीय आणि अनुसूचित जाती जमातींचा निधी दुसरीकडे वळविला जाणार नाही. बऱ्याच वेळा वित्त विभागाकडून अडचणी येतात आणि खालपर्यंत जाण्यासाठी विलंब होतो. भविष्यात विलंब होता कामा नये. म्हणून कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि ओरिसा या तीन राज्यांनी जो कायदा बनविला आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही अनुसूचित जाती जमाती आयोगाचा जो कायदा आहे. यासंदर्भातील ड्राप्ट मागविलेला आहे आणि याबाबत बैठकाही झालेल्या आहेत. येणाऱ्या तीन महिन्यात म्हणजेच पुढच्या अधिवेशनात हा कायदा विधानसभेमध्ये आणण्याच्या दृष्टीने कार्यवाही करु एवढेच मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजकुमार बडोले.....

जात पंचायतीच्या कायद्याच्या बाबतीत सामाजिक बहिष्काराच्या संदर्भात आपण या ठिकाणी बोललात गृहमंत्रालयाने अगोदरच कायदा आणलेला आहे. सामाजिक दृष्टीने यामध्ये काही सुधारणा करायची आहे. हा कायदा विधानसभेमध्ये आल्यानंतर त्यामध्ये काही सामजिक बाबी संम्मिलीत करायच्या आहेत. त्याबाबतीत नक्की सकारात्मक दृष्टीने कार्यवाही करु. एवढे तुम्हाला या ठिकाणी सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, आंतरजातीय विवाह करणा-या पालकांच्या मुलांना आई-वडिलांचे नाव लावता येत नाही ही समस्या आपण सर्वांनी लक्षात आणून दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो. आंतरजातीय विवाह करणारे असतील त्याच्यामध्ये हा घटस्फोटीत व इतर यांच्या संदर्भात हा प्रश्न अडचणीचा ठरतो. यासंदर्भात आम्ही नक्की कार्यवाही करु. अनुसूचित जातीतील नव बौध्द समाजाला अनुसूचित जातीचे आरक्षण मिळू नये हा अत्यंत महत्वाचा विषय मांडला, यासंदर्भात आम्ही मंत्रालयामध्ये दोन-तीन वेळा बैठका घेतल्या. माननीय केंद्रीय आदरणीय श्री.गलोत साहेब यांच्या सोबत मी चर्चा केली. त्यांच्याकडे याबाबतचा पत्र व्यवहार केला. त्यांच्याकडून पत्र व्यवहार झाला त्यामध्ये एक विषय होता की, दुस-या धर्मातील काही लोक ख्रिश्चन धर्मिय किंवा इतर धर्मिय झालेले लोक आहेत. काही बौध्द धर्मिय झालेले आहेत. यासंदर्भात सर्वंकष विचार करुन जातीच्या प्रमाणपत्राबाबत विचार करायला पाहिजे. जो केंद्र सरकारने जातीच्या प्रमाणपत्राचा जो फॉरमॅट बनवलेला आहे. त्या फॉरमॅटमध्ये या धर्मात्तरीत 1956 च्या नंतर महाराष्ट्रामध्ये नव्हे तर देशामध्ये अनेक ठिकाणी धर्मांत्तरीत झालेले लोक आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 14 ऑक्टोबर, 1956 नंतर त्याच्यामुळे महाराष्ट्रामध्ये तथाकथित महार किंवा अन्य जातीतील लोक धर्मांत्तरीत होऊन नव बौध्द झाली असली तरी इतर राज्यामध्ये इतर जातीची लोकसुध्दा धर्मांत्तरीत झालेली आहेत. त्यामुळे सर्वांसाठी कशा पध्दतीचा फॉरमॅट करावा किंवा काही लोक ख्रिश्चन किंवा इतर धर्मातील धर्मांत्तरीत झालेली आहेत. या कारणांमुळे फॉरमॅटची अडचण आहे. परंतु आम्ही नक्कीच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजकुमार बडोले.....

धर्मांत्तरीत नव बौध्दांच्या संदर्भात जरूर विचार करु. मंडल आयोगाच्या मागण्या मंजूर केलेल्या आहेत. त्याच्यामुळे फॉरमॅट बदलावयाचा आहे. या संदर्भात केंद्र शासनासोबत परत चर्चा करुन आपण याच्यावर कार्यवाही करु. अनेक विषय आपण या ठिकाणी मांडलात. जाती प्रमाणपत्राचा नमूना सुधारित न केल्यामुळे हा लाभ भेटत नाही. इंदू मिलचे भूमिपूजन झाले. आम्ही त्याकामाला सुरुवात करीत आहोत. त्यामध्ये काही अडचणी आहेत. त्या नक्की दूर करुन हे काम होईल. जनरल बजेटमध्ये हे काम घ्यावे असे आपण म्हटले. नक्की या संदर्भात जनरल बजेटमध्ये करु. ॲट्रॉसिटीचे गुन्हे वाढलेले आहेत असे आपण म्हणालात. केंद्र शासनाने कायदा केलेला आहे. हा कायदा लागू करण्याच्या बाबत आम्ही लवकरच कार्यवाही करु. घरकुलाच्या संदर्भामध्ये जी बी.पी.एल. ची अट रद्द करण्याबाबतीत बोलले गेले. परंतु बिपीएलचा महाराष्ट्रात ब-याच ठिकाणी टारगेट आहे. हा पूर्णत्वास आलेला आहे. याबाबत शहरामध्ये अडचण आहे. त्यांच्या नावाने ब-याच ठिकाणी तो प्लॉट राहत नाही. त्याच्यामुळे अडचणी येतात. त्यांच्या नावाने कुठेही प्रापर्टी कार्ड असत नाही. त्याच्यामुळे त्याला बी.पी.एल. च्या लोकांना घरकुल देताना अडचण निर्माण होते. ग्रामीण भागामध्ये हा प्रचंड प्रमाणात बी.पी.एल.ची यादी साधारणतः संपलेली आहे. आता जी काही शिल्लक राहिलेली मंडळी असतील त्यांची परत यादी बनवून त्या सर्व लोकांना बी.पी.एल.ची घरे द्यायची. त्याच्यानंतर ए.पी.एल. ची शहरी भागामध्ये आम्ही रमाई आवास, बी.पी.एल. संपल्यानंतर ए.पी.एल. सुरु करु. कराची अशी अट केली. त्याचप्रमाणे ग्रामीण भागामध्ये सुध्दा ही अट शिथिल करु. एवढे मी तुम्हाला सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, ब-याच मंडळीनी आपले मते मांडली आहेत. आमचे आदरणीय श्री.दिलीप वळसे पाटील यांनी सुध्दा येथे ब-याच गोष्टी मांडल्या. ते सुरुवातीलाच म्हणाले होते की, अर्थसंकल्पाला विरोध दर्शवितो. मला वाटते सभागृहाचे ते ज्येष्ठ सदस्य आहेत. अनेक वर्षांचा त्यांचा अनुभव आहे. मी तुम्हाला एवढेच या ठिकाणी सांगू इच्छितो की, सामाजिक न्याय विभागाबाबतीत मागच्या अनेक वर्षापासून पाहिले तर आपल्याला असे दिसेल की, कोणत्याही वर्षात सामाजिक न्याय विभागाचा पैसा दुसरीकडे वळवला नाही. बी.डी.एस. किंवा शेवटच्या दिवसाच्या दिवशी अडचणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजकुमार बडोले .....

असतात त्या कारणाने पैसाच्या कमी जास्त होऊ शकते. परंतु आपण कुठेही सामाजिक न्याय विभागाचा पैसा वळवण्याची परिस्थिती आलेली नाही. आपण म्हटल्याप्रमाणे विजाभज आश्रम शाळेची परिस्थिती अत्यंत वाईट आहे असे या ठिकाणी म्हटले होते. राज्यातील विजाभज आश्रम शाळांसाठी सन 2013-14 या आर्थिक वर्षामध्ये 536 कोटी रुपये आणि सन 2014-15 या वर्षामध्ये 567 कोटी रुपये, सन 2015-16 या आर्थिक वर्षामध्ये 553 कोटी रुपये, सन 2016-15 या वर्षासाठी सध्यारुपये 502 कोटी रुपये एवढी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यासाठी आपण आणखी आवश्यक असलेली तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल. हे मी सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, विजाभज आश्रम शाळेमध्ये विद्यार्थी कमी व कर्मचारी जास्त अशी परिस्थिती आहे यासंदर्भात ज्या राज्यामध्ये खाजगी अनुदानित विजाभज आश्रम शाळांची संख्या ती पुढील प्रमाणे आहे. प्राथमिक आश्रम शाळा 526 आहेत. माध्यमिक आश्रम शाळ 296 आहेत एकूण मिळून 822 शाळा आहेत. निवासी विद्यार्थ्यांची संख्या एक लाख अकरा हजार सहाशे पन्नास आहे. अनिवासी विद्यार्थी आहेत. एक लाख पंच्चावन हजार या विद्यार्थ्यांची संख्या एकूण दोन लाख सहासष्ट हजार आठशे पंधरा या आकडेवरुन राज्यातील विजाभज आश्रम शाळेतील किमान 21 विद्यार्थी संख्ये मागे एक कर्मचारी अशी संख्या आहे. सदर कर्मचारी संख्या आरटी ॲक्ट प्रमाणे आहे. परंतु काही ठिकाणी विद्यार्थी कमी व कर्मचारी जास्त अशी परिस्थिती असल्याची बाब निदर्शनास आल्यास तेथील कर्मचारी संख्या नियंत्रणात आणण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल हे मी सांगू इच्छितो. महाराष्ट्रामध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या एक कोटी बत्तीस लाख असून ॲट्रॉसिटीच्या कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील यांनी सूचना केली. ऐसी च्या कमिशनच्या बाबती मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती वर्षा गायकवाड यांनी जसे म्हटले आहे की, तो कमिशनकडे जी एक हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. ही एक हजार प्रकरणे अनुसूचित जाती कमिशनकडे कोणतेही निर्णय न झाल्याकारणाने ते प्रलंबित असे आपण म्हटले. त्या ठिकाणी त्या प्रकरणांवर निर्णय करण्यासाठी दोन महिन्याच्या आत कार्यवाही करु. ओ.बी.सी., एस.सी., व्ही.जे.एन.टी., अपंग यांचे दोन वर्षापासून फि रिऍबेज झालेली नाही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजकुमार बडोले.....

किंवा होत नाही असे आपण म्हटले आहे. यासंदर्भात फक्त एवढेच म्हणेण की ओ.बी.सी. व्ही.जे.एन.टी. इत्यादि समाजाच्या संदर्भात आपण पाहिले होते जेवढे पैसे केंद्र शासनाने फी द्यायला पाहिजे ती फी केंद्र शासन देत नाही. राज्य सरकार ती पूर्णपणे बेअर करते. त्याच्यामुळे काही ठिकाणी अडचण येते. तरी सुध्दा या वर्षी ओ.बी.सी.ची जी शिवृत्ती अत्यंत कमी शिल्लक राहिलेली आहे. ती पूर्ण फि लवकरच तुम्हाला देऊ. इंदू मिल आणि लंडनच्या घराच्या बाबतीत सरकारने कार्यवाही केली. त्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश आबिटकरांनी धन्यवाद दिला. मानगावच्या संदर्भामध्ये 10 कोटी रुपये जे मागच्या सरकारने मंजूर केले होते. ते देण्यात आले नाहीत. तो निधी लवकरच दिला जावा अशी त्यांची मागणी होती. 36X36 ची योजना होती परंतु त्या योजनेचा पूर्ण प्रारुम मागच्या कालखंडामध्ये झाला नव्हता. त्यामुळे तो निधी देताना काही अडचणी यायच्या. 10 कोटी रुपये हे मानगावसाठी छत्रपती शाहू महाराजांनी डॉ.बाबासाहेबांना अनुसूत जाती आणि मागासवर्गीयांचे नेते असे घोषित केले होते. ती अत्यंत महत्वाची जागा आहे. त्यासाठी आपण 10 कोटी रुपयांची मागणी केली. तो लवकरात लवकर देण्यात येईल.

PP-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अध्यक्ष : मी सभागृहाची वेळ आजचे दिवसाचे कामकाज संपेपर्यंत वाढवित आहे. आजच्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांनंतर नियम 293 अन्वयेचा विरोधी पक्षाचा प्रस्ताव चर्चेला घ्यावयाचा आहे.

श्री.दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, आजच्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर मंत्री महोदयांचे उत्तर लहान आहे की मोठे आहे हा प्रश्न नाही. पण हा विषय महत्वाचा आहे. यामध्ये काही गोष्टीची क्लिअॅरीटी होणे गरजेचे आहे. आपण जेव्हा संधी द्याल त्यावेळी मी बोलतो. आपण आता संधी दिली तर आता बोलतो. आपण शेवटी बोला असे म्हणाला तर मी शेवटी बोलतो. मला एक-दोन विषयाचे क्लिअरीफिकेशन पाहिजेत.

अध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे पाटील यांचे भाषण झालेले आहे, पुन्हा या विषयावर आपणास कसे बोलता येईल.

श्री.राजकुमार बडोले : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश आबिटकर वसतिगृहातील गरम पाण्याबाबत म्हटले आहे. त्यांच्या मागणीप्रमाणे गरम पाण्याचे गिझर लगेच देणार आहोत.

सन्माननीय सदस्य श्री.अमित देशमुख यांनी इंदू मिल येथील स्मारकाचे भुमीपूजन झाल्यानंतर पुढील काम लवकरात लवकर करणे, मराठवाडा विद्यापीठास 125 कोटी रुपये तरतूद करणे, पानगाव येथे विभागीय स्मारकाचा दर्जा देणे, स्कॉलरशीपमध्ये वाढ करणे, महामंडळाची थकीत कर्जे पूर्ववत सुरु करणे अशा सूचना केलेल्या आहेत. या सर्व सूचनांचा विचार करण्यात येईल असे मी सांगू इच्छितो.

सन्माननीय सदस्य श्री.सुधीर भालेराव यांनी भूमीहीन आदिवासी जातीच्या लोकांच्या अंत्यविधीसाठी स्मशानभूमी उपलब्ध नसल्याबाबत मागणी केली आहे. आदिवासी जाती जमातीस विशेषत: मातंग समाजाच्या वेगळया स्मशानभूमीची मराठवाडयात आवश्यकता आहे असे ते बोलले आहेत. या संदर्भात नक्की विचार करुन सकारात्मक दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल हे मी सांगू इच्छितो. अनुसूचित जातीमधील जातींचे वेगवेगळे आरक्षण करण्याबाबत त्यांनी उल्लेख केलेला आहे. माननीय मुख्यमंत्री येथे उपस्थित आहेत. याबाबत आपण नक्कीच बैठक घेऊन विचार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजकुमार बडोले .....

करण्यात येईल. अण्णाभाऊ साठे महामंडळात 500 कोटीचे भांडवल देण्यासंदर्भात, मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थांमध्ये सुधारणा करुन सुरु करण्याच्या संदर्भात व निधी खर्च करण्यासंदर्भात त्यांनी सूचना दिलेल्या आहेत. याबाबत आपण नक्की कार्यवाही करु.

सन्माननीय सदस्य श्रीमती प्रणिती शिंदे यांनी कुष्ठरोगी पिडीतांकरिता संजय गांधी योजनेप्रमाणे योजना लागू करण्यासंदर्भात, पद्मशाली समाजाच्या कास्ट व्हॅलिडीटीच्या पुराव्यासंदर्भात सूचना दिलेल्या आहेत. तसेच कैकाडी समाजाला विदर्भात एस.सी. चे प्रमाणपत्र मिळते परंतु इतर ठिकाणी मिळत नाही याबाबत त्यांनी विचारणा केली आहे. याबाबत या समाजाला अनुसूचित जातीचा दर्जा देण्याबाबत आपण केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविलेला आहे व पाठपुरावा केलेला आहे. ही मागणी नक्की पूर्ण होईल. त्यांच्या इतर मागण्यांबाबत विचार करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री.राहूल कूल यांनी दौडमधील निवासी शाळा व कॉस्ट व्हॅलिडीटीबाबत मागणी केलेली आहे. याबाबत नक्की विचार केला जाईल. सन्माननीय सदस्य श्री.आसिफ शेख यांनी सांगितले की, छप्परबंद समाजाचा व्हीजेएनटीबाबत शासनाचा जो निर्णय झाला होता, त्यामध्ये सुरुवातीस एकच पुरावा मागितला जायचा, आता तीन-तीन पुरावे मागितले जातात. यामुळे छप्परबंद समाजाची अत्यंत अडचण होते. याबाबत मी सांगू इच्छितो की, मला हा विषय माहिती आहे, कारण याबाबत मी 2-3 बैठका घेतल्या आहेत. मध्यंतरीच्या काळात उच्च न्यायालयाने छप्परबंद समाजाच्या विरोधात एक निर्णय दिला होता. यामध्ये अडचणी आल्यातर आपल्यासोबत बैठक घेऊन याबाबत अजून कार्यवाही करुन या समाजाला लवकरात लवकर कास्ट सर्टीफिकेट दिली गेली पाहिजेत याकरिता कारवाई केली जाईल असे मी येथे सांगू इच्छितो.

सन्माननीय सदस्या श्रीमती मेधा कुलकर्णी यांची जुनी मागणी आहे की, ज्येष्ठ नागरिकांचे वय 65 वरुन 60 वर्षे करावे, याबाबत आम्ही ऑलरेडी कार्यवाही करीत आहोत. याबाबत लवकर कार्यवाही होईल हे सांगू इच्छितो.

.....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजकुमार बडोले .....

सन्माननीय सदस्य श्री.चंद्रदीप नरके यांनी संजय गांधी निराधार योजनेमध्ये वाढ करण्याबाबत सूचना केली आहे. सन्माननीय सदस्य श्री.हर्षवर्धन सपकाळ यांनी मतिमंद मुलांसाठी बालगृहाचा जी.आर. बाबत उल्लेख केला आहे. यामध्ये 930 रुपये अनुदान मिळते, त्या अनुदानात वाढ करण्यासंदर्भात वाढ करण्याची मागणी केलेली आहे. 18 वर्षानंतरच्या मतिमंदांचा प्रश्न सर्व ठिकाणी आहे. कारण मतिमंदाना कोणताही आधार नसतो. यांची आधारगृहे करण्याबाबत राज्य शासन विचार करीत आहे, तशा प्रकारचा प्रस्तावही आम्ही पाठविलेला आहे. भविष्यात त्यावर निश्चित कार्यवाही करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य ॲड.रामचंद्र अवसरे यांनी 2 कोटी रुपये अनुसूचित जाती उपयोजनेतून देण्याची मागणी केलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.गोपालदास अग्रवाल यांनी या पाच महामंडळांना कर्जे उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात मागणी केली. गोंदिया येथील वसतिगृहाचे 10.42 कोटीचे काम सुरु होण्यासंदर्भातही त्यांनी मागणी केलेली आहे. महाराष्ट्रात 371 मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था झालेल्या आहेत, त्यापैकी 71 संस्थांनी कर्ज घेतले आहेत, परंतु त्यांचे उद्योग उभे झालेले नाहीत. यांच्यावर नक्की कारवाई करण्यात येईल हे मी नक्की तुम्हाला सांगू इच्छितो. गोंदियामध्ये महिला आयटीआयची त्यांची मागणी आहे, हा आयटीआय उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा आहे.

सन्माननीय सदस्य श्री.मंगलप्रभात लोढा यांनी कन्यादान योजनेत 10 हजार ऐवजी 25 हजार निधी करण्यासंदर्भात मागणी केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्रीमती मनिषा चौधरी यांनी नोकरी करणाऱ्या महिलांना ओबीसीचे आरक्षण 30 टक्के ठेवण्याबाबतची सूचना दिली. तसेच कास्ट व्हॅलीडीटीसंदर्भात त्यांनी सांगितले की, तीन महिन्याऐवजी आताच्या सेवा हमी कायद्याप्रमाणे 45 दिवसांमध्ये कास्ट व्हॅलीडीटी दिली गेली पाहिजे. त्याप्रमाणे सेवा हमी कायद्याचे नक्की पालन करण्यात येईल हे मी सांगू इच्छितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजकुमार बडोले .....

अध्यक्ष महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी येथे मागण्या केलेल्या आहेत. ज्यांच्या सूचना आलेल्या नसतील त्यांनी लेखी स्वरूपात सूचना द्याव्यात. त्याबाबत सकारात्मक दृष्टीने विचार करण्यात येईल व त्या मागण्या पूर्ण करण्यात येतील. ओबीसीची क्रिमीलेअरची मर्यादा लवकरात लवकर वाढविण्यात येईल एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सन 2016-2017 च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या सभागृहात सादर केलेल्या योजनांतर्गत 6730 कोटी 19 लाख 49 हजार तसेच योजनेत्तर 5472 कोटी 25 लाख 60 हजार फक्त असे 12202 कोटी, 44 लाख 56 हजाराच्या अर्थसंकल्पीय मागण्यांना मंजूरी देण्याची आपल्यामार्फत मी सभागृहास विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, कौशल्य विकास आणि उद्योजकता विकास विभागाच्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांचे मत व्यक्त केले आहे. यामध्ये सन्माननीय सदस्य डॉ.मिलींद माने, प्रा. वर्षा गायकवाड, डॉ.देवराव होळी, श्री.प्रकाश आबिटकर, श्री.अमित देशमुख, श्री.सुधाकर भालेराव, श्रीमती दीपिका चव्हाण, श्रीमती प्रणिती शिंदे, श्री.राहूल कूल, श्री.चंद्रदीप नरके, श्री.गोपालदास अग्रवाल, श्री.मंगलप्रभात लोढा, श्रीमती मनिषा चौधरी यांनी कौशल्य विकास आणि उद्योजकता विकास विभागाच्या संदर्भात अनेक मुद्दे व त्यावरील चर्चा येथे उपस्थित केली.

अध्यक्ष महोदय, राज्य सरकारने कौशल्य विकास आणि उद्योजकता हा वेगळा विभाग सुरु केल्यानंतर बरेच कार्यक्रम या विभागांतर्गत हाती घेतलेले आहेत. आपला देश व राज्य डेमोग्राफीक डिव्हीडंडमधून आज जात आहे. 50 टक्केपेक्षा जास्त तरुण लोकसंख्या ही 25 वर्षाच्या आतील आहे. महाराष्ट्राचे सरासरी वय 27 वर्षे आहे. त्यामुळे विकासाची मोठी संधी आज महाराष्ट्राला उपलब्ध आहे.

यानंतर QQ-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

आणि त्याकरिता या तरुण लोकसंख्येच्या हाताला काम द्यावयाचे आणि त्यांना प्रशिक्षण देण्याकरिता कौशल्य विकासाचा एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम देशाचे पंतप्रधान माननीय श्री.नरेंद्र मोदी यांनी हातात घेतलेला आहे. राज्यात देखील शासनाने या संदर्भात विविध योजना सुरु केलेल्या आहेत. साधारणत: 15 ते 45 या वयोगटामध्ये कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगाराची निर्मिती करणे हा यामागील उद्देश आहे. आज एकीकडे आपण असे म्हणतो की, देशात व राज्यात खूप बेरोजगारी आहे, परंतु दुसरीकडे जर आपण उद्योग व सेवा क्षेत्रातील उद्योगांना विचारले तर ते म्हणतात की, आवश्यक त्या प्रकारचे मनुष्यबळ उपलब्ध नाही. एकीकडे बेरोजगारी आहे, दुसरीकडे मानवी संसाधनांची कमतरता आहे. या दोन्हीमध्ये जे डिसकनेक्शन आहे, जो संबंध विच्छेद आहे तो कौशल्याचा आहे. जोपर्यंत या लोकसंख्येला कौशल्य प्रशिक्षित करुन मानवी संसाधनामध्ये मनुष्य बळ परिवर्तीत करीत नाही तोपर्यंत त्यांच्या हाताला काम मिळणार नाही. रोजगाराला जे अपेक्षित मनुष्य बळ आहे, ते मिळणार नाही. या दृष्टीने हा कार्यक्रम शासनाने हातात घेतलेला आहे. याकरिता शासनाने महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेची स्थापना केलेली आहे. रोजगार केंद्रित कौशल्य प्रशिक्षण योजना सुरु करण्यात आली. शासनाने स्व.प्रमोद महाजन कौशल्य प्रशिक्षण योजना सुरु केली त्याच्या अंतर्गत शासनाने विविध इनिशिएटिव्ह सुरु केलेले आहेत. त्यामध्ये प्रशिक्षण देण्याकरिता संस्थांची नोंदणी केलेली आहे. या संस्थेवर शासनाने बंधन टाकले की, जी संस्था प्रशिक्षा देईल त्यातील 75 टक्के प्रशिक्षणार्थींना रोजगार मिळवून देण्याची जबाबदारी देखील त्याच संस्थेची असणार आहे. या अंतर्गत शासनाने 614 संस्थांना सुचिबध्द केलेले आहे. त्याच्या अंतर्गत 551 प्रशिक्षण वर्ग सुरु केलेले आहेत. त्यातून 15,407 इतक्या लाभार्थ्यांचे प्रशिक्षण आजही सुरु आहे. 124 प्रशिक्षण वर्ग लवकरच सुरु करण्यात येणार आहेत. त्यामधून 3700 प्रशिक्षणार्थी शिक्षण घेणार आहेत. हे सर्व करण्याकरिता शासनाने पुरेशा निधीची उपलब्धतता करुन देण्यात आलेली आहे. हे करीत असतांना ज्या संस्थांना शासन याकरिता निधी देणार आहे, तो देत असताना शासनाने काळजी घेतलेली आहे. 75 टक्के लोकांना नोकरी दिल्यानंतर किमान सहा महिने नोकरीत राहतील तरच पूर्ण पैसे संस्थेला दिले जातील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

प्रशिक्षणार्थींना केवळ नियुक्ती पत्र देऊन चालणार नाही, अशी रचना करून प्रशिक्षणार्थींकरिता प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे. योजना केवळ कागदावर न राहता प्रशिक्षणार्थींची उपस्थिती बायोमेट्रिक पध्दतीने नोंदविली जाईल. केवळ कागदावर प्रशिक्षणार्थी दिसता कामा नये. त्यांची उपस्थिती असेल तरच त्यांना प्रशिक्षणार्थी म्हणून नोंदविले जाईल. या अटींवरच संस्थांना व प्रशिक्षणार्थींना पैसे दिले जात आहेत.

अध्यक्ष महोदय, यासोबतच शासनाने उद्योग केंद्रित कौशल्य विकास कार्यक्रम हाती घेतलेले आहेत. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध संस्थांसोबत आणि विशेषत औद्योगिक संस्थांसोबत शासन एमओयू करीत आहे. यामध्ये शासन पुढाकार घेत आहे. शासनाने आतापर्यंत या कार्यक्रमांतर्गत जेवढे एमओयू केलेले आहेत, त्यातून 7,02,000 एवढया प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण आणि रोजगारासंदर्भात शासनाने एमओयू केलेले आहेत. यामध्ये यूएनडीपी ही संस्था शासनाला मदत करीत आहे. टाटा ट्रस्ट या संस्थेने एक लाख प्रशिक्षणार्थींना कौशल्य प्रशिक्षित करून रोजगारक्षम बनविण्याची जबाबदारी घेतलेली आहे. जेएसडब्ल्यू या संस्थेने 20 हजार प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविण्याची जबाबदारी घेतलेली आहे. कोहिनूर टेक्निकल इन्स्टिटयूटने 1,00,000 प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविण्याची जबाबदारी घेतलेली आहे. रुस्तमजी या कंपनीने 10,000 प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविण्याची जबाबदारी घेतलेली आहे. आयसीआयसीआय स्कील ॲकॅडॅमीने 30,000प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविण्याची जबाबदारी घेतलेली आहे. प्रशिक्षण सुरु झालेले आहे. ओला कॅबने 20 हजार वाहन चालकांना प्रशिक्षित करून रोजगारक्षम बनविण्याची जबाबदारी घेतलेल आहे. नमस्तेजी या ई-कॉमर्स संस्थेने 10,000 लोकांना प्रशिक्षित करण्याची व रोजगारक्षम बनविण्याची जबाबदारी घेतलेली आहे. स्कील स्मार्ट संस्थेने शासनासोबत 10,000 प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविण्यासंदर्भात एमओयू केलेला आहे. जेम्स ॲण्ड ज्वेलरी या संस्थेने 12,000 प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देऊन त्यांच्या नोकरीची जबाबदारी घेतलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

टेक महिंद्रा फाऊंडेशनसोबत शासनाने 25,000 प्रशिक्षणार्थींच्या प्रशिक्षणासंदर्भातील एमओयू केलेले आहे. ही या क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी करते. याचे काम सुरु झालेले आहे. नॅस्कॉम ही संगणक व आय.टी.क्षेत्रातील मोठी कंपनी असून या कंपनीने शासनासोबत 50,000 प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षित करुन रोजगारक्षम बनविण्यासंदर्भातील एमओयू केलेला आहे. रियल ट्रस्ट असोसिएशन ऑफ इंडियासमवेत शासनाने एमओयू केलेला आहे. अजून याचे क्वांटिफिकेशन झालेले नाही, त्यामुळे मी याची आकडेवारी सांगू शकत नाही. फोक्सवॅगन या कंपनीने सेंटर्स काढण्याकरिता 2 कोटी रुपयांच्या निधीचा सपोर्ट शासनाला केलेला आहे. अस्तित्वातील आय.टी.आय.मध्ये अपग्रेड करुन अपेक्षित मनुष्यबळ निर्मिती व्हावी, याकरिता त्यांनी अर्थसहाय्य केलेले आहे. इलेक्ट्रॉनिक्स सेक्टर स्कील कौन्सिलने 2 लाख कौशल्य प्रशिक्षणार्थींची व्यवस्था केलेली आहे. फनफर्स्ट या संस्थेने 20,000 प्रशिक्षणार्थींची जबाबदारी घेतलेली आहे. ॲपरल सेक्टर स्कील कौन्सिल संस्थेने 20,000 प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षित करण्याची व त्यांना रोजगारक्षम बनविण्याची जबाबदारी या योजनेंतर्गत सरकारशी एमओयू करुन स्वीकारलेली आहे. अशा प्रकारे शासनाने या योजनेच्या मार्फत 7,02,000 तरुण युवक व युवतींच्या प्रशिक्षणाची व्यवस्था उभी केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने ॲप्रेंटिसचा कायदा बदललेला आहे. त्याचा फायदा महाराष्ट्र राज्याने सर्वात जास्त घेतलेला आहे. यामुळे एका वर्षामध्ये 82,299 ॲप्रेंटिस राज्याला नेमता आलेले आहेत. आयटीआयमधील 60,000 विद्यार्थी या योजनेच्या माध्यमातून समुहांमध्ये ॲब्झॉर्ब करु शकलेलो आहोत. बॉश्च कंपनीने 25 आय.टी.आय.शी करार केलेला आहे. त्यामध्ये गुंतवणूक करुन तेथील वेगवेगळया कौशल्यांचे अपग्रेडेशन सॉफ्ट स्कील देणे हे काम करण्यात येणार आहे. या 25 आय.टी.आय.सेंटर्सची सुरुवात नाशिक येथील आय.टी.आय.पासून झाली असली तरीही उर्वरित आय.टी.आय.बॉश्च कंपनीने मागास भागातील निवडलेले आहेत. त्यामुळे निश्चितपणे मोठा फायदा राज्याला होणार आहे. शासन एनसीव्हीटी, एससीव्हीटी,एमएसएसडीएस या विविध संस्थांशी आता राष्ट्रीय कौशल्य केंद्राशी पूर्णपणे अलाईनमेंट करुन कोर्स डिझाईन करण्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

या अंतर्गत जे याकरिता कर्ज देतात, महामंडळे जी या प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षणार्थींना कर्ज देतात, या सर्व कर्जाला कौशल्य प्रशिक्षणाशी लिंक कसे करता येईल ? जेणेकरून कौशल्य प्रशिक्षण घेणा-यांना कर्ज देता येईल. कर्ज मागितलेले आहे, त्यांचे स्कील्स एनहान्स कसे करता येईल याकरिता युनिफॉर्म प्लॅटफॉर्म तयार केला जात आहे.

आरआर-1/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

याचबरोबर महाकौशल्य, महारोजगार आणि स्वयंरोजगाराची पोर्टल्स तयार केलेली आहेत. ही सर्व पोर्टल्स वन स्टॉप शॉप म्हणून काम करीत आहेत. हे सर्व प्लॅटफार्म आपल्याला वापरता येणार आहेत. म्हणजे कौशल्य प्रशिक्षित लोकांची यादी ठेवता येईल, ज्यांना प्रशिक्षण घ्यावयाचे आहे, त्यांना नोंदी करता येतील, बेरोजगारांना नोंदी करता येतील आणि इंडस्ट्रिजला मागणीप्रमाणे नोंदणी करता येणार आहे. यापूर्वी आपल्याला वाटतील असे प्रशिक्षण सुरु करायचे असा एक फेरबदल केलेला आहे. शासनाने इंडस्ट्रीज प्रशिक्षण लिंकेज सुरु केलेले आहे. त्यामध्ये आपण इंडस्ट्रीजला, तुम्हाला काय हवे अशी विचारणा करुन किंवा तुमच्यासोबत कॉलॅबोरेट करुन प्रशिक्षण करु, त्याचे सर्टिफिकेशन करु, अशा प्रकारचे काम सुरु केलेले आहे. सन 2015-2016 मध्ये 233 रोजगार मेळावे घेतलेले आहेत. शासनाने 165 रोजगार मेळावे घेण्याचे उद्दिष्ट निश्चित केलेले होते. रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून 23,240 लोकांना रोजगार दिलेला आहे.

अध्यक्ष महोदय, रोजगार प्रोत्साहन योजना आहे. या योजनेमध्ये 25,300 लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी उद्दिष्ट निश्चित केलेले होते. या अंतर्गत 20,819 लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. याचबरोबर पारंपारिक किंवा प्रत्यक्ष कार्यानुभवातून कौशल्य धारण केलेल्या उमेद्वारांचे प्रमाणकीकरण करण्याचे काम केलेले आहे. आपली बारा बलुतेदाराची पध्दत आहे. यामध्ये परंपरागत ट्रेनिंगधारक आहेत. कौशल्य हे आपल्या देशातच आवश्यक आहे असे नाही. जगाला कौशल्य प्रशिक्षित मानवसंसाधन हवे आहे. आपण वेगवेगळ्या देशांमध्ये प्रशिक्षित कामगार पाठवित असतो. या कामगारांकडे कोणतेही सर्टिफिकेशन नसते, तोपर्यंत अशा कामगारांना अनट्रेन्ड मानले जाते. त्यामुळे अनेक देशांकडून मागणी असून देखील, आपल्या कामगारांना तेथील व्हीसा देखील मिळत नाही. कारण त्यांना अनस्कील्ड समजले जाते. ही स्थिती आपल्या देशात देखील असते. त्यामुळे कामगारांना प्रशिक्षित करायचे. अशा कामगारांसाठी सॉफ्ट स्कील्ड आणि हार्ड स्कील्डसारखे कोर्सेस तयार करायचे आणि त्याचे सर्टिफिकेशन त्यांना द्यायचे, अशा प्रकारची योजना शासनाने कार्यान्वित केलेली आहे. आता या योजनेंतर्गत काम सुरु केलेले आहे. अशा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

प्रकारे आपण कामगारांना सर्टिफिकेशन दिले तर या माध्यमातून एक प्रशिक्षित मानवसंसाधनाचा एक पूल तयार करु शकणार आहोत आणि या पुलाच्या माध्यमातून इतर लोकांना फायदा मिळण्यास मदत होणार आहे. यासंदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आयटीआयची मागणी देखील केलेली आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या प्रा. वर्षा गायकवाड यांनी धारावातील आयटीआयसाठी जागा उपलब्ध आहे, पण त्यामधील पदनिर्मिती केलेली नाही अशी खंत व्यक्त करुन दाखविली होती. शासनाने परवाच पदनिर्मितीसाठी धारावीत बैठक घेतलेली होती. पदनिर्मिती लवकरच केली जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गोपालदास अग्रवाल यांनी गोंदिया जिल्ह्याच्या संदर्भातील एक मागणी केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केलेली आहे, ती तपासून घेण्यात येईल. मी त्यांच्या मागणीला कधीच विरोध केलेला नाही. सन्माननीय सदस्य हे त्यांची मागणी पूर्ण करण्यासाठी वारंवार पाठपुरावा करीत असतात, याची मला पूर्ण कल्पना आहे. सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केलेली आहे, ती योग्य आहे की नाही हे पहिल्या प्रथम तपासून घेऊन पुढील योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे. सन्माननीय सदस्य चांगली मागणी करतात. राजकारणाचा भाग दूर असला तरी त्यांच्या मागण्या योग्य असतात.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश आबिटकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे मी उत्तर दिलेले आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. अमित देशमुख यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे मी उत्तर दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. मिलिंद माने यांनी नागपूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये फक्त तीन ट्रेन्ड सुरु असल्याची माहिती दिलेली आहे. हे मी तपासून घेणार आहे. परंतु, माझ्या माहितीप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे, ती योग्य नाही.

अध्यक्ष महोदय, अनुसूचित जातीकरिता प्रमोद महाजन कौशल्य योजना सुरु केलेली आहे. यामध्ये अनुसूचित जमाती असतील. माननीय महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांच्याकडे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

अल्पसंख्याक विभाग असून, त्या विभागासाठी हुनर योजना सुरु केलेली आहे. या योजनेच्या माध्यमातून अल्पसंख्याक बांधवांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत मागील काळात मुंबईमध्ये हजार तरुणींना प्रशिक्षण दिले होते. माननीय केंद्रीय मंत्री यांच्या उपस्थितीत संबंधितांना सर्टिफिकेटचे वाटप केले होते. त्यांना रोजगार मिळालेला आहे. त्यामुळे एससी, एसटी, अल्पसंख्याक यांच्या कौशल्य प्रशिक्षणाच्या कार्यक्रमामध्ये कार्यवाही सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती प्रणिती शिंदे यांनी विडी कामगारांच्या पाकीटाच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केलेला होता. सदरहू प्रश्न कौशल्य विभागाशी निगडित नसला तरी देखील त्यासंदर्भात केंद्र शासनाबरोबर आवश्यक तो पाठपुरावा केला जात आहे. विडी ओढणे हे प्रकृतीला हानीकारक आहे, हे आपण सर्वजण मान्य करतो. त्यामुळे पाकिटांवर स्टॅट्युटरी वॉर्निंग छापण्याबाबत केंद्र शासनाने सूचना केलेली असून, ती चुकीची आहे असे मला तरी वाटत नाही. परंतु, यामधील प्रॅक्टिकल अडचणीच्या संदर्भात विचारविनिमय सुरु आहे. त्यामुळे कौशल्य प्रशिक्षणाचा कोणताही संबंध येत नसल्यामुळे ती त्यावर अधिक भाष्य करणार नाही.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मंगलप्रभात लोढा यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. त्यांनी केलेल्या सूचनांचा निश्चितपणे अंतर्भाव केला जाणार आहे. सन्माननीय सदस्यांनी मोठ्या प्रमाणात ट्रेनर लागतील अशी एक महत्वपूर्ण सूचना केलेली होती. शासनाने ट्रेनरच्या ट्रेनिंगची व्यवस्था केलेली आहे. तसेच जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेच्या शाळा संध्याकाळच्या वेळेत स्कील्ड ट्रेनिंगसाठी सुरु करण्याबाबत सूचना केलेली आहे. शासनाकडून त्यासंदर्भातील धोरण तयार केले जाणार आहे. माझे तर असे म्हणणे आहे की, राज्य शासनाचे जेवढी कार्यालये आहेत, अशा कार्यालयांमध्ये कोणते स्कील्स दिले जाऊ शकते याचा देखील विचार केला जात आहे. मुख्यमंत्री कार्यालयात ॲपरँटिसची एक योजना सुरु केली. मुख्यमंत्री इंटर्स योजना सुरु केलेली आहे. यामधील अकरा महिन्यामध्ये प्रशासनाला ट्रेनिंग दिले जाणार आहे. हा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस.....

ट्रेनिंगचा भाग आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये कोणत्या योजना सुरु करता येतील, त्यातून त्यांना एंगेज करुन वषभराचे ऑन फिल्ड ट्रेनिंग आणि त्यातून सर्टिफिकेट देऊ शकलो तर रोजगार मिळण्यास मदत होणार आहे. अशा प्रकारचा विचार राज्य शासनाच्या माध्यमातून केला जात आहे. त्यामुळे स्कील गॅपचे ॲनालिसीस केल्यानंतर भरीव ट्रेनिंगचा कार्यक्रम राज्य शासनाच्या माध्यमातून सुरु केलेला आहे. या कामासाठी मला सार्वभौम सभागृहाकडून मदत मिळेल असे अपेक्षित आहे. आपल्या महाराष्ट्राला आणि देशाला पुढे घेऊन जाणारा अशा प्रकारचा एक चांगला कार्यक्रम आहे. हे नवीन मंत्रालय आहे. त्यामुळे यासंदर्भात सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्याचे निश्चितपणे पालन केले जाणार आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. राहुल कुल यांनी देखील एक चांगली सूचना केलेली होती. तसेच सन्माननीय सदस्य श्री. चंद्रदीप नरके यांनी शेतीच्या संदर्भातील स्कील्सवर कार्यवाही केली जाती काय, असा असा महत्वपूर्ण प्रश्न उपस्थित केलेला होता. शासनाने शेतीमधील स्कील गॅप ॲनालिसीस सुरु केलेले आहे. चीन देशाने स्कील डेव्हलपमेंट सुरु केलेले आहे. चीनने शेतीवर खूप मोठ्या प्रमाणावर भर देऊन कामे केलेली आहेत. यासंदर्भातील योजना केली जात आहे. शासनाने आता स्कील गॅप ॲनालिसीस सुरु केलेले आहे. हे पूर्ण झाल्यानंतर विस्तृत योजना घोषित केली जाणार आहे. म्हणून मी सभागृहाला विनंती करतो की, सन 2016-2017 या वित्तीय वर्षाकरिता कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाशी संबंधित मागणी क्रमांक झेड-अे-1, झेड-अे-2, झेड-अे-3 अंतर्गत.....

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ज्यावेळी भाषण करीत असतात, त्यावेळी ते उत्तराची आतुरतेने वाट पहात असतात. कारण एखाद्या प्रश्नाचे क्लॅरिफिकेशन केलेले नसेल तर ते उत्तराच्या भाषणानंतर मिळाले पाहिजे, अशी त्यांची अपेक्षा असते. नाही तर भाषण करुन निघून जायचे. मंत्री नंतर उत्तर देणारच आहेत. असा त्याचा अर्थ होईल. यापूर्वी माननीय मुख्यमंत्री हे सभागृहात उपस्थित नव्हते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील.

मी माझ्या भाषणात एक मुद्दा मांडला होता की आदिवासी कल्याण विभाग आणि समाज कल्याण विभाग यांचा गेल्या वर्षातील खर्च अतिशय कमी झालेला आहे. जवळपास 40 टक्क्याच्या आसपास खर्च झालेला आहे. सन 2014-2015 मध्ये 42 टक्के, जिल्हास्तरीय योजनेमध्ये 93 टक्के सन 2015-2016 मध्ये राज्यस्तरीय 18 टक्के आणि जिल्हास्तरिय 53 टक्के झालेला आहे. मागे जे झालेले आहे त्यावर आपण पडता टाकू, परंतु आता जी तरतूद केलेली आहे त्यासंदर्भात मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात सांगायला पाहिजे की, हा खर्च पुढील वर्षात 100 टक्के होईल, त्यासाठी काय मेकॅनिझम करावे लागेल यासंदर्भात या सभागृहाला शाश्वत करायला पाहिजे. स्किल डेव्हपमेंटसंदर्भात खूप बाबी सांगतल्या, मी त्याचे स्वागत करतो. हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज, पदवी शिक्षण घेणारे जे विद्यार्थी आहेत, यांचेसाठी केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या स्कॉलरशिप, फी प्रतिपूर्तीच्या योजना आहेत. व्यावसायिक फी प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. जोपर्यंत आपण तो निर्णय बदलत नाही तोपर्यंत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, ओबीसी, तसेच आर्थिकदृष्टया मागासवर्गीय बाकी जे वर्ग आहेत, या सर्वांची फी प्रतिपूर्तीसाठी शिक्षण संस्थांना वेगवेगळ्या विभागांकडे जावे लागते. म्हणून ही सेंट्रलाईज्ड करता येइल का, त्या विभागाच्या स्तरावर ते अनुदान एकत्रित करुन देता येईल काय, याचा विचार व्हावा. समाजकल्याण अधिकारी, आदिवासी विभागातील अधिकारी आहेत, हे माझ्या दृष्टीकोनातून आपल्या विषयाशी संबंधित विषय आहेत. इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट मध्ये यापूर्व काळात आपण फॅकल्टी एक्सचेंजचा कार्यक्रम घेतला होता. आमचे शिक्षक इंडस्ट्रीजमध्ये अनुभव घ्यायला जाऊ शकतील. इंडस्ट्रीज इंजिनिअर कॉलेज, शाळांमध्ये फॅकल्टी एक्सचेंजचा कार्यक्रम ॲप्रेंटिसशिप जे आपल्य कार्यालयात आहेत. मेंबर्स ऑफ पार्लमेंट कार्यालयाने एमएलए ॲप्रेंटिसशिपच्या बाबतीत सुरुवात केली आहे त्याप्रमाणे एमएलए तयार करण्याच्या बाबतीत आपणास सुरुवात करता येईल.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महाराज, आदिवासी विकास विभागाचा खर्च कमी झाला त्याचे अजून रिकन्स्लीलिएशन व्हावयाचे आहे. मागे आपण असा निर्णय घेतला होता....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप वळसे-पाटील : महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालामधून ही माहिती घेतलेली आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महाराज, राज्यात आर्थिक पाहणी अहवालाचे आकडे साधारणत जानेवारी महिन्यातील असतात, याची आपल्याला कल्पना आहेच. आता मार्च महिन्याच्या शेवटी रिकन्सीलिएशन होते. या दोन्ही विभागाच्या अंतर्गत 70 टक्के निधी रिलीज केलेला होता. त्यातून पैसे समर्पित केलेले नाहीत. कोठल्याही परिस्थितीत 50 टक्केच्या खाली हा खर्च अशक्य आहे. गेली अनेक वर्षे या विभागात 43 टक्केच खर्च होत आहे तो पूर्ण होत नाही. हा खर्च वाढला पाहिजे, यासंदर्भात आम्ही काळजी घेऊ, त्यासंदर्भात प्रयत्न करु. ज्यावेळेस रिकन्सीलिएलशन होईल त्यावेळेस यावर्षी सर्वाधिक खर्च झालेला आहे, ते आकडे मी निश्चितपणे सभागृहात मांडेन.

सन्माननीय सदस्यांनी विषय फी प्रतिपूर्तीच्या संदर्भात उपस्थित केला आहे. ही सूचना अतिशय चांगली आहे. यासंदर्भात एक कमिटी तयार करुन त्यात दोन प्रकारचे कामे केली जाणार आहेत. मागील काळातील फी संदर्भात ज्या अनियमितता झाल्या, त्या अनुषंगाने अनेक संस्थांची तपासणी सुरु केली, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता दिसून येत आहे. त्यातील लपूहोल्स दूर करणार आहोत. आपण दिलेली सूचना मला अत्यंत महत्वाची वाटते. आपल्याला वेगवेगळ्या विभागाचे इंटिग्रेशन करता येईल. सामाजिक न्याय विभागातंर्गत, समाजकल्याण अधिकारी "आ बे लड्डू जा बे लड्डू" विदर्भात अशी म्हण आहे, तशी त्यांची परिस्थिती होते. आदिवासी विभागात एटीसी किंवा प्रकल्प अधिकारी असेच प्रकार करतात. यामुळे मधली माणसे कशाला हवीत. एकदा असे ठरले की, यांचे एवढे लोक आहेत, त्यासाठी इलेक्ट्रॉनिक पध्दतीने फी ची प्रतिपूर्ती करावयाचा प्रयत्न करु या कमिटीला मॅनडेट दिलेले आहे. कौशल्य प्रशिक्षण विभागातंर्गत चांगली सूचना मांडली आहे. काही इंडस्ट्रीजमधील लोक आपल्याकडे येतात आणि आपल्यातील काही लोक इंडस्ट्रीजमध्ये जातात. विशेषत: इंजिनिअरचा अजूनही तेवढा कल नाही. त्यांचा ग्लॅमरस कंपनीकडे थोडासा कल असतो. आजकाल कॉलेजेस ग्लॅमरस ठिकाणी पठविण्याचा जास्त प्रयत्न करतात. ते मोठ्या इंडस्ट्रीजमध्ये गेले तर त्यांना जाहिरात करता येते की, आमचे मुले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

टाटा कंपनीमध्ये गेली होती, यामध्ये जो थोडा गॅप आहे त्याचा आपल्याला जरूर विचार करता येईल.

सन्माननीय सदस्यांनी एमएलए ॲप्रेंटिसशिपसंदर्भातील मुद्दा उपस्थित केला. अशाप्रकारे आपण निश्चित विचार करू पब्लिक पॉलिसीमध्ये जर कोणाला काम करायचे असेल तर, माननीय अध्यक्षांच्या अखत्यारित एमएलएच्या सर्व बाबी येतात, राज्य सरकार याला सपोर्ट करायला तयार आहे. अध्यक्ष महाराज, आपल्या अखत्यारित आपण एखादी फ्रेम तयार केली तर त्याचा जरूर तो विचार करता येईल.

डॉ.संजय कुटे : अध्यक्ष महाराज, सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला, त्यामध्ये सामाजिक न्याय विभागातील अनुसूचित जातीचा प्रवर्ग हा प्रामुख्याने आहे. त्याच बरोबर सामाजिक न्याय विभाग, एसबीसी, विमुक्त जाती, भटक्या जमाती, ओबीसी या प्रवर्गाचा समावेश होतो. अनेक सन्माननीय सदस्यंनी ओबीसी प्रवर्गासंदर्भात आपापली मते मांडली, परंतु सामाजिक न्याय मंत्र्यांनी ओबीसी संदर्भात एक चकार शब्दही काढला नाही. अनुसूचित जाती या प्रवर्गाला त्यांचा न्यायहक्क मिळाला पाहिजे, परंतु त्याचबरोबर त्यांचेसोबत ओबीसी, एसबीसी, विमुक्त जाती, भटक्या जमाती, अनुसूचित जाती, यामध्ये मातंग समाज तसेच कैकाडी या समाजाचा समावेश आहे. सामाजिक न्याय विभागाचा विचार करताना या सर्व घटकांचा समावेश त्यामध्ये झाला पाहिजे. ओबीसी प्रवर्गाला शिष्यवृत्ती मिळण्यासाठी सन 2003 चा शासन निर्णय आहे. अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी जी शिष्यवृत्ती मिळत होती, त्याच धर्तीवर ओबीसी प्रवर्गाला सवलत दिली पाहिजे, अशी मागणी झाली त्यानंतर सन 2003 पासून 100 टक्क्या ऐवजी 50 टक्के सवलत ओबीसी प्रवर्गाला दिलेली आहे. मागील कारकीर्द बघितली तर ओबीसी ला 100 टक्के शिष्यवृत्ती देण्यासंदर्भात केंद्र सरकारचे धोरण असताना ती 50 टक्के दिली गेली. यामध्ये सन 2009-2010 मध्ये थोडीशी सुधारणा केली त्यानंतर 50 टक्के सवलत प्रचलित नियमानुसार दिली गेली . सदरचा विषय आम्ही सामाजिक न्याय विभागाच्या मागण्यांच्या वेळीच मांडतो. हा विषय सहसा कोणी गांभीर्याने घेत नाही. या राज्यात जी जनगणना झालेली आहे, त्यामध्ये 51 टक्के ओबीसी प्रवर्ग आहे. मुख्यमंत्री महोदय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.संजय कुटे.....

सभागृहात उपस्थित आहोत. शासनाने ओबीसीची जनगणना जाहिर करावी. स्व.गोपिनाथ मुंडे यांनी तसेच आदरणीय मुख्यमंत्री यांनी त्यावेळी ओबीसीचा प्रश्न उचलून धरला होता. माननीय महसूल मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. ओबीसीची जनगणना प्रसिध्द करण्यात यावी. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती या वर्गाला न्याय मिळालाच पाहिजे, परंतु त्याचबरोबर 51 टक्के ओबीसी प्रवर्ग जो दुर्लक्षित राहिला आहे त्याची जनगणना जाहिर करुन त्या प्रमाणात अर्थसंकल्पामध्ये त्यांचा विशेषाधिकार त्यांना मिळाला पाहिजे.

यानंतर TT-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. संजय कुटे ....

अध्यक्ष महोदय, आदरणीय मुंडे साहेबांनी बऱ्याच वर्षांपासून ओबीसींचे स्वतंत्र मंत्रालय असले पाहिजे याबाबत मागणी केलेली होती. त्या माध्यमातून या महाराष्ट्रात ओबीसींना न्याय दिला पाहिजे. मुख्यमंत्री महोदयांनी मागच्या कार्यकाळात ओबीसींबद्दल व त्यांचे वेगळे मंत्रालय होण्याबाबत भूमिका घेतलेली आहे. आपण निश्चितपणे ओबीसींचे तारणहार आहात आणि म्हणून मला अपेक्षा आहे की, आपल्या कार्यकाळात ओबीसींचे वेगळे मंत्रालय होईल व 51 टक्के ओबीसी जनतेला आपण न्याय द्याल, त्याबाबत आपण सुतोवाच करावे, ही विनंती आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुटे यांनी ओबीसींच्या संदर्भातील विषय मांडलेला आहे आणि ही गोष्ट खरी आहे की, राज्यामध्ये ओबीसी हा खूप मोठा घटक आहे. विशेषत: सामाजिक, आर्थिकदृष्ट्या बरेच मागासलेपण हे ओबीसी समाजात देखील आहे आणि म्हणूनच आपण त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी आरक्षण देखील दिलेले आहे. आपण त्या संदर्भात काही योजना देखील चालवित आहोत. प्रामुख्याने माननीय मंत्री महोदयांनी त्या संदर्भातील एका मागणीवर तातडीने निर्णय घेण्याच्या संदर्भात सांगितलेले आहे, कारण आज नॉन क्रिमिलेअरची उत्पन्न मर्यादा योजनांकरिता आपण साडेचार लाख रुपयेच ठेवलेली आहे. ती साडेचार लाख रुपये असल्याने आज एक मोठा ओबीसी समाज यापासून वंचित राहिलेला आहे. त्यामुळे सातत्याने ही मागणी करण्यात येत आहे की, ती मर्यादा 6 लाख रुपये इतकी करण्यात यावी. त्याचे फायनान्शिअल इम्प्लिकेशन मोठे आहे म्हणून कॅबिनेटने त्या संदर्भातील सर्व फायनान्शिअल इम्प्लिकेशनची माहिती मागवून त्यानंतर निर्णय घेण्याचे ठरविलेले आहे.

मी सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुटे यांना आश्वस्त करतो की, काही फायनान्शिअल इम्प्लिकेशन असले तरी देखील ओबीसींची नॉन क्रिमिलेअरची उत्पन्न मर्यादा वाढविण्यात येईल. त्या संदर्भातील निर्णय अत्यंत तत्काळ घेण्यात येईल. त्यासोबत आपण जनगणनेच्या संदर्भातील विषयही सांगितलेला आहे. मी या अनुषंगाने सांगू इच्छितो की, हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारित येत नाही. तर तो केंद्र शासनाच्या अखत्यारित येतो. राज्य शासन ती प्रकाशित करु शकत नाही. त्यावरील उचित कार्यवाही केंद्र सरकार निश्चितपणे करील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस .....

सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुटे ओबीसींच्या संद र्भात वेगळे मंत्रालय करावे, अशाप्रकारची मागणीही आपण केलेली आहे. आम्ही त्याचा विचार निश्चितपणे करु ओबीसी महामंडळ आहे. आपल्या आमदारांची ओबीसी समितीही आहे. ही समिती आपण आपल्या योजनांचा समन्वय कशाप्रकारे घडवू शकतो, या संदर्भातील पाठपुरावा करते. या समितीचे अध्यक्ष डॉ. संजय कुटे असल्यामुळे या समितीने आम्हाला जो अहवाल दिला, त्या अहवालावर अतिशय गांभीर्याने राज्य सरकार संपूर्ण कार्यवाही करील. तुम्ही त्यांना असे सांगू नका की, ओबीसी विभाग झाला तरच ते मंत्री होतील, आता आहेत त्या विभागाचेही ते मंत्री होऊ शकतात. तुम्ही त्यांच्यावर असे काही बंधन टाकू नका. राज्य सरकार या संदर्भात गंभीर आहे. सन्माननीय सदस्य डॉ. संजय कुटे मी आपल्याला दुसरे आश्वासन देतो की, येत्या दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये ओबीसींच्या प्रश्नावर मी स्वत: एक सविस्तर बैठक घेऊन या संदर्भातील प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीन.

अध्यक्ष महोदय, सन 2016-2017 च्या वित्तीय वर्षाकरिता कौशल्य विकास व उद्योजकता विभागाशी संबंधित मागणी क्रमांक झेडए-1, झेडए-2, झेडए-3 अंतर्गत एकूण योजनेतर व योजनांतर्गत 1385.47 कोटी इतक्या खर्चाच्या अर्थसंकल्पीय मागण्यांना मंजुरी देण्याची मी आपल्यामार्फत सभागृहास विनंती करतो.

अध्यक्ष : आता मी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक एन-2, एन-3, एन-4, एन-5 तसेच, कौशल्य विकास आणि उद्योजकता विभाग या विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्रमांक झेडए-1, झेडए-2, झेडए-3 आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक.

L. A. BILL NO. XIV OF 2016

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.)

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन 2016 चे वि. स. वि. क्रमांक 14 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

अध्यक्ष : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चे वि. स. वि. क्रमांक 14 मांडतो.

अध्यक्ष : विधेयक मांडण्यात आले आहे.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : नवीन भाडे नियंत्रण कायद्याबाबतच्या बातमीमुळे भाडेकरुंमध्ये पसरलेली घबराहट

मु.शी. : नवीन भाडे नियंत्रण कायद्याबाबतच्या बातमीमुळे भाडेकरुंमध्ये पसरलेली घबराहट याबाबत मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन.

श्री. देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, सकाळी सन्माननीय सदस्य सर्वश्री मंगलप्रभात लोढा, राज पुरोहित व ॲड. आशिष शेलार यांनी नव्या भाडे नियंत्रण कायद्यावरुन संकट अशाप्रकारची बातमी आल्यामुळे भाडेकरुमध्ये खूप मोठी घबराहट पसरलेली आहे, त्यामुळे याबाबतची नेमकी परिस्थिती काय आहे यासंदर्भातील माहिती आजच देण्यास सांगितली होती. याबाबत आपण सकाळी निदेश दिले होते.

अध्यक्ष महोदय, मी या संदर्भातील सविस्तर निवेदन पुन्हा करीन. परंतु, आज प्राथमिक माहिती घेतली असता, एवढेच लक्षात आलेले आहे की, अशाप्रकारचा कुठलाही कायदा मंजूर झालेला नाही. जुन्या सरकारच्या काळातच एक ड्राफ्ट तयार झाला होता. त्याला अजून कॅबिनेटचीही मान्यता नाही, तोच ड्राफ्ट सजेशन्स, ऑब्जेक्शन्सकरिता वेबसाईटवर आलेला आहे. त्यावरुन अशाप्रकारची घबराहट तयार झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, मला असे वाटते की, अशाप्रकारची घबराहट होण्याचे काही कारण नाही. राज्य सरकारच्यावतीने देखील हे जे काही सजेशन्स, ऑब्जेक्शन्स आहेत त्या दरम्यान केंद्र सरकारला हे सांगण्यात येईल की, महाराष्ट्राची या संदर्भातील भूमिका अशी-अशी आहे. मुंबईच्या भाडेकरुना प्रोटेक्ट करण्याची भूमिका आम्ही सातत्याने घेतलेली आहे, हे देखील त्या ठिकाणी सांगण्यात येईल. त्यामुळे मला असे वाटते की, अशाप्रकारचा कोणताही निर्णय झालेला नसल्याने घबराहट पसरण्याचे काही कारण नाही. मी सविस्तर निवेदन नंतर करीन.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी.: मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही

मु. शी.: मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही या विषयावर सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, बाळासाहेब थोरात, भास्कर जाधव, मो. आरिफ नसीम खान, जितेंद्र आव्हाड, गोपालदास अग्रवाल, जयदत्त क्षीरसागर, विजय वडेट्टीवार, हनुमंत डोळस, नितेश राणे, पांडुरंग बरोरा, अब्दुल सत्तार, डॉ. सतीश पाटील, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री नरहरी झिरवाळ, सुनिल केदार, दिपक चव्हाण, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री अस्लम शेख, वसंतराव चव्हाण, डी.पी.सावंत, कालीदास कोळंबकर, मधुकरराव चव्हाण, काशीराम पावरा, अमिन पटेल, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री जयकुमार गोरे, राहुल बोंद्रे, अमित झनक, अमर काळे, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री डी. एस. अहिरे, हर्षवर्धन सपकाळ, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री कुणाल पाटील, शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, ॲड. त्र्यंबक भिसे, सर्वश्री अमित देशमुख, बसवराज पाटील, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला ...

श्री. भास्कर जाधव (गुहागर) : अध्यक्ष महोदय, दिनांक 31 मार्च, 2016 रोजी विरोधी पक्षाच्यावतीने म.वि.स. नियम 293 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या प्रस्तावामध्ये मुंबई आणि कोकण या संदर्भातील काही विकासात्मक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. मुंबईचा विचार करावयाचे म्हटले तर .....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पॉईंट ऑफ इन्फर्मेशन

ॲड. आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, या सभागृहामध्ये दुपारच्या वेळेस वेलमध्ये आमचे काही सन्माननीय सदस्य झेंडा....

श्री. भास्कर जाधव : आपल्याला पॉईंट ऑफ इन्फर्मेशन मांडण्यास हीच वेळ मिळाली काय ?

ॲड. आशिष शेलार : सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव तुम्हाला अडचणीत आणण्याचा माझा हेतू नाही. या प्रस्तावातील तुमच्या कोकणाच्या बाबतीतील भूमिकेला माझे समर्थन आहे.

अध्यक्ष महोदय, मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपल्या ठिकाणी अध्यक्षांच्या आसनावर बसलेल्या अध्यक्ष महोदयांनी असे सांगितले होते की, येथे भारताच्या ध्वजाचा अपमान झाला आहे की नाही हे आम्ही व्हिडिओ शुटिंग चेक करून पाहू व सदनासमोर त्याची माहिती दिली जाईल. त्याचे नेमके काय झाले हे मला विचारावयाचे आहे. त्याच बरोबर माझ्यासमोर जी क्लिप आहे आणि त्याबद्दलची जी माहिती दिली गेली आहे, त्यामध्ये भारतीय राष्ट्रध्वजाचा सर्रास अपमान झाल्यासारखे दिसत आहे. केवळ उलटाच नाही तर, हातामध्ये एखादी पिशवी पकडून चालावे असा ध्वज घेऊन जाणाऱ्या काही सदस्यांची माहिती व क्लिप माझ्याकडे आलेली आहे. केवळ तेवढेच नाही तर असे दिसत आहे की, एका सन्माननीय सदस्याने तो ध्वज तोंडाजवळ आणून तोंड पुसुन ध्वज खाली आणला आहे, त्यामुळे राष्ट्रध्वजाचा सरसकट अपमान झाल्याचे माझ्या समोर आलेल्या माहितीवरून दिसत आहे. आपण याबाबत खुलासा करावा व माहिती द्यावी, अशी माझी मागणी आहे.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी दिलेली माहिती मागवून घेण्यात यावी. तोंडासमोर घेऊन शिंकरणे इत्यादी बाबी तपासून घेण्यात याव्यात. राष्ट्रध्वजाचा अपमान सहन केला जाणार नाही, असे आपणही म्हणता व आम्हीही म्हणतो. यासंदर्भातील वस्तुस्थिती काय आहे, ती सदनासमोर आली पाहीजे...(अडथळा)...कुठेही घडो. सदरहू क्लीप सभागृहामध्ये व सर्वदूर फिरत आहे. मला एका न्युज चॅनेलच्या प्रतिनिधींनी देखील यासंदर्भात विचारले होते. मला माहीत नाही, असे मी त्यांना सांगितले. जो पर्यंत सभागृहामध्ये विषय येणार नाही, तोपर्यंत आपल्यालाही देता येणार नाही, असेही मी त्यांना सांगितले. परंतु सदरची क्लीप व्हॅट्सॲप वर फिरत आहे. यासंदर्भात तपासणी करण्यात यावी...(अडथळा)... विधानसभा सभागृहातील कामकाजाचे लाईव्ह प्रक्षेपण केले जात असल्यामुळे ते सर्व जगाला दिसते. त्यांनी ते पाहीले आहे. त्यामुळे या क्लीपची तपासणी करण्यात यावी व यामध्ये कोणीही दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. सदरहू सन्माननीय सदस्य या बाजूचे असो की, त्या बाजूचे असो त्यांच्यावर कारवाई झाली पाहीजे. यासंदर्भातील माहीती घेऊन सभागृहाला कार्यवाहीसहीत माहिती देण्यात यावी, अशी मी आपल्याला विनंती करतो.

अध्यक्ष : सदरहू क्लीप पाहून उद्या निर्णय करण्यात येईल. परंतु राष्ट्रध्वजाचा वापर हा केवळ ध्वजारोहणाच्या वेळीच नव्हेतर इतरत्र हाताळताना देखील त्यासंदर्भातील नॉर्म्सचे सर्वांनीच पालन केले पाहीजे. खेळाडूंकडून क्रिकेटच्या ग्राऊंडवर केले जाते, त्याप्रमाणे सभागृहामध्ये करायला नको. आपण आमदार आहोत, अनेक लोकांकडून निवडून आलेलो आहोत. त्यामुळे या ठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांनी अधिक काळजी घेतली पाहीजे. उद्या सदरहू क्लीप पाहून त्यावर निर्णय करण्यात येईल.

ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी प्रस्तावावर बोलण्यास सुरुवात करावी.

...2/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही

मु.शी.: मुंबई महानगरपालिकेतील उघडकीस आलेली गैरकारभार व भ्रष्टाचाराची प्रकरणे व पेंडसे-केंद्रेकर अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणी संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही या विषयावर सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, बाळासाहेब थोरात, भास्कर जाधव, मो. आरिफ नसीम खान, जितेंद्र आव्हाड, गोपालदास अग्रवाल, जयदत्त क्षीरसागर, विजय वडेट्टीवार, हनुमंत डोळस, नितेश राणे, पांडुरंग बरोरा, अब्दुल सत्तार, डॉ. सतीश पाटील, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री नरहरी झिरवाळ, सुनिल केदार, दिपक चव्हाण, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री अस्लम शेख, वसंतराव चव्हाण, डी.पी.सावंत, कालीदास कोळंबकर, मधुकरराव चव्हाण, काशीराम पावरा, अमिन पटेल, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री जयकुमार गोरे, राहुल बोंद्रे, अमित झनक, अमर काळे, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री डी. एस. अहिरे, हर्षवर्धन सपकाळ, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री कुणाल पाटील, शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, ॲड. त्र्यंबक भिसे, सर्वश्री अमित देशमुख, बसवराज पाटील, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुढे सुरु ...

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव (गुहागर) : अध्यक्ष महोदय, म.वि.स.नियम 293 च्या प्रस्तावामध्ये आम्ही मुंबईतील आणि कोकणातील विकासाच्या संदर्भातील काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. मी आदरणीय मुख्यमंत्री महोदयांना परवा अशी विनंती केली होती की, कृपया आपण यासंदर्भातील उत्तर द्यावे. त्यांना जेवढे शक्य आहे, तेवढे ते सभागृहामध्ये बसू शकतील. मला सभागृहामध्ये बसणे शक्य झाले नाही, तर मी नंतर पाहील, असे त्यांनी त्या दिवशी सांगितले होते.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील घरांचा प्रश्न आहे. मुंबईत दळणवळणाचा प्रश्न आहे. झोपडपट्टी निर्मुलनाचा प्रश्न आहे. पाण्याचा प्रश्न आहे. आजतागायत आपण बघितले तर इंग्रजांनी बांधलेल्या धरणाच्या व्यतिरिक्त आपण काही धरण बांधू शकलो नाही. नंतरच्या काळामध्ये आपण दोन धरण बांधायला घेतली. आरोग्याचा विषय घेतला तर इंग्रजांनी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये केवळ जी काही आरोग्य केंद्र उभी केली आहे, ती पहाता त्यानंतर सेवन हिल्स सोडले तर आणखी काही आरोग्य केंद्र उभी करु शकलो नाही. मेट्रोचा प्रश्न आहे. डीपी मंजूर झाला नाही, त्यासंदर्भातील चर्चा सुरु आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करण्याचा प्रश्न आहे. इंदू मिलचा प्रश्न आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभे करण्याचा प्रश्न आहे. सी लिंकचा प्रश्न आहे. क्लस्टर डेव्हलपमेंटचा प्रश्न आहे. पोलीस वसाहत व कामगार वसाहतीसंदर्भातील प्रश्न आहे. वरळी, शिवडी बीडीडी चाळीच्या विकासाचा प्रश्न आहे. गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न आहे आणि हिंदु ह्रदयसम्राट आदरणीय शिवसेना प्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचा प्रश्न आहे. अशा प्रकारचे असंख्य प्रश्न मुंबई महानगरपालिकेचे आहेत. या प्रश्नांवर मुंबईतीलमाझे सहकारी मीत्र बोलण्यासाठी येथे उपस्थित आहेत. म्हणून त्यासंदर्भात मी बोलू इच्छित नाही.

अध्यक्ष महोदय, आज मी प्रामुख्याने कोकणाच्या संदर्भात बोलणार आहे. 1937 साली विधीमंडळ अस्तित्वात आले. आजतागायत दुर्दैवाने कोकणच्या विकासाबाबत या सभागृहामध्ये कधीही चर्चा होऊ शकली नाही. 2007 साली मी विधानपरिषदेचा सदस्य होतो. त्यावेळी एकदा कोकणच्या विकासावर चर्चा घडवून आणली होती. कै.गुरुनाथजी कुलकर्णींच्या पुढाकाराने त्यावेळी चर्चा झाली होती. परंतु त्यानंतर एकदाही कोकणाच्या विकासासंदर्भात चर्चा झाली नाही.

...4/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव.....

अध्यक्ष महोदय, कोकण काय आहे, हे आपण प्रथम समजून घेतले पाहीजे. कोकण म्हणजे नररत्नांची खाण अशा प्रकारे कोकणाचा उल्लेख आदराने केला जातो. तो कोकण म्हणजे समुद्राला मागे हटवून भगवान परशुरामाने तयार केलेली भूमी म्हणून जीचा उल्लेख केला जातो, ती भूमी म्हणजे कोकण भूमी. नेपोलियन आणि अलेक्झांडरपेक्षाही शौर्य गाजविणारा योद्धा, ज्यांचा जन्म पश्चिम महाराष्ट्रात झाला, ज्यांचे मूळ गाव मराठवाड्यामध्ये होते, ज्यांचे आजोळ विदर्भामध्ये होते आणि ज्यांनी शेवटचा श्वास हा कोकणाच्या खांद्यावर सोडला, हिंदवी स्वराज्याची गादी म्हणून व हिंदवी स्वराज्याची राजधानी म्हणून ज्या रायगडमध्ये ज्यांनी स्थापन केली, त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली भूमी म्हणजे कोकण. "मेरी झाशी नही दुंगी", अशी गर्जना करत इंग्रजांना ठणकावून सांगणाऱ्या आणि ज्या विरांगणेने इंग्रजांशी दोन हात करुन त्यांच्यासोबत युद्ध केले, ती झाशीची राणी ही देखील माझ्या कोकणातीलच. झाशीच्या राणीची भूमी म्हणजे कोकण भूमी. सागरी किनारा सुरक्षित ठेवून मोगलांचे स्वप्न धुळीस मिळविणारे हिंदवी स्वराज्याचे आरमारप्रमुख सरखेल कान्होजी आंग्रे ज्या रायगड जिल्ह्यामधील होते, ती भूमी म्हणजे कोकण भूमी. छत्रपती शिवाजी महाराजांचे अकरावे गुरु म्हणून ज्याचा उल्लेख ऐतिहासिक दस्तऐवजामध्ये आढळतो ते केळशीचे याकुबबाबा म्हणजे कोकण भूमी. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच" असे इंग्रजांना ठणकावून सांगितले आणि इंग्रजांची सत्ता ज्यांनी गदगदा हलविली, ते रत्नागिरी जिल्ह्यामध्ये जन्माला आलेले, रत्नागिरीत जन्माला आलेले लोकमान्य टिळक यांची भूमी म्हणजे कोकण भूमी. अस्पृश्यता व गुलामगिरीच्या खाईत लोटल्या गेलेल्या लाखो दलित पिडीतांचे पुनरुत्थान करणारे महामानव, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमी म्हणजे कोकण भूमी.

अध्यक्ष महोदय, महात्मा गांधीचे राजकीय गुरु गोपालकृष्ण गोखले, सुदैवाने त्यांच्या घराच्या शेजारी माझे घर असून त्यांचे गाव माझे मूळ गाव आहे. असे गोपाळकृष्ण गोखले यांची भूमी म्हणजे कोकण भूमी. "खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे", अशा प्रकारे धर्माची व्याख्या सांगून या देशाला मोठा संदेश देणारे पांडुरंग सदाशिव साने म्हणजे दापोलीला जन्माला आलेले साने गुरुजी यांची भूमी म्हणजे कोकण भूमी. सिंधुदुर्गातील पोंभुर्ले येथे जन्मलेले आणि पुढे जावून

...5/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव.....

मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर हे सुद्धा कोकणचे असून त्यांची जन्मभूमी म्हणजे कोकणच भूमी. महिलांचे शिक्षण व त्यांचे हक्क, विधवा पुनर्विवाह यासाठी जीवन वाहून घेतलेले थोर समाजसुधारक, भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे तथा अण्णासाहेब कर्वे हे सुद्धा माझ्या कोकणातलेच.

अध्यक्ष महोदय, थोर समाजसुधारक आगरकर हे देखील माझ्या कोकणातलेच. धर्मशास्त्र व समाजसुधारणा या क्षेत्रात असामान्य कर्तृत्व गाजवून जागतिक किर्ती मिळविणारे आणि महोपाध्याय अशी ख्याती प्राप्त करुन पहिले भारतरत्न या उपाधिने सन्मानित झालेले पां वा. काणे हे देखील माझ्या कोकणचेच आणि त्यांची भूमी म्हणजे कोकण भूमी. गणितशास्त्र या विषयात केंब्रिज विद्यापिठातील 'रॅग्लर' ही सर्वोच्च पदवी मिळविलेले, फर्ग्युसन कॉलेजचे माजी प्राचार्य रघुनाथराव परांजपे म्हणजे 'रॅग्लर' परांजपे हे देखील माझ्या कोकणातलेच आणि त्यांची भूमी म्हणजे कोकण भूमी. ज्या काळी स्त्री शिक्षणच नाही तर स्त्रियांनी घराबाहेर पडणेही निषिद्ध मानले जात होते, अशा काळात सातासमुद्रापार जावून ज्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले आणि महाराष्ट्रातील पहिल्या महिला डॉक्टर होण्याचा मान मिळविला, ज्या गुहागरचे मी प्रतिनिधीत्व करतो, त्या गुहागरच्या आनंदीबाई जोशी यांची भूमी म्हणजे कोकण भूमी, त्यादेखील माझ्या कोकणातीलच. इंग्रज अधिकारी जॅक्सनवर गोळ्या झाडून त्याचा वध करणारे आणि वयाच्या अवघ्या 18 व्या वर्षी मातृभीमीसाठी "वंदे मातरम" म्हणून फासावर जाणारे, बलिदान देणारे क्रांतीकारक हुतात्मा अनंत कान्हेरे हे देखील आयनीमेटे गावातले, त्यांची भूमी म्हणजे कोकण भूमी.

अध्यक्ष महोदय, मराठी कवितेच्या क्षेत्रात क्रांती घडविणारे युगप्रवर्तक कवी कृष्णाजी केशव दामले अर्थात कवी केशवसूत हे सुद्धा माझ्या कोकणातलेच. देशाच्या साहित्य क्षेत्रातला सर्वोच्च प्रतिष्ठेचा ज्ञानपीठ पुरस्कार मिळविणारे विंदा करंदीकर हे सुद्धा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील म्हणजे माझ्या कोकणचेच. साठाव्या दशकात प्रकाशित झालेल्या "गारंबिचा बापू"ची मोहिनी आजही टिकून असणाऱ्या कादंबरीचे लेखक श्री. ना. पेंडसे म्हणजे कोकण. "सह्याद्रीच्या तळी शोभिते हिरवे तळकोकण" यासारख्या काव्यरचनांनी माहिती सर्वदूर पोहचविणारे, ज्या विभागाचे मी प्रतिनिधीत्व करतो त्या गुहागरचे कवी माधव काटदरे म्हणजे कोकण. आपल्या साहित्याने जगाला

...6/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव.....

भुरळ घालणारे वि. स. खांडेकर असतील, मंगेश पाडगांवकर असतील, आरती प्रभू असतील, कविवर्य वसंत सावंत असतील, पद्मश्री मधु मंगेश कर्णिक असतील तसेच वेगळ्या विचारधारेचे क्रांतीकारी लेखक, समाजसुधारक हमीद दलवाई यांची भूमी म्हणजे कोकण.

...VV/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्कर जाधव.....

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सन 1952 साली देशाच्या लोकसभेत पहिले सभापती म्हणून ज्यांनी काम केले ते श्री.गणेश वासुदेव तथा दादासाहेब मावळंगकर यांची भूमी कोकण. क्रिकेटचा देव ज्याला आपण मानतो तो सचिन तेंडूलकर, विक्रमादित्य सुनिल गावसकर, दिलीप वेंगसरकर हे दिग्गज खेळाडू कोकणच्या मातीततले, हे खेळाडू म्हणजे कोकण. लक्ष्मीकांत बेर्डे, डॉ.काशिनाथ घाणेकर, मच्छिंद्र कांबळी, माधुरी दिक्षित, प्र.ल.मयेकर असे अनेक अनमोल हिरे रंगभूमी व चित्रपट श्रृष्टीला देणारी भूमी म्हणजे कोकणची. असा माझा कोकण आहे.

अध्यक्ष : या राज्याचे पहिले मुख्यमंत्री श्री.बाळासाहेब खेर हे देखील कोकणचेच होते.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मी कोकणची थोडीशी पार्श्वभूमी सांगणार आहे. सदनामध्ये माननीय मुख्यमंत्री उपस्थित असल्याने मला मूळ मुद्यावर बोलावयाचे आहे. 26/11 मुंबईतील दशतवादी हल्ल्याच्या वेळी अतिरेक्यांशी दोन हात करताना चिपळून तालुक्यातील शहीद झालेले कै.शशांक शिंदे, हे सुध्दा माझ्या कोकणातील होते.

अध्यक्ष महोदय, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याच्या वेळी मुंबई वाचविण्याकरिता मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन करण्याकरिता 106 हुतात्म्यांनी बळी दिला होता. त्यापैकी 99 हुतात्मे माझ्या कोकणातील होते. त्या 99 हुतात्म्यांनी बलिदान देऊन मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केली.

अध्यक्ष महोदय, एका बाजूला अथांग सागर, दुसऱ्या बाजूला सह्याद्रीचा उत्तुंग कडेकपारीमधील नसर्गाचे वरदान लाभलेला चिंचोळा भाग म्हणजे कोकण. कोकण म्हणजे काय, तर एका बाजूला समुद्र, दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या 22 पर्वत रांगा व त्याच्यामध्ये असणारी चिंचोळी पट्टी म्हणजे कोकण. कोकणाला फार मोठी जमीन नाही, अत्यंत चिंचोळी पट्टी असलेला भाग म्हणजेच कोकण.

अध्यक्ष महोदय, आंबा, काजू, फणस, कोकम, करवंदीची विविधता, नारळी-पोफळीच्या बागा बागांनी बहरलेला, डवरलेला भाग म्हणजे कोकण. 720 कि.मी. समुद्र किनारा लाभलेला व माशांची विपुलता लाभलेला भाग म्हणजे कोकण.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.योगेश सागर)

श्री.भास्कर जाधव.....

अध्यक्ष महोदय, नागमोडी वळणाचे रस्ते, डोंगरकड्या कपारातून कोसळणारे धबधबे, गरम पाण्याचे झरे, जांभा दगड, माती व कौलारुची घरे, स्वच्छ व सुंदर शेणाने सारवलेले अंगण म्हणजे कोकण.

अध्यक्ष महोदय, दशावतार, नमन, जाखडी, शिमगोत्सवातील संकासूराचे खेळे अशा प्रकारच्या लोककलांचे माहेर घर म्हणजे कोकण.

अध्यक्ष महोदय, दुष्काळ पडला, पूर आला, वादळ वाऱ्यात शेती भागाचे नुकसान झाले कितीही अडचणी आल्या तरी संकटाला धिरोदात्तपणे सामोरे जाणारा व पुन्हा नव्या जोमाने उभा राहणारा माणूस म्हणजे कोकण. शासनाचा कोणताही कर न चुकवणारा, कर्ज न काढणारा, काढलेच तर वेळीच हप्ता भरणारा, कोणत्याही प्रकारचा हुंडा न मागणारा, एकही हुंडाबळी न घेणारा, स्त्रीभ्रूण हत्या न करणारा, स्वत:चे कितीही नुकसान झाले तरी शासनाकडे आपली नुकसान भरपाई मागण्यासाठी आक्रस्ताळेपणा न करणारा माणूस म्हणजे कोकण.

अध्यक्ष महोदय, आज या सभागृहामध्ये अशा विविधतेने नटलेल्या व वैभव संपन्न कोकणाच्या सौंदर्याची महती मी आपणास सांगत आहे. शौर्यांचा, विरांचा, कविंचा अशा प्रकारची खूप मोठी परंपरा लाभलेला कोकण. त्या कोकणाच्या विकासाच्या चर्चा व योजना आपल्याकडून मंजूर व्हाव्या, या अपेक्षेने सदनामध्ये म.वि.स.नियम 293 अन्वये प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

अध्यक्ष महोदय, एक काळ कोकणातील माणसांचा संपूर्ण आर्थिक गाडा हा मुंबई व पुणे येथून येणाऱ्या मनी ऑर्डरवर सुरु होता. कोकणी माणूस म्हणजे मनी ऑर्डर. कोकणामध्ये शेती नाही. थोडी फार जी भात शेती आहे ती 100 टक्के निसर्गाच्या लहरीपणावर चालणारी आहे, पावसावर अवलंबून राहणारी आहे. पाऊस भरपूर पडला तर ती शेती वाहून जाते. त्याकरिता शासनाने मदत करण्याचे ठरविले तरी तेथे दुबार पीक, घेता येत नाही, दुबार पेरणी करता येत नाही. पाऊस पडला नाही व शासनाने बी-बियाणे दिले तरी दुबार पेरणी करता येत नाही व पीक घेता येत नाही. अशा प्रकारची एक पिकी शेती असलेला कोकण हा भाग आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्कर जाधव.....

अध्यक्ष महोदय, आजपर्यंत कोकण हा मनी ऑडर्वर जीवंत राहिला आहे. कोकणातील लोक मुंबई व पुणे येथे मिळेल ती नोकरी करुन आपला संसार निटनेटका चालवत होते. या नोकरीच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या मनी ऑर्डर आज संपल्या आहेत. मुंबईतील गिरण्या बंद पडल्याने कोकणच्या लोकांचा कायमचा रोजगार गेला. पोलीस भरतीमध्ये समानता आल्यामुळे लोकांची हक्काची नोकरी गेली. आज आपण पाहिले जगात ग्लोबलायझेशन आले आहे. जगातील कोणत्याही देशातील व राज्यातील माणूस आपल्याकडे येऊ शकतो, रोजी रोटी कमवू शकतो. त्यामुळे कोकणातील माणसाची हक्काची रोजीरोटी राहिलेली नाही. त्यामुळे कोकणातील लोकांवर मोठ्या प्रमाणात एक दडपण आहे.

अध्यक्ष महोदय, आज कोकणाच्या विकासासाठी मत्स्य विकास, पर्यटन व फळलागवड या तीन गोष्टीवर विचार करण्याची गरज आहे. कोकणातील मत्स्य विकासासंदर्भात काही निर्णय घेण्याची गरज आहे, पर्यटनाचे धोरण आखण्याची आवश्यकता आहे, फळलागवडीसाठी मदत करुन फुड प्रोसेसिंगचे युनिट मोठ्या प्रमाणात उभे करण्याची आवश्यकता आहे. कोकण भूमी म्हणजे डॉलर भूमी आहे. कोकणातून परदेशामध्ये मासे पाठविण्यात येतात त्यामधून आपल्याला डॉलर मिळतात. परदेशी पर्यटकांच्या कोकण पर्यटनातून डॉलर मिळतात. जेएनपीटी व मुंबई पोर्ट ट्रस्टच्या माध्यमातून डॉलर मिळतात. कोकणातील आंबा बाहेर देशात विक्रीसाठी पाठवतो त्यामधून देखील मोठ्या प्रमाणात डॉलर मिळतात. ही डॉलर भूमी पूर्णपणे दुर्लक्षित झाली आहे.

अध्यक्ष महोदय, पर्यटनाच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर केरळ राज्याला पर्यटनाच्या माध्यमातून 28 हजार कोटी रुपये उत्पन्न मिळते. केरळ राज्यात वर्षाला 12 लाख विदेशी पर्यटक येतात व 1 कोटी देशी पर्यटक जातात. त्यांच्या माध्यमातून केरळमध्ये 28 हजार कोटी रुपयांची उलाढाल होते. कोकणात जेमतेम 60 ते 70 हजार देशी पर्यटक येतात. मुंबईमध्ये 50 ते 60 लाख पर्यटक येतात पण त्यातील पर्यटक कोकणामध्ये जात नाहीत. कारण कोकणामध्ये पर्यटकांसाठी आवश्यक सोयीसुविधा नाहीत. कोकणामध्ये पर्यटनासाठी आवश्यक गोष्टी करण्यात येत नाहीत.

....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्कर जाधव.....

अध्यक्ष महोदय, राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये पर्यटनासाठी यावर्षी केवळ 285 कोटी रुपये तरतूद केली आहे. केरळ राज्याने पर्यटनाच्या प्रसिध्दीसाठी 275 कोटी रुपये तरतूद केली आहे. त्यामुळे देशात व देशाच्या बाहेर केरळ राज्यातील पर्यटनाची जाहिरात करणे शक्य होते. आपल्या राज्य शासनाने पर्यटन प्रसिध्दीसाठी केवळ 62 कोटी रुपये तरतूद केली आहे. राज्य शासनाने पर्यटनवाढीकरिता हजारो कोटी रुपये तरतूद करण्याची आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये जाणारा मुंबई-गोवा हायवे हा एकमेव रस्ता आहे. राज्यातील सर्व रस्त्यांचे चौपदरीकरण झाले आहे. परंतु या रत्याचे काम मागील कित्येक वर्षापासून रखडलेले आहे. हा रस्त्या या सरकारमुळे रखडला आहे, असे मी म्हणत नाही. मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहामध्ये अनेक वेळा सांगितले की, देशातील सर्वात जास्त अपघात होणारा मुंबई-गोवा हा रस्ता आहे. देशात सर्वात जास्त अपघात या रस्त्यावर होतात. जेवढी माणसे दिवसागणिक अपघात होऊन या रस्त्यावर मृत्युमूखी पडतात तेवढी माणसे देशातील कोणत्याही रस्त्यावर अपघात होऊन मृत्युमूखी पडत नाहीत. हा रस्ता राज्यांतर्गतच नाही एका बाजूला गोवा व दुसऱ्या बाजूला महाराष्ट्र ही दोन राज्ये जोडणारा हा रस्ता आहे. या रस्त्याचे चौपदरीकरण होत नसल्याने पर्यटक कोकणामध्ये जाऊ शकत नाही. पूर्वीच्या काळात हा हायवे नव्हता. कोकणामध्ये पूर्वी जलवाहतूक होती, ती आता बंद पडली. शासनाने मुंबई-गोवा हायवे तत्काळ चौपदरी करावा, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी व मुख्यमंत्री महोदय कोकणामध्ये रस्त्याच्या भूमिपूजनासाठी आले होते. त्यावेळी मुख्यमंत्री महोदय पुढील कार्यक्रमासाठी थोडे लवकर गेले होते. नंतर माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांनी कोकणातील जलवाहतूक सुरु करण्यासाठी मी प्रयत्न करीत आहे, असे सांगितले होते. मुख्यमंत्री महोदयांनी अनेक निर्णय दिल्ली सरकारकडून करुन आणल्याची माहिती त्यांनी सभागृहाला अनेक वेळा दिली आहे. त्यांनी याप्रकरणी पुढाकार घेऊन कोकणातील जलवाहतुकीचा प्रश्न सोडविला तर मी त्यांना निश्चितपणे धन्यवाद देईन.

यानंतर WW-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव....

आज आपण बघितले तर दरवर्षी मी मघाशी म्हटल्याप्रमाणे आपल्याला माशांमधून दरवर्षी 3986 कोटी रुपये परकीय चलन मिळते. 148 हजार टन दरवर्षी आपल्या समुद्र किनाऱ्यावर मासेमारी होते. त्याचबरोबर 32,96,027 क्विंटल आंबा निर्यात होतो. त्यातून 25 हजार 613 लाख कोटी इतकी रक्कम, मला वाटते कदाचित माझा हा आकडा चुकत असावा. पण एवढे परकीय चलन आपल्याला मिळते. त्यामुळे कोकणाच्या दृष्टीने आपल्याला या ठिकाणी काही तरी प्रयत्न करायला हवा.

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये काही समुद्र किनारे अत्यंत धोकादायक आहेत. त्यामध्ये हर्णे, मुरूड, गुहागर, वेळणेश्वर, रत्नागिरी, देवगड, मिठबाव, कुणकेश्वर, मालवण, वेंगुर्ला, रायगडमध्ये थिवीम, अलिबाग, रेवदंडा, मुरुड, जंजिरा, हरीहरेश्वर, श्रीवर्धन, ठाण्यामध्ये बोडर्वे, डहाणू, केळवे, माहिम आणि अर्नाळा या ठिकाणी वरचेवर मोठ्या प्रमाणात अपघात होतात. अनेक माणसे समुद्राच्या लाटांमध्ये किंवा समुद्राच्या पाण्याच्या मोहामध्ये पडतात, त्यांना स्वतःला कंट्रोल करता येत नाही. तेथील पाण्याचा अंदाज नसतो. लाटांचा अंदाज नसतो आणि तरुण तरुणी त्यामध्ये पोहायला जातात व दुर्दैवाने त्या ठिकाणी मृत्यूमुखी पडतात. 4 महिन्यांपूर्वी एका कॉलेजची मुले सहल घेऊन आली होती. त्यातील 14 तरुण मुले मुरुडच्या किनाऱ्यावर बुडून गेली. माझ्या गुहागरमध्ये 26 सप्टेंबर 2015 ला 7 जणांचे संपूर्ण कुटुंब समुद्रामध्ये बुडून गेले. अशा प्रकारे वर्षभरामध्ये जवळ जवळ 120 ते 122 माणसे समुद्राच्या पाण्यात बुडतात, अशा प्रकारची माहिती आहे. पर्यटनाच्या दृष्टीने आणि पर्यटकांच्या दृष्टीने ही बाब अत्यंत चिंताजनक आहे आणि पर्यटनाला मारक आहे. आपण या संदर्भात गोवा राज्याच्या धर्तीवर उपाययोजना आखण्याची गरज आहे. त्यासाठी आपण पुढाकार घ्यावा, अशा प्रकारची विनंती मी आपल्याला करतो.

अध्यक्ष महोदय, मला दुसरा मुद्दा कोकणातील पाटबंधारे प्रकल्पासंबंधी निदर्शनास आणावयाचा आहे. कोकणातील पाटबंधारे प्रकल्प गेले कित्येक वर्षे बंदच झालेली आहेत. ते पूर्ण होण्याकरिता आणि कोकणाच्या विकासाकरिता आपण आतापर्यंत बघितले तर एवढ्या समित्या त्यासाठी नेमल्या की, विचारु नका. त्यामध्ये पहिली स्वामिनाथन समिती, दुसरी खताळ समिती, तिसरी कल्याणी समिती, चौथी भाई सावंत समिती, पाचवी आडारकर समिती, सहावी भाऊसाहेब वर्तक समिती, सातवी जयंत पाटील समिती, आठवी बलिआप्पा समिती, नववी कर्देकर पेंडसे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव....

समिती, अशा प्रकारच्या अनेक समित्या नेमल्या गेल्या. या प्रत्येक समितीने आपापल्या परीने पाटबंधारे विभागासंदर्भात शासनाला अहवाल दिलेले आहेत. आपल्याकडे ती बरीचशी माहिती आहे. यामधील कोणताही एक अहवाल कायम स्वरुपी आपण स्वीकारलेला नाही. वि.म.दांडेकर समितीचा 1983 सालचा अहवाल आपण अद्यापही स्वीकारलेला नाही. कोकणाचे भाग्य किंवा दुर्भाग्य म्हणा, काही वर्षे आमचे बॅ. अंतुलेसाहेब मुख्यमंत्री म्हणून राहिले असते तर निश्चितपणे आमच्या कोकणाला न्याय मिळाला असता. कारण त्यांनी कोकणाकरिता एकूण 16 कलमी कार्यक्रमाची आखणी करुन कामाला सुरूवात केली होती. त्यातील एक पाटबंधारेचा आणि दुसरा सागरी महामार्गाचा विषय आहे. मघाशी मी ज्या पध्दतीने मुंबई गोवा महामार्ग म्हणालो तशाच पध्दतीने सागरी महामार्गाचा एक विषय आहे. हा सागरी महामार्ग वर्षानुवर्षे पूर्णत्वास गेलेला नाही. पर्यटनाच्या दृष्टीने आणि प्रदुषणाच्या दृष्टीने हा अत्यंत चांगला मार्ग आहे. हा मार्ग पूर्ण झाला तर कोकणामध्ये पर्यायी रस्ता निर्माण होईल. त्यामुळे याचा विचार करण्याची गरज आहे. आज कोकणामध्ये एकही विमानतळ नाही. पर्यटनाच्या दृष्टीने विमानतळ अत्यंत आवश्यक आहे. चिपीचे विमानतळ पूर्ण होण्यासाठी गेले कित्येक वर्षे प्रयत्न झालेला आहे पण ते पूर्ण झालेले नाही. रत्नागिरीला विमानतळ अस्तित्वात आहे. पण त्याला विकसित करावे लागेल. त्याचे थोडेफार रिन्यूवेशन करावे लागेल. सध्या ते कोस्ट गार्ड याच्या ताब्यात दिले आहे. आपल्या कारकिर्दीमध्ये एखादी सर्व्हीस सुरू झाली तर निश्चितपणे त्याचा फायदा होईल.

अध्यक्ष महोदय, आज आपण बघितले तर कोकणासाठी वैधानिक विकास महामंडळ स्थापन व्हावे अशा प्रकारची मागणी, "जेथे मागासलेपण तेथे वैधानिक विकास महामंडळ" आमची अवस्था अत्यंत कठीण झाली आहे. वैधानिक विकास महामंडळासंबंधी 13 मार्च 1989 साली तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय श्री. शरद पवारसाहेब यांनी या सभागृहामध्ये ठराव मांडला आणि वरच्या सभागृहामध्ये तत्कालीन अर्थमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदेसाहेब यांनी ठराव मांडला. दोन्ही सभागृहांनी एकमताने पाठिंबा दिला आणि त्यानंतर कै. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना पुन्हा ठराव झाला आणि त्यामध्ये मात्र आपण उत्तर महाराष्ट्र घातला. पण पूर्वी कोकणासाठी वेगळे वैधानिक विकास महामंडळ व्हावे असे ठरले होते. आज आमच्या वैधानिक विकास महामंडळाची अवस्था काय आहे हे बघितले तर आणि आपण आमचा कोणताही बॅकलॉग बघितला तर तो

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव....

आपल्याला दिसत नाही. आपल्याला तो पाटबंधारे खात्याचा दिसत नाही. रस्त्यांचा दिसत नाही, सिंचनाचा दिसत नाही, दळणवळणाचा दिसत नाही, शिक्षणाचा दिसत नाही, का तर एका बाजूला जो प्रगत भाग आहे, त्या प्रगत भागाप्रमाणे आम्ही आहोत, त्या पश्चिम महाराष्ट्राबरोबर आम्हाला जोडले आहे. उत्तर महाराष्ट्राबरोबर जोडले आहे. मुंबई आणि ठाणे ही अत्यंत प्रगत शहरे आहेत, त्यांच्याबरोबर आमचे सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड हे तीन जिल्हे जोडले असल्यामुळे आमचा बॅकलॉग आहे असे आपल्याला आकडेवारीवरुन दिसत नाही. माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करताना आपण केवळ कोकण डोळ्यासमोर ठेऊन चर्चा करावी. माझा प्रयत्न हाच होता की, फक्त कोकणाची चर्चा या सभागृहामध्ये आणायची. म्हणून मी सर्वच पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या सह्या घेतल्या होत्या. आपल्यालाही भेटलो होतो, त्यावर आपण ताबडतोब उत्तर देण्याची तयारी दाखविली होती. माननीय अध्यक्षांना भेटलो आणि त्यांना विनंती केली की, आपण नियम 101 अन्वये या प्रस्तावावर सभागृहामध्ये चर्चा घडवून आणावी. नियम 101 अन्वये प्रस्ताव आला तर निव्वळ कोकणाची चर्चा आम्हाला करता येईल. परंतु हा प्रस्ताव 293 अन्वये आल्यामुळे यामध्ये मुंबईचा समावेश झाला आणि त्यामुळे नुसत्या कोकणाची चर्चा यामध्ये करता येत नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, उद्या उत्तर देताना मुंबईची आकडेवारी धरुन आपण त्याचा विचार करु नका तर कोकणातील दोन जिल्ह्यांचा विचार करावा.

अध्यक्ष महोदय, आज आपण बघितले तर पश्चिम महाराष्ट्रातील साखर उद्योग हा तेथील शेतकऱ्यांचा कणा आहे. विदर्भातील शेतकऱ्याचा कापूस हा कणा आहे, मराठवाड्यातील शेतकऱ्याचे उत्पन्न कापूस आहे. शेतकऱ्यांच्या पाठीमागे उभे राहणे हे आपले कर्तव्य आहे असे मी समजतो. त्यांच्या पाठीशी आपण उभे राहिले पाहिजे. मुख्यमंत्री महोदय आपण हा निर्णय एकदा कधी तरी घ्या. परवा कधी तरी आपण म्हणालात की, मी काही मुंबईकर नाही. पण मी जेव्हा कधी तरी रिटायर होईल आणि नागपूरला जाईल तर त्यावेळी लोकांनी म्हटले पाहिजे की, मुंबईचा विकास आणि मुंबईच्या विकासाचा विचार हा नागपूरच्याच माणसाने केला आहे, अशा प्रकारची इतिहासात नोंद व्हावी असे आपण भाष्य केले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भास्कर जाधव....

अध्यक्ष महोदय, माझी आपणास विनंती आहे की, अशा प्रकारचा निर्णय आपण कोकणासाठी घ्यावा. ज्या मागास आणि दुर्लक्षित भागातून आपण आलात, तसाच आज कोकणाचा उल्लेख सुध्दा मागास कोकण, दुर्लक्षित कोकण, भकास कोकण, अविकसित कोकण म्हणून होतो, त्यावेळी आमच्यासारख्या कार्यकर्त्याला असंख्य वेदना होतात. अशा प्रकारचा निर्णय घ्या की, कोकणाचा विकास विदर्भातील एका मागास भागातून आलेल्या तरुण मुख्यमंत्र्याने केला अशा प्रकारचे चांगले निर्णय आपल्याकडून व्हायला पाहिजेत आणि ते निर्णय कोणते झाले पाहिजेत तर त्यामध्ये पहिल्यांदा कोकणचा विकास होण्याकरिता कोकण पर्यटन विकास महामंडळ स्थापन करण्याची गरज आहे. त्याकरिता संजय यादवरावसारखा आपला कार्यकर्ता नेमा. जलपुरुष असलेले सन्माननीय श्री. राजेंद्र सिंह यांच्या कार्यक्रमासाठी आपण गेलो होतो. अतिशय चांगला अभ्यास असलेली व्यक्ती. राजकारणामध्ये जरुर आमचा विरोध असेल, तो आपल्या पक्षाचा असेल, पण या विषयामध्ये त्यांचा अभ्यास चांगला असल्यामुळे अशा एखाद्या कार्यकर्त्याची नेमणूक केली तर बरे होईल. आम्हाला आपण मदत म्हणून देऊ नका, आम्हाला आपण अनुदान म्हणून देऊ नका, आम्हाला आपण पॅकेज म्हणून देऊ नका. पण कोकणाला 10 वर्षाकरिता 2-2 हजार कोटी रुपये आपल्याला मूलभूत सुविधा देण्यासाठी द्यावेत. हवे असल्यास ही रक्कम कर्जाऊ म्हणून घ्यावी. ती टॅक्सच्या रुपाने घेता आली तर घ्या. पण 10 वर्षाकरिता कोकणाला कोणी तरी मदत करण्याची गरज आहे. जर 10 वर्षे आपण पर्यटनाकरिता मदत केली, फलोत्पादनाकरिता मदत केली, मत्स्य व्यवसायाकरिता मदत केली तर मी जाहीरपणे सांगतो की, महाराष्ट्राचा आर्थिक भार हा माझा कोकण उचलल्याशिवाय राहणार नाही, एवढी क्षमता कोकणात आहे. आर्थिक भार कोकण उचलेल. आम्हाला अजिबात अनुदान देऊ नका.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्कर जाधव.....

अजिबात आम्हाला पैसे माफ करु नका. पण ते आम्हाला विकासाकरिता मुलभूत सोयी सुविधांकरिता याठिकाणी द्यावेत अशी माझी विनंती आहे. विरोधाला विरोध म्हणून सांगत नाही. हे देताना आपल्याला अडचण काही येणार नाही आणि वाटले तर एकदा श्वेपत्रिका काढून टाका. गेल्या 50 वर्षामध्ये कोकणाला किती मदत केली? अतिवृष्टी झाली तर शेतकऱ्यांना मदत करतो. मदत करायला पाहिजे, पण कोकणाला काहीही मदत झालेली नाही. कधी पाऊस पडला नाही म्हणून शेतकऱ्याला मदत केली पाहिजे. कोकणाला काही मदत होत नाही. शेतकऱ्यांचे कर्ज माफ करतो, कोकणात कोणी कर्जच घेत नाही. त्यामुळे त्यांना माफीचा फायदा मिळत नाही. आपण कर्जाचे हप्ते रिशेड्युल करतो. कोकणात कोणी कर्जच घेत नाही. त्यामुळे हप्ते रिशेड्युल करण्याचा प्रश्न येत नाही. आपण कृषी संजीवनी योजना काढतो. कोकणामध्ये एकही रुपयाचा फायदा नाही. विद्यार्थ्यांची फी माफ नाही. कोकणाला काही मदतच आपण करु शकत नाही. म्हणून त्याच्या विकासाकरिता मदत करा आणि ही मदत करावी अशाप्रकारची मी विनंती करतो. कोकणाकरिता वेगळे वैधानिक विकास महामंडळ आणले तर आपल्याला जेवढे धन्यवाद द्यावे तेवढे देता येतील. अशाप्रकारची मी याठिकाणी अपेक्षा व्यक्त करतो. मी भरपूर वेळ बोलणार होतो, परंतु फार वेळ घेणार नाही.

अध्यक्ष महोदय, 48 बंदरे आज कोकणात आहेत. आपण नवीन पॉलिसी तयार करीत आहात. सभागृहाचे विरोधी पक्षनेते श्री.राधाकृष्ण विखे-पाटील या खात्याचे मंत्री होते आणि मी त्या खात्याचा राज्यमंत्री होतो. आम्ही राज्याचे पहिले धोरण तयार केले. त्यामध्ये आपण नवीन चांगले बदल करीत आहात. जर तशा प्रकारचा बदल केला तर त्याचा फायदा निश्चितपणे कोकणाला होईल आणि याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. दुसरी गोष्ट अशी की, मुख्यमंत्री महोदय नागपूरला असे म्हणाले होते की, कोकणामध्ये केमिकल झोन आणीत आहोत. माझी आपल्याला हात जोडून विनंती आहे की, सगळे काही करा पण कोकणामध्ये केमिकल झोन आणू नये. आम्ही अत्यंत हवालदिल झालेलो आहोत. कोकणामध्ये कोळशावर आधारित 26 प्रकल्प होणार अशाप्रकारची चर्चा आणि टांगती तलवार गेली दहा वर्षे आमच्या डोक्यावर आहे. या प्रकल्पांची सर्व

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्कर जाधव.....

नावे माझ्याकडे आहेत. सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी यांना फक्त 200 मेगावॅट वीज लागते. पाण्यावरील कोयनेची वीज आम्ही तुम्हाला 1020 मेगावॅट वीज देतो. बाकीच्या ठिकाणची वेगवेगळी वीज देण्यात येते. 10 हजार कोटी रुपयांचा जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प याठिकाणी आणलेला आहे आणि आम्ही तीन ते साडेतीन हजार मेगावॅट वीज देतो. मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत निर्णय करण्याची गरज आहे. माननीय ऊर्जा मंत्री कोकण दौऱ्यावर गेले होते. त्यांनी सांगितले की, कुठल्याही परिस्थितीमध्ये कोळशावर चालणारा प्रकल्प कोकणामध्ये आणणार नाही. परंतु त्याची अधिकृत घोषणा आपल्याकडून होणे आवश्यक आहे आणि दुसरी एक घोषणा करा की, कोकणामध्ये वाटेल त्या परिस्थितीमध्ये केमिकल झोन आणणार नाही. रायगडला केमिकल कारखाने काढले. आज रायगडची अवस्था काय आहे ते बघा. रत्नागिरी येथील लोटे येथे केमिकल कारखाने आणले. आज त्याठिकाणची काय अवस्था आहे हे पाहण्याची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, आमच्या कोकणामध्ये एखादा इंजिनिअरिंगचा कारखाना का येत नाही. एखादा ऑटोमोबाईलचा कारखाना का येत नाही. कोकणामध्ये 720 किलोमीटरचा समुद्र किनारा आहे आणि मत्स्य विद्यालय मात्र नागपूर येथे आहे. हे विद्यालय आमच्या कोकणामध्ये का नाही. आंध्रप्रदेशमध्ये ज्याप्रमाणे मेरीटाईम विद्यापीठ आहे. अशा पध्दतीचे एखादे विद्यापीठ कोकणामध्ये आणण्याचा प्रयत्न करा त्याचे आम्ही स्वागत करु, एखादे टेस्टाईल पार्क आणा, आम्ही स्वागत करु. कोकणामध्ये सातत्याने केमिकल कारखाने आणले जातात आणि त्यालाच लोकांचा विरोध आहे. त्यामुळे कोकणाची अशी ओळख झालेली आहे की, कोकणामध्ये कुठलाही प्रकल्प गेला तर त्याला विरोध करणारे हे लोक आहेत पण तसे नाही. आमच्याकडे जबरदस्त अशाप्रकारचे निसर्ग सौदर्य आहे. आमच्याकडे खूप मोठ्या प्रमाणात फळे आहेत. समुद्र किनारा असल्यामुळे मासे चांगले मिळतात. स्वागतातिथ्य आणि आदरातिथ्यामध्ये कोकण कमी नाही. त्यामुळे पर्यटनातून मोठ्या प्रमाणावार उत्पन्न मिळेल. आंब्यातून मोठे उत्पन्न मिळेल. यावर प्रक्रिया करणारे कारखाने कोकणामध्ये घेऊन या, त्यांचे आम्ही स्वागत करु. परंतु कृपया याठिकाणी केमिकल झोन आणू नये अशाप्रकारची मी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्कर जाधव.....

अध्यक्ष महोदय, जाता जाता दोन तीन गोष्टी याठिकाणी सांगतो. एक म्हणजे कोकण हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामुळे कोकणाला स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ देण्यात यावे. याकरिता प्रयत्न करण्यात यावे. शिक्षण विकासासाठी स्वतंत्र विद्यापीठ नाही त्याकरिता कोकणात स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना करण्यात यावी. मेरीटाईम ट्रेनिंग इन्स्टीट्यूट, मत्स्य विद्यापीठ आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कोकणामध्ये होईल यादृष्टीने प्रयत्न करण्यात यावेत. पर्यटन हा कोकणचा आर्थिक विकासाचा कणा आहे. मी म्हटल्याप्रमाणे पुढील 10 वर्षाकरिता 2-2 हजार कोटी रुपये आम्हाला त्याठिकाणी कर्जाऊ द्या, इन्फ्रास्ट्रक्चर तयार करण्यासाठी द्या, बेसिक अमेनिटीजकरिता द्या, आम्हाला कायमचे कर्ज माफ करा असे मी काही म्हणणार नाही. कोकणातील नैसर्गिक समृध्दी आणि कृषी उत्पादने याचा प्रचार व प्रसार करण्याकरिता भारतात तसेच जगभरात मुंबईत जागतिक व्यापार केंद्र सुरु करावे. रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग येथे पर्यटनासाठी उपयुक्त असे विमानतळ तयार करावे. कोकणातील सर्व बंदरांचा व्यापारीदृष्ट्या विकास कसा होईल यासाठी प्रयत्न करावा. पर्यटन, शेती, फलोत्पादन, मत्स्योत्पादन, समुद्री उद्योग व बंदरे, शैक्षणिक विकास पायाभूत सुविधा, औद्योगिकरण, पर्यावरण आणि जलव्यवस्थापन या प्रमुख विकास क्षेत्रांचा एकसंघपणे विचार करुन पुढील 10 वर्षाकरिता निधीचा आराखडा तयार करावा. कोकणात एकत्रित प्लॅनिंग नाही म्हणून असे प्लॅनिंग करण्याची आवश्यकता आहे. आपण कसे मिहान प्रकल्पाकरिता भांडत असतात. कारण तुमचा तो प्लॅन तयार झालेला आहे. गोरेवाडा याठिकाणी पार्क होण्यासाठी प्रयत्न करीत आहात. तशा पध्दतीचा आमच्याकडे प्लॅन नाही. कोकणात येऊ घातलेले औष्णिक व ऊर्जा प्रकल्प रद्द करण्याची घोषणा आपण करावी. अपारंपारिक ऊर्जा तयार करण्यामध्ये कोकणाला संधी आहे त्याचाही याठिकाणी विचार करण्यात यावा.

अध्यक्ष महोदय, कोकणाला लाभलेल्या 720 किलोमीटर समुद्र किनाऱ्याचा प्रभावी उपयोग करुन सागरी पर्यटन आणि जल वाहतुकीचा विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. सध्या असलेल्या रासायनिक व अन्य प्रकल्पांमुळे नद्या व खाड्यांचे प्रदूषण किमान पातळीवर कसे येईल यादृष्टीने प्रयत्न करावा. आंबा, काजू, कोकम, नारळ, पोफळी इत्यादींची उत्पादकता वाढविण्याच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्कर जाधव.....

दृष्टीने आपल्याला प्रयत्न करायला पाहिजे. हापूस आंबा व इतर फळांवर निर्यात करण्यापूर्वी प्रक्रिया केली जाते ही प्रक्रिया केंद्र लासलगाव आणि वाशी येथे आहेत. आंबा रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग येथे पिकतो याठिकाणी प्रकिया केंद्र सुरु करण्यात यावीत अशी मी याठिकाणी विनंती करतो. कोकणातील आंबा विक्रीसाठी वाशीला आणावा लागतो. वाशीला आणून दलालांकडे द्यावा लागतो. त्याच्या ऐवजी ही विक्री केंद्रे रत्नागिरी किंवा सिंधुदूर्ग येथे करण्यात यावीत अशी मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो. कोकणातील हापूस आंबा रेल्वेने कसा नेता येईल याकरिताही प्रयत्न करायला हवा.

अध्यक्ष महोदय, ज्याप्रमाणे आपण शेतकऱ्यांना 4 टक्के दराने कर्ज देतो. त्याप्रमाणे फळ बागायती करणारे लोक आहेत आणि मत्स्य शेती समजून त्यांना देखील शेतकऱ्यांप्रमाणे 4 टक्के दराने कर्ज देण्यात यावे अशाप्रकारची विनंती याठिकाणी करतो. महिला बचत गटांसाठी फलप्रक्रिया, उद्योगधंदे व गावनिहाय प्रशिक्षण सुरु करावे. कोकणामध्ये वन औषधी आणि सुगंधी वनस्पती मोठ्या प्रमाणात आहे. जिल्हानिहाय स्वतंत्र संस्था तयार करण्याकरिता शासनाने रोपवाटिका आणि मसाले पीकांचा नारळामध्ये आंतर पीक म्हणून अंतर्भाव करण्याच्या दृष्टीने अनुदान द्यावे. कृषी पर्यटन केंद्र उभारण्यासाठी मदत करावी. मुंबई, गोवा राष्ट्रीय महामार्ग त्याठिकाणी तयार करण्यात यावा. कोयनेपासून 100 टीएमसी पाणी वाया जाते. वीज पॉवर जनरेट केल्यानंतर 100 टीएमसी पाणी वाया जाते त्या दोन्ही नदीच्या बाजूला 2156 जमीन अशीच आहे. मराठवाड्याला पाणी नाही, चारा नाही. त्याठिकाणी तशा पध्दतीचा चारा तयार करून तो कशा पध्दतीने बाहेर नेता येईल. एकप्रकारे शेतकऱ्यांना तो उद्योग सुध्दा होईल. मोठी धरणे करण्याऐवजी छोटी धरणे त्याठिकाणी करावीत. त्याठिकाणी परकीय चलन मिळवून देणारा मत्स्यव्यवसाय आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्करराव जाधव .....

मला मुख्यमंत्री महोदयांना विनंती करायची आहे. लोकांनी गरजेपोटी अनधिकृत बांधकामे केलेली आहेत. ती आपण सहानुभूतीपूर्वक विचार करुन कायम करण्याचा प्रयत्न करता आहात. अशाच प्रकारचा कोकणामध्ये निर्णय घेण्याची गरज आहे. कोकणामध्ये मच्छिमार बांधव समुद्र किनारी, खाडी किनारी राहतात. कारण त्यांचा व्यवसाय तिथेच असतो. इतरत्र कोठे जाऊ शकत नाहीत. त्यांच्या नावावरच्या किंवा पिढयान पिढया वापरत असलेल्या जागा त्यांच्या नावावर नाही. मागच्यावेळी दिनांक 26 फेब्रुवारी 2010 मध्ये राष्ट्रीय मत्समहोत्सव भरला होता. तिथे आदरणीय श्री.शरद पवार यांनी जाहीर केले होते की, मच्छीमार लोक पिढयान पिढया वापरत असलेल्या जमिनी त्यांच्या नावावर झाल्या पाहिजेत. त्याची अजून पुर्तता झाली नाही. याबाबत एकदा विचार करण्याची गरज आहे. सी.आर.झेड च्या बाबतीत विचार करण्याची गरज आहे. सी.आर.झेड गोवा, केरळ राज्याला लागून आहे. आपण त्या ठिकाणी सी.आर.झेड च्या नावाखाली लोकांनी बांधलेली घरे सरसकट तोडून टाकण्याचे किंवा दंड लावण्याचे काम करतो आहोत. तेव्हा अशा घरांवर कारवाई होणार यादृष्टीकोनातून विचार करावा. अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, कोकणामध्ये दुग्ध विकासाचा एकही प्रकल्प नाही. दुग्ध विकासाच्या प्रकल्पाचे कोकणामध्ये नाव नाही. दुधाची मागणी मोठया प्रमाणात आहे. ते दुग्ध प्रकल्प होण्याच्या दृष्टीने एकात्मिक योजनेच्या नावाखाली प्रकल्प राबविता येईल का ? याचा विचार करावा. मुख्यमंत्री महोदय आपण सभागृहात स्वतः बसल्यामुळे प्रत्येक मुद्दा मी विस्ताराने बोलत नाही. आपण सभागृहात उपस्थित राहील्याबद्दल धन्यवाद देतो. जाता जाता एक विनंती करतो, पुर्वीच्या महाराष्ट्र सरकारने सोमवंत नावाची एक कमिटी नेमली होती. त्या कमिटीने सादर केलेल्या अहवालामुळे पर्ससीन मासेमारीवर बंदी केली. त्यांना फक्त चार महिने मासेमारीची परवानगी दिलेली आहे. बाकीच्या वेळेला मासेमारी बंद ठेवलेली आहे. त्यामुळे मागिल दिड महिन्यापासून मासेमारी पूर्णपणे बंद आहे. यासंदर्भात आपल्याकडे बैठक झाली. यासंदर्भात माझी आपल्याला विनंती आहे की, आता अवघा दिड महिन्याचा सिझन शिल्लक आहे. नंतर पावसाळयामध्ये मासेमारी करता येत नाही. त्या जी.आर.ला तुर्त स्थगिती द्यावी. महिना ते दिड महिना त्यांना त्या ठिकाणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भास्करराव जाधव.....

मासेमारी करु द्यावी. त्यानंतर एक कमिटी नेमावी. आपल्याला योग्य वाटेल तो निर्णय घ्यावा. पारंपारीक मच्छिमारीचा विचार करता करता पर्सिसनेटच्या पोटावर पाय येणार नाही असा दोघांचा एकत्रित विचार करावा. कोणा एकाचा विचार करा अशातील भाग नाही. कारण बदलत्या परिस्थितीनुसार यांत्रिक युग आलेले आहे. ते यांत्रिकीकरण स्विकारावे लागणार आहे. त्या दृष्टीने तात्काळ निर्णय घेतला तर आपले आभार मानावे लागतील. माझे काही लिखित मुद्दे आहेत ते मी आपल्याकडे पाठवून देणार आहे. कृपया या कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर, ठाणे आणि मुंबई, मुंबई उपनगरे या सर्व जिल्हयांचा प्रामुख्याने विचार करावा करावा. या मुंबईतून जरी 36 आमदार निवडून येत असले तरी यांचा मतदार हा कोकणातील आहे. 21 आमदार ठाण्यातून निवडून आले असले तरी त्याचा मतदार कुठेना कुठे कोकणातील आहे. त्या कोकणाचा विकास म्हणजे राज्यातील 75 आमदारांचा विकास त्या दृष्टीने विचार करावा, विचार कराल अशा प्रकारची अपेक्षा करुन मी आपल्याला धन्यवाद देतो. जयहिंद जय महाराष्ट्र !

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : अध्यक्ष महोदय, विरोधीच्या वतीने दाखल केलेल्या नियम 293 च्या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी मी उभा आहे. ज्या नियम 293 च्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री.भास्करराव जाधव यांनी आपले विस्तृत विचार कोकणच्या संदर्भात मांडले ख-या अर्थाने या सदनामध्ये श्री.भास्करराव जाधव यांनी एक अर्थाने पक्षाच्या परिसीमा बाजूला ठेवून आवश्यक त्या सर्व मुद्यांवर कोकणच्या विकासासंबधी जी भूमिका मांडली त्याबद्दल मला श्री.भास्कररावांचे मनापासून अभिनंदन केले पाहिजे. अशा स्वरुपाचे काही प्रश्न श्री.भास्कररावांनी मांडले. सर्वाथाने सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश आबिटकरांच्या म्हणण्याला समर्थन नसले तरी त्यांच्या भाषणामागच्या एका स्पिरिटला, भावनेला या सभागृहातील बरेच सन्माननीय सदस्य समर्थनार्थ आहोत. तरी या नियम 293 च्या प्रस्तावाला मी विरोध करतो.

अध्यक्ष महोदय, त्याचे कारण स्पष्ट आहे. ज्यावेळेला नियम 293 चा प्रस्ताव समोर आला त्यावेळी तो वाचायला सुरुवात केली. तर श्री.भास्करराव कोकणच्या शेवटच्या पॅरापर्यंत येण्याआधी ज्यावेळेला मी वाचत होतो. त्यावेळी महापालिकेतील गैरकारभाराची, भ्रष्टाचाराची, मैदानांच्या लिलावांची, रखडलेल्या पुनर्विकासाची, एस.आर.ए. मधील, गिरणी कामगारांच्या घरांची हे सर्व वाचत गेलो तेव्हा माझ्या मनात प्रश्न निर्माण झाला की, हा प्रस्ताव चुकून येथे छापला गेला नाही ना ? म्हणून विभागामध्ये गेलो, विभागात जाऊन माहिती काढली, त्यांना म्हटले कदाचित हा प्रस्ताव हा चुकीचा छापला गेला की काय ? अशी माझ्या मनात शंका आहे. कारण सन 2006, 2007, 2008 मध्ये अशा पध्दतीचे प्रस्ताव छापून यायचे. तोच प्रस्ताव पुन्हा छापला गेला की, काय ? विभागाने सांगितले की, जो प्रस्ताव दिला गेला तोच छापण्यात आला आहे. ज्यावेळेला पूर्ण प्रस्ताव वाचला ज्यावेळी बोलण्याची भूमिका बनवली त्यावेळी मनात एक भूमिका स्पष्ट झाली हा प्रस्ताव अशाच पध्दतीने देणे हे आमच्या विरोधी मित्रांना आवश्यक वाटल्याचे कारण खरे सरकारने केलेले काम जर मानायचे झाले तर विरोधकांना अभिनंदनाचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांचा द्यावा लागेल. जे विषय मांडले आहेत. त्याबद्दलच्या माहितीमुळे सर्व विरोधी नेत्यांना संधी मिळणार आहे व सत्ताधारी पक्षातील नेत्यांनाही संधी मिळणार आहे. ते मांडण्याचा नक्की ते प्रयत्न करतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आशिष शेलार.....

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करण्याची वेळ विरोधी पक्षावर आली आहे पण ते टाळण्यासाठी लिहिले आहे अशा पध्दतीचे माझे मत झाले आहे. कारण भूमिका स्पष्ट आहे. मुंबई महापालिकेमध्ये पूर्वी जे घडायचे नगरविकास खात्याचे मंत्री म्हणून माननीय मुख्यमंत्री अतिशय सजकतेने त्यावर लक्ष ठेवून आहेत. पूर्वी ज्या गोष्टी झाल्या नाहीत. त्या गोष्टी महापालिकेत नव्याने व्हायला सुरुवात झाली आहे. नंतर आपल्या असे लक्षात येईल पूर्वी ज्यावेळेला बिल्डींग प्रपोझल डिपार्टमेंटमध्ये एखाद्या इमारतीचा प्रस्ताव संमत करण्यासाठी जावे लागत होते. त्यावेळेला ज्युनिअर इंजिनिअर, सब इंजिनिअर, असिस्टंट इंजिनिअरच्या टेबलवर, डि.वाय.सी.च्या टेबलवर, चिफ इंनिअरच्या टेबलवर, ओ.एस.डी.च्या टेबलवर, नंतर कमिशनरच्या टेबलवर या सर्व टेबलांवर विकास किंवा पुनर्विकास करण्यासाठी डेव्हलप्मेंट कंट्रोल रुल्स् मध्ये असलेल्या प्रस्तावाला सुध्दा या दहा दहा ठिकाणी जावे लागायचे. पूर्वी काही लोकांचा आरोप होता की, त्या सर्व टेबलांवर फाईलींवर व फाईली खाली काहीतरी दिल्या शिवाय फाईल सरक नव्हती असा काही लोकांनी आरोप केला. हे सरकार स्थापन झाल्यावर पहिल्यांना ऑटो डिसिआरचा निर्णय महानगरपालिकेने घेतला. आज ज्युनिअर इंजिनिअर पासून ओ.एस.डी. पर्यंत सर्वांकडे फाईल व फाईल बरोबर काहीतरी, असे जे आरोप व्हायचे त्यापेक्षा आता ऑटो डिसिआरमध्ये तुमच्या असलेल्या भूखंडावर विकास किंवा पुनर्विकास करायचा असेल तर डिसिआरमध्ये असलेल्या प्रावधानाला अन्य कोणाचीही दाढी कुरवाळायची गरज नाही. हया ऑटो डिसिआरमध्ये तुम्हाला मिळणा-या एफ.एस.आय.मध्ये काय बांधू शकतो याची स्पष्टता येऊ लागली.

ZZ-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार .....

अध्यक्ष महोदय, म्हणून मी या नियम 293 अन्वये प्रस्तावाला विरोध करीत आहे. मुंबईतील मैदानाच्या लिलावाबाबतची परंपरा कोठून सुरु झाली याबाबत मी बोलणार नाही. यापैकी एक तर जेलमध्ये आहेत. त्यांचे मैदान आम्ही परत मिळविले आहे. त्यामुळे कोणाची नावे घेणे बरोबर नाही. त्यामधील राजकारणापेक्षा मुंबईकरांची अपेक्षा होती की, जेव्हा ॲडॉप्शन व केअर टेकर पॉलीसीचा प्रस्ताव हा मुंबई महानगरपालिकेमध्ये मंजूर झाला, त्यावर सखोल चर्चा झाली त्यावेळी सर्वपक्षीय लोकांनी भूमिका मांडली. त्यानंतरही मुंबईकर ओरडत होते की, आमच्या मोकळया जागा आम्हाला 24 तास मोकळया द्याव्यात. मुंबईकर ओरडत होते की, मुंबईतील ओपन स्पेसेस कोणा एका खाजगी माणसांची नाहीत व मुंबईतील 1200 एकर इतकी विस्तीर्ण मोठी मैदाने, मनोरंजन मैदाने, गार्डन, ओपन स्पेसेस हे मुंबईकरांसाठीच खुले ठेवण्यात यावे. मी स्वत:, तसेच आमचे सहकारी सन्माननीय सदस्य श्री.अमीत साटम, ॲड.पराग अळवणी, श्री.अतुल भातखळकर असे बरेच सदस्य आम्ही रात्री 11.30 वाजता विमानतळावर माननीय मुख्यमंत्री यांना भेटलो होतो. त्यांना आम्ही मुंबईकरांची गरज सांगितली. मुंबईकर मानतात की, मैदानांचा विकास तर झालाच पाहिजे. पण या पॉलीसीमधून आडमार्गाने का होईना जर मैदानांचा लिलाव व मैदानांचे खाजगीकरण होणार असेल तर माननीय मुख्यमंत्री यांनी रात्री 11.30 वाजता मुंबई विमानतळावर मुंबईकरांना राहत दिली आहे. आमच्या निवेदनावर एक आदेश काढला व मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना सांगितले की, नव्याने पॉलीसी तयार करण्यात यावी. कारण तोपर्यंत मुंबईकरांना हे मोकळे भूखंड मिळणार नव्हते. म्हणून मी सांगितले की, हा नियम 293 चा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री यांचे अभिनंदन करण्याचा प्रस्ताव म्हणून आणण्याची गरज होती.

अध्यक्ष महोदय, एवढेच नव्हे तर मी प्रायव्हेट बील मी सदनामध्ये आणले आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील त्या दिवशी असते तर बरे झाले असते. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.अमिन पटेल उपस्थित होते. आजपर्यंत मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये मोकळी मैदाने विकसित करणे, संरक्षित करणे ही मुंबई महानगरपालिका आयुक्तांची बंधनकारक कर्तव्येच नव्हती. आजपर्यंत सेक्शन 63 मध्ये हे ऐच्छिक कर्तव्य मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांचे होते. मुंबईतील मोकळा श्वास हा संरक्षित केला पाहिजे ही बंधनकारक कर्तव्ये आजपर्यंतच्या तुमच्या सरकारला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार .....

कधीच कळाली नाहीत. मुंबईकरांची आवश्यकता आहे की, यामध्ये मोकळी संरक्षित मैदाने सुशोभीत झाली पाहिजेत. हे आयुक्तांचे बंधनकारक कर्तव्य आहे. असे वाटल्यानंतर प्रायव्हेट बिलाच्या माध्यमातून आम्ही भूमिका मांडली आहे. मी मुख्यमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो की, त्यांनी या सदनामध्ये यावर सकारात्मक उत्तर दिलेलेच आहे. त्यावेळी सन्मानीय सदस्य श्री.अमिन पटेल उपस्थित होते. माझे विधेयक मागे घेण्याची विनंती करताना माननीय मुख्यमंत्री यांनी सांगितले की, येणाऱ्या दुसऱ्या कॅबिनेटच्या बैठकीत याबाबत मंजूरी देण्यात येईल व महानगरपालिकेच्या अधिनियमामध्ये बदल आणण्यात येईल. बदल केलेला कायदा या सभागृहासमोर आणण्यात येईल. मुंबईकरांच्या मोकळया श्वासाचे बंधन आयुक्तांवर टाकण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य सरकार व मुख्यमंत्री महोदयांनी घेतलेला आहे.

अध्यक्ष महोदय, गिरणी कामगारांच्या घराबाबतचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. हे खरे आहे की, गिरणी कामगारांची घरे ही अजून मागेच राहिली आहेत. पण गिरण्यांवर विकासकाचे इमले या आधीच उभे राहिले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.कालिदास कोळंबकर यांचे म्हणणे बरोबर आहे. पण तो निर्णय कोणी केला ? तालिका सभाध्यक्ष महोदय हे स्वत: मुंबई महानगरपालिकेत सदस्य होते. या नियम 293 च्या प्रस्तावाच्या माध्यमातून मी विनंती करणार आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी याबाबतची चौकशी नेमावी. गिरणी कामगारांना घरे मिळावीत याबाबत दुमत नाही पण ही घरे परवडणारी असावीत. या महिन्यात त्याची लॉटरी निघणार आहे असे मुख्यमंत्री महोदयांनी घोषित केले आहे. पण डीसीआर 58 मध्ये मागील दीड वर्षापूर्वी सर्वात जास्त बदल म्हणजे 16 वेळा बदल केले गेले. हा बदल कोणाच्या फायद्यासाठी झालेला आहे, माझी विनंती आहे की, याबाबत नगरविकास खात्याकडून चौकशी करण्यात यावी. मुंबई महानगरपालिकेत मी होतो, सन्माननीय सदस्य ॲड.पराग अळवणी व श्री.सुनील प्रभू होते. डीसीआर 58 मध्ये 16 वेळा बदल करून केवळ विकासकाचा फायदा केला गेला. गिरणी कामगारांच्या घरांचा विचार नंतर केला गेला. यामध्ये एक बदल तर इतका भयंकर होता की, इंटीग्रेटेड मील डेव्हलपमेंटमध्ये बदल केला गेला. जर एनटीसीच्या मुंबईत 7-8 वेगवेगळया ठिकाणी मील असतील, एखाद्या ठिकाणी भाव चांगला असेल,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार .....

एखाद्या ठिकाणी रेडी रेकनर कमी असेल, एखादी जागा अतिशय सुंदर ठिकाणी असेल तर, सुंदर ठिकाण व रेडी रेकनरमध्ये चांगला भाव असणारी जागा विकासकाला मिळावी म्हणून इंटीग्रेटेड 4-5 मिल डेव्हलपमेंटचा एकत्र प्रस्ताव देण्यात यावा व एक मिलमध्ये सगळयातील 1/3 काढून तो अशा ठिकाणी टाकावा की, जेथे रेडी रेकनरचा भावच नाही व तो शेअर मुंबई महानगरपालिकेला देण्यात यावा. अशा प्रकारे 1/3 सर्व मील मधील काढण्यात यावा, तो एका मील मध्ये अशा ठिकाणी टाकावा की म्हाडाला घरे बनविण्यासाठी द्यावा की जेथे ॲक्सेस रोड मिळणेही कठीण जाईल. माझा आरोप आहे की, अशा प्रकारे इंटीग्रेटेड मील विकसीत करुन मलबार हिलवरील मिलच्या जागेवरील बंगले विकसीत झाले. मुंबई महानगरपालिकेला भायखळा दगडी चाळीच्या बाजूला 1/3 शेअर मिळाला. याचीसुध्दा डीसीआर 58 मधील चौकशीची मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, नियम 293 च्या प्रस्तावामध्ये मुंबई मेट्रो आणि विकास आराखडयाचा घोटाळयाबाबत उल्लेख आला आहे. विरोधी पक्षाने घोटाळा हा अतिशय योग्य शब्द वापरला आहे. या सदनामध्ये सत्य आलेच पाहिजे. सध्या मुंबईमध्ये मेट्रोचे तीन प्रस्ताव चालू आहेत. 15 वर्षामध्ये गेल्या सरकारच्या काळात एक मेट्रो आली. दीड वर्षात तीन मेट्रोची टेंडर निघाली. मुंबईकरांना सेवा देण्याचा स्पीड हा भाग तर वेगळाच आहे. दुर्दैव असे आहे की, आमचे काही सन्माननीय सदस्य त्यास विरोधही करीत आहेत. तो विषय बाजूला ठेऊ. प्रश्न असा आहे की, मुंबईची पहिली मेट्रो ही रिलायन्स मुंबई मेट्रो कशी झाली, मुंबई मेट्रोच्या अगोदर रिलायन्स मेट्रो हे नाव कोणाच्या काळात मंजूर झाले ? सर्वात गंभीर बाब ही आहे की, ट्राय पार्टी अग्रीमेंट झाले होते. त्यामध्ये तिकीटाचे दर ठरले होते. माझा असा दावा आहे की, राष्ट्रकुल स्पर्धेतील घोटाळयाचा दुसरा एपिसोड त्यावेळी मुंबई मेट्रोमध्ये झाला आहे. दिल्लीमध्ये राष्ट्रकुल स्पर्धांच्या आवश्यकतेसाठी तातडीने मेट्रोचा रूट वाढविला पाहिजे म्हणून इंडियन ट्रान्स ॲक्टच्या ऐवजी मेट्रो ॲक्ट आणला असे तत्कालीन केंद्र सरकाने सांगितले होते. आपली मेट्रो ही इंडियन ट्रामवेज ॲक्टखाली होती. ट्राय पार्टी ॲग्रीमेंटमध्ये दरही ठरले होते. नवीन ॲक्ट आणला गेला व फेअर फिक्सेशन कमिटीचा जन्म यांच्याच काळात दिला गेला. कमिटीमध्ये ऑपरेटर रिलायन्स यांनी सांगितले की, आम्हाला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार .....

आता हे दर मान्य नाहीत. आम्ही तुमच्याशी करार केलेल्या दरावर मुंबईकरांना मेट्रो देऊ शकत नाही. याचे मुळ तुम्ही आमच्या ट्राय पार्टी ॲग्रीमेंटला दिलेली बगल म्हणून आहे. तरीही या सरकारने, वाढीव दर ऑपरेटरने मांडले असताना सरकार सुप्रीम कोर्टापर्यंत लढत आहे. अजूनही प्रस्तावित केलेले वाढीव दर, ज्याचा जन्म यांनी केलेल्या चुकीच्या निर्णयामुळे झालेला आहे. त्या प्रस्तावित वाढीव दराला अजूनही या सरकारने मंजूरी मिळू नये यासाठी सर्व कायदेशीर तजवीज केलेली आहे. रिलायन्सला किती फायदा झाला, त्याला किती खर्च झाला, त्याला बळ कोणाचे मिळाले.

यानंतर 3A-1

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार.....

या सर्व गोष्टी एका बाजूला जाऊ द्याव्यात. त्यांच्या सरकारच्या काळात त्यांनी स्वत: ऑडिटची मागणी केली नाही. एक रुपयाच्या ऐवजी दहा रुपये कसा खर्च आला ? दोन रुपयांच्या ऐवजी दीड रुपये कसा फायदा मिळत आहे ? तो मिळाला आहे का ? त्यांच्या काळामध्ये याचे ऑडिट करण्याची गरज त्यांना वाटलीच नाही. मेट्रो घोटाळा झाला तो केवळ रिलायन्स या कंपनीला मदत करण्यासंबंधीचा घोटाळा झाला होता. रिलायन्स कंपनीला फायदा मिळावा याकरिता नवीन कायदा आणला. ट्रायपार्टी ॲग्रीमेंट मोडण्यात आले. नवीन दर आणले गेले. तसेच, या सर्व प्रकाराचे व व्यवहाराचे सीएजी ऑडिटदेखील मागील सरकारच्या काळामध्ये केलेले नाही. या सर्व बाबींची चौकशी होणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, कोस्टल रोड या मुंबईमध्ये प्रलंबित आहेत. विरोधी पक्षाने यासंदर्भातील जुनी भाषणे काढली असती तरीही त्यांना कळले असते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी अर्थमंत्री असताना किती वेळा बजेट मांडले, याचा विक्रम केलेला आहे. त्यांच्या बजेटमध्ये किती वेळा कोस्टल रोडसंबंधी छापून आले होते. कमिटी नेमली आहे. प्रस्ताव पर्यावरण विभागाकडे गेलेला आहे. कन्सल्टंट येणार आहेत, अशा प्रकारची तीच तीच उत्तरे त्यामधून दिसून येतात. आता मात्र युती सरकारच्या काळामध्ये या संदर्भात एका वर्षाच्या आता कार्यवाही होऊन दोन-चार महिन्यांमध्ये काम देखील सुरु होईल, याकरिता मी माननीय मुख्यमंत्री महोदयाची अभिनंदन करतो. याकरिता त्यांनी कोणत्याही जयंतीचे व टॅक्सेशनचे निमित्त साधलेले नाही. कोस्टल रोडसंबंधीचा प्रस्ताव युती सरकारने पर्यावरण खात्याकडून मंजूर करुन घेतलेला आहे. याकरिता कन्सल्टंट्सचे फायनल डिझाईन देखील मंजूर झालेले आहे. त्याकरिता एक्स्टेन्शनचा प्रस्ताव देखील मंजूर झालेला आहे. या प्रकल्पाकरिता असलेले सजेशन ऑब्जेक्शन्सही मंजूर झालेले आहेत. मुंबईकरांकरिता गेल्या 8-10 वर्षांपासून केवळ दिवास्वप्न असलेला कोस्टल रोड आता प्रत्यक्षात येणार आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी या प्रकल्पाच्या कामासंदर्भात सकारात्मक भूमिका घेण्याची गरज आहे. पर्यावरण आणि पर्यावरणाचा मार हा मुंबईकर सातत्याने सहन करीत आहे.

....2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार.....

वाहतूकीच्या समस्यांमुळे वेळ व इंधनाचा अपव्यय, सततच्या हॉर्निंगमुळे ध्वनीप्रदूषण यातून मुंबईकरांची सूटका होणार आहे. ध्वनी प्रदूषण, इंधन व वेळ यांचा अपव्यय या सर्व समस्यांवर रामबाण उपाय म्हणजे हा कोस्टल रोड होय. या कोस्टल रोडचे महत्त्व पश्चिम उपनगरात राहणा-या आमदारांना किंवा लोकांना विचारण्यात यावे. या कोस्टल रोडमुळे मुंबई शहराला नव्याने ओपन स्पेस मिळणार आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई महापालिकेत चौकशा सुरु आहेत. रोडसंदर्भातील चौकशीची मागणी मी स्वत: केलेली आहे. रस्त्याच्या विषयामध्ये एक पेपर माझ्या हातामध्ये आहे. श्री.संजय देशमुख, अतिरिक्त महापालिका आयुक्त यांनी पाठविलेले एक पत्र माझ्याकडे आहे. ते पत्र मी पटलावर ठेवत आहे. या पत्रामध्ये असे नमूद केलेले आहे की, रस्ते कंत्राटदाराने रॅबिज वाहून नेण्यासंदर्भातील भ्रष्टाचाराची तक्रार करण्यता आलेली आहे. विद्याविहार स्टेशन ते सांताक्रुझ - चेंबूर लिंक रोड म्हणजेच रामदेव पीर रोड या रस्त्याच्या बांधकामासंदर्भातातील भ्रष्टाचाराची तक्रार झालेली आहे. ही तक्रार केवळ एका रस्त्याबाबत झालेली आहे. अतिरिक्त महापालिका आयुक्त यांनी याची चौकशी केली. त्याचे फाईंडिंग्ज माझ्या हातात आहेत. सदर रस्त्याच्या कामात जेवढया क्वांटिटीचे कॉंक्रीट वापरले त्यापेक्षा जास्त क्वांटिटी बिलात नमूद करुन कंत्राटदाराला बिल दिलेले आहे. प्रत्यक्षात खूपच कमी कॉंक्रीट वापरलेले आहे. वर्षानुवर्षाची परंपरा राहिलेली आहे की, वारंवार आरोप केला आणि वारंवार मागणी केली तरीही चौकशी लागत नव्हती. परंतु आता पहिल्यांदा या विषयाची चौकशी लागलेली आहे. कॉंक्रीटचे रस्ते मुंबईची गरज आहे. आवश्यक असलेल्या परिमाणापेक्षाही कमी परिमाणात कॉंक्रीट रस्त्याच्या कामात वापरलेले आहे. त्यामुळे निकृष्ट दर्जाचा रस्ता तयार झालेला आहे. सदर रस्त्याच्या कामात जेवढया क्वांटिटीचे स्टील वापरले, त्यापेक्षा जास्त परिमाण बिलात नमूद करुन कंत्राटदाराला बिल दिलेले आहे. केवळ कंत्राटदाराने कॉंक्रीट कमी वापरले एवढेच नाही तर जी क्वांटिटी स्टीलची वापरायला पाहिजे होती, ती सुध्दा वापरलेली नाही. सदर रस्त्याच्या कामात जेवढया क्वांटिटीचे रबल पॅकिंग वापरले त्यापेक्षा जास्त परिमाण बिलात नमूद करुन कंत्राटदाराला बिल दिले गेलेले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.आशिष शेलार.....

तसेच, रबल पॅकिंगची गुणवत्ताही खराब होती. मुळातच रबल पॅकिंग कमी वापरले गेले आहे. जास्तीचे बिल दिले, जे रबल पॅकिंग वापरले ते सुध्दा निकृष्ट दर्जाचे वापरलेले आहे. आरसीसी ब्लॉक्स स्लॅबची व बाजूच्या भिंतीची जाडी बिलात दाखविल्यापेक्षा खूप कमी आहे. आरसीसी ब्लॉक्सची जाडी ही देखील एका रस्त्यात कमी झालेली आहे. आएमसी प्लांटवरून कॉंक्रीट वाहून नेणा-या ट्रककरिता वापरलेले 92 चलन खोटे दर्शविलेले आहेत. प्रत्यक्षात कॉंक्रीट साईटवर आलेच नाही व ते वापरल्याचे दर्शवून कंत्राटदारास बिल देण्यात आलेले आहे. याची यादी दिलेली आहे. ज्यामध्ये एक वाहन एकाच दिवशी एकाच वेळी दोन -दोन तीन तीन ठिकाणी रॅबिज वाहून नेतांना दाखविलेले आहे. मागील सरकारच्या काळात झालेल्या चुकांवर चौकशी करण्याचे धाडस देखील दाखविलेले नाही. लोकांना आणि लोकांना दुखाविणा-या अशा पध्दतीच्या निकृष्ट दर्जाच्या कामाच्या कंत्राटदाराला पाठीशी घालण्याचे काम लोकशाही आघाडी शासनाच्या कालावधीमध्ये झालेले आहे, असा मुंबईकरांचा संशय आहे. लोकशाही आघाडी शासनाच्या काळामध्ये हे झाकण्याचे काम चालू होते. युती शासनाच्या काळामध्ये चौकशा लावून या सर्व गोष्टी "दुध का दुध पानी का पानी" करण्याचा घाट घातलेला आहे. या सर्व अपहारांची व गैरव्यवहारांची चौकशी लागलेली आहे. युती सरकारने केलेल्या कामाचे अभिनंदन करण्यासंबंधीचा प्रस्ताव विरोधी पक्षात बसलेल्या सन्माननीय सदस्यांनी करावा आणि मागणी केलेल्या चौकशीचा अहवाल या सदनासमोर यावा, अशी मागणी मी करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम): अध्यक्ष महोदय, नियम 293 अन्वये विरोधी पक्षाने मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, या संबंधी मी आजी व माजी मंत्री, माननीय मुख्यमंत्री व इतर सर्व मान्यवरांची भाषणे मी ऐकलेली आहेत, काही भाषणे माझ्या वाचण्यात आलेली आहेत. मुंबईमध्ये मुख्यमंत्री महोदय आणि सर्व मंत्री महोदय राहतात. मुंबईमध्ये देशातील सर्व फिल्मस्टार्स राहतात. या जगातील सर्वाधिक श्रीमंत व्यक्ती देखील या मुंबईतच राहतात. तीस वर्षापूर्वी आणि आजही पूर्ण देशभरात कुठेही जन्मलेल्या माणसाला असे वाटते की, मी आयुष्यातून एकदातरी या मुंबईत आलो पाहिजे. काही वर्षापूर्वी या मुंबई शहरावर एक गीत तयार झाले होते, त्या गिताची मला आता आठवणे येत आहे.

" ए दिल, है मुश्कील जीना यहाँ,
जरा हटके, जरा बचके
यह है बंबई मेरी जान"

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अस्लम शेख.....

गेली 20 वर्षे महानगरपालिकेत कोणाची सत्ता आहे ? मला या प्रश्नाचे उत्तर देण्याची गरज नाही. मी आरोप-प्रत्यारोप करणार नाही. गेल्या 20 वर्षामध्ये मुंबईतील पर्यावरणाच्या संदर्भात कोणतीही कामे किंवा कोणतेही प्लॅनिंग केलेले नाही. पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून जे प्लॅनिंग केले होते, त्यावर मात्र कोणतीही अंमलबजावणी झालेली नाही. आज मुंबई शहरातील क्रीक, पंपींग स्टेशन्स, आणि ट्रीटमेंट प्लॅन्टवर खूप मोठा ताण पडलेला आहे.

अध्यक्ष महोदय, 1998 मध्ये मालाड-मालवणीमध्ये सिव्हरेज ट्रीटमेंट प्लॅन्ट उभारण्यात आला होता. त्यावेळी प्लॅन्टची 240 सीएमडी एवढी कॅपेसिटी होती. परंतु, आजच्या तारखेला 150 एमएलडी अनट्रीटमेंट सिव्हरेज वॉटर हे क्रीकच्या माध्यमातून समुद्रात जात आहे. त्यावेळी आमचे शासन असताना मुंबईतील पर्यावरणाच्या संदर्भात मी पहिले पत्र दिले होते. त्यानंतर मी पर्यावरणाच्या संदर्भात आयुक्तांना एक नोटीस दिली होती. आज आम्ही सर्वजण मुंबई शहरात राहत असून, मुंबई शहरातील कोणत्याही लोकांच्या स्वास्थाबाबत कोणतेही कॉम्प्रोमाईज केले जाणार नाही. आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडण्यापेक्षा मुंबईतील पर्यावरण सुधारण्यास कशी मदत होईल या दृष्टीकोनातून सर्वांनी विचार करण्याची वेळ आलेली आहे. मुंबई ही महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला आर्थिक ताकद देत आहे. आज मुंबई शहराचे नाव जगात पसरलेले आहे. एखादी खास वस्तू जशी आपण घरात सांभाळून ठेवतो, त्याचप्रमाणे आज मुंबई शहराला सांभाळून ठेवण्याची वेळ आलेली आहे. मी मुख्यमंत्री महोदयांना 5 मिनिटे माझे भाषण ऐका म्हणून विनंती केलेली होती. आमच्या सरकारने पॉल्यूशन आणि एमसीझेडमधील आवश्यक त्या परवानग्या केंद्र शासनाकडून मिळविण्यासाठी प्रयत्न केलेला होता. पण त्यास यश मिळाले नाही, हे आम्ही मान्य करीत आहोत. परंतु, माननीय मुख्यमंत्र्यांनी एका वर्षाच्या कार्यकाळात पॉल्यूशन आणि एमसीझेडमधील आवश्यक त्या परवानग्या केंद्र शासनाकडून मिळवून देण्याचे एक महत्वाचे काम केलेले आहे. आज मुंबई शहरातील ट्रीटमेंट प्लॅन्ट, पंपीग स्टेशन्ससाठी एमसीझेड आणि सीआरझेडची परवानगी मिळविण्याचे राहिलेले आहे. मुख्यमंत्री महोदयांनी मुंबई शहरातील ट्रीटमेंट प्लॅन्ट, पंपीग स्टेशन्ससाठी एमसीझेड आणि सीआरझेडची परवानगी मिळवून आणली तर मुंबई

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अस्लम शेख.....

शहराला न्याय मिळणार आहे. काही लोकांनी ट्रीटमेंट प्लॅन्टच्या संदर्भात कोर्टात धाव घेतलेली आहे. ट्रीटमेंट प्लॅन्टच्या आजुबाजूचा सर्व भाग हा कांदळवनांनी व्यापलेला आहे. माननीय उच्च न्यायालयाने सन 2009 मध्ये कांदळवनाला कापण्यात यावे अशा प्रकारची एक ऑर्डर पास केली होती. त्याचप्रमाणे माननीय उच्च न्यायालयाने सीआरझेड आणि वनविभागाची परवानगी घ्यावी, अशी देखील एक अट टाकलेली आहे. मुख्यमंत्री ज्या पध्दतीने कामे करीत आहेत, त्या पध्दतीने आम्हाला वाटले की, कोस्टल रोडचे काम लवकर पूर्ण होईल असे मला वाटत होते. कोस्टल रोडचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी योग्य तो प्रयत्न करण्याची गरज आहे. मुंबईची एक वेगळी ओळख निर्माण करुन देण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करीत आहोत. अनेक सन्माननीय सदस्यांनी डम्पींग ग्राऊन्डच्या संदर्भातील भावना व्यक्त केलेल्या आहेत, त्यावर मी बोलणार नाही. मुंबई शहरात शेती पिकविली जात नाही. मुंबई शहरात अनेक इमारती उभारल्या जात आहेत. मुंबई शहरातील चाळीचा आणि झोपडपट्टयांचा विकास केला जाणार आहे. गेल्या 20 वर्षापासून मुंबई महानगरपालिकेकडे डेब्रीज डंम्पींगसाठी कोणताही पर्याय उपलब्ध नाही. त्यामुळे लोक मिळेल त्या ठिकाणी डेब्रीज टाकीत आहेत. माझ्या विभागातील क्रीकला कनेक्टेड असणारे सर्व मार्ग बंद केले आहेत. माझ्या विभागातील जलकल्याण, पटेलवाडी, शंकरवाडी आणि मालवणीमधील क्रीकला कनेक्टेड असणारे सर्व मार्ग बंद केले आहेत. महानगरपालिकेले लो-लाईनसाठी एखादा एरिया निश्चित केला असता तर त्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांचा महसूल मिळाला असता. मुंबई शहरात 3 हजार एमएलडी एवढे घाण पाणी तयार होत आहे. यामधील 1400 एमएलडी पाण्यावर फस्ट प्रिमिनिअली ट्रीटमेंट होत आहे. मुख्यमंत्री महोदयांनी कोस्टल रोडला न्याय देण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. याच धर्तीवर आवश्यक त्या परवानग्या आणण्यासाठी प्रयत्न करतील.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी डिसिल्टींगबद्दल माहिती दिलेली आहे. मुंबईत पावसाळा सुरु झाल्यानंतर अनेक भाग पाण्याखाली जातो. याची कारणे काय आहेत, त्यावर विचार करण्याची गरज आहे. याठिकाणी महानगरपालिकेची काम करण्याची जी

.....3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अस्लम शेख.....

पध्दत आहे, ती पध्दत चुकीची आहे, हे मला या ठिकाणी सांगावे लागत आहे. पाऊस सुरु होण्यापूर्वी नालेसफाई करण्यासाठी टेंडर काढली जातात. पावसाळा सुरु होण्यापूर्वी 50 टक्के नालेसफाईची कामे पूर्ण केली जातात. पाऊस सुरु झाल्यानंतर 30 टक्के नालेसफाईची कामे पूर्ण केली जातात आणि पावसाळा संपल्यानंतर 20 टक्के नालेसफाईची कामे पूर्ण केली जातात अशी काम करण्याची परंपरा आहे. नालेसफाई करण्यासाठी दर महिन्याला टेंडर प्रसिध्द करण्याची गरज आहे. यानंतर नालसफाई व्यवस्थित होईल अशी जबाबदारी संबंधित कंत्राटदारांवर टाकण्याची गरज आहे. आज काँग्रेस पक्षाने नालेसफाईतील स्कॅम उघडकीस आणून दिलेला आहे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांना सांगू इच्छितो की, रोड आणि सिलच्या स्कॅमच्या संदर्भातील पहिले पत्र देणारा मी आहे. मुख्यमंत्री महोदयांनी स्कॅमच्या संदर्भात महानगरपालिकेत कोणाची सत्ता आहे हे न पाहता त्याची चौकशी सुरु करण्याचे काम केलेले आहे. यामध्ये डिसिल्टींकला जबाबदार असणाऱ्या दोषी लोकांना जेलमध्ये टाकण्याची गरज आहे. अशा लोकांच्या विरोधात युडब्ल्युअंतर्गत कारवाई केल्यामुळे ते आज जेलमध्ये आहेत. जेलमधून सुटून आल्यानंतर संबंधित दोषी लोकांनी ती कामे थांबविलेली नाहीत. अशा लोकांच्या रोड आणि ब्रिजेसच्या संदर्भातील कंपन्या आहेत. एकच माणूस तीन कंपन्यांचा कारभार करीत आहे. आज बिहार राज्यात माननीय श्री. नितेशकुमार यांनी कंपनीच्या मालकांची प्रॉपर्टी जप्त करण्याची कारवाई केलेली आहे, त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडून तशी कारवाई केली जाईल काय असा माझा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी रोडच्या संदर्भातील माहिती दिलेली आहे. हे प्रकरण एवढे मोठे आहे की, त्यावर एक तास जरी बोलायचे म्हटले तर खूप कमी वेळ मिळणार आहे. गेल्या 6 वर्षापासून रोडची कामे ठराविक कंत्राटदारांना मिळावीत म्हणून तशी टर्म्स आणि कंडिशन टेंडरमध्ये टाकलेली आहे. गेल्या 6 वर्षापासून ठराविक 5 कंत्राटदारांना त्या कामाची टेंडर मिळत होती. मी आयुक्तांना टेंडर पॉलिसी कशी चुकीचे आहे, ते पटवून दिलेले आहे. टेंडर पॉलिसीच्या संदर्भात मी आवश्यक त्या सूचना आयुक्तांकडे केलेल्या आहेत. मी केलेल्या सूचना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अस्लम शेख.....

आयुक्तांनी मान्य केलेल्या आहेत. त्यामुळे आज रस्त्यांची कामे करण्यासाठी टेंडरमध्ये स्पर्धा लागल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे रस्त्याच्या कामांना न्याय मिळत आहे. रस्त्यांच्या कामाची चौकशी गेल्या 4 महिन्यापासून सुरु आहे. रस्त्यांच्या कामामध्ये मोठा घोटाळा उघडकीस आलेला आहे. गेल्या 5 वर्षाच्या काळात महानगरपालिकेने 15 हजार कोटी रुपये रस्त्यांच्या कामासाठी खर्च केलेला आहे. मुंबई शहरातील एकही रस्ता टेंडर कंडिशनप्रमाणे झालेला नाही. एक जरी रस्ता टेंडरमधील कंडिशनप्रमाणे केलेला असेल तर मी भविष्यात कोणत्याही निवडणुका लढविणार नाहीत. महानगरपालिकेतील महापौर किंवा स्थायी समितीच्या अध्यक्षांनी याकडे कधीच लक्ष दिलेले नाही. ही चूक कोणाची आहे. यावर मी भाष्य करणार नाही.

3C-1.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनिल प्रभू : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.अस्लम शेख हे या सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. सन्माननीय सदस्य मुंबई शहरातील रोडच्या कामाचे वर्णन करीत आहेत. त्या कामांवर महानगरपलिकेचे महापौर, स्थायी कमिटीचे अध्यक्ष, नगरसेवक यांनी लक्ष दिले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. या सभागृहाची दिशाभूल करणारे त्यांचे वक्तव्य आहे. अध्यक्ष महाराज, आपण विधानसभेच्या या सर्वोच्च आसनावर बसला आहात. आपणही कधी काळी मुंबई महानगरपालिकेचे नगरेसेवक होता. सुधार समितीचे अध्यक्ष आपण होता. या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्य मुंबई महानगरपालिकेत कामकाज करुन येथपर्यंत आलेले आहेत. या रस्त्याच्या कामांना मंजुरी देण्याची न देण्याची जबाबदारी सभागृहाची असते. त्यावर पर्यवेक्षण करणे, ते काम बरोबर चालले आहे की नाही हे बघणे, हे प्रशासनाचे काम आहे. प्रशासन अधिकाऱ्यांना महानगरपालिकेच्या करातून जो पगार मिळतो, त्या मोबदल्यात सुपरव्हिजन करुन हे काम करायचे असते. सन्माननीय सदस्य श्री.अस्लम शेख केव्हापासून 20 वर्षे 20 वर्षे असा उल्लेख करीत आहेत. आपण देखील त्या ठिकाणी विरोधी पक्षात होता. सत्ताधारी पक्षापेक्षा विरोधी पक्षाची जबाबदारी जास्त असते. आपले तेथिल विरोधी पक्षनेते, स्थायी समितीचे सदस्य हे त्यावेळी काय करीत होते, हा माझा प्रश्न आहे. केवळ विरोधाला विरोध करायचा, सभागृहाची दिशाभूल करायची, आपण काही फार मोठे करतो आहोत, असे दाखविणे, हे या सभागृहात उचित नाही. सभागृहाची चर्चा वेगळ्या दिशेने जात आहे. आपण जे मुद्देसुद बोलणार त्याचे निश्चितच आम्ही स्वागत करु परंतु नको त्या गोष्टी रेकॉर्डवर आणणे चुकीचे आहे. म्हणून ते मुद्दे रोकॉर्डवरुन काढून टाकावे, अशी माझी मागणी आहे.

श्री.अस्लम शेख : अध्यक्ष महाराज, मी माझ्या भाषणात असे कोठेच सांगितले नाही की यांचा संबंध आहे. मी एवढेच सांगत होतो की, स्थायी समितीचे अध्यक्ष तथा महापौर यांना त्याचे वाईट वाटले असेल, परंतु विद्यमान महापौरांनी रोडच्या कामासंदर्भात घोटाळे होत आहेत, अशी तक्रार केली आहे. महापौर मान्य करतात परंतु आपण का मान्य करीत नाहीत? महापौरांनी स्वतःच सांगितले आहे की, रोड डेलिब्रेज झालेले आहेत. आपला महापौरांवर विश्वास नाही काय? मला कोणावरही प्रति आरोप करायचा नाही. मला फक्त रोडच्या बाबतीत एवढेच म्हणावयाचे आहे. मी एवढे ठामपणे बोलत असताना त्यामध्ये तथ्य आहे. पंधरा हजार कोटी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अस्लम शेख....

रुपयांपेक्षा जास्त रक्कम या मुंबई शहरातील रोडसाठी खर्च झालेले आहेत. पाच हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त फक्त व्हेरिएशनच्या कामासंदर्भात घोटाळे झालेले आहेत. रोड बनविण्यासाठी 100 कोटी रुपयांचे टेंडर आपण करतो. ते 100 कोटी रुपये संपल्यानंतर दुसरे 100 कोटी रुपयांचा व्हेरिशनचा प्रस्ताव मंजूर करतो. आपण मुंबई शहरातील कोठलाही एक रोड दुरुस्तीसाठी घेतला तर त्यासाठी तात्पुरते 100 कोटी रुपये खर्च करणार असाल त्याऐवजी 105 कोटी रुपये खर्च झाले तर आम्ही समजू शकतो, परंतु 5 टक्क्याऐवजी 300 टक्क्यापर्यंत व्हेरिएशन झालेले आहे, हे सर्व बाहेर येण्याची गरज आहे. गेल्या चार महिन्यापासून या मुंबई महानगरपालिकेत श्री.देशमुख साहेबांनी रोडच्या प्रकरणांची चौकशी सुरु केली आहे, परंतु त्या चौकशीचा अहवाल बाहेर का येत नाही? हे बजेट अधिवेशन सुरु होऊन पंधरा दिवस झाले, हा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवायला एवढा वेळ का लागतो? अजून किती वर्षे लागणार आहेत? जे कोणी दोषी असतील त्यांचेवर कारवाई झाली पाहिजे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी एकही रोड पूर्ण झालेला नाही असे स्पेसिफिक सांगितले आहे. रोड पीसीसी करण्यासाठी जे स्टिल वापरावयाचे असते, ज्या पध्दतीने मेन्टेनन्स करायचा असतो, तसे काहीही झालेले नाही. या सर्व तक्रारी आल्यानंतर 30 जागांपेक्षा जास्त ठिकाणी ट्रायल पीट करण्यात आले. परस्पर मुंबई शहरात रोडच्या नावे फक्त 5 टक्के ट्रायॅल पीट करुन हे प्रकरण संपविण्याचे काम चालू होते. यामध्ये पाच ठेकेदारांपैकी केवळ दोन ठेकेदारांना फसविण्याचा प्रकार चालू होता. रोडच्या बाबतीत जेवढे ठेकेदार आहेत, ते कोठे ना कोठे तरी गुंतलेले आहेत. जेवढी ट्रॉयल पीट झालेली आहेत, तेथे 100 टक्के चुकीचे झालेले आहे. मुख्यमंत्री महोदय या प्रकरणात कोणाच्या पाठीशी उभे राहिलेले नाहीत. या रोडचा चौकशी अहवाल हे अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहात काय? ज्या अधिकाऱ्यांनी चूक केली असेल, त्यांचेवर कारवाई होणार आहे काय? या प्रकरणामध्ये एसआयटी चौकशी करणार आहात काय? या बाबींचा खुलासा होणे गरजेचे आहे. आज मुंबई शरामध्ये सरळ चालता येत नाही.

अध्यक्ष महाराज, युपीए सरकारने हॉकर्स पॉलिसी फ्रेम केली होती, परंतु त्यानंतर अंमलबजावणी करण्याचे काम मुंबई महानगरपालिकेचे आहे. एकदा पॉलिसी फ्रेम केल्यानंतर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अस्लम शेख...

त्याची जबाबदारी मुंबई महानगरपालकेची आहे. मुंबई महानगरपलिका ऐकत नाही म्हणून लोक कोर्टात गेले आणि कोर्टाने आदेश दिले की, मुंबई शहरात हॉकर्ससंबधी टीसीएसने जो सर्व्हे केला होता, त्यादृष्टीने त्यांना बसविण्याची व्यवस्था करावी. मुंबई महानगरपालिकेने कोठलेही पॉलिसी करायची नाही. अधिकाऱ्यांना हॉकर्सवाल्यांचे सामान उचलावयाचे, त्यांना मारायचे असे प्रकार सर्रासपणे सुरु आहेत. मुंबईमध्ये हॉकर्स पॉलिसी कोठे झाली असेल तर ती फक्त शीव वडापावच्या नावाने झालेली आहे. ज्या कामासाठी त्यांना जागा देण्यात आली, ते काम तेथे होत नाही. केंद्र सरकारने तसेच हाय कोर्टाने जी पॉलिसी तयार केलेली आहे, त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले की, आम्ही यासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांकडे गेलो आणि त्यांना सांगितले की, हॉकर्स पॉलिसी निर्माण केली पाहिजे. या मुंबई शहरात जेवढे स्विमींग पूल, आर.जी. पी.जी. प्लॉट ज्या पक्षाच्या सदस्यांनी घेतले असतील ते सर्व परत घेण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती उत्तम असून या जागांवर लोकांना सोई सुविधा देण्याचा प्रयत्न करावा. "दूध का दूध और पाणी का पाणी " असे सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार बोलत होते.

अध्यक्ष महाराज, या मुंबई शहरात डी.पी. प्लॅनचे काम सुरु आहे. गेल्या पंधरा वर्षात या मुंबई शहरात एकाही ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेले नाही. आपण मुंबई शहरातील मुख्य रस्त्यांवर किंवा अंतर्गत रस्त्यावरील पार्किंग पाहता लोकांना सरळ चालता येत नाही. गेली 20 वर्षे मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त काय करीत आहेत? ज्या विकासकाना पार्किंग करण्यासाठी एक्स्ट्रॉ एफएसआय दिला, त्यांनी तयार केलेली पार्किंग आपण घेऊ न शकल्यामुळे त्या बिल्डरांनी ते पार्किंग लोकांना विकून टाकली आहे. या निमित्ताने माझी शासनास विनंती आहे की, मुंबई शहराचा नवीन डी.पी. प्लॅन तयार होत आहे, त्यामध्ये जास्तीत जास्त पार्किंग, जास्तीत जास्त खेळाची मैदाने आरक्षित केली पाहिजेत. आज जर आपण हे करु शकलो नाही तर येणाऱ्या 20 वर्षात आपल्याला ही व्यवस्था करता येणार नाही. मुंबई शहराचा डी.पी. प्लॅन लवकरच जाहिर करण्याची आवश्यकता आहे. मुंबईमध्ये जे डेव्हलपमेंट करण्यात येत आहे त्यामध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अस्लम शेख...

पुनर्विकासाचीच कामे आहेत. आता हाय कोर्टाची ऑर्डर आलेली आहे. गेल्या चार वर्षापासून सर्व बांधकामे ठप्प झालेली आहेत. या मुंबई शहरात रि-डेव्हलपमेंटची सर्व कामे बंद झालेली आहेत. मुंबई महानगरपालिका कोठल्याही मूलभूत सुविधा उपलब्ध करीत नाही. एका बाजूला आपण मुंबई शहराला स्मार्ट सिटीच्या यादीमध्ये घेतलेले आहे. आपण देशात एक क्रमांकाचे मुंबई शहर बनविणार आहात. येथे इमारतीचा पुनिर्वकास आपण करु श्कत नाही. येथे स्थानिक मूलभूत सोई सुविधा आपण उभ्या करु शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री.जाधव यांच्या विभागाचा जसा समुद्राला तट लागतो तसा माझ्याही विभागाला लागतो. गेल्या 20 वर्षामध्ये टुरिझमच्या नावाखाली काय डेव्हलपमेंट करण्यात आले? इंटरनॅशनल एअरपोर्टवर उतरल्यानंतर मुंबई मध्ये जाण्यासाठी रस्ताच डेव्हलप करण्यात आलेली नाही. माझ्या मालाड मतदारसंघामध्ये टुरिझमसाठी एक जागा आरक्षित केलेली आहे ती डेव्हलप करण्याची नितांत आवश्यकता आहे. अध्यक्ष महाराज, मला आणखी काही मुद्दे मांडावयाचे होते, परंतु वेळेअभावी मांडता आले नाहीत. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पुरे करतो.

यानंतर 3D-1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी मांडलेल्या म.वि.स. नियम 293 अन्वयेच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्याकरिता मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी कोकणामध्ये जन्माला आलेल्या रत्नांचा इतिहास सांगितलेला आहे. सरकारने भविष्यात काय केले पाहिजे, या संदर्भात त्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. आमचे दुसरे सहकारी सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनीही मुंबईतील समस्यांबाबतच्या सूचना येथे मांडलेल्या आहेत. मागील सरकारने घेतलेल्या निर्णयावर मतेही मांडलेली आहेत.

अध्यक्ष महोदय, मी कोकणातील जनतेच्या दैनंदिन जीवनातील प्रश्न, अडचणींवर माझे विचार मांडणार आहे. कोकण हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये कोकणी जनतेने शिवसेनेला भरभरुन यश दिलेले आहे. या कोकणामधून कोकणी जनतेने 2 खासदार निवडून दिले. विधानसभेच्या निवडणुकीमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातून 2 आमदार निवडून दिले तर, रत्नागिरी जिल्ह्यातून 3 आमदार निवडून दिले आणि रायगड जिल्ह्यातून 2 आमदार निवडून दिले. अशाप्रकारे या कोकणाने 7 आमदार निवडून दिलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, देशामध्ये सत्ता परिवर्तन झाले. या परिवर्तनाच्या माध्यमातून मंत्रिमंडळामध्ये 3 ज्येष्ठ कॅबिनेट मंत्री तर 2 राज्यमंत्री असे कोकणातील 5 मंत्री आहेत. त्यामुळे या सरकारकडून जनतेच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. मला विश्वास आहे की, या सरकारच्या माध्यमातून भविष्यात विकासाची कामे होतील व मी तसा आशावाद व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, कोकण निसर्गाने सजलेला, नटलेला आणि फुललेला आहे. परंतु, या कोकणावर आज औष्णिक प्रकल्पांचे येऊ घातलेले जे संक्रमण आहे, त्यामुळे भविष्यात हे सौंदर्य नष्ट करण्याचे काम या ठिकाणी होणार आहे. कोकणामध्ये 17 ते 18 औष्णिक प्रकल्प होऊ घातलेले आहेत. मी आपल्याला माहिती सांगू इच्छितो की, रायगड जिल्ह्यामध्ये 1 हजार मेगावॉटचा इस्पातचा प्रकल्प होणार आहे. रायगड जिल्ह्यात रिलायन्स, पटणी, टाटा यांच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजन साळवी .....

माध्यमातून 9100 मेगावॉटचा प्रकल्प होणार आहे. दाभोळच्या धोपावेच्या माध्यमातून 1600 मेगावॉटचा प्रकल्प होणार आहे. दापोली तालुक्यामध्ये भोपनमध्ये 1980 मेगावॉटचा प्रकल्प होणार आहे. जयगडमध्ये 4400 मेगावॉटचा प्रकल्प होणार आहे. रणपारमध्ये 1043 मेगावॉटचा प्रकल्प होणार आहे. देवगडमध्ये आजगावमध्ये जवळपास 17 ते 18 औष्णिक प्रकल्पांच्या माध्यमातून 33 हजार मेगावॉट इतकी वीज निर्मिती होणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी आपले याकडे लक्ष वेधू इच्छितो की, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये आज आपण पाहिले तर पोफळीच्या माध्यमातून 1920 मेगावॉट इतकी वीज निर्मिती होणार आहे. जिंदालच्या माध्यमातून 1200 मेगावॉट इतकी वीज निर्मिती होणार आहे. दाभोळच्या माध्यमातून 2 हजार मेगावॉट इतकी वीज निर्मिती होणार आहे. याचा अर्थ 5920 मेगावॉट विजेची निर्मिती या जिल्ह्यात होणार आहे. आज जिल्ह्याकरिता फक्त 88 मेगावॉट इतक्या विजेची गरज आहे. उर्वरित वीज निर्मिती जिल्ह्याच्या बाहेर दिली जाते, हा देखील एक महत्त्वाचा मुद्दा आहे. कोकणातील या प्रकल्पांच्या माध्यमातून 33 हजार मेगावॉट इतकी वीज निर्मिती होणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये दिवसा होणारी वीज निर्मिती 16500 मेगावॉट इतकी आहे. रात्री होणारी वीज निर्मिती 14500 मेगावॉट इतकी होणार आहे. अशाप्रकारे 31 हजार मेगावॉट इतकी वीज निर्मिती होणार आहे. महाराष्ट्राला जितक्या विजेची गरज आहे ती, सध्याच्या वीज निर्मितीतून पूर्ण होत आहे त्यामुळे त्याकरिता नवीन प्रकल्पाची गरज नाही, असे माझे मत आहे. संपूर्ण महाराष्ट्र वीज निर्मितीच्या बाबतीत परिपूर्ण असतानाही परदेशी कंपनीच्या बहिष्कृत केलेल्या जैतापूरसारख्या संहारक अणुऊर्जा प्रकल्पाची आपल्याला गरज आहे काय ?

अध्यक्ष महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, रत्नागिरी जिल्ह्यात माझ्या मतदारसंघात जैतापूरचा अणुऊर्जा प्रकल्प केंद्र शासनाने होऊ घातलेला आहे. जगातील सर्वात मोठा जैतापूरचा प्रकल्प या ठिकाणी होणार आहे. 10 हजार मेगावॉट इतकी वीज निर्मिती या प्रकल्पाच्या माध्यमातून होणार आहे. 1 लाख 80 हजार कोटी रुपये खर्च त्याकरिता खर्च होणार आहेत. आज आपण पाहिले तर, एवढा मोठा प्रकल्प होतो आहे परंतु, या प्रकल्पाची गरज नाही असे माझे म्हणणे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजन साळवी .....

आहे. भविष्यात हा प्रकल्प उभा राहीला आणि दुर्दैवाने समजा त्या ठिकाणी एखादा भूकंप झाला कारण हे क्षेत्र भूकंपप्रवण 4 या क्षेत्रात येते, त्यामुळे समजा त्या ठिकाणी भविष्यात भूकंप झाला किंवा जपानमध्ये अणुभट्टयांचा स्फोट झाल्यानंतर जसे जनजीवन विस्कळीत झाले, जसे हजारो, लाखो लोक मृत्युमुखी पडले त्या पार्श्वभूमीवर गोव्यापासून कोकणासहीत मुंबईसहित कोकण किनारपट्टीवर समजा भविष्यात अशाप्रकारच्या प्रकल्पाच्या माध्यमातून अणुभट्टयांचा स्फोट झाला तर संपूर्ण कोकण, मुंबई उद्ध्वस्त होईल. याकरिता या अणुऊर्जा प्रकल्पाला स्थानिक जनतेने विरोध केलेला आहे. माझी विनंती आहे की, भविष्यामध्ये राज्य सरकारने केंद्र सरकारकडे विनंती केली पाहिजे की, असा अणूऊर्जा प्रकल्प हा विनाशकारी आहे. या प्रकल्पामुळे माझा आंबा बागायतदार शेतकरी, माझा मच्छीमार उद्ध्वस्त होणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प रद्द झाला पाहिजे ही आमची एकमुखी मागणी आपल्याकडे आहे.

अध्यक्ष महोदय, या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी कोकणातील अनेक महत्त्वाच्या विषयांना स्पर्श केलेला आहे. परंतु, तेथील जनतेच्या दैनंदिन जीवनाशी संबंधीत असलेले काही विषय मी या ठिकाणी मांडू इच्छितो. त्यामध्ये महत्त्वाचा विषय म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यामध्ये मासेमारी हा महत्त्वाचा व्यवसाय आहे. या रत्नागिरी जिल्ह्यात दोन प्रकारे मच्छीमारी करणारे मच्छीमार आहेत, एक पारंपारिक मच्छीमारी करणारे व एक पर्सिसन नेट मच्छीमारी करणारे मच्छीमार आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर म्हणजे 90 टक्के मच्छिमार हे पर्सिसन नेटने मच्छीमारी करणारे आहेत.

अध्यक्ष महोदय, सन 1997 मध्ये पर्सिसन नेटवर बंदी घालण्यात आली. त्यावेळेस मच्छीमार संघ न्यायालयात गेले आणि पुन्हा पर्सिसन नेट मच्छीमारी सुरु झाली. त्यावेळेस सरकारने जाहीर केले, डॉ. सोमवंशी समिती निर्माण केली, त्या समितीचा अहवाल दिनांक 5 फेब्रुवारी, 2016 रोजी लागू

झाला. या निर्णयाप्रमाणे महत्त्वाची अट घालण्यात आली ती म्हणजे पूर्वी मासेमारीची मुदत 1 सप्टेंबर ते 31 मे अशी होती, तो कालावधी 5 महिने कमी करुन त्यांनी 1 सप्टेंबर ते 31 डिसेंबरपर्यंत मुदत घातलेली आहे. त्यामुळे हा मच्छीमार उद्ध्वस्त झालेला आहे. गेले 2 महिने ही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजन साळवी ....

संपूर्ण मच्छीमारी बंद पडलेली आहे. त्यामुळे सर्व आर्थिक यंत्रणा, परकीय चलन बंद पडलेले आहे. मुख्यमंत्री महोदयांच्या दालनात याबाबत बैठक झाली होती. त्या बैठकीत मुख्यमंत्री महोदयांनी आम्हाला शब्द दिला होता आणि म्हणून माझी विनंती राहणार आहे की, ही मागणी महत्त्वाची आहे मासेमारीची मुदत 1 सप्टेंबर ते 31 मे पर्यंत व्हावी, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, ऑनलाईन 7/12 देण्याबाबतचा विषय आहे. महाराष्ट्रामध्ये सर्व तालुक्यांमध्ये ऑनलाईन 7/12 देणे सुरु झालेले आहे. माझ्याही मतदारसंघात लांजा तालुक्यात प्रथम ऑनलाईन 7/12 देणे सुरु झाले. परंतु, इंटरनेटची सुविधा योग्यरितीने मिळत नसल्याने जनता हैराण झालेली आहे, खरेदीखत, महसूल थांबलेला आहे. या संदर्भात माननीय महसूल मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांच्या दालनात एक बैठक झाली होती, त्या बैठकीत मंत्री महोदयांनी सांगितले की, हे होत नसेल तर हस्तलिखित करावे.

अध्यक्ष महोदय, तहसीलदारांनी ग्रामपंचायत हद्दीतील घरबांधणी, घरदुरुस्तीचे परवाने देण्याचे अधिकार ग्रामपंचायतीकडून काढून घेऊन ते प्रांत अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. या संपूर्ण कोकणातील स्कॅटर्ड भाग पाहिला तर आमच्या रत्नागिरी जिल्ह्यामध्ये 1500 बिगर गावठाणे आहेत. गावठाणे फक्त 150 आहेत. याकरिता माझी विनंती आहे की, कोकणामध्ये गावठाण क्षेत्र कमी असल्यामुळे ग्रामपंचायतींना घरबांधणी व दुरुस्ती अधिकार देणे गरजेचे आहे. या संदर्भात मंत्री महोदया श्रीमती पंकजा मुंडे यांच्याबरोबर आमची बैठक झाली होती. त्या बैठकीत हा प्रश्न मांडला होता. मंत्री महोदयांनी आम्हाला शब्द दिलेला आहे की, कोकणाकरिता ही अट शिथिल केली जाईल आणि पुन्हा एकदा ग्रामपंचायतीला हे अधिकार दिले जातील, अशाप्रकारचा मुद्दा या ठिकाणी निश्चितपणे आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजन साळवी.....

अध्यक्ष महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा आहे. कोकणामध्ये आंबा, काजुचे प्रचंड नुकसान झालेले आहे. अतिवृष्टी झाली, हवामानामध्ये बदल होऊन नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली, ही वस्तुस्थिती आहे. परंतु सर्व्हे झाला, पंचानामे झाले त्यावेळी नुकसान भरपाईच्या नोंदीमध्ये असंख्य शेतकरी वंचित राहिलेले आहे. त्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून तालुका पातळीवर, गाव पातळीवर सर्व्हे करण्यात आला. सदरहू सर्व्हेचा अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडून सरकारकडे आलेला आहे. भविष्यामध्ये जो निधी आलेला आहे, जो निधी शिल्लक राहिलेला आहे, त्या माध्यमातून उर्वरित वंचित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, राजापूर मतदार संघामध्ये लघुसिंचनाचे 9 प्रकल्प सुरु झाले. लोकांकडून जागा संपादीत करण्यात आली. प्रकल्पाचे काम सुरु झाले परंतु आता ते निधी अभावी बंद पडलेले आहे. लोकांकडून जागा घेतल्या, जमिनी घेण्यात आल्या व त्यानंतर काही प्रगती होत नाही. मुख्यमंत्री महोदय आमच्या जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता यासंदर्भात त्यांना विनंती करण्यात आली होती व त्यांनी मान्य देखील केले होते. जे प्रकल्प बंद आहेत, ज्या प्रकल्पांना निधी नाही, त्याकरिता निश्चितपणे निधी देण्यात येईल, असे त्यांनी अभिवचन दिले होते. त्यामुळे त्यासंदर्भातील निधी देण्यात यावा, अशी मी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, कोकण विभागासाठी स्वतंत्र विद्यापीठ करण्यात यावे, अशी मागणी होत आहे. कोकणचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने कोकणचे स्वतंत्र विकास महामंडळ करण्यात यावे, अशी देखील आमची मागणी आहे. कोकणचे नेते शामराव पेजे आर्थिक विकास महामंडळाला भरीव निधी देण्यात येईल, असे मुख्यमंत्री महोदयांनी रत्नागिरी जिल्हा दौऱ्यावर असताना सांगितले होते. त्याची देखील तरतूद केल्याचे दिसत नाही. त्याकरिता निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. पर्यटन, सीआरझेडमध्ये बदल, दुग्ध विकास प्रकल्प असे अनेक विषय आहेत. कोकणाच्या हिताच्या दृष्टीने जे महत्वाचे विषय असतील त्या सर्व बाबतीत निश्चितपणे आपल्याकडून योग्य तो निधी दिला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. राजन साळवी.....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी या ठिकाणी विषय मांडला होता. मुंबई-गोवा महामार्गाची सद्यस्थिती काय आहे, यासंदर्भात ते बोलले. मी अभिमानाने सांगेल की, देशामध्ये परिवर्तन झाले. देशामध्ये माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांचे सरकार आले. त्यानंतर तातडीने आमचे केंद्रीय मंत्री माननीय श्री. अनंतराव गिते, माननीय खासदार श्री. विनायक राऊत यांनी पुढाकार घेऊन सर्व संबंधितांच्या बैठका घेऊन माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या माध्यमातून भूमीपूजन केले ही वस्तुस्थिती आहे. आज पाहिले तर कोकणामध्ये म्हणजेच मुंबईपासून लांजापर्यंत 21 पुलांचे भूमिपूजन होऊन त्या पुलांचे काम पुर्णत्वाकडे चालले आहे. म्हणजे परिवर्तन झाले आहे. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या सरकारच्या माध्यमातून कोकण किनारपट्टीला लागून असलेल्या समुद्राच्या माध्यमातील प्रकल्प निश्चितपणे आहे. कोकणाच्या दृष्टीने आम्ही मांडलेल्या प्रश्नांना न्याय देण्यात यावा, अशी विनंती करतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

---*---

...3/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धैर्यशिल पाटील (पेण) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम 293 वरील प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, कोकण म्हणजे काय, तर कोकण म्हणजे 25, 30 किलोमीटर रुंदीची, 720 किलोमीटर लांबीची एक किनारपट्टी आहे. असे म्हणतात की, अगस्तीऋषींनी समुद्र पिऊन घेतला आणि त्यातून समुद्राचा जो तळ उघडा पडला त्याला अप्रांत म्हणतात आणि अप्रांत म्हणजे कोकण, अशा पद्धतीची एक अख्यायिका आहे.

अध्यक्ष महोदय, वनस्पती असो, कला असो, बुद्धी असो, ही सर्व ऐश्वर्य आम्हाला देवाने अक्षरशः भरभरुन दिली. देवाने आम्हाला श्रीमंती दिली नाही, परंतु ऐश्वर्य दिले, सुख दिले, संपन्नता दिली. आजची चर्चा मुंबई आणि कोकण यासंदर्भात आहे. मुंबई हे पूर्वी छोटेसे बेट होते. मुंबई विकसित होत असताना या छोट्या बेटाचे चांगले बंदर, औद्योगिक केंद्र अशा माध्यमातून भरभराट झाली. अशी भरभराट होत असताना, मुंबईच्या आसपासच्या परिसरावर देखील त्याचा फरक पडला. असे म्हटले जाते की, वडाचे झाड मोठे होते तेव्हा ते आसपासचे कोणतेही झाड, वृक्ष जगू देत नाही. लहान झाड तेथे उगू शकत नाही. मोठ्याशहरांचे देखील असेच असते. मोठी शहरे ज्या बुद्धीसंपदेच्या जोरावर विकसित होत असतात, ज्या पाण्याच्या जोरावर विकसित होतात, ज्या मनुष्यबळावर विकसित होतात, ज्या वेगवेगळ्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या जोरावर विकसित होतात. त्यांच्याकडून ही साधनसंपत्ती कुठूनतरी एकत्रित केली जात असतो. ज्या पद्धतीने एखादा सेक्शन पंप आपली ताकद वापरुन आसपासचे सर्व ओढून घेतो, त्या पद्धतीने मोठी शहरे त्यांच्या आसपासचे सर्व ओढून घेत असतात. मुंबई विकसित झाली. मुंबईने आमच्या कोकणाला फार मोठा आधार दिला. आम्ही कोकणातील मंडळी म्हणतो की, कोकण आमची आई असेल तर मुंबई आमची मावशी आहे. या मावशीने मावशीची भूमिका नेहमी बजावलेली आहे. परंतु मावशीची भूमिका बजावत असताना, ही मुंबई विकसित होत असताना, मुंबईने आसपासच्या कोकणातील काय, काय घेतले आहे, याचा देखील विचार करावा लागणार आहे. मुंबई बद्दल योग्य तो आदर बाळगत, मुंबईने काय घेतले आणि आपल्याला काय दिले याचा मुंबईतील आसपास रहाणारी रायगडची मंडळी हिशोब मांडते आणि त्यावेळी आम्हाला काय वाटते ते देखील या चर्चेच्या माध्यमातून मांडायचे आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धैर्यशिल पाटील.....

अध्यक्ष महोदय, असे म्हणतात की, शेजारी सुखी असेल तर आपले आयुष्य सुखी. शेजाऱ्याच्या घरात दारिद्र्य असेल आणि आपल्याच घरात श्रीमंती असेल तर त्या दारिद्र्याचा चटका आपल्याला सहन करावा लागतो. मुंबई वाढली, मुंबई आर्थिक केंद्र झाले, मुंबईमध्ये मोठमोठे टॉवर्स उभे राहिले, परंतु या टॉवर्सला पाणी कुठून आले, याचाही विचार व्हायला पाहीजे. मुंबईला आलेले पाणी ठाणे आणि रायगड जिल्ह्यातून आलेले आहे. कोकणाला सिंचनाचा बॅकलॉग नाही, असे म्हणतात. कोकणाला पाटबंधारेचा बॅकलॉग नाही, असेही म्हणतात. परंतु कोकणाला सिंचनाचा बॅकलॉग आहेच, परंतु कोकणाला धरणांचा बॅकलॉग नाही. कोकणामध्ये धरणे झाली. आपण कोकणाकडे निघाल्यावर रत्नागिरी जिल्ह्याची हद्द सुरु झाल्यावर "नातू सागर" नावाचे एक धरण आहे. हे धरण कोकणामधील मुंबईनंतरचे 200 किलोमीटरवरील पहिले धरण आहे की, त्यातील पाणी सिंचनाकरिता वापरण्यात येते. अन्यथा ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील प्रत्येक धरण हे सिंचनाच्या नावाखाली झाली, काही मुंबईला पाणी देण्याच्या नावाखाली तर काही औद्योगिकरणाला पाणी देण्याच्या नावाखाली झाली. परंतु सिंचनाला झालेल्या धरणांनी कोकणामध्ये सिंचन केले नाही तर त्या धरणांचे पाणी मुंबईला वापरण्याकरिता मिळाले. याचा परिणाम असा झाला की, आमची शेती कधीच फुलली नाही आणि मुंबईतील पैसेवाले न फुललेली आमची शेती विकत घेण्याकरिता खिशामध्ये बंडलं घेऊन आमच्या कोकणामध्ये हजर झाला.

अध्यक्ष महोदय, गेल्या 100 वर्षांपासून आम्ही आमच्या मावशीकडे येतोच, ही मावशी आम्हाला जगवत आहे, म्हणजेच मुंबई आम्हाला जगवत आहे. परंतु याचा दुसरा परिणाम असा देखील झाला की, आमच्या कोकणातील मुलगा शिकला व नोकरी करण्याकरिता मुंबईत आला, त्यामुळे कोकणामध्ये बौद्धिक संपदा राहिली नाही. मुंबईने स्वत:चे ऐश्वर्य आणि संपन्नता गोळा करीत असताना या उभ्या कोकणामधील नैसर्गिक साधनसंपत्ती घेतली, स्वीकारली, शोषली त्यामुळे कोकणाचा विकास होऊ शकला नाही, ही वास्तविकता असून ती आपण स्वीकारली पाहीजे. आमच्याकडे लोक आत्महत्त्या करीत नाही. याला कारण असे आहे की, देवाने आम्हाला जगण्यापुरते दिलेले आहे. देवाने जगण्यापुरते दिलेले शासनाने टिकवले नाही, तर आमच्यावर देखील तशीच वेळ येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धैर्यशिल पाटील.....

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जाधव साहेबांनी सांगितलेली बाब खरी आहे. कोकणामध्ये काय नाही. कोकणामध्ये संगीत आहे, खेळ आहे, शुरविर आहेत, राजकीय नेते आहेत, वक्ते आहेत. कोकणामध्ये सर्व पद्धतीची संपदा आहे. कोकणामध्ये काय नाही, असे नाही. परंतु हे जपले पाहीजे. अशा पद्धतीने मुंबई शोषण करीत राहिली तर, मुंबईने आम्हाला परतावा दिला पाहीजे. समतोल विकासाचा असा सिद्धांत आहे की, फॉरवर्ड लिंकेजेस जेवढे स्ट्रॉंग आहेत, तेवढेच बॅकवर्ड लिंकेजेस स्ट्राँग असले पाहीजेत. म्हणजे काय तर आपले बापजादे एक म्हण वापरतात, "दिल्या घेतल्याची दुनिया". म्हणजेच जेवढे दिले पाहीजे तेवढे घेतले पाहीजे, जेवढे घेतले पाहीजे तेवढे दिले पाहीजे.

...3F/-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धैर्यशील पाटील.....

तर ते संबंध व्यवस्थित रहतात, तर तो विकास समतोल राहतो, शाश्वत राहतो.

अध्यक्ष महोदय, मुंबईतील औद्योगिकीकरण 40-50 वर्षापूर्वी मुंबईच्या बाहेर पडले त्यावेळी ते पहिल्यांदा आमच्या रसायनीमधील धाटाव एमआयडीसीमध्ये आले. त्यानंतर ते आमच्या महाड व लोटेपरशुराम येथे गेले. मुंबईला ताकद देणाऱ्या या कारखान्यांची कार्पोरेट ऑफिसेस मुंबईत आहेत, त्यांचे पैसे मुंबईमध्ये येतात परंतु हे कारखाने घाण आमच्या कोकणात सोडतात. या केमिकल कारखान्यामुळे अतिशय वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे.

अध्यक्ष महोदय, श्रीमती लता मंगेशकर यांचा जन्म कोकणामध्ये झाला, श्री.सुनील गावस्कर यांचा जन्म कोकणामध्ये झाला, श्री.देशमुख साहेबांसारखे अर्थ तज्ज्ञ कोकण मध्ये जन्माला आले. कोकण सुखी का आहे, कोकण भागामध्ये का कोणी आत्महत्या करीत नाही ? कारण देवाने कोकणाला खान्या-पिण्याकरिता व जगण्यापुरते व्यवस्थित दिले आहे. आमचे बाबा ज्यावेळी आमची सुट्टी पडत त्यावेळी आम्हाला म्हणायचे गावाला चला. आम्ही पेण या तालुक्याच्या ठिकाणाहून आमच्या गावाला जात असत. गावाला गेल्यानंतर आम्हाला खाण्या-पिण्याकरिता एक रुपया खर्च येत नसत. खाण्यासाठी आम्हाला सुकी मासळी, मागच्या परसामध्ये असलेला आंबा व चिंच, विहिरीचे थंड पाणी मिळत असत. नद्या आटू लागल्या की त्यामधील मासे खाण्यासाठी मिळत, पेणला परत येईपर्यंत आम्हाला एक पैसा खर्च करावा लागत नव्हता. अशी आमची कोकणाची संपन्नता हळूहळू औद्योगिकीकरणामुळे बिघडत आहे.

अध्यक्ष महोदय, कोकणातील सर्व उद्योग पूर्वी निसर्गाच्या आधारावर होते. मासे, भात, आंबे, जांभळे, आटोरणे, शेंबडी नावाची फळे आम्हाला मुबलक प्रमाणात खाण्यासाठी उन्हाळयात मिळत, त्यावर आधारित तेथील लोक व्यवसाय करीत असत. परंतु हे निसर्गावर आधारित असलेले सर्व धंदे प्रदूषणामुळे गेले. रयासनी येथे कारखाना आल्यानंतर आमचा शेतकरी त्याला भुलला. त्याला वाटले पोरगा शेतामध्ये काम करीत नाही तर तो कारखान्यामध्ये स्टूलवर बसून आरामात पगार घेईल. म्हणून त्यावेळी त्यांनी कारखान्याला विरोध केला नाही. या कारखान्यांनी सोडलेल्या घाण पाण्यामुळे खाडी प्रदूषित झाली. त्याच बरोबर त्या खाडीतील मासे मेले, डूबीची वाळू

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धैर्यशील पाटील.....

काढणारा कामगार त्वचा रोगाने हैरान झाला, खाडीच्या गोड्यापाण्यावरील शेती गेली. कारखान्यामुळे 10 लोकांना रोजगार मिळाला व हजार लोकांचा उद्योग बुडाला. ही सर्व मंडळी पुन्हा मुंबईमध्ये रोजगारासाठी आली. मुंबईने त्यांना सांगितले की आम्ही तुम्हाला जगवतो. "मुंबई आमची आणि भांडी घासा तुमची" असे धन दांडगे अभिमानाने आमच्याबद्दल बोलू लागले.

अध्यक्ष महोदय, मुंबई आमची मावशी आहेच पण आमच्या आईला आम्हाला मरु देता येणार नाही. कोकणातील साधनसंपत्तीच्या जीवावर मुंबई मोठी झाली त्या मुंबईने कोकणाचा मान राखला पाहिजे. त्यासाठी काय करावयास पाहिजे हे सन्माननीय सदस्य तथा माजी मंत्री श्री.भास्कर जाधव यांनी सभागृहात सांगितले आहे. ही दिल्या घेतल्याची दुनिया आहे. जेवढे आमच्याकडून घेतले तेवढे आम्हाला परत मिळाले पहिजे. ते तुम्ही आम्हाला नोकरीच्या माध्यमातून परत द्या. आम्ही मुंबईला बाळगंगा धरणातून पाणी देतो. माझ्या मतदार संघामध्ये दोन धरणे असून मी त्यामुळे दोन वेळा विस्थापित झालेलो आहे. हेटवणे धरण हे सिंचनाकरिता बांधण्यात आले, आमच्या शेती सिंचनाकरिता आरक्षित म्हणून कागदपत्रावर शिक्के मारण्यात आले. पण या धरणाचे पाणी मुंबईला दिले जाते.

अध्यक्ष महोदय, आता बाळगंगा धरण बांधण्यात येत आहे. हे धरण डिपॉझिटरी वर्क म्हणून बांधण्यात येत आहे. या धरणातील पाण्याचा साठा वाणिज्यिक कारणास्तव मुंबईमध्ये वापरण्यात येणार आहे. याचा अर्थ असा की, या पाण्याच्या जोरावर मुंबईची वाणिज्यिक भरभराट होणार आहे व ती आमचे घर मोडल्याने होणार आहे. तुम्ही आमच्या घराचे, जमिनीचे पैसे देणार, पॅकेज देणार हा तर आमचा हक्क आहे. आमचे घर तुम्ही मोडले म्हणून तुम्ही आम्हाला पैसे दिले पाहिजेत, आमची जमीन तुम्ही घेतली म्हणून पैसे दिलेच पहिजेत. ज्या कोकणामध्ये आम्हाला आत्महत्या करावी लागणार नाही असे आयुष्य आम्हाला देवाने, निसर्गाने व आमच्या बापजाद्याने आम्हाला वारसाहक्काने दिले होते. ते तुम्ही आमच्याकडून घेतले त्याबदल्यात तुम्ही आम्हाला काय देणार ? आमचे म्हणणे आहे की, पुनर्वसन करीत असताना आमच्याकडून घर घेतले, जमीन घेतली त्याचे पैसे आम्हाला दिले पण आमच्याकडून तुम्ही संपन्न आयुष्य घेतले त्याबदल्यात तुम्ही आम्हाला काय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धैर्यशील पाटील.....

देणार ? आमच्यामुळे पुन्हा सिडको व मुंबई वाणिज्यिक भरभराट होणार आहे त्यावर आमचा देखील अधिकार आहे, असे आम्हाला वाटते. प्रकल्पासाठी आम्ही फक्त घरे नाही दिली, जमीन नाही दिली तर ज्या पाण्याच्या जीवावर आमच्या बापजाद्यांनी त्याठिकाणी आम्हाला जन्माला घातले आमची वहिवाट रुजू केली त्या पाण्यावर आमचा देखील हक्क आहे. तो हक्क आम्हाला मिळाला पाहिजे, असे माझे म्हणणे आहे.

अध्यक्ष महोदय, सिडकोचे माजी अध्यक्ष श्री.हिंदुराव यांनी सांगितले की, सिडको, ठाणे, नवी मुंबई, मुंबई येथील यासर्व मंडळींना आमच्या शेतकऱ्यांनी पाणी दिले. त्याबद्दल सांगताना ते म्हणाले की, या पाण्याची किंमत सुध्दा आम्हाला दिली पाहिजे. श्री.हिंदुराव बोलले ते सत्ता गेल्यानंतर बोलले. हे विचार त्यांनी अगोदर मांडले असते तर त्याचा अधिक फायदा झाला असता.

अध्यक्ष महोदय, मुंबई व कोकणावर चर्चा होत असताना कोकणाची संपन्नता सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सांगितली आहे, ती खरी आहे, आम्हाला अभिमानास्पद आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबईला सुखी ठेवण्याकरिता, ऐश्वर्य संपन्न ठेवण्याकरिता आम्ही जे-जे दिले ते-ते मुंबईने आम्हाला परत दिले पहिजे. एमएमआरडीएच्या माध्यमातून योजना राबविण्यात याव्यात व त्यातून आम्ही जे काही तुम्हाला दिले ते परत देण्यात यावे. अत्यंत सुखी व ऐश्वर्य संपन्न जगणारी आम्ही माणसे आहोत. आम्हाला तसेच ठेवण्याकरिता योग्य ती धोरणे तयार करण्यात यावीत, अशी अपेक्षा मी या निमित्ताने व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये म.वि.स.नियम 293 अन्वये प्रस्तावावरील चर्चा महत्प्रयासाने उपस्थित केली त्याबद्दल आभार मानून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद !

.....4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभाध्यक्ष (श्री.योगेश सागर) : म.वि.स.नियम 293 अन्वये प्रस्तावावरील चर्चा ऑन लेग ठेवण्यात येत असून त्यावर उद्या विशेष बैठकीमध्ये चर्चा घेण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार दिनांक 5 एप्रिल, 2016 रोजी सकाळी 10 वाजता पुन: भरेल. सकाळी 10 ते 10.45 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यानंतर सकाळी 11 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 47 मिनिटांनी सोमवार, दिनांक 5 एप्रिल, 2016 रोजी सकाळी 10 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION